# ।। जयजय रघुवीर समर्थ ।।

यत्न तो देव जाणावा । यत्नेवीण दरिद्रता ।

आधी तें करावें कर्म ।
कर्ममार्गें उपासना ।

या शरीरयंत्राऐसें
यंत्र आणिक नाहीं ।



प्रपंच करावा नेटका ।

विवेकाचे फळ तें सुख ।

प्रपंची जो सावधान ।

तोचि परमार्थ करील जाण ।



।।श्रीराम समर्थ।।

# श्री समर्थ सेवा मंडळ, सज्जनगड

(रजि.नं.N.S.F./1)
मुख्य कार्यालय : मु.पो.सज्जनगड, ता. व जि. सातारा – ४१५०१३, महाराष्ट्र. फोन : (गड) ०२१६२-२७८०१९
Email : sevamandal@live.com | Mob : 7588352357



हे प्रचितीची उत्तरे | कळती सारासार विचारे | मनन ध्यासे साक्षात्कारे | पावन होईजे ||

'*युवकांचा स्फूर्ती निर्झर*' , या समर्थांच्या निवडक ओव्या असलेल्या पुस्तकातील ओव्या निरूपण इ-पुस्तक प्रसिद्ध करताना मला अतिशय आनंद होत आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने कालजयी समर्थ उक्तीचे असे प्रकटीकरण व्हावे हा एक दैवी संकेतच होय.

समर्थ व्यासपीठाने प्रसिद्ध केलेल्या या पुस्तिकेतील ओव्या, समर्थव्रती सुनील दादा चिंचोलकरांनी निवडलेल्या असून आजच्या तरुणांसाठी समयोचित मार्गदर्शन करणाऱ्या आहेत. त्यावरील विवेचनही युवकांनीच केले असल्यामुळे हा उपक्रम अत्यंत औचित्यपूर्ण साजरा झाला आहे.

दासबोध अध्ययनाच्या अनुषंगाने विविध उपक्रम अभ्यासार्थींच्याकडून करून घेणे हेच आपल्या उपक्रमाचे प्रवर्तक, ती.स्व.अप्पा केळकर यांचे वैशिष्ठ्य होते.आजही आपण त्याच पदचिन्हांवर अग्रेसर होत आहोत, याचे आपल्या पूर्वसूरींना देखील समाधान वाटत असेल.

या उपक्रमाचे आणखी एक वैशिष्ठ्य असे की लेखन करणाऱ्यांनी '*अवघे करणे जगदीशाचे*' या उक्तीप्रमाणे आपले नाव लिहिलेले नाही. अशी आत्मविलोप वृत्ती केवळ संत साहित्याच्या,दासबोधाच्या अभ्यासाने शक्य होते. यालाच श्री समर्थ, '*क्रियापालटे तत्काळ*' असे म्हणतात. हे ओव्या निरूपण ई-पुस्तक आता आपल्या संकेतस्थळावर (www.dasbodhabhyas.org) अभ्यासार्थींच्यासाठी उपलब्ध असणार आहे.

असे विविध उपक्रम साजरे व्हावेत. '*नासे अज्ञान दुःखभ्रांती* |' याची प्रचिती आपणास सर्वांना यावी हीच श्री समर्थ चरणी प्रार्थना !!

|| जय जय रघुवीर समर्थ ||

योगेश बुवा रामदासी.

योगेश बुवा रामदासी
कार्यवाह ,श्री समर्थ सेवा मंडळ सज्जनगड.

कार्यालय : समर्थ सदन, १७९, सोमवार पेठ, सातारा-४१५००२,महाराष्ट्र
श्री सुंदरमठ सेवा समिती,मु. शिवथरघळ, पो. कुंभेशिवथर, ता.महाड, जि. रायगड.
Samarth Sadan : samarthsevamandal@gmail.com | Phone No.: 02162-284016

# युवकांचा स्फूर्तिनिर्झर - समर्थ रामदास

## ॥ श्रीराम ॥

**१५ ऑक्टोबर २०२३**

युवकांचा स्फूर्तिनिर्झर म्हणजे यशस्वी आणि दर्जेदार जीवन जगण्यासाठी अत्यंत आवश्यक असलेली सूत्ररूप पुस्तिका आहे. उद्याचा भारत घडवणाऱ्या आजच्या तरुणांसाठी अतिशय महत्त्वाची असलेली समर्थांची एकूण २२३ सूत्रे (ओव्या) यात आहेत. आजचा युवक म्हणजे जग बदलवण्याची प्रचंड क्षमता असलेली शक्तिशाली पिढी होय. या तरुण पिढीला समर्थ सांगतात, शक्तीने मिळती राज्ये । युक्तीने यत्न होतसे । शक्ती युक्ती जये ठाई । तेथे श्रीमंत धावती ॥ युक्ती आणि शक्ती कुठे आणि कशी वापरायची ह्याचा विवेक ज्याला करता येतो त्याला सर्व प्राप्त होऊ शकते. आताच्या या भोगवादी जगाच्या चुकीच्या प्रवाहातून स्वतःला लांब ठेऊन माणसाने माणसाशी माणूस म्हणून कसे वागावे? तसेच प्रत्येकाचे व्यैयाक्तिक, समाजिक आणि राष्ट्रीय कर्तव्य काय असावीत? यावर केलेले मार्गदर्शन सर्व तरुण पिढीला अत्यंत उपयुक्त ठरेल यात शंकाच नाही. ज्याप्रमाणे निर्झराचे खळखळते स्वच्छ पाणी मन मोहून टाकते त्याप्रमाणे न्याय, नीती, धर्माने वागणारा युवक सर्वांना मोहून टाकतो, आपलासा वाटतो.

सुमारे ३५० वर्षापूर्वी मरगळलेल्या महाराष्ट्राला समर्थांच्या या वाणीने जशी संजीवनी दिली होती. उद्याचा भारत घडवणाऱ्या आजच्या युवा शक्तीला ती तशीच अजूनही तेवढीच मार्गदर्शक ठरू शकते आणि म्हणूनच आपण ही पुस्तिका अभ्यासाला घेतली आहे.

समर्थांच्या या विचारांना आत्मसात करून आपले जीवन देखील समृद्ध करण्यासाठी आपण हा अभ्यास करत आहोत असा निश्चय करून ही सर्वे सूत्रे समजून घेतली की मग ती आचरणात आणणे सोपे जाते. अभ्यास सुरू करण्यापूर्वी आपण यातील १२ भाग एकमेकांशी कसे जुळले आहेत आणि त्यात काय आहे ह्याचा थोडक्यात आढावा घेऊया.. म्हणजे समर्थांना काय सांगायचे आहे ते समजून येईल.

सर्वात प्रथम संत संगतीने नरदेहाचे सार्थक करावे या विभागात एकूण २६ ओव्या / सूत्रे असून 'नरदेह परम दुल्लभ' म्हणत समर्थांनी नरदेहाचे स्तवन केले आहे. अत्यंत पुण्याईने मिळालेल्या नरदेहाचा विवेकाने योग्य उपयोग केला तर उत्तम पदें प्राप्त करता येतात. नरदेहाचा फायदा सांगताना तोटाही सांगतात की,

**जन्मा आलियाचें फळ । कांही करावे सफळ ।**
**ऐसे न करिता निर्फळ । भूमिभार होये ॥**

जर सफलता मिळाली नाही तर भूमिभार होऊन राहशील. भूमिभार होऊन राहू नये म्हणून संतांचे मार्गदर्शन घ्यावे कारण त्यांनी त्यांचे जीवन उंच व दर्जेदार बनवलेले असते. आणि अत्यंत निरपेक्ष भावनेने ते आपल्याला दारिद्र्यातून बाहेर काढून नृपती (राजा) बनवतात. नृपती (राजा) बनण्यासाठी किंवा उत्तम पदांवर आरूढ होण्यासाठी मूर्ख, पढतमूर्ख लक्षणे तसेच रजोगुण व तमोगुणांचा त्याग करून सत्त्वगुण वाढवला पाहिजे

हे पुढील २, ३ व ४ भागात सांगितले आहे. मूर्ख व पढतमूर्ख लक्षणात एकूण ३२ सूत्रे सांगितली आहेत, त्यातील पहिल्या २३ सूत्रात जी मूर्ख लक्षणे आहेत, त्यात आपण कुठे बसतो हे स्वयंमूल्यमापन करून बघायची आणि पुढील १० सूत्रात पढतमूर्ख लक्षणात 'रात्रंदिवस करी श्रवण । न सांडी आपले अवगुण ।' असे आपले आहे का? असे आत्मपरीक्षण करून या सर्व लक्षणांचा त्याग करायचा आहे.

तिसऱ्या विभागात १९ ओव्या असून रजोगुणें पुनरावृत्ती। तमोगुणें अधोगती। असे गुण योग्य रीतीने काबूत ठेऊन न वापरल्यास काय काय होते ते सांगून त्यामुळे जीवनाची कशी वाताहात होते ते सांगितले आहे. नरदेहात जन्माला आल्याने या देहाचे सार्थक करण्यासाठी सत्त्वगुण प्रयत्नपूर्वक अंगी बाणवता आला पाहिजे हे चौथ्या विभागात एकूण १७ सूत्रांत त्याचे महत्त्व सांगितले आहे. सत्त्वगुणांच्या प्रभावाने जो आपल्या मनाला जिंकतो, इंद्रियांना जिंकतो तो सुख, समाधान, शांतीची प्राप्ती करून घेतो. चुकीच्या सवयींचा त्याग आणि चांगल्या गोष्टींचा स्वीकार करण्यासाठी योग्य आखीव दिनचर्या हवी. त्याबद्दल पाचव्या भागात समर्थ एकूण ८ सूत्रात दिनचर्या सांगितली आहे.

उत्तम पदी पोहचण्यासाठी दिनचर्या तंतोतंत आचरणात आणण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावे लागतात. कष्टेविण फळ नाही। कष्टेविण राज्य नाही। केल्याविण होत नाही। साध्य जनीं ॥ प्रयत्न हाच परमेश्वर -या सहाव्या विभागात १३ सूत्रे असून संतांनी सांगितलेले विचार, त्यांचे बोल जोपर्यंत प्रयत्नपूर्वक आचरणात आणले जात नाही तो पर्यंत काहीही प्राप्त होणार नाही असे सांगून प्रयत्नांचे महत्त्व सांगितले आहे. प्रयत्न म्हणजे अभ्यास. अभ्यासानेच उत्तम गुण आपल्या आचरणात आणता येतात आणि या अशा चांगल्या गुणांनी बहुतांचे मुखी उरावें । बहुतांचे अंतरी भरावे । म्हणजे बहुतांच्या स्मरणात राहता येते, त्यांच्या अंतःकरणात स्थान मिळते.

सातव्या भागात १५ सूत्रे असून विवेकाने चांगल्या गोष्टी आत्मसात करून आधी आपण शहाणे व्हावे आणि शहाणे करून सोडावे बहुत जन असे सांगितले आहे. जसे अभ्यासाने उत्तम गुण अंगीकारता येतात तसेच अवगुण पण सोडिता येतात. उदा. वादविवाद करू नये, पापद्रव्य घेऊ नये, निंदा द्वेष करू नये, धूम्रपान, उन्मत्त द्रव्य सेवन करू नये, कोणाला शिवी देऊ नये अश्या अनेक गोष्टींचे प्रबोधन आठव्या भागात २० सूत्रांतून केले आहे. या वरील ८ भागात व्यक्तिमत्त्व विकासाची महत्वाची सूत्रे सांगितल्यावर परमार्थाच्या पाश्वभूमीवर प्रपंच करावा असे स्पष्ट सांगत आहेत. भक्ती, नीती आणि प्रपंच यांची सांगड घालून समाज संघटक सशक्त व सोहर्दपूर्ण असावे अशी राष्ट्रीयभावना समर्थांची आहे. नवव्या भागातील एकूण ९ सूत्रांतून प्रपंच सोडून परमार्थ केला तर खायला अन्न  मिळणार नाही आणि परमार्थ सोडून प्रपंच केला तर यमयातना भोगशील असे विविध उदाहरण देऊन दोन्हीचा समन्वय साधला आहे.

आपल्याला प्राप्त झालेल्या नरदेहाचे सार्थक होण्यासाठी ज्या समाजात आपण राहतो त्या समाजाचे ऋण द्यावे लागते. १०व्या भागातील एकूण १४ सूत्रांमध्ये सुसंघटीत राष्ट्रनिर्मितीची प्रेरणा समर्थ देतात. समाजाला एकत्र बांधण्यासाठी दुसऱ्यांच्या सुखात सुख मानावे आणि अवघेचि सुखी असावे अशी इच्छा कायम ठेवून जो परोपकार करितां चि गेला । पाहिजे तो ज्याला त्याला । मग काये उणे तयाला । भूमंडळी ॥ म्हणजे जो निष्काम कर्म किंवा परोपकार करतो त्याला या भूमंडळी काहीही कमी पडणार नाही हे समजावून सांगतात. अशा प्रकारे समाज घडवण्यासाठी नकळत राजकारणाशी संबंध येतो. राजकारणाचे भान कसे ठेवावे.. शिवाजी महारांजाच्या सारखे सावध, साक्षेप आणि दक्ष राहून काय काय करायला पाहिजे ते २६ सूत्रांत सांगितले आहे. समाजाचे ऋण फेडताना परोपकार करा असे सांगणारे समर्थ वेळ आली तर दुश्मनांशी दोन हात करण्याची तयारी असली पाहिजे, असे इथे सांगतात. 'धटासी असावे धट । उद्धटासी उद्धट असावे' असे

सांगताना सर्व गोष्टी अत्यंत गुप्तपणे कराव्यात, मुख्य सूत्र हाती घ्यावें । करणे ते लोकांकरवी करवावे । असे सांगून सतत सावध, साक्षेपी आणि दक्ष राहण्याची सुचना करतात.

शेवटच्या विभागातील एकूण २४ ओव्यात 'आनंदवन भुवनी' आणि आत्ताच्या भाषेत 'वसुधैव कुटुंबकम्' म्हणजे माणसाने माणसाशी माणसा प्रमाणे कसे वागावे हे सांगितलेले आहे. आपल्याला मिळालेल्या नरदेहाचे सार्थक करण्याची जबाबदारी आपल्या प्रत्येकावर आहे. मात्र भगवंताच्या कृपेशिवाय काही प्राप्त होऊ शकत नाही. जो जो करील तयाचे । परंतु येथे भगवंताचे । अधिष्ठान पाहिजे ॥ आपली प्रत्येक गोष्ट त्याच्या अधिष्ठानावर होत असते. परंतु, मी कर्ता ऐसें म्हणसी । तेणे तूं कष्ठी होसी। राम कर्ता म्हणतां पावसी। येश कीर्ती प्रताप ॥ मी केले म्हणून झाले असा अहंकार आला की दुःख मिळते म्हणून निष्काम कर्म करून फलाची अपेक्षा न ठेवता कर्माचे फल श्रीरामाला अर्पण करावे.

अशा प्रकारे युवकांचा स्फूर्तिनिर्झर या सूत्ररुपी पुस्तिकेतील समर्थांच्या ओव्यांचे सार Listen - Observe - Think & Act या प्रमाणे समजून घेऊन युवकांनी ते सर्व आत्मसात केले पाहिजे. छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श आपल्या समोर ठेऊन जगद्गुरू समर्थ रामदासस्वामींच्या ओजस्वी विचारांवर युवकांनी वाटचाल केली तर हिंदवी स्वराज्य आणि सु असा आपला 'भारत' निर्माण होईल. आत्ताच्या काळात जगभर अभ्यासिले जाणारे विषय ह्युमन रिसोर्स डेव्हलपमेंट (मानवी संसाधन), व्यवस्थापन (मॅनेजमेंट), समय व्यवस्थापन (टाईम मॅनेजमेंट), नेतृत्व विकास हे चारशे वर्षापूर्वीच राष्ट्रगुरु, समाजशास्त्रज्ञ, मनासतज्ञ समर्थ रामदासस्वामींनी आपल्याला सांगितले आहे. युवकांनी तसेच प्रत्येक व्यक्तींनी या नुसार आपले जीवन घडवताना आपली वैयाक्तिक, समाजिक आणि राष्ट्रीय कर्तव्य या स्फूर्तिनिर्झर प्रमाणे केली.. आणि जीवनाला योग्य वळण दिले तर प्रत्येक व्यक्ती आदर्श नागरिक, आदर्श व्यक्ती बनेल.

---

**१६ ऑक्टोबर २०२३**

**भाग १ :- संत संगतीने नरदेहाचे सार्थक करावे**

**बहुतां जन्मांचा सेवट । नरदेह सांपडे अवचट ।**
**येथें वर्तावें चोखट । नीतिन्यायें ॥१॥**
**(दास. ११.३.१)**

**अर्थ** = कित्येक जन्ममरणे झाल्यावर पापपुण्य समान होता क्षणी अचानक मनुष्य शरीर प्राप्त होते. त्यात न्यायनीतिचे पवित्र जीवन जगावे.

**स्पष्टीकरण** = युवकांचा स्फूर्तिनिर्झर या सुत्ररूपी पुस्तिकेतील ही पहिलीच ओवी आहे. -नरदेहाचे महत्त्व ओळखून वृद्धपण येण्याच्या आधीच मिळालेल्या नरदेहाचे नीतिन्यायाने वागून सार्थक करावे तसेच विवेकाने वागून प्रपंच व परमार्थ साधावे, हे या ओवीतून समर्थ तरुणपिढीला सांगत आहेत. बहुतां जन्मांचा सेवट = आपल्या हिंदू धर्मात पुनर्जन्मावर आपण विश्वास ठेवतो. जन्मजन्मांतरी पापपुण्याचे भोग भोगताना, जेव्हा अकस्मात दोन्ही समसमान होतात तेव्हा मनुष्यशरीराची प्राप्ती होते असे शास्त्र सांगते. येथे पापाने पुण्याला परस्पर छेद बसून दोन्ही नष्ट होत नाहीत तर दोन्हीची फळे भोगावी लागतात. माणसाला जन्म का घ्यावा लागतो? तर जीवाच्या भोगवासनेमुळे ! संत एकनाथ महा म्हणतात, 'जन्म घेणे लागे वासनेच्या संगे'

मी व माझे, मला अमुक हवेनको इत्यादी असंख्य वासनेने पुन्हा पुन्हा जन्माला यावे लागते. मात्र प्रत्येकवेळी मनुष्य देह प्राप्त होईल असे नसते तर ज्या प्रमाणे मनुष्यप्राण्यांची वासना असते आणि त्याने जे जे कर्म केलेले असते त्याप्रमाणे त्याला ८४ लक्ष योनी मधून फिरावे लागते. अशा अनेक जन्मांचा सेवट पापपुण्य समसमान होते आणि मगच मनुष्यदेह प्राप्त होतो.

नरदेह सांपडे अवचट = अवचट - म्हणजे एकाएकी. अचानक सापडला. ८४ लक्ष योनी फिरून आल्यानंतर अचानक सापडलेला अवचट असा हा नरदेह आहे. मिळालेल्या संधीचा पुरेपूर उपयोग करून परमार्थप्राप्तीसाठी ह्याचा उपयोग करून घेण्यातच जीवनाचे सार्थक आहे. नरदेहाचे माहात्म्य सांगणारी एक अर्थवादात्मक कथा ऐतरेय उपनिषदात दिली आहे. ईश्वराने ज्ञानेंद्रियांच्या देवता निर्माण केल्या, पण त्यांना शरीर दिले नव्हते. जेव्हा त्यांना निवडीसाठी ईश्वराने घोडा व गाय ह्यांचे शरीर दाखविले तेव्हा त्यांनी ते नाकारले. कारण त्या शरीरात आहार, निद्रा, भय व मैथुन यांचे खेरीच कशाचीच व्यवस्था नव्हती. जेव्हा त्यांचे समोर मनुष्याचे शरीर उभे केले तेव्हा त्यांनी ते आनंदाने स्वीकारले, कारण त्यात स्वतःच्या निर्मात्याचे ज्ञान करून देण्याची क्षमता आहे. म्हणून मनुष्य शरीर प्राप्त झाले असता जगत् कारण ब्रह्म जाणून घेणे हेच त्याचे कर्तव्य ठरते. ते न पार पडल्यास पशू व माणूस ह्यांच्यात फरक उरत नाही.

येथें वर्तावें चोखट । नीतिन्यायें = या संपूर्ण सृष्टीमध्ये मनुष्यदेह सोडून इतर सर्व प्राणिजात भोग योनी आहे. तर फक्त मनुष्य देहाची कर्मयोनी आहे. म्हणून या शरीरात क्रियमाणकर्म स्वातंत्र्य असते. चांगले - वाईट, खरे खोटे, न्याय अन्याय, नित्य अनित्य ह्यांचा निवडा फक्त याच देहात करता येतो. ह्यालाच विवेक करणे म्हणतात. विवेकाने आपल्या जीवनाला दिशा देण्याचे स्वातंत्र्य फक्त याच नरदेहात आहे. शरीरशास्त्राच्या दृष्टीने सुद्धा, मनुष्य हा प्राणी इतर प्राण्यांच्या मानाने अत्यंत प्रगत आहे. पाठीचा उभा कणा असलेला मनुष्य हा एकमेव प्राणी आहे. मानवाने स्वतः भोवतालच्या जगात व स्वतःच्या जीवनात मिळालेल्या स्वातंत्र्याचा लाभ घेऊन प्रचंड परिवर्तन घडविले आहे. या नरदेहप्राप्तीनंतर अनेकांनी अहंकाराचा लय करून आत्मपदाची प्राप्ती करून घेतली आहे. त्यासाठी वर्तावे चोखट म्हणजे न्याय, नीति, धर्माला धरून वर्तन करावे.

अचानक मिळालेल्या नरदेहाचे खऱ्याअर्थाने सार्थक होण्यासाठी समर्थ मनाच्या श्लोकांतून समाज प्रबोधन करतात आणि माणसांची त्यांची खरी कर्तव्य समजावून सांगतात. जीवन आनंदमयी, तृप्त, शांत, समाधानी आणि निर्भय बनण्यासाठी आपल्या मनात दुष्ट वासना असू नये, पापबुद्धी नको, धर्म, नीति न्याय सोडू नये अश्या अनेक गोष्टी समाजवून आचरण करायला सांगतात.

सारांश = -जन्म मरण टाळण्यासाठी कितीवेळा जन्मा यावे किती व्हावे फजीत असे संत विचारतात. ८४ लक्ष योनी फिरून आल्यावर पापपुण्य समान झाल्यावरच नरदेहाची अचानक प्राप्ती होते. म्हणून या जन्मात, मिळालेल्या नरदेहाचा उपयोग करून न्याय, नीति, धमनि वागून जर जीवनाचे सार्थक करून घेतले नाही तर पुढचा जन्म कोणत्या योनीत येईल हे सांगता येणार नाही. म्हणून आपण संतांचे पाय धरावे, त्यांना शरण जावे.. त्यांच्या स्वानुभवाच्या वचनांचे श्रवण करून Listen - Observe - Think - Act या प्रमाणे आचरण करून प्राप्त झालेल्या नरदेहाचे सार्थक करून घ्यावे.

**बहुतां जन्मांचा सेवट । नरदेह सांपडे अवचट ।**
**येथें वर्तावें चोखट । नीतिन्यायें ॥१॥**

**१७ ऑक्टोबर २०२३**

ग्रंथराज दासबोधात श्रीसमर्थांनी समष्टी जीवनाला ऐहिक तसेच पारमार्थिक जीवन सार्थक करण्याची दिशा दिली आहे. यामधील सर्वच ओव्या महत्त्वपूर्ण आहेत. राष्ट्राचे भविष्य असणाऱ्या युवकांना डोळ्यासमोर ठेवून दासबोधातील काही निवडक ओव्या वेगळ्या काढून याठिकाणी एकत्रित केल्या आहेत. ज्यांचे पालन केले असता युवकवर्गाच्या प्रापंचिक जीवनाची घडी व्यवस्थित बसेलच पण, त्याचबरोबर त्यांचे पारमार्थिक जीवनहि यशस्वी व्हायला मदतच होईल. युवकांचा स्फूर्तिनिर्झर अंतर्गत संतसंगतीने नरदेहाचे सार्थक करावे हा भाग आपण पहात आहोत.

**"शत वरुषें वय नेमिलें । त्यांत बाळपण नेणतां गेलें ।**
**तारुण्य अवघें वेंचलें । विषयांकडे ।। ११-३-३।।"**

दासबोधातील अकराव्या, भीम दशकातील सिकवणनिरुपण या तिसऱ्या समासातील ही तिसरी ओवी.

अर्थ : "माणसाचे आयुष्य शंभर वर्षे समजतात. त्यापैकी बाळपणाचा काळ अज्ञानात जातो. तरुणपणाचा काळ विषयसुख किंवा इंद्रियसुख भोगण्यात खर्च होतो."

मानवदेह दुर्लभ आहे, तो सहजासहजी मिळत नाही. चौऱ्यांशी लक्ष योनी फिरून नंतर मनुष्ययोनीत जन्म मिळतो. म्हणून त्याला हरिभजनाला लावून आपण पावन व्हावे. नरदेहाच्या माध्यमातूनच स्वस्वरूपाची प्राप्ती साध्य करता येते. कारण,

**पशुदेहीं नाहीं गती । ऐसें सर्वत्र बोलती ।**
**म्हणौन नरदेहींच प्राप्ती । परलोकाची ।। १-१०-२१ ।।**

वर वर्णन केल्याप्रमाणे ऐहिक जीवनाच्या धबडग्यात ज्याच्या कृपेने आपल्याला हा मनुष्यदेह प्राप्त झाला आहे, त्याची आठवण तर आपल्याला क्षणभरही होत नाही. "संतांचे संगती मनोमार्ग गती । आकळावा श्रीपती येणे पंथे" असे माऊलींनी म्हटले आहे. सत्संग म्हणजे सद्गुरूंच्या सहवासात राहून आपल्या जीवनाला योग्य आकार देणे होय. मनाला सतत विषयांचा छंद असतो. मनाला सत्संगतीमध्ये रमवून हितोपदेश केला तर ते मन अंतर्मुख होऊन शांत राहते. सत्संगतीमध्ये राहूनच सद्गुण, सद्बुद्धी, सद्विचार आणि सन्मार्ग सापडतो. या सद्गुणांमुळे तसेच संतांच्या संगतीमध्ये केलेल्या श्रवण, मनन, चिंतन, निजध्यासन यामुळे आपला आत्मविश्वास वाढतो. यामुळे मन हळूहळू स्वरूपाशी तादात्म्य पावायला सुरुवात होते.

तुकाराम महाराजांनी संतांच्या सहवासाला स्वर्गाची उपमा दिली आहे. स्वर्गात दुःखाचा लवलेश नाही तद्वत सद्बुद्धी आणि सन्मार्ग लाभत असल्यामुळे सत्संगतीत दुःख शिल्लक राहत नाही.

श्रीसमर्थांनी मनोबोधात "प्रभाते मनीं राम चिंतीत जावा" असे श्लोक क्र. ३ आणि त्यापुढे श्लोक क्र. ६७ ते ७६ मध्ये म्हटले आहे. प्रभातकाळ म्हणजे उमेदीचा काळ. प्रत्येक दिवसातला उमेदीचा काळ म्हणजे पहाट/प्रातःकाळ. मानवी जीवनाची पहाट/उमेदीचा काळ म्हणजे तारुण्याचा काळ. प्रभातकाळ या शब्दाचा असा व्यापक अर्थ लक्षात घेऊन रोज पहाटेच्या वेळी आणि जीवनाची खरी सुरुवात जेथून होते, त्या तरुण वयापासून दिवसाची आणि आयुष्याची उभारणी पक्क्या पायावर उभी रहावी यासाठी रामनाम आणि सत्संगतीची कास

धरावी. भक्त प्रल्हाद, ध्रुवबाळ आणि स्वत: श्रीसमर्थांनीही अशा प्रभातकाळीच नामसाधना केली. ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजहि किशोरवयीन असतानाच सद्गुरूंच्या शोधार्थ बाहेर पडले होते. युवक वयातच माउलींनी संपूर्ण विश्वासाठी पसायदान मागितले. छत्रपती शिवाजीमहाराजांनीहि युवक वयातच स्वराज्याचा पाया घातला.

ना. गो. सकळकळे विरचित गजानन महात्म्यच्या बाराव्या अध्यायातहि अशा अर्थाच्या ओव्या आहेत.

**बालपण नाचता गेले । तारूण्य खेळता उडाले ।**
**वार्धक्य पश्चातापे गेले । जरा येता गोंधळले ।। ७ ।।**

आचार्य आपल्या भजगोविंदम् मध्ये म्हणतात,

**बालस्तावत् क्रीडासक्तः । तरुणस्तावत् तरुणीसक्तः ।**
**वृद्धस्तावच्चिन्तासक्तः । परे ब्रह्मणि कोऽपि न सक्तः ।। ७ ।।**

अशाप्रकारे सत्संगतीची महती लक्षात घेऊन, तिची कास धरून युवकांनी आपले जहाज हाकले तर ते नक्कीच किनाऱ्यावर लागेल.

---

## १७ ऑक्टोबर २०२३

**शत वरुषें वय नेमिलें| त्यांत बाळपण नेणतां गेलें |**
**तारुण्य अवघें वेचलें| विषयांकडे ||३||११.३.३**

प्रस्तुत श्लोक सध्यस्थितीत अधिक पर्याप्त वाटतो.उत्तम आरोग्य सुविधा व उपचार यामुळे आयुष्यमान अगदी शंभर नाही तरी ८५-९० पर्यंत नक्की वाढले आहे. या काळाचा उपयोग आपण कसा करतो?

बालपण नेणते असते . तसेच संस्कारक्षम असते.आई वडील गुरुजन आदर्श असतात व त्यांच्या मतानुसार मार्गदर्शन स्वीकारण्यास तयार असे मन असते.सूत्र इतरांच्या हाती म्हणून हे नेणतेपण. पण आपण आपल्याला वेळ हवा म्हणून त्यांच्या हाती मोबाईल देतो.आई व मूल यांच्यात उत्तम संवादाचा काळ दोघांचाही दूरदर्शन समोर जातो .आपण खरंच हा महत्त्वाचा काळ अक्षरशः वाया घालवतो असेच समर्थ म्हणतील.नंतर येते ते तारूण्य. नवनवोन्मेश फुलण्याचा अतिशय ऊर्जेचा हा काळ.उत्साहाने नवं आत्मसात करायचा काळ.पण आजचं तरुणाईचं चित्र कसं आहे? चार मित्र जमले तर मनमोकळा संवाद किती साधतात? मैदानावर किती जातात? सर्व आभासी जगात रमणं सुरू आहे.त्याने डोळे व बुद्धी दोन्हीचे नुकसान होत आहे.व्यसनांचे प्रमाण वाढते आहे.पायरीवर बसून आयुष्य कसे वापरावे याचे नियोजन करण्याचे वय गेम्स मधे रमण्यात व भविष्याचा धूर करून छातीची खोकी होत आहेत. तारुण्य अवघे वेचले विषयांकडे याचा हा अर्थ उघड दिसत आहे.

शिक्षण ही गुरुकिल्ली असते.पण तिथे काय परिस्थिती आहे? महाविद्यालयात वर्ग रिकामे आणि उपहारगृहात बसायला जागा नाही.शिकवणे व परीक्षण दोन्ही आपले उद्दिष्ट हरवले आहेत का? शिकणे आनंददायी होत आहे का? नसेल तर त्यात बदल हवे आहेत आणि नवीन शैक्षणिक धोरण त्या दृष्टीने चांगले आहे.पण ही तळमळ विद्यार्थी वर्गापर्यंत पोहोचायला हवी.अन्यथा दिशाहीन तरूणाई ही समर्थ म्हणतात

त्याप्रमाणे निरर्थक भौतिक विळख्यात कालापव्यय करीत राहील. ही परिस्थिती असेल तर ती पालटावी यासाठी या श्लोकाचा उपयोग आहे. अनेक दुर्गुण समर्थ त्यागार्थ सांगतात.व्यसनं तेव्हा होती आताही आहेत.नरदेह उत्तम राखायचा तर विवेक विचार गरजेचा आहे.तो तरुणाई पर्यंत पोहोचायला हवा.

---

**१८ ऑक्टोबर २०२३**

**वृद्धपणीं नाना रोग| भोगणें लागे कर्मभोग |**
**आतां भगवंताचा योग| कोणे वेळे ||४||११.३.४**

वृद्ध पणी रोग भोगावे लागतात .हा कर्मभोग म्हणजे तरूण पणाच्या काळात शरीराची जी हेळसांड केली त्याचा परिणाम.शरीराचे लाड केले किंवा त्याला अति श्रमवले त्याचा परिणाम स्वरूप जे आजार होतात ते लक्षात घ्यायला हवेत. काही आजार वंशपरंपरागत,अनुवांशिकतेने येतात.पण आपली जीवनशैली योग्य ठेवली तर उशिरा होतात किंवा अतिशय सौम्य होतात.पूर्ण नाही पण ब-याच प्रमाणात हे आपल्या नियंत्रणाखाली असते. हल्ली आपण पहातो की माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील लोक १२-१४ तास संगणकासमोर बसतात.व्यायामाला वेळच नाही.अवांतर वाचन छंद याबाबत बोलायची सोय नाही.

प्रत्येक जण धावतो आहे.स्पर्धा आहे.ईर्षा आहे.आणि क्षितीज तर नेहमीच लांब पळत असते.खूप ताण आहेत.गरज आणि चैन ठरवणे कठीण होत चालले आहे.चैनीचं चुकीच्या जीवनशैलीचं  हे तर 'आवश्यक आहे आजच्या काळात' असे म्हणून आपण समर्थन करतो.कधी इतरांना सांगता सांगता आपण तेच खरे मानून चालू लागतो,हेही लक्षात येत नाही.अगदी धाप लागेपर्यंत धावत रहातो. मन दमतं शरीर थकतं पण स्पर्धा थांबत नाही आणि आपणही थांबून श्वास घेत नाही .या सगळ्या गोष्टी ' कर्म ' यात येतात.थोडं थांबून आत डोकवायला परमार्थ सांगतो आणि सतत बाहेर पहायला प्रपंच भाग पाडतो,दुष्ट चक्र फिरत रहाते आणि आपण अधिक अडकत जातो.

खरीखुरी विश्रांती मनाला हवी असते.ती कशी मिळेल कुठे मिळेल ठाऊक नसते.मग उत्तेजना हवी म्हणून व्यसनं,खोटी प्रतिष्ठा जपण्यासाठी पार्ट्या हे सगळं उथळ मनोरंजन सुरु रहाते आणि खरं तर आपण आतून पोखरले जात असतो.पोकळ होत असतो. पण लक्षात कोण घेतो? लक्षात आणून देणारे असतात पण तारुण्याचा मद असतो तोवर आपण सोयिस्कर दुर्लक्ष करीत रहातो.कुठपर्यंत? 'संध्या छाया भिवविती हृदया' अशी वेळ येईतो हे असे सुरू रहाते.

या सगळ्यात भगवंताची आठवणही होत नाही.शरीर थकले कुरकुरू लागले की त्या व्याधींकडे उपचारांकडे लक्ष रहाते.विचार व चर्चा तीच . व्यवधान तेच. माणसाच्या हरेक आयुष्यातील टप्पा कसा भ्रमलेला रहातो ते समर्थ सांगत आहेत. हे तरूण पणीच लक्षात आले तर खूप चांगले.नरदेहिचे सार्थक करायला वेळ तरी हाती असतो.उत्तम शरीर हाती असते.बुद्धी सतेज असते.म्हणून समर्थ हे समजावून सांगत आहेत.

---

## १८ ऑक्टोबर २०२३

आपण समर्थ रामदास स्वामी रचित युवकांचा स्फूर्ती निर्झर या सूत्ररूपी पुस्तकातील संत संगतीने नर देहाचे सार्थक करावे याविषयी संवाद साधत आहोत आज आपण तिसरी ओवी निरूपणासाठी घेतली आहे.

**वृद्धपणी नाना रोग |भोगणे लागे कर्म भोग |**
**आता भगवंताचा योग | कोणे वेळे श्रीराम || ११-३-४**

समर्थ आपल्याला सांगतात ,म्हातारपणी अनेक रोग शरीराला पीडा देतात .माणसाला पूर्वकर्माचे भोग भोगावेच लागतात .अशा रीतीने बाली, तारुण्य आणि वृद्धपण प्रपंचासाठी खर्ची पडते. म्हणून भगवंताच्या दर्शनाचा योग मिळण्याची संधीच सापडत नाही. अर्थ अगदी सरळ आहे. वृद्धपणी नाना रोग होतात .आणि आपलाच कर्मभोग म्हणून ते भोगावेही लागतात. म्हातारपण आलाय आता भगवंताचा योग केव्हा येईल? असे पश्चातापाचे बोल येवू नयेत म्हणून पहिल्या व दुस-या ओवीत सतर्कतेचा इशारा समर्थ आपल्याला देतात. वृद्धपण येण्याआधीच नरदेहाचे सार्थक करावे.

शंभर वर्षाच्या आयुर्मानात आपण कसे वागतो? याबाबत समर्थांची रचना आपल्याला सावधतेचा इशारा देते. " सावध सावधान वाचे बोला रामराम " या रचनेत अगदी बालपणापासून ते वृद्धपणापर्यंत सगळे वर्णन आलेले आहे. तसेच समर्थ आपल्याला तिस-या ओवीत आपल्याला वृद्धपणा ची जाणीव करून देतात .म्हणतात बाबारे बालपणापासूनच या नर देहाचे सार्थक करून घे. नाही तर " बाळपणी खेळी रमलो |तारुण्य नासले |वृद्धपणी देवा आता |सुटे पैलपार |असे होवू नये म्हणून प्राप्त झालेल्या नरदेहाचे सार्थक करावे. ग्रंथराज दासबोध दशक तिसरा समास तिसरा हा वाचला म्हणजे वरील ओवी डोळ्यासमोर येते .या समासात समर्थांनी वृद्धपणाचे वर्णन केले आहे.

**व्याधी भरली सर्वांगी | प्राणी झाला क्षयरोगी |**
**केले दोष आपले भोगी | सीघ्रकाळे || श्रीराम**

तारुण्यातील कर्म असे वृद्धपणी उभे ठाकले . हे सगळे माझेच कर्म म्हणून आता मी ते कर्मभोग भोगत आहे. शेवटी म्हणतो.

**आता मरण देगा देवा |बहुत कष्ट झाले जीवा |**
**जाला नाही नेणो ठेवा | पातकाचा | श्रीराम**

देवा आता मरण दे. जीवाला खूप यातना होत आहेत. अजून किती कर्मभोग भोगायचा राहिला रे? अजून माझ्या पापाचा साठा संपलाच नाही का? यासाठी समर्थ आपल्याला वेळीच सावध करतात आणि श्रवण करीत करीत संत संगतीने नरदेहाचे उचित साध्य करायला सांगतात. आजची आपली ओवी आहे...

**वृद्धपणी नाना रोग |भोगणे लागे कर्म भोग |**
**आता भगवंताचा योग | कोणे वेळे श्रीराम || ११-३-४**

समर्थ आपल्याला सांगतात ,म्हातारपणी अनेक रोग शरीराला पीडा देतात .माणसाला पूर्वकर्माचे भोग भोगावेच लागतात .अशा रीतीने बाली, तारुण्य आणि वृद्धपण प्रपंचासाठी खर्ची पडते. म्हणून भगवंताच्या दर्शनाचा योग मिळण्याची संधीच सापडत नाही.

---

**१९ ऑक्टोबर २०२३**

ग्रंथराज दासबोधात श्रीसमर्थांनी समष्टी जीवनाला ऐहिक तसेच पारमार्थिक जीवन सार्थक करण्याची दिशा दिली आहे. यामधील सर्वच ओव्या महत्त्वपूर्ण आहेत. राष्ट्राचे भविष्य असणाऱ्या युवकांना डोळ्यासमोर ठेवून दासबोधातील काही निवडक ओव्या वेगळ्या काढून याठिकाणी एकत्रित केल्या आहेत. ज्यांचे पालन केले असता युवकवर्गाच्या प्रापंचिक जीवनाची घडी व्यवस्थित बसेलच पण, त्याचबरोबर त्यांचे पारमार्थिक जीवनहि यशस्वी व्हायला मदतच होईल. युवकांचा स्फूर्तिनिर्झर अंतर्गत संतसंगतीने नरदेहाचे सार्थक करावे हा भाग आपण पहात आहोत.

**लोक मरमरो जाती।वडिले गेली हे प्रचिती।**
**जाणत जाणत निश्चिती।काये मानिले।। ११-३-६ ।।**

दासबोधातील अकराव्या, भीम दशकातील सिकवणनिरुपण या तिसऱ्या समासातील ही सहावी ओवी.

अर्थ : लोक मरतात, हे आपण लहानपणापासुन पहात आलो. वयाने म्हातारी माणसे मरतात. अलिकडे ९० वयापर्यंत आयुर्मान वाढलेले दिसत असले. तरी साठ ते ९० हा ३०वर्षाचा काळ ना तारुण्य उपभोगता येत, ना देशकार्यात हातभार लावता येत. इस्रायल चे निवृत्त पंतप्रधान नेत्यान्याहु देश आपत्ती जाणून लगेचच वर्दी घालून संकटकाळी धावून आले. असे किती जण! लोक मरमरो जाती। सतत सगळीकडे माणसे मृत्यू मुखी पडत असतात. भूकंप, ज्वालामुखी उद्रेक, त्सुनामी वादळे, दुष्काळ ही अस्मानी संकटे तर विमान अपघात, रेल्वे अपघात, मोटार अपघात यात प्रत्यही मृत्यू होत असतात. मरणात खरोखर जग जगते हा अनुभव प्रतिक्षणी आपण घेत असतो. वडीले गेली हे प्रचिती येतच असते.

साधारण २५ -३० वर्षापूर्वी माझे सासरे म्हणाले, आमच्या बरोबरीचे सगळे गेले. आम्ही एकटेच मागे उरलो. आपण संसारात, व्यवसायात अडकलेले असतो, आपल्या लक्षात ही येत नाही . काळ पुढे सरकतो. व जी माणसे ईश्वरी कार्य करण्यास वृद्धत्वामुळे निरुपयोगी होतात. ते जगाचा निरोप घेतात. ते आपण पहातोच.

**होता मृत्याची आटाटी। कोणी घालू न सकती पाठी।**
**सर्वत्रास कुटाकुटी।मागे पुढे होतसे ।।**
**मृत्युकाळ काठी निकी। बैसे बळीयाचे मस्तकी।**
**महाराजे बळीये लोकी। राहो न सकती।। ३ -९ -५ व ६।।**

ओवी ७ ते ३५ मधे मोठे बळाचे, सामर्थ्याचे, कौशल्याचे. योगी, तपस्वी, राजे, महाराजे, चक्रवर्ती , इतकेच काय परमेश्वराचे अवतार त्यांनाही मृत्यू ने सोडले नाही. असे समर्थ म्हणतात . हे सर्व दिसत असताना, माहिती असताना शाश्वती कशाची धरतो आपण? आपण तर एखाद्या व्यक्तीला स्मशानात सोडून आलो की लगोलग आपले व्यवहाराचे हिशोब करुन ते मिळविण्यासाठी खटपटीला लागतो. हा अमरपट्टा मिळाल्या

सारखे आपले वागणे कशातुन येते. तर या देहात तो आत्मा परमात्म्याचा अंश कि जो परमेश्वरा इतकाच शक्तीमान व श्रेष्ठ आहे. तो अविनाशी म्हणजे  मृत्यू वर्जित आहे. तो हे शरीर चालवतो. संवर्धन व रक्षण करतो. त्या बळावर आपण गमजा गरतो, मौजमजा करतो, समाजकार्य करतो, देशकार्य करतो. मानवदेह दुर्लभ आहे, तो सहजासहजी मिळत नाही. चौऱ्यांशी लक्ष योनी फिरून नंतर मनुष्ययोनीत जन्म मिळतो. म्हणून त्याला ईश्वरीकार्यात लावून आपण पावन व्हावे. नरदेहाच्या माध्यमातूनच किर्ती साध्य करता येते.

वर वर्णन केल्याप्रमाणे ऐहिक जीवनाच्या धबडग्यात ज्याच्या कृपेेने आपल्याला हा मनुष्यदेह प्राप्त झाला आहे, त्याची आठवण तर आपल्याला क्षणभरही होत नाही. सत्संग म्हणजे सद्गुरूंच्या सहवासात राहून आपल्या जीवनाला योग्य आकार देणे होय. मनाला सतत विषयांचा छंद असतो. सत्संगतीमध्ये राहूनच सद्गुण, सद्बुद्धी, सद्विचार आणि सन्मार्ग सापडतो. या सद्गुणांमुळे तसेच संतांच्या संगतीमध्ये केलेल्या श्रवण, मनन, चिंतन, निदिध्यास यामुळे आपला आत्मविश्वास वाढतो. तुकाराम महाराजांनी संतांच्या सहवासाला स्वर्गाची उपमा दिली आहे.

स्वर्गात दुःखाचा लवलेश नाही तद्वत सद्बुद्धी आणि सन्मार्ग लाभत असल्यामुळे सत्संगतीत दुःख शिल्लक राहत नाही. प्रत्येक दिवसातला उमेदीचा काळ  म्हणजे तारुण्याचा काळ असा व्यापक अर्थ लक्षात घेऊन रोज पहाटेच्या वेळी आणि जीवनाची खरी सुरुवात जेथून होते, त्या तरुण वयापासून दिवसाची आणि आयुष्याची उभारणी पक्क्या पायावर उभी रहावी यासाठी रामनाम आणि सत्संगतीची कास धरा युवक वयातच माउलींनी संपूर्ण विश्वासाठी पसायदान मागितले. छत्रपती शिवाजीमहाराजांनीहि युवक वयातच स्वराज्याचा पाया घातला. आज जगभरातुन सर्व इस्त्रायली आपली कुटुंबे मागे ठेवून युद्धसज्ज झाले ते आपण पहात आहोत तेव्हा सत्संगतीची महती लक्षात घेऊन, तिचीच कास धरून युवकांनी आपले ध्येय्य निश्चित केले  तर ते नक्कीच यश किर्ती करतील. पूर्वजांना उद्धरतील.

---

**लोक मरमरों जाती| वडिलें गेलीं हे प्रचिती |**
**जाणत जाणत निश्चिती| काये मानिलें ||६|| ११.३.६**
**मरे एक त्याचा दुजा शोक वाहे|**
**अकस्मात तोही पुढे जात आहे|**

Conveyer belt वरील प्रत्येक वस्तू पुढे पुढे अपरिहार्य पणे सरकत असते.कारखान्यात उसाच्या मोळ्या चरकात जाण्यासाठी रांगेत उभ्या असतात.विश्वरूप दर्शनात अर्जुन पहातो दोन्ही सैन्यातील वीर महावीर सामान्य सैनिक भगवंताच्या कराल मुखात खेचले जात आहेत. पण हे जाणत नसल्याने ते सगळे आपण अमरच आहोत अशा विश्वासाने आविर्भावात युद्धात सज्ज झाले आहेत. एका निरूपणात विचारलेला प्रश्न होता की मरणाचे कारण काय? उत्तर अपेक्षित होतं जन्म.ते आलंही.म्हणजे माहिती म्हणून निरीक्षण म्हणून हे आपल्याला मान्य असतं की मर्त्य लोकांत जन्म आणि मृत्यू हे अटळ अविरत चालू रहाणारं चक्र आहे. पण मग स्मशान वैराग्य म्हणून उत्पन्न होणारी जाणीव अल्प का ठरते? आपण स्वतः बद्दल आश्वस्त असतो.हे सत्य आपण मनोमन स्वीकारलेले असते का? दुसरी बाजू आहे.

आपण जर सतत मृत्यू च्या भीतीने ग्रस्त राहिलो तर आपण काहीच कृती करू शकणार नाही.म्हणून काही काल गेल्यावर आपण त्या शोकग्रस्त मनस्थितीतून बाहेर आले पाहिजे.सतत शोकमग्न राहून चालणार नाही. म्हणजे समर्थ जाणत जाणत अशी द्विरुक्ती करतात त्याचा अर्थ समजून घ्यायला हवा. एखाद्या गोष्टीची जाणीव असणे आणि त्यात गुंतून रहाणे यातील फरकाकडे समर्थ आपले लक्ष वेधत असावेत.

संत लोक सत्प्रवृत्त सतत रहातात याचं एक कारण सांगीतले जाते की त्यांना मरणाचे 'भान' असते . म्हणून ते कधी कोणाचं अहित चिंतीत नाहीत आणि कधी कोणाचं अहित करत नाहीत.सतत विश्वकल्याण हा हेतू त्यांच्या वाणीतून पाझरत रहातो.

आपण हे जाणून त्यानुसार आपल्या आयुष्यात कसे वागावे हे ठरवावे.भरवसा धरायचा तो भगवंताचा.तोच आपल्याला चैतन्य देतो व कृती करवून घेतो.कालमर्यादा तोच ठरवतो .हे निश्चित पणे समजून आश्वस्त होऊन काम करावे.उपासना करावी. भ्रमात राहून काही करु नका.जाणून घेऊन स्वस्थ मनाने आपला जीवनप्रवास करा असे समर्थ सांगून आपल्याला आश्वस्त करीत आहेत असे मला वाटते. जाणत जाणत निश्चिती काये मानले||

---

**१९ ऑक्टोबर २०२३**

**या नरदेहाचेनि आधारें। नाना साधनांचेनि व्दारें।**
**मुख्य सारासारविचारें । बहुत सुटले ॥**
**(दशक पहिला - समास दहावा नरदेहस्तवननिरूपण ओवी क्र.१८)**

या नरदेहाचे महात्म्य जाणलेल्या महात्म्यानी परमार्थप्राप्तीसाठी नाना त-हेची साधने केली. आत्मानात्म विवेकाने सारासार विचार केला. असे बहुत सज्जन सुटले म्हणजे जन्ममृत्यूच्या, पापपुण्याच्या फेऱ्यातून मुक्त झाले हा झाला सरळ स्पष्ट असा शब्दार्थ.

चिंतनीय प्रश्न -

१) सुटण्यासाठी म्हणजेच मुक्तीसाठी एवढी धडपड का केली ?
२) "नाना साधनांच्याव्दारे "यातील नाना साधने कोणती? साधनामध्ये सर्वोत्तम साधन ते कोणते ?
३) सारासार' विचार कसा करावा? त्याचे कोणते टप्पे आहेत ?
४) प्राप्त नरदेहाचा आधार प्रापंचिक माणसाने परमार्थप्राप्तीसाठी कसा घ्यावा
५) समर्थांचे बोधवचन आचरणात कसे आणावे ?

नरदेह हा जर परमार्थ साधण्याचा एकमेव मार्ग आहे, परमेश्वराचे सान्निध्य लाभणारी भक्ति जर याच जन्मात करता येते, तर ती भक्ति, तो साधनामार्ग सोडून मुक्त का व्हावे?

**मुक्त का व्हावे ?**

कल्पना करा, आपण गणेशोत्सवात दर्शनासाठी जात आहोत. गर्दिने गजबजलेला रस्ता... धड चालण्यासही जागा नाही असा. अगदी लगटून चालणा-यांच्या स्पर्शानेही नकोसे होतेय... आपलं अंग आकसून जमेल तेवढा स्पर्श टाळण्याचा प्रयत्न करतोय... चित्रविचित्र गर्दिच्या वासांनी नाक मुरडतोय... श्वास कोंडला जातोय. त्यात डिजे नामक राक्षसी भिंत कर्कश्य आवाजात आपल्या जवळ येतेय हातांनी दोन्ही कान बंद केले. हृदयाचे ठोके वाढलेत. काहीच सुचत नाही. शिरन् शिर आक्रसल्येय डोळे घट्ट मिटले गेले. आणि काय आश्चर्य! क्षणाचा लक्षांश तरी आपल्याला शांत वाटले. पूर्ण शांत. आपले अस्तित्वच लुप्त झाले एका क्षणाचा तो लक्षांशही आपल्या नकळत आपल्यात पुढील प्रसंगाला सामोरे जाण्याचे बळ देतो. हेच ते परब्रह्म ! हाच तो निजानंद ! पण केवढा लाभला ? तर क्षणाचाही लक्षांश ! दर्शन राहिले बाजूलाच, आपणास घरी आल्यावर

काय आठवले तर ती गर्दि, तो गलका, तो गोंगाट ! लक्षपूर्वक विचार केला तर जाणवेल की आपल्या आत्म्याभोवती अशीच गर्दि आहे, अन्नमय कोशाची, मनोमय कोशाची, मनातील असंख्य विचारांची, भावनांची, मग गर्दि शरीराची, त्यायोगे भासणाच्या दृश्याची देहबुध्दिची, अहंभावाची, बरे ही एक दिवसाची गर्दि नव्हे बर ! जन्मजन्मांतरीची देहबुध्दिमूळे आपण आत्मतत्वालाच विसरलोय ! दिशाहिन गर्दीचाच भाग झालोय. यातून सुटका म्हणजेच मुक्ति. मुक्त होणे म्हणजे पूर्णार्थाने परब्रह्मात सामावणे. या शाश्वत सत्यानंदाला प्राप्त करणे. म्हणून या परब्रह्मात पूर्णपणे पोहोचवणा-या मुक्तिमार्गाने बहुत सज्जन सुटले.




**कसे सुटले ? तर नाना साधनांद्वारे.**

परब्रह्मापर्यंत पोहोचण्याची नाना साधने आहेत ज्ञानमार्ग, कर्ममार्ग, मक्तिमार्ग यापैकी कोणत्याही मार्गाने तेथपर्यंत पोहोचता येते आपल्या प्रापंचिकासाठी मक्तिमार्ग हा सहज सुलभ आहे नवविद्याभक्तिपैकी प्रत्येक भक्ति आपल्याला थेट परमेश्वरा पर्यंत पोहोचवते. हीच परमार्थीच्या साधनमार्गापैकी साधने आहेत *श्रीसमर्थांच्या 'आत्माराम 'नामक दिव्य ग्रंथातील 'साधन निरूपण' नामक चौथा समास जरूर वाचावा श्रवणमनन हे सकळ साधनाचे सार आहे असे समर्थ सांगतान

**जें सकळ साधनाचे सार । जेणे पाविजे पैलपार ।**
**जेणें साधनें अपार । साधक ते सीध जाले ।।**
**(आत्माराम समास चौथा - ओवी क्र.१)**
**"ते हे जाण रे श्रवण । करावे अध्यात्मनिरूपण ।**
**मनन करिता समाधान । निजध्यासे पावती ॥**
**(आत्माराम समास चौथा ओवी क्रमांक २)**

श्रवणमनन हे सकळ साधनांचे सार आहे ज्याने हा भवसागर पार करून पलिकडे जाता येते. ज्या साधनाने अनेक साधक सिध्द झाले आहेत. या परब्रह्मतत्वाचे श्रवण करावे. त्याचे मनन करून भावार्थ शोधण्याचा प्रयत्न करावा. भावार्थ शोधता शोधता मन एकाग्र, निर्मल होत जाते त्याने समाधान लाभते असे करत करत मन सूक्ष्म होत आत्म्याच्या ठायी एकाग्र होत जाते. म्हणजेच ध्यान लागते .यालाच निजध्यास म्हणतात (प्रा के वि बेलसरे याच्या ओवीअर्थावरून) " मुख्य सारासारविचारे" सार-असार विचार कसा करावा ? मानवी व्यवहारीबुध्दिला अनुसरून हिताचे काय व अहिताचे काय यातील फरक करत जावा. हितवर्धक ते अंगिकारावे अहितकारक ते त्यजावे .ही सवय मनास झाली, की सत् कडे वळण्याची वृत्ती वाढेल व असत् ते कमी होत जाईल मन: शुब्दि, चित्त:शुब्दि आणि मग आत्मशुध्दिकडे वाटचाल सुरू होईल.

आत्म- अनात्म यातील विवेक आत्म्याठायी एकाग्र होण्यास शिकवतो. हे काही सहजसाध्य नव्हे, प्रपंचात राहून तर नव्हेच नव्हे. परंतु साधकाने एक एक पायरी पुढे जाण्याचा ध्यास बाळगावा. रोजच्या जीवनात ही सारासारविवेक बुध्दि जागृत ठेवावी. कमी बोलावे, कमी खावे, अनेकातून एकाच्या या प्रवासात आपले सारे दुर्गुण लोप पावतात, निर्विकार परब्रह्माच्या जवळ जाताना आपणही अनासक्त, अनुसूय, अव्दितीय, अनादि अनंत होत जातो. जिवाकडून शिवाकडे जाणाऱ्या या प्रवासात समर्थवचनांकित मुख्य सारासारविचार जरूर अंगी बाणावा.

**नरदेहाच्या आधारे प्रापचिक माणसाने परमार्थप्राप्ती कशी करावी?**
**समर्थाचे बोधवचन आचरणात कसे आणावे ?**

समर्थवाङ्मय हे काही एकदा वाचून, निरूपण करून सोडून द्यावे असे नाही. ते पुनः पुनः वाचावे. श्रवण करावे मनन चिंतन करावे. दरवेळी नवीन अर्थ गवसावा, नवीन विचार, नवीन प्रेरणा मिळावी असे याचे सामर्थ्य आहे. आपल्या सर्वांचे आयुष्य आहे त्या क्षणापासून बदलून मानवी जीवनाचे सार्थक करण्याची स्फूर्ति समर्थविचारांत आहे मात्र आपण "काया वाचा मनोभावे तुझा मी म्हणवीतसे " असे समर्थासह म्हणता म्हणता खरोखरच "मी तुझा आहे" या भावनेने शरण जायला हवे

माझ्या सद्गुरूच्या ओवीचे यथाशक्ती यथामती निरूपण करण्याचा प्रयत्न केला. अथांग ज्ञानसागराच्या खोलीचे वर्णन वाळूकणाने करावे, ज्ञानसागराच्या किनाऱ्यावर आदळणा-या लाटांनी भिजावे इतकिच या कणाची बुव्दिझेप. परंतु आपण ज्ञानीजनांनी या गहन सागराची गूज ऐकावी आणि सद्गुरूंना अपेक्षित योग्य भावार्थ समजावा ही नम्र विनंती

---

**२० ऑक्टोबर, २०२३**



**अग्न गृहासी लागला । आणि सावकास निजेला ।**
**तो कैसा म्हणावा भला । आत्महत्यारा ।।११-०३-०७।।**

'सिकवणनिरुपण' समासातील ही ओवी म्हणजे समर्थांचा 'रात्र वैऱ्याची आहे, सावध हो!' हा इशाराच आहे! समर्थांनी दासबोधातून व इतर वाङ्मयातून कायमच 'सावध, साक्षेपी आणि दक्ष' राहण्याची पूर्वसूचना दिली आहे. समर्थांना अपेक्षित सावधपण आपल्यात येण्यासाठी या एका समासाची पारायणं केली पाहिजेत इतक्या ताकदीचा हा समास आहे. प्रस्तुत ओवीत समर्थांनी दिलेले रूपक मनात खोलवर जाऊन विचार करायला प्रवृत्त करते.

द्वैत अर्थाने पाहिले तर खरंच आपल्या घराला आग लागलेली असताना कोणता मूर्ख मनुष्य झोपून राहील? असा झोपलेला, गाढ निद्रेत असलेला मनुष्य खरंच आत्महत्यारा म्हणावा लागेल. कारण अश्या प्रसंगी खडबडून जागे होऊन ती आग विझविण्यासाठी प्रयत्न करणे अपेक्षित आहे. हाच फॉर्मुला समर्थ आपल्या जीवनातील प्रवासासाठी वापरायला सांगतात.

मानवी आयुष्य चार आश्रमांमध्ये विभागलेले आहे हे आपण जाणतो, ब्रह्मचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ आणि सन्यास! पण खरंच आपण एका आश्रमातून पुढच्या आश्रमात जातो का? गृहस्थाश्रमातून वानप्रस्थाकडे आपली वाटचाल होते का? आयुष्यभर जाणते आणि अजाणतेपणाने घडलेली कर्मं जेव्हा भोगांच्या रूपात आवासून उभी राहतात तेव्हा तरी आपण जागे होतो का? माझ्या वाट्याला आलेले दुःख कशामुळे आहे, याचा शोध आपण घेतो का? तर बहुतांशी वेळा या प्रश्नांचे उत्तर 'नाही' हेच आहे!

मनुष्याला चौकटीत राहायला आवडत नाही. बंधन झुगारून मुक्तपणे संचार करायला आवडतो मग अश्या मनुष्याच्या वाट्याला जेव्हा **शुभाशुभेन कर्मणा देहांते यमयातना । स्वर्गनरकादि भोक्तव्यमिदं चैवाधिदैविकं ।। (संदर्भ - दासबोध दशक ३, समास ८)** असे आदिदैविक ताप येतात तेव्हा तरी त्याला खडबडून जाग यायला पाहिजे. परंतु देहबुद्धी, अहंकार आणि विषय-विकार यांची नशा इतकी ताकदवान असते की ते याची जाणीवच मुळी होऊ देत नाहीत.

'मीच आहे माझ्या जीवनाचा शिल्पकार!' हे सद्गुरु वामराव पै यांनी सांगितलेले वाक्य मनुष्य बहुतेक वेळा अहंकारातूनच घेतो. परंतु माझ्या वाईट कर्मांचा शिल्पकार देखील 'मीच' आहे हे मात्र तो विसरतो. मग मात्र त्याची अवस्था समर्थांनी सांगितलेल्या गाढ निद्रेत असलेल्या माणसासारखी होते.

शारीरिक, मानसिक भोगांनी ग्रस्त होऊन सुद्धा परमार्थाकडे वळण्याची जाणीवच ज्याच्या पिंडाला शिवत नाही, तो आत्महत्याराच नव्हे काय! 'आहे तरुण तर घे मजा करुन ' अश्या भ्रमात तारुण्य व्यसनांपायी, दारेषणा, वित्तेषणा, लोकेषणा आणि धुंदीत उधळून लावणाऱ्या मनुष्याला आत्महत्याराच म्हंटले पाहिजे, साठी नंतर अजूनही प्रश्न पडत असेल की मी आता काय करु? माझा वेळ कसा घालवू? तर असा मनुष्य आत्महत्याराच नाही का!

ऐंशीच्या उंबरठ्यावर येऊन अजूनही माझ्यातला 'मी' अहंकाराने पीडित आहे हेच जर मला उमजत नसेल तर मग असा मनुष्य आत्महत्याराच नाही का! तरुण वयात नाना उपभोग घेतले तरीही ज्याच्या मनात वासना उभी राहते आणि ती कशी व का उभी राहते हेच जो शोधत नाही, तो आत्महत्याराच म्हणावा लागेल! नरदेह घेऊन तर आलो आहे पण तो वापरायचा कसा हेच जर आपण शोधले नाही तर आपण आत्महत्यारा नाही का! म्हणूनच समर्थांनी पुढे यम यातनेचा झोला दाखविला आहे व तो कसा चुकवावा यासाठी मानवी आयुष्य कसे उभारायचे हे देखील दाखविले आहे.

आता एवढे समर्थांनी सांगून सुद्धा या वाटेवरुन जो जाणार नाही, तो देखील 'आत्महत्याराच' होय! मग संत तुकाराम महाराज म्हणतात तसे, "काय बा कुणाचे गेले, ज्याचे त्याने अनहित केले" (संदर्भ - तुकाराम गाथा, अभंग क्र. ३८७)

**२१ ऑक्टोबर २०२३**

**तरी आतां ऐसें न करावें। बहुत विवेकें बर्तावें ।**
**इह लोक परत्र साधावें । दोहीकडे ||**
**(दशक ११ समास ३ ओवी क्र. ९)**

ग्रंथराज दासबोधाच्या पूर्वार्धामध्ये म्हणजे पहिल्या दहा दशकांमध्य श्रीसमर्थांनी मानवाला शुद्ध शाश्वत आत्मज्ञानाचा सन्मार्ग दाखवला. आत्मज्ञान झालेला माणूस परब्रह्माशी तदाकार होऊन अद्वैत स्वानंदा रममाण होतो. यासाठी आत्मज्ञानाशी एकरूपता व्हावी या हेतूने नवविध मार्ग दाखवला.

प्रत्येक सश्रध्द आणि भाविक मनुष्य या नवविधा भक्तिपैक कोणत्याही मार्गाने गेला तरी तो एक श्रध्दाळू उपासक आणि समक्त मग समर्थ भक्ताला बद्धापासून सिद्धापर्यंतच्या लक्षणांचे वर्णन सागून बध्दाला मुमुक्षुकडे, मुमुक्षुला साधकाकडे आणि साधकाला सिद्ध होण् प्रबोधन करतात.

अशाप्रकारे पूर्वार्धामध्ये समर्थानी सिध्दांत सांगितला. उत्तरार्धात हा सिध्दात कृतीत कसा उतखायचा याचे ज्ञान करून दिले अ अकरावा रूद्र म्हणजेच साक्षात शिवशंकराचा अवतार असणारा बलभीम मारूती. महारुद्र हनुमान की जय ! अशा मारुतीरायाचे नाव दे अकराव्या दशकाला 'भीमदशक' असे संबोधले आहे (समासांतील अर्थान नाम दशकाला देण्याची पध्दत इतर दशकाना समर्थानी वापरली आहे)

मारुतिरायांच्या भीमरूपाचा आदर्श प्रपंच असो की परमार्थ, आपण सर्वांना पदोपदी घेत मार्गक्रमण करावे, हाच संदेश समर्थांना आपल्याला द्यायचा असेल.

आता आजच्या ओवीचा अभ्यास करूया. याला आपण 'ओवीनिरूपण' किंवा 'ओवीचिंतन ' असे संबोधण्यापेक्षा 'ओवी संदेश' असे म्हणावे ही विनंती- संदेशाला संवादाचे स्वरूप लाभते.

अवघा दासबोध हा गुरुशिष्यसंवादातून सांगितला आहे. म्हणूनच तो वाचताना आपणही स्वतःला समर्थांच्या शिष्यवर्गी पाहावे. साक्षात् समर्थ सांगताहेत हा भाव जागृत ठेवून जास्तीत जास्त एकाग्रतेने जीवगचे कान करून ऐकावे.

समर्थांचा आवाज ऐकण्याची ही आर्तता, तळमळ रोज समर्थांपर्यंत पाहोचावी यासाठी नुसते वाचन करण्यापेक्षा त्याला श्रवणाचे स्वरूप द्यावे. आणि यातून सद्गुरुमाऊली निश्चित आपल्यास अर्थबोधाचे आणि अंगीकारण्याचे सामर्थ्य देऊन समर्थ करतील यात शंका नाही!

---

**२३ ऑक्टोबर २०२३**

**परमार्थी तो राज्यधारी| परमार्थ नाहीं तो भिकारी |**
**या परमार्थाची सरी| कोणास द्यावी ||२३||१.९.२३**

सरळ अर्थ:- ज्याला परमार्थ साधला तोच खरा राजा.जो परमार्थ करत नाही तो भिकारी.परमार्थाची बरोबरी करील असे या जगात काही नाही. परमार्थ स्तवन या समासात ही ओवी आली आहे.याआधीच्या ओव्यांमधे मानवाच्या आयुष्यात परमार्थ किती महत्वाचा आहे ते समर्थ सांगत आहेत.त्याच्या योगे योगी

अद्वैत स्थिती प्राप्त करतात, सिद्ध साधु आणि महात्मे तसेच ब्रह्मादिक सगळ्यांचे विश्रांती चे मोक्षाची स्थिती परम अर्थ जाणल्याने ,साधना केल्याने मिळते.

नरदेहाचेही जे उद्दिष्ट आहे ते परमार्थानेच साध्य होते. जड जीवही परमार्थ मार्गे आपला उद्धार करवून घेऊ शकतात.जन्म सार्थकी लागतो.संसारसागरातुन तरून जायला परमार्थ हा एकमेव खात्रीचा मार्ग आहे.तपस्वी साधक यांना आधार म्हणजे साधनेत टिकून रहायला परमार्थ मदत करतो.दृढ निश्चयी बनवतो. हे सांगितल्यावर समर्थ प्रस्तुत ओवी लिहीतात

राजा हा नियंत्रक असतो.नियामक असतो.त्याच्या आदेशानुसार राज्यशकट सैन्य चालते.परमार्थ हा स्वनियमन करायला शिकवतो.एकवेळ इतरांना आवरणे ताब्यात ठेवणे हे धाकाने ,पैशाने,सत्तेने शक्य आहे.पण मनावर नियंत्रण महा कठीण आहे.ज्याने स्वतः ला जिंकले त्याने जग जिंकले असे म्हणतात. अलेक्झांडर जग जिंकूनही हरला. त्याची सत्ता मृत्यू पश्चात तर गेलीच पण पाठ फिरली की गणराज्ये आपली सत्ता परत मिळवत गेली.

पण समर्थ ज्ञानेश्वर महाराज तुकाराम महाराज हे संत पारमार्थिक सर्वोच्च पदी पोहोचले.इतकी शतकं लोटली तरी त्यांचे आदराचे, सद्गुरू पदीचे स्थान आजही अबाधित राहिले आहे.हे खरे राज्य.चिरस्थायी राज्य हे ज्याला मिळवता नाही आले तो व्यर्थ भूभार झाला असे समर्थ म्हणतात.त्याने किती सत्ता ऐश्वर्य मिळवले कमावले याला महत्त्व नाही. ज्याला जन्माला येण्याचे उद्दिष्ट सापडले नाही तो विपन्न ,कर्म दरिद्रीच.अशा हतभाग्याला भिकारी हीच उपमा योग्य आहे. संत झोपडीत स्वर्गसुख भोगतात आणि मोठ्या ऐटीत म्हणतात

**राजास जी महाली सौख्ये कधी मिळाली|**
**ती सर्व प्राप्त झाली| या झोपडीत माझ्या||**

आणि सर्व सत्ताधीश मात्र महालात चिंतेने ग्रस्त तळमळत रहातात,सत्ता जायची वेळ आली की बंकरमधे लपून स्वहस्ते स्वतः ला संपवतात. ही उदाहरणे कोण खरा भाग्यवान आणि कोण करंटा हे स्पष्ट करतात. परमार्थाची बरोबरी कशाचीच होत नाही . जे जाणण्यास परम आहे ते जाणल्याने परमात्म्याची भेट होते व नंतर अद्वैत स्थिती प्राप्त झाल्यानंतर काही मिळायची इच्छा उरत नाही कारण असा साधक वेगळेपणाने उरतच नाही. म्हणून परमार्थ एकमेव अद्वितीय आहे असे समर्थ रामदास स्वामी म्हणतात.

---

## संत संगतीने नरदेहाचे सार्थक करावे

**परमार्थी तो राज्यधारी । परमार्थ नाहीं तो भिकारी ।**
**या परमार्थाची सरी । कोणांस द्यावी ।। १-९-२३ ।।**

दासबोधातील स्तवनाच्या पहिल्या दशकातील "परमार्थस्तवन" समासातील ही २३ वी ओवी आहे.

अर्थ : "ज्याला परमार्थ साधला तोच खरा राजा होय. जो परमार्थ करीत नाही तो एकपरीने भिकारीच समजावा. परमार्थाची बरोबरी करेल असे या जगात काही नाही." सामान्यपणे सिद्धिचमत्कारांनाच लोक परमार्थ म्हणून महत्त्व देतात, पण तो खरा परमार्थ नव्हे.

सर्व दृश्य भास ओलांडून आत्मस्वरूपाची प्राप्ती करून घेणे म्हणजे परमार्थ साधणे होय. आपल्या हिंदू संस्कृतीने धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष असे चार पुरुषार्थ सांगितले आहेत. नरदेह प्राप्त झाल्यानंतर या चार गोष्टी मिळविल्याशिवाय नरदेहाचे सार्थक होत नाही किंवा, नरदेहाचा परिपूर्ण उपयोग करून घेतल्यासारखे होत नाही. या चारींमधील "मोक्षा"ला श्रेष्ठ म्हणजे परम पुरुषार्थ म्हटले आहे. त्यालाच परमार्थविद्या किंवा अध्यात्मविद्या असे म्हणतात, ज्याच्यामुळे सर्व संतमंडळी आणि त्यांची संगत लाभलेले धन्य झाले.

संतांच्या दृष्टीने परमार्थ म्हणजेच ब्रह्म, ब्रह्मज्ञान किंवा ब्रह्मज्ञान साधना. अशा या परमार्थविद्येचे/अध्यात्मविद्येचे वर्णन करताना भगवंतांनी

**राजविद्या राजगुह्यं पवित्रमिदमुत्तमम् ।**
**प्रत्यक्षावगमं धर्म्यं सुसुखं कर्तुमव्ययम् ।। गीता ९-२ ।।**

असे म्हटले आहे. म्हणजे, "ही विद्या/ज्ञान सर्व गुह्यांचा/गुपितांचा राजा म्हणजे श्रेष्ठ आहे. ही राजविद्या आहे म्हणजे सर्व विद्यांमध्ये श्रेष्ठ, पवित्र, उत्तम, प्रत्यक्ष बोध होणारी, आचरण्यास सुखकारक, अव्यय आणि धर्म्य आहे."

परमार्थ या शब्दाची फोड केली तर परम + अर्थ अशी होते. याचे विस्तृत वर्णन आ. बाबा बेलसरे यांनी समासाच्या सारांशामध्ये केले आहे. विस्तार भयास्तव त्यातील दोन अर्थ याठिकाणी वानगीदाखल घेत आहे. उर्वरित अर्थांसाठी समास सारांश मुळातून बघावा.

परम म्हणजे अखेरचे, अद्वितीय, आणि अर्थ म्हणजे कारण, हेतू, मूळ. आपल्या अनुभवास येणारे विश्व घटनामय आहे. आजू-बाजूला घडणाऱ्या घटनांचा शोध घेणे हा मानवी स्वभाव आहे. विश्वाचे आदिकारण म्हणजे ईश्वर. त्या ईश्वराचा शोध म्हणजे परमार्थ.

परम म्हणजे उत्तम, मुख्य आणि अर्थ या शब्दाचा सर्वात सुपरिचित अर्थ म्हणजे द्रव्य, संपत्ती. आपल्या गरजा भागविण्यासाठी आपल्याला संपत्तीची आवश्यकता असते, पण आपल्या गरजा कधी संपतच नाहीत आणि, संपत्तीची मागणी थांबत नाही. अशाश्वत संपत्तीने कधी गरजा भागत नाहीत आणि त्यांचे मागणेही संपत नाही. जेवढ्या अपेक्षा जास्त, तेवढं दारिद्र्य जास्त.

मनोबोधात श्रीसमर्थ म्हणतात, अती वीषई सर्वदा दैन्यवाणा - ६४ ब्रह्मरूपी शाश्वत संपत्तीने तृप्ती व समाधान मिळते, त्यामुळे त्याची प्राप्ती झालेले संत हे नेहमी तृप्त व समाधानी असतात. या समाधानापुढे त्यांना राजेश्वैर्य देखील तुच्छ वाटते म्हणूनच **"परमार्थी तो राज्यधारी, परमार्थ नाही तो भिकारी"** असे म्हटले गेले आहे. आणि असे ऐश्वर्य प्राप्त करणे म्हणजे परमार्थ करणे.

कोणतेही ज्ञान, सामर्थ्य संपन्न असते म्हणून भगवंताचे ज्ञान करून घेण्याने/परमार्थ साधल्याने जीवनातील दुःख नाहीसे होते. दुसऱ्या गावी जाण्यासाठी ज्याप्रमाणे गाडी हे साधन आहे त्याप्रमाणे, परमार्थ साधण्यासाठी किंवा परमात्म्याच्या प्राप्तीसाठी, नरदेह आणि प्रपंच हे साधन आहेत. प्रपंचातील आसक्ती, विषयाकडे असलेला ओढा भगवंताकडे लावला की परमार्थ साधतो परंतु टप्प्याटप्प्याने हे वैराग्य कसे साधायचे याचे ज्ञान संत-सज्जनांच्या संगतीत प्राप्त होते. आणि त्यासाठीच संत-सज्जनांच्या संगतीची कास धरायची आणि नरदेहाचे सार्थक करून घ्यायचे.

## २६ ऑक्टोबर २०२३

**चिंतनास प्राप्त ओवी**

**भल्याने परमार्थी भरावे । शरीर सार्थक करावे ।**
**पूर्वजांस उद्धरावें । हरिभक्ती करुनि ।।०१-०९-२७।।**

परमार्थस्तवन' समासातील या एका ओवीत समर्थांनी मनुष्य जन्माचे ध्येय आणि त्या ध्येयाप्रती पोचण्याचा मार्ग दाखविला आहे. त्या मार्गावरुन चालल्याने काय प्राप्त होते हे देखील दाखविले आहे. म्हणजे एकाच ओवीत का? कसे? आणि प्राप्त काय? या तीनही गोष्टी दाखविल्या आहेत. मनुष्य जन्म कसा प्राप्त होतो हे आपण मागील काही ओव्यांमधून पाहिले,

आता समर्थ मनुष्य जन्म मिळाला पण याचे सार्थक कसे करायचे याचे मार्गदर्शन करतात. मागे सज्जनगड शिबिरात सांगितल्याप्रमाणे दासबोधातील एक एक ओवी म्हणजे मनुष्य जीवन जगण्याचे गाईड आहे. यावर संपूर्ण विश्वास आणि निष्ठा ठेवून जो आयुष्य जगला त्याने खरोखरीच स्वतःसोबत पूर्वजांचा उद्धार केला! आम्हा स्त्रियांना तर अधिक पुण्य लाभते कारण आम्ही सासर आणि माहेरच्या पूर्वजांना उद्धरुन नेऊ शकतो इतकी ताकद, इतके सामर्थ्य या परमार्थ मार्गात आहे. अर्थात, समर्थांनी सांगितलेल्या मार्गावरून चाललो तर!

समर्थांनी 'भला' कोणास म्हंटले आहे? तर त्याची व्याख्या देखील समर्थांनी देऊन ठेवली आहे, "उत्तम गुणी शृंघारला । ज्ञानवैराग्ये शोभला । तोचि येक जाणावा भला । भूमंडळी ।।१२-१०-१७।।" जो उत्तम गुण धारण करण्यासाठी धडपडतो, कष्ट करतो, ज्याला आत्मज्ञान (पाहावे आपणासी आपण । या नाव ज्ञान ।।०५-०६-०१।।) जाणून घेण्याची जिज्ञासा असते, वैराग्य धारण करण्यासाठी जो कष्टतो, तो भला मनुष्य आहे असे समर्थ म्हणतात. म्हणजेच जो बद्ध मनुष्य मुमुक्षपर्यंतचा प्रवास करत आहे (चालू वर्तमान काळ) तो मनुष्य भला आहे असे समर्थ सांगतात. मग यासाठी मार्ग कोणता? तर 'परमार्थ मार्ग'! खरंतर परमार्थ संज्ञेची फोड केली तर परम + अर्थ असा अर्थ स्पष्ट होतो. हा परम अर्थ म्हणजेच आपले साध्य! कोणी त्याला 'मोक्ष' म्हणेल, तर कोणी 'परमेश्वर प्राप्ती', तर कोणी 'जन्म मृत्यूचा फेरा चुकविणे' असे म्हणेल.

या सर्व समानार्थी व्याख्या आहेत. परंतु त्याचे मूळ किंवा त्याचा success mantra हा त्या मार्गावरुन यशस्वीरीत्या चालणे हे आहे कारण तो मार्ग काही सोपा नाही! नुसते भाराभर ग्रंथ, पुस्तके वाचून, प्रवचने ऐकून तो उमजणार नाही. हा प्रवास खरंतर सोहं कडून पुन्हा सोहं कडे परत जाण्याचा आहे. म्हणूनच हा मार्ग सुकर होण्यासाठी लागते ती भक्ती सद्गुरूंना किंवा आपल्या उपास्य देवतेला संपूर्ण शरणागत भावाने मी (अहं) अर्पण करून टाकणे म्हणजे भक्ती होय. मग या मार्गावरुन जाण्यासाठी वाहन कुठले? तर ते मानवी देह होय. ८३ लक्ष, ९९ हजार, ९९९ जन्म भोगून झाल्यानंतर लाभलेला हा मनुष्य देह किती मोलाचा आहे हे त्यालाच कळते जो त्रिविध तापांतून पोळून निघतो, होरपळून, तावून सुलाखून बाहेर पडतो.

समर्थ म्हणतात, "तैसा संसारे दुखःवला । त्रिविध तापे पोळला । तोचि येक अधिकारी जाला । परमार्थासी ।।०३-०६-०७।।" समर्थांचा 'तोचि' शब्द महत्वाचा आहे कारण त्यात संशयाला जागाच राहत नाही. समर्थांनी इथे परमार्थ मार्गासाठी लागणारा eligibility criteria सांगितला आहे. मनुष्य संसारात असा पोळल्याशिवाय त्याला हे सुचतच नाही की अरे आपलं काहीतरी चुकतंय! आपण नाशिवंत गोष्टींच्या मागे धावतोय! हे तेव्हाच कळतं जेव्हा तोंड फुटून कपाळमोक्ष व्हायची वेळ येते. अर्थात, परमार्थ 'मार्ग लाभणे' यासाठी अनंत जन्मींची पूर्वपुण्याई लागते हे आपण जाणतोच! मग हा मार्ग प्राप्त झाल्यावर त्यावरुन

मार्गक्रमणा करायला सर्वात महत्वाचे लागते ते 'सद्गुरुचरण', 'सद्गुरुकृपा'! "ऐसा सद्गुरु पूर्णपणीं । तुटे भेदाची कडसणी । देहावीण लोटांगणी । तया प्रभुसि ।।०७-०१-१८।।" असे सद्गुरु सामर्थ्य लाभल्यावर मगच खऱ्या अर्थाने मनुष्य या नरदेहाचे सार्थक परमार्थ मार्गातून साधू शकतो.

आपण श्राद्ध, तर्पण करतो ते आपल्या पूर्वजांना शांती लाभावी म्हणून! परंतु जो मनुष्य परमार्थ मार्गावरुन यशस्वीरीत्या मार्गक्रमणा करतो, त्याच्या पूर्वजांना खरोखरीच शांती मिळत असेल कारण, "या नरदेहाचेनि लागवेगे । सार्थक करावे संतसंगे । नीचयोनी दुःख मागे । बहुत भोगिले ।।०३-१०-३८।।" हे दुःख आपल्या पूर्वजांनी भोगले आहे.

आपणही मागील जन्मांत भोगले आहे पण आता समर्थांनी जाणीव करुन दिल्यावर तरी आपण या सन्मार्गावरून प्रयत्नपूर्वक चालत राहिले पाहिजे यातच आपल्या जन्माचे सार्थक आहे. कारण समर्थांनी स्पष्ट इशारा देऊन ठेवला आहे की, "देह परमार्थी लावले । तरीच याचे सार्थक जाले । नाही तरी वेर्थचि गेले । नाना आघातें मृत्यपंथे ।।०१-१०-६१।।" आणि म्हणूनच आपण जर 'भले' असू तर हा परमार्थ मार्ग शेवटपर्यंत दृढ धरुन ठेवू, नव्हे नव्हे! समर्थांना प्रार्थना करु की 'न विसंबे आता तुमचे चरण' मग या देहाचे बरे वाईट आता तुम्हीच पाहून घ्या.

शेवटी, संत तुकाराम महाराजांनी पांडुरंगाला कळवळून केलेल्या एका विनंतीत ते म्हणतात, "तुटो हे मस्तक फुटो हे शरीर । हरिनामाचा गजर सोडू नये । नाशिवंत देह जाला जरी भंग । तरी कीर्तन रंग सोडू नये ।।" विठ्ठल विठ्ठल!

---

**धन्य धन्य हा नरदेहो । येथील अपूर्वता पाहो ।**
**जो जो कीजे परमार्थलाहो । तो तो पावे सिद्धीते।। ।।१-१-१०।।**

आपल्या या पवित्र अशा भारतभूमी मध्ये या नरदेहाने परमार्थाची साधने करून, अनेक लोकांनी सिद्धी प्राप्त करून घेतलेली आहे कोणी भक्तीची साधना केली तर ती त्यांना मिळाली, कोणी योग साधना, कोणी तिर्थ यात्रा, कोणी पुरश्र्चरणे, तपसाधना तर कोणी निष्ठेने नामस्मरण केले आणि आपापले इच्छित साध्य करून घेतले आहे.

कोणी वेदांचा अभ्यास करून विद्वान झाले, कोणी वाचासिद्ध झाले तर काही लोकांनी लहान सहान सिद्धी प्राप्त करून घेतल्यात.  हे सार नरदेहाने प्राप्त झालेत. असंख्य साधू, संत, सज्जन यांनी सुध्दा नरदेहात राहूनच आपले आत्महृत करून घेतलेले आहे.  असा हा नरदेह नामांकित आहे, विख्यात आहे.  पशु देहामध्ये  या गोष्टी शक्य नाही.

भगवंतांची प्राप्ती करून घ्यायची असेल तर त्यासाठी नरदेहच हवा. म्हणून माणसाला धडधाकट, धष्टपुष्ट देह मिळाला असेल तर त्यांनी लागलीच परमार्थाची वाट धरावी व आपले जीवन सार्थकी लावावे. पण या देहाद्वारे अति भोग किंवा अति दमन करणे उचित नाही.आपले शरीर निरोगी, स्वच्छ, पवित्र ठेवणे आवश्यक आहे कारण आपल्या जन्माचे सार्थक घडवण्यासाठी आपले शरीराच साथ देते.

या शरीराचा एक गुण आहे तो म्हणजे त्यात राहून "मी" जी भावना करतो त्या भावनेनेच शरीर साथ देते.  म्हणजे "मी" जर वासनेत असेल तर इंद्रिय वासनेमध्येच  असतात, "मी"  मत्सरामध्ये असेल

तर  शरीर मत्सराचीच कृती करते, तोच "मी" जर भक्तीमध्ये रंगला असेल तर शरीरही भक्तीमध्येच रमते, "मी" हा नामामध्ये मग्न असेल तर शरीरही  नामामध्येच रमते, "मी" जर  ध्यानात असेल तर शरीरही ध्यानासाठी अनुकूल होते.

संपुर्ण ८४ लक्ष योनी फिरल्यावर पूर्व पुण्याच्या सुकृताने मिळणारा हा देह खरोखरच अत्यंत धन्य आहे.  या नरदेहाची अपूर्वता अशी आहे की परमार्थ लाभावा यासाठी जे काही प्रयत्न आपल्या देहाकडून घडतील ते सर्व यशस्वी होतात म्हणून मानवाने आपल्या जीवनात आत्मदर्शन हाच मुख्य हेतू ठेवून जीवन जगावे व आपल्या जीवनाचे सार्थक करून घ्यावे. अर्थात यासाठी संतसज्जनांचा सतत सहवास असणे आवश्यक आहे.

---

**२७ ऑक्टोबर २०२३**

**अनंत जन्मीचें पुण्य जोडे । तरीच परमार्थ घडे ।**
**मुख्य परमात्मा आतुडे । अनुभवासी ॥ १-०९-२४ ॥**

अभ्यासासाठी प्राप्त ओवी श्रीमत् ग्रंथराज दासबोधाच्या स्तवनाच्या पहिल्या दशकातील परमार्थ स्तवन समासातील आहे. संपूर्ण दासबोधाचा जो मूळ गाभा आहे अश्या या परम वस्तूची प्राप्ति अनंत जन्माच्या पुण्याईने प्राप्त होते असे समर्थ म्हणतात. सदगुरूंचे सामान्य बोलणे अत्यंत संकेतात्मक असते, थोडे फार रहस्यात्मक देखील असते. त्यांच्या शब्दातील गर्भितार्थ शोधायला त्यांच्या शब्दांच्या अंतरंगात शिरणे गरजेचे असते आणि त्यांना आपल्याला नेमके काय सांगायचे आहे हे केवळ गुरुकृपेमुळे आणि गुरुनिष्ठेमुळे शक्य होते. प्रस्तुत ओवीत देखील आपण या जगांत कशासाठी आलो आहोत? आपण येथून पुढे कुठल्या दिशेने आणि काय घेऊन जायला हवे? हे सांगायची समर्थांची तळमळ दिसून येते कारण या जगातील या खोट्या मायेच्या पसाऱ्यात अडकून आपण रिकामी झोळी घेऊन तर पुढे जाणार नाही हा धोका समर्थांना व्यथित करतो.

अनंत जन्माच्या पुण्याईमुळे या मनुष्य जन्मात येऊन आपला पिंड सात्विकतेकडे लागणे, त्याला सदगुरूंच्या कृपेची जोड मिळणे, सद्‌गुरुकृपेमुळे अंतरंगात परमार्थाकडे जाण्याची वाटचाल सुरू होणे इतकी सगळी अनुकूलता मिळाल्यावर देखील आपल्याला तो “परम अर्थ” न गवसल्यामुळे या भौतिक जगातील मायेच्या पसाऱ्यात अडकून पुन्हा आपले अध:पतन तर होणार नाही न ? या काळजीने समर्थांचे हृदय तळमळत् असते. आपल्या जीवनाचे नेमके ध्येय काय आहे ? आपण  या जगांत काय घेऊन आलेलो आहोत ? पूर्व जन्मीचे संस्कार, प्रारब्धवश आलेले काही सत्कर्म आणि त्यामुळे आलेला हा मनुष्य जन्म ही शिदोरी घेऊन आपण या जगांत आलो खरं पण कशा साठी आलो ? आपल्याला या जन्मातून काय साधायचे आहे? याचे उत्तर आपल्याजवळ नसते.

जन्माला आलेले मुल आपल्या बरोबर काही घेऊन येत नाही व स्मशानाकडे जाणार मृत देह देखील आपल्या बरोबर काही घेऊन जात नाही, हे सत्य माहीत असूनही जन्म आणि मृत्यू या दोन टप्प्यांच्यामध्ये आपण सतत धडपडत असतो पण आपल्या जीवनाचे ध्येय काय आहे यावर आपण कधी विचार करीत नाही. आपल्या जीवनाचे ध्येय “भगवद्‌प्राप्ति” असायला हवे आणि हे ध्येय या जगाच्या बाजार पेठेत आपल्याला कधीही सापडणार नाही.

समर्थ म्हणतात आपल्याला आपल्या जीवनाचे ध्येय गाठणे, जन्म सार्थक करणे आहे तरी परम सुगम म्हणजे अतिशय सोपे आहे. एखाद्या सक्षम सत्पुरुषाचे म्हणजे सद्गुरुचे चरण धरावे आणि त्यांचे बोट धरून या दृश्य जगाचा उंबरठा ओलांडून आत्मारामाच्या कुशीत जाऊन स्थिरावणे सहज शक्य होते. पण हे सोपे वाटले तरी परी जनासी जाला दुर्गम असे पण समर्थ सांगतात. कारण नि:शंक होऊन शरणागती पत्करणे आपल्याला सहज शक्य होत नाही म्हणून हा मार्ग सोपा असला तरी आपल्याला दुर्गम वाटतो.

नसे ज्ञान हे काय मागू तुला मी । तुम्ही जाणते सद्गुरू पूर्ण स्वामी । यथायोग्य वाटे तसे तू करावे । कृपेने तुझ्या हे जीणे धन्य व्हावे ।। हा श्लोक मुखाने आपण रोज म्हणत असतो पण सद्गुरुकडे आपले मागणे काही संपत नाही. तुझ्याजवळ काय मागू हे ज्ञान माझ्याकडे नाही असे आपण म्हणतो खरे पण माझ्यासाठी काय योग्य आहे हे सद्गुरुला ठरवू न देता आपणच ठरवू लागतो. कारण पूर्ण शरणागती आपल्या अंगवळणी नाहीच मुळी.

एखादे लहान मुल खेळायला घराच्या बाहेर जाते आणि चिखलाने बरबटून घरी परतते तशी आपली अवस्था झालेली आहे. पण लहान मूल आणि आपल्यात मूलभूत फरक शरणागतीचा आहे. लहान मुल चिखलात माखून घरी आल्यावर स्वत:ला आईच्या स्वाधीन करते आणि त्याची आई अतिशय प्रेमाने त्याला जवळ घेऊन त्याच्या अंगावरील चिखल दूर करून त्याला निर्मळ करते. आपण असे करीत नाही.

आपण देखील पूर्णपणे स्वत:ला सद्गुरूंच्या हातात सोपविल्याने ते आपल्या मनातील विषयाचा चिखल दूर करून, आपल्याला निर्मळ करतील जेणेकरून आपल्याला परमात्म्याच्या मूळ स्वरूपाचे दर्शन घडेल. शरणागती पत्करण्यासाठी परमार्थाचा अर्थ गवसणे अतिशय गरजेचे आहे कारण या भवसागरातून कसे पार पडायचे हे परमार्थ ज्ञानानेच शक्य होते.

यथामति गवसलेला ओवीचा अर्थ सर्व गुरु बंधु-भगिनीं समोर मांडायचा प्रयत्न केला आहे. यात जे काही चांगले असेल ते समर्थांचे आणि जे न्यून वाटेल तो माझ्या बुध्दीचा कमकुवतपण्याचा परिणाम आहे, म्हणून मांडलेला विषय गोड मानून घ्यावा.

---

<u>**२८ ऑक्टोबर, २०२३**</u>

**या नरदेहाचेनि लागवेगे । येक लागले भक्तीसंगे।**
**येकी परम वीतरगे । गिरीकंदरे सेविली ।। १ -१०-२ ।।**

सरल अर्थः- जन्म झाला तो मनुष्य योनीत . म्हणून नरदेह मिळाला. ज्यांना या नरजन्माची अपूर्वता , मुल्य माहिती आहे, ते लागवेगे म्हणजे लगोलग भक्तीच्या मार्गाला लागले. कोणी अत्यंत विरक्त होऊन डोंगरकपारीत अत्यंत कठीण अशी तपश्चर्या करायला गेले.

भावार्थः-- कालच आपण ओवी १ -१० -१ वाचली" धन्य धन्य नरदेहो। येथिल अपूर्वता पाहो। नरदेह परमेश्वर कृपेने मिळतो. कधी? चौर्यांशी लक्ष योनीतुन फिरताना पापपुण्य समसमान होते , तेव्हाच मनुष्य जन्म मिळतो. हा अत्यंत दुर्लभ असा योग आला. तर मग त्याचे मुल्य माहिती असेल तर हा जन्म वाया जाणार नाही. आपण जन्म निश्चित सार्थकी लावू. अतिशय मुल्यवान रत्न वा वस्तु मिळाली तर आपण तिचा जपून वापर करतो. सर्वांना अभिमानाने दाखवतो. मात्र नरदेहाची अपूर्वता आपल्याला कोणीच

सांगितलेली नसते. ती समर्थांनी सांगितली. ईश्वराने मनुष्य जन्म दिला. बारशाला सगळे आप्तस्वकीय अनेक भेटी देतात. पण तत्पूर्वीच ईश्वराने आपल्याला तीन अमूल्य भेटी ( देणगी) दिल्या व या जगात पाठवले.

१) वाणी - आपण बोलू शकतो. आपले विचार कल्पना इतरांना सांगू शकतो. व परमेश्वराचे नाम घेऊ शकतो. पोपटही बोलतो. विठू विठू म्हणतो. पण त्याचा त्याला काही उपयोग होत नाही. पशुदेही नाही गती। ऐसे सर्वत्र बोलती ।।

२) बुद्धीः- परमेश्वराने बुद्धी दिली. नवे नवे शोध लावून जीवनात सुखसाधने निर्माण करु शकतो.ध्येय्य ठरवून जीवनाला एका उंचीवर नेऊ शकतो.

३) निवडीचे स्वातंत्र्यः- आपण जीवनाला योग्य दिशा देऊ शकतो. इतरांनी केलेली हेटाळणी, ठेवलेली नावे, केलेले उपमर्द आपल्याला त्रास देत नाहीत. आपण अचल अशा ध्येय्यमार्गावर अग्रेसर होत रहातो.

या तीन देणग्यांचा वापर जर यथायोग्य केला तर नरदेहात अपूर्व अशी कामगिरी करता येते. ती कशी? तर गिनीजबुक व लिम्का बूक मधे नोंदवलेले विक्रम पहा. आपलेच विक्रम आपणच मोडून नवे प्रस्थापित करु शकतो. मात्र या अशा विक्रमांनी फार तर लोकप्रियता मिळेल जीवनाची सार्थकता होणार नाही. मग आपण काय करायचे तर नरदेहाची जी अपूर्वता आहे ती कशात आहे? तर जो जो कीजे परमार्थ लाहो। तो तो पावे सिद्धीते।। हे लक्षात घेतले, तर अपूर्वतेचा आपण उपयोग करुन घेऊ शकतो.



अगदी गिरीकंदरात जायला नको. उग्र कठोर तपश्चर्या कशात करायची.? आपली आवड ओळखुन त्यानुसार जीवनात ध्येय्य ठरवून ते सतत सतत करीत रहायचे थॉमस अल्वा एडीसन ने २००० प्रयोग केले तरी विजेचा दिवा लागत नव्हता. सर्वांनी वेड्यात काढले. पण दिवा लागणारच यावर तो ठाम होता. व दिवा लागला. हिंमत है मर्दा तो मदद दे खुदा। कल्पना चावलाने स्वप्न पाहीले अंतराळात काम करीन. तिचे स्वप्न साकार झाले. समार्थांनी आनंदवनभुवनी स्वप्न पाहीले. ते त्यांच्यात हयातीत प्रत्यक्षात आले. हिंदुपदपातशाही निर्माण झाली. अटक ते कटक अनिर्बंध मराठ्यांची सत्ता तयार झाली

---

**२९ ऑक्टोबर २०२३**

**या नरदेहाचेनि आधारें। नाना साधनांचेनि व्दारें।**
**मुख्य सारासारविचारें। बहुत सुटले ॥**
**(दशक पहिला - समास दहावा ओवी क्र. अठरा )**

प्रास्ताविक - ग्रंथराज दासबोधातील पहिल्या दशकात श्रीसमर्थांनी आद्य प्रणव- स्वरूप श्रीगणेश, वेदमाता श्रीशारदा, सतुचिदानंद सद्गुरु, जगद्कल्याणकारी संत अशा उपास्यांचे स्तवन आणि आवाहन केले आहे. तदनंतर मानवी जीवनाला योग्य दिशा देणारे कवि, श्रोते, सभा, परमार्थ व नरदेह यांचेदेखील स्तवन केले

आहे. व्यवहारी बुध्दीच्या माणसाला अनुसरून समर्थ पहिल्याच समासात आपल्या ग्रंथाचे नाव काय, ग्रंथ लिहिण्याचा हेतु काय, ग्रंथाच्या अभ्यासाने काय फळ मिळणार हे आरंभीच स्पष्ठ सागतात

**आतां श्रवण केलियाचें फळ । क्रिया पालटे तत्काळ ।**
**तुटे संशयाचे मूळ । येकसरा ॥ (०१-०१-२८)**
**मार्ग सांपडे सुगम न लगे साधन दुर्गम ।**
**सायोज्यमुक्तीचे वर्म । ठाई पडे ॥ (०१-०१-२९)**
**"नासे अज्ञान दुःख भ्रांती। शीघ्रचि येथे ज्ञानप्राप्ती ।**
**ऐसी आहे फळश्रुती । इये ग्रंथी ।॥ (०१-०१-३०)**

पहिल्याच दशकातील शेवटच्या म्हणजे दहाव्या समासात समर्थ आपल्याला नरदेहदुल्लभतेची जाणीव करून देतात सुरुवातीला सागितलेली फलश्रुती आपल्यापैकी सर्वांनाच लागू पडते, का तर आपल्या सर्वांनाच नरदेहप्राप्त आहे .पहिल्याच दशकाअंती समर्थ आपल्याला परमार्थमार्गाच्या प्रवेशव्दाराशी घेऊन येतात कारण यापूर्वी कधी मनुष्य जन्माचे महत्वच आपल्याला ठाऊक नसते. बहुतेक प्रपंची जीव आला जन्माला म्हणून जगत असतो

आपण पशुपक्षांपेक्षा, वनस्पतींपेक्षा वेगळे आहोत, श्रेष्ठ आहोत अशी जाणीव जरूर असते. परतु मिळालेल्या ज्ञानेद्रियांवर आणि कर्मेंद्रियांवर मुक्तपणे स्वार होण्यापलीकडे काही आपण पोहोचत नाही. नरदेहस्तवन सांगून समर्थ आपल्याला चांगलेच अंतर्मुख व्हायला लावतात.

या नरदेहाची महती काय, याचा वापर कसा करावा, आपले ध्येय काय असावे असे सांगून शेवटी समर्थ आपल्यातील देहबुदीला चागलाच चिमटा काढतात. माझा देह, माझ नाव, माझा चेहरा, माझं घर यात गुरफटलेल्या जीवाला समर्थ जागे करतात. इथेच माणसाची परमार्थ दिशेने वाटचाल सुरू झालेली असते.

आपल्यावरील देहबुध्दीचा प्रभाव संपायला कितीतरी वर्षे, कितीतरी जन्मच वाया जातील, वाया गेले हे खरे! परंतु देहबुद्धीची क्षणभंगूरता तर लक्षात आली !

---

**३० ऑक्टोबर, २०२३**

**या नरदेहाचेनि संमंधे । बहुत पावले उत्तम पदें ।**
**अहंता सांडून स्वानंदे । सुखी जाले ।।१-१०-१९**

नरदेह हे साधन म्हणून वापरून जे स्वानंद सुखाचे अधिकारी झाले असे अनेक महानुभाव आहेत .अहंकार सोडल्याने ही किमया घडली. याबाबत वाल्याकोळ्याचे उदाहरण महत्वाचे आहे.वाटमारीचा व्यवसाय होता.बलाचा शस्त्रांचा अहंकार होता.आपली दहशत आहे हे माहित होते.त्याचाही अभिमान. हत्या करणे लुटणे काही गैर कृत्य वाटत नव्हते

**सकळ अवगुणामधें अवगुण| आपले अवगुण वाटती गुण ।**
**मोठें पाप करंटपण| चुकेना कीं ||८||१९.८.८**

पण नारद मुनी भेटले.त्यांनी जाणीव करून दिली की तुझे सोयरे हे धनाचे वाटेकरी आहेत .पापाचे नाहीत .याची खात्री पटली आणि डोळे उघडले. अनुताप झाला.अभिमान अवघा गळाला नारदमुनींनी त्रयोदशाक्षरी मंत्र दिला त्याचा जप देहभान विसरून केला आणि पातकांच्या राशी जळून गेल्या.

**अवगुण त्यागी दिवसेंदिवस| करी उत्तम गुणाचा अभ्यास |**
**स्वरूपीं लावी निजध्यास| या नांव साधक ||१४|| ५ .९ .१४**

हा जप देहामुळे शक्य झाला.विदेही अवस्था प्राप्त झाली.रामांचा अवतार होण्यापूर्वीच काव्य स्फुरले. अहंता सुटणे अवघड असते पण ते उपासनेतून साध्य होते.देहाची आसक्ती प्रेम ममत्व हे अहंकाराचे 'मी' पणाचे कारण आहे.त्यासाठी या देहाचे सत्य स्वरूप नीट ओळखायला हवे. गुण व उपयुक्तता साधन म्हणून वापरत असताना त्यांच्यात गुंतून न पडता अलिप्त कसे व्हायचे ते संतांकडून शिकून आत्मसात करावे लागेल.विवेक तर्क यांनी कठोर आत्मपरीक्षण करावे लागेल.

**तत्त्वझाडा निःशेष होतां | तेथें निमाली देहअहंता |**
**निर्गुण ब्रह्मीं ऐक्यता | विवेकें जाहली ||२१|६-३.२१**

८२ तत्वांचा झाडा ,निरास घडल्या वर देहाची आसक्ती पूर्ण सुटते आणि साधक व ब्रह्म स्वरूप एक होतात.ते शाश्वत आनंदाचे ठिकाण असल्याने भक्तही त्या स्थितीला पोहोचतो. अहंता सोडली,सुटली म्हणून परमसुख प्राप्त झाले.

---

**३१ ऑक्टोबर २०२३**

**दशक-१, समास- १० नरदेह स्तवन" ओवी क्रमांक २१.**
**पशुदेही नाही गती। ऐसे सर्वत्र बोलती।**
**म्हणून नरदेहीच प्राप्ती। परलोकाची।।**

सरलार्थ: - पशु देहापेक्षा नरदेह श्रेष्ठ आहे. पशु देहात उत्तम गती मिळत नाही. असे सगळे सांगतात म्हणून भगवंताच्या प्राप्तीला नरदेह उपयोगी पडतो यात कोणतीही शंका नाही.


भावार्थ: - पहिला दशक नित्याचा आहे. या दशकात अनेक तत्त्वांचे स्तवन केलेले आढळते स्तवन म्हणजे स्तुती. सृष्टीतल्या विविध तत्त्वांना वंदन. ज्या तत्त्वांच्या कृपेमुळे आपल्याला ज्ञानप्राप्ती होते. त्या त्या प्रत्येक तत्त्वाला वंदन केले आहे. शेवटी समर्थांनी नरदेहाला सुद्धा वंदन केले आहे.

नरदेह जरी अनित्य असला तरी नित्य अशा परलोकाची प्राप्ती करून घेण्यासाठी नरदेह कामी येतो. म्हणून नरदेहाला ही वंदन .इथे समर्थांचे वेगळेपण दिसून येते. नरदेहाच्या सहाय्याने अनेक योगी, संत, साधू, विद्वान, ज्ञानी यांनी परमार्थाच्या साधनाचे अनेक प्रकारे प्रयत्न केले आणि ते त्यात यशस्वी झाले.

भगवंत अत्यंत सूक्ष्म आहे. त्याला स्थळ, काल, मन , बुद्धी कशाकशाचे ही बंधन नाही. तो सर्वांच्या पलीकडे आहे. पण हे जरी खरे असले तरी त्याच्यापर्यंत पोहोचण्यासाठी साधन म्हणून देहाचाच तारू वापरावा लागतो. या दशकात समर्थांनी मानव जन्मात होणाऱ्या चुका, न्यून तसेच त्याचे फायदे सगळ्याचाच क्रमवार

उहापोह केलेला आहे. जन्म, मृत्यू, व्याधी हे सगळं अटळ आहे , तरीही नरदेह अमूल्य आणि दुर्लभ आहे. त्याचे महत्त्व जाणून त्याचा साधन म्हणून कसा उपयोग करून घ्यायचा ते समर्थ सांगतात.

शास्त्र असे सांगते की, जन्मजन्मांतरीचे पाप-पुण्य समसमान झाले की मगच मानव देह प्राप्त होतो. हे झाले मानव जन्माचे पहिले वैशिष्ट्य. मग असा 84 लक्ष योनी फिरुन मिळालेला देह त्याचे सार्थक केलेच पाहिजे. नरदेहा मध्ये येऊन पुष्कळ जणांनी स्वतःचा उद्धार करून घेतला. ही ऊर्ध्वगती केवळ नरदेहातच शक्य आहे. समर्थांनी या समासाच्या २ ते १८ ओव्यांपर्यंत नरदेहामुळे कोणी कशी परमपदाची प्राप्ती करून घेतली अशी अनेक उदाहरणे देऊन सांगितले आहे. वाल्या कोळ्याचा वाल्मिकी ऋषी झाले, आणि परमपदाला पोचले अशी नरदेहाची श्रेष्ठता आहे




समर्थ म्हणतात - पशुदेही नाही गती । ऐसे सर्वत्र बोलती। ह्या ओवीत समर्थांनी तत्त्वज्ञान, अध्यात्मज्ञान आणि शरीर शास्त्र या तिन्हीच्या दृष्टीने नरदेहाचे महत्त्व पटवून दिले आहे. मोक्षप्राप्तीचे साधन केवळ नरदेहातच सापडते. पशु देहात ते शक्य नाही कारण पशु पराधीन असतात. मानवाला सगळेच स्वातंत्र्य असते बुद्धीचे, कर्माचे, विचाराचे सगळेच स्वातंत्र्य मानवाची शारीरिक रचना पाहिली तर, माणसाच्या पाठीचा कणा उभा असतो. मानवी शक्ती उर्ध्वगामी असते. माणसाची उर्ध्वगामी शक्ती म्हणजेच योगशास्त्रात वर्णन केलेली कुंडलिनी शक्ती . ही शक्ती जागृत करून ब्रम्हरंध्रात स्थिर करता येते माणूस ब्रह्मलीन होऊ शकतो. पण पशु जीवनात त्यांना कसलेच स्वातंत्र्य नाही. पराधीनता वाट्याला आलेली असते. त्यांच्या जन्मात उर्ध्वगती ही नाही आणि अधोगती ही नाही. आहे त्याच स्थितीत जगायचे. मिळालेले प्रारब्ध भोगायचे आणि मृत्यूला सामोरे जायचे. पशु योनी म्हणजे भोग योनी.

ऐतरेय उपनिषदात एक कथा आहे. ईश्वराने निर्मिती कार्य सुरू केले आणि इंद्रियांच्या देवता निर्माण केल्या. त्यांना राहायला जागा हवी म्हणून गाय, घोडा, अश्या प्राण्यांचे शरीर दाखवले, पण देवतांनी ते नाकारले. कारण प्राण्यांच्या शरीरात आहार, भय, निद्रा , मैथुन ह्या व्यतिरिक्त दुसरी व्यवस्था नाही. शेवटी ईश्वराने मानवी शरीर दाखवले. ते त्यांनी आनंदाने स्वीकारले. केवळ मानव शरीरातच त्याच्या निर्मात्याची ओळख व त्याचे ज्ञान करून घेण्याची क्षमता आहे. मानव योनी म्हणजे कर्मयोनी.त्याला मिळालेले कर्म स्वातंत्र्य. पशुंच्या मानाने माणूस खूपच प्रगत आहे. शिवाय माणसाच्या मेंदूचे वजन सर्वात जास्त असते. आत्तापर्यंत मानवाने अनेक शोध लावून मानवी जीवन खूप सुसह्य व सुखी केलेले आहे.

स्वतःच्या जीवनाला दिशा देण्याचे स्वातंत्र्य मानवाला असते. सारासार विचार शक्ती ,चांगले-वाईट, खरेखोटे, न्याय-अन्याय याचा निवाडा करण्याचा विवेक माणसाला आहे. शिवाय साधना करून उत्तम पद प्राप्त

करून घेण्याची शक्ती ही मानवाला मिळालेली आहे. समजा वाघाने गाय मारली , पुन्हा भुक लागल्यावर दुसरी मारली, पण त्याचे त्याला काहीच वाटत नाही कारण पशूंकडे भावनाही नसतात.

नरदेहाची अनेक वैशिष्ट्ये समर्थांनी मांडलेली आहेत. पुढच्या चरणात समर्थ म्हणतात म्हणौन नरदेहीच प्राप्ती। परलोकाची।। मानव देहातच परलोक साध्य करता येतो. स्वर्गातील अनेक देवदेवता सुद्धा पृथ्वीवर जन्म मिळावा मानव देह प्राप्त व्हावा म्हणून क्यू मध्ये असतात. सांगायचा मुद्दा हा की, त्यांनाही मानव जन्माची अभिलाषा असते. आता पर लोक म्हणजे काय?? परलोक म्हणजे स्वर्ग खचितच नाही. कारण पुण्य संपल की स्वर्गातून पृथ्वीवर ढकलले जाते.अनेक लोक आहेत. त्या सगळ्या लोकांहून जो परमश्रेष्ठ असा लोक. एकदा का ती परमगती प्राप्त झाली की पुन्हा ह्या लोकात यावे लागत नाही.

परलोक म्हणजे अमर लोक किंवा ब्रह्मज्ञान, आत्मज्ञान. आत्मज्ञानाची प्राप्ती होणे म्हणजेच परलोकाची प्राप्ती होणे. ते आत्मज्ञान मिळविण्यासाठीच सगळ्या संतांनी प्रयत्न केले ते ज्ञान मिळवले आणि देह सार्थकी केला. त्याचा अनुभव त्यांनी घेतला. म्हणून ते आपल्याला परोपरिने सांगत असतात. अशा अनेक प्रकारे समर्थांनी नरदेहाचे महात्म्य सांगितले आहे. त्याला परोपकारार्थ झिजवून प्रत्येकाने स्वतःच्या आत्म्याची उन्नती करून घ्यावी.

---


**<u>३१ ऑक्टोबर २०२३</u>**

**तत्वज्ञानी योगाभ्यासी। ब्रह्मचारी दिगंबर संन्यासी।**
**षड् दर्शनी तापसी। नरदेहीच जाले।। १-१०-२३ ।।**

सरल अर्थः- नरदेह मिळाला, अलभ्य लाभ झाला. हे ओळखुन अनेकांनी चांगला उपयोग करुन आयुष्य सार्थकी लावले. कोणी आत्मज्ञान , ब्रह्मज्ञान मिळविले. कोणी योगी झाले व योगाभ्यास केला. कोणी ब्राह्मी स्थिती प्राप्त करुन निरंतर स्वरुपानुसंधानात रमले. कोणी दिगंबर संन्यासी झाले.कोणी सहा शास्त्रे अभ्यासुन भाष्य लिहिले. कोणी तपश्चर्या करुन इप्सित प्राप्त केले.

भावार्थः- काल आश्विनीताईंनी ओवी विवेचन केले. त्यात आपण पाहिले की पशुदेही नाही गति। त्या केवळ भोग योनी आहेत. काही कर्तृत्व , पुरुषार्थ, यश किर्ती मिळवायची तर केवळ नरदेह मिळाल्यासच हे जमते. जीव ८४ लक्ष जीवयोनीतुन फिरत फिरत, अनेक जन्ममृत्यू सोसुन जेव्हा मनुष्य जन्म त्याला परमेश्वर कृपेने प्राप्त होतो. याचा अर्थच आता परमेश्वराने त्याला एक अपूर्व अशी अमुल्य संधी दिली आहे. या संधीचे सोने तो करु शकतो. केव्हा ? तर तरुण वय असतानाच त्याने आयुष्याचे ध्येय्य निश्चित केले तर, जो जो कीजे परमार्थ लाहो। तो तो पावे सिद्धीते। हे याच जन्मात घडू शकते.

समर्थांच्या अनेक उदाहरणे देण्याच्या शैलीनुसार दशक १ समास १० मधे ओवी ३ ते १५ पर्यंत अनेक, असंख्य सिद्ध पुरुष होऊन गेले. व त्यांनी आपले जिवित सत्कारणी लावून कशा सिद्धी प्राप्त केल्या ते उदाहरणांसहित सांगितले आहे. तरुणांना quiz सोडावायला आवडते. हे ओळखून समर्थांनी कोडी घातली आहेत. ती आपण सोडवून त्या सिद्धांची नावे ओळखायची. आपल्या वाचकांना मदत म्हणून मी दोन तीन सांगते एकूण तेरा वा जास्तच आहेत.




**१) भिंत चालवणारे ज्ञान देव**

**२) वायुरुप होऊन अदश्य झाले तुकाराम महाराज व मुक्ताबाई**

**३) जळ आटवणारे ऋषी  अगस्ती**

**४) वायुचा निरोध करणारे, केसरी हनुमंताचे वडील व बाळ ध्रुव**



मला वाटते आता इतर कोण कोणत्या सिद्धी कोणी कोणी मिळविल्या ते ओळखणे सोपे आहे. ओळखा पाहू.

## २ नोव्हेंबर २०२३

**म्हणौनि नरदेह श्रेष्ठ|नाना देहांमध्ये वरिष्ठ|**
**जयाचेनि चुके आरिष्ट|येमयातनेचें|| १-१०-२४**

सरळ अर्थ - नरदेह लाभल्यानंतर उत्तम पदाची प्राप्ती साधु शकते,पण त्यासाठी अहमपणाचा त्याग करणे गरजेचे आहे. म्हणौनि नरदेह श्रेष्ठ। नाना देहांमध्ये वरिष्ठ। उपनिषदामधील कथेतून नरदेहाचे उद्दिष्ट समजते. देवाने ज्ञानेंद्रियांची रचना केली आणि त्याच्या देवता निर्माण करुन त्यांच्यासमोर ३ सांगाडे ठेवले,

१)गाई- देवता देहाच्या आत प्रविष्ट झाल्या त्या बाहेर बघायला लागल्या तर त्यांना बाहेर बैल,गोठा,कडबा दिसले.

२)घोडा- घोडी,तबेला,घास दिसले.

३)नरदेह- सप्तसूर ,आकाश,चंद्र,तारे, सातरंग,साहित्य,कला,क्रीडा दिसले. नरदेह प्रगती करतो.माणसाने प्रगती साधली. उदा- कपडे,अन्न शिजवून,वाफवून खाणे इ.शोध लावले हे वैशिष्ट्य इतर योनीमधे नाही. माशांना पोहण्यासाठी कोचिंग क्लासेस लावावा लागत नाही की,पक्ष्यांना उडण्यासाठी ट्रेनिंग घ्यायची गरज नसते. मानवाला बुद्धीचा विकास करण्याचे सामर्थ्य मिळाले आहे.बुद्धीचे वरदान लाभलेला नरदेह आहे. इतर योनीतील जीव फक्त प्रपंच करतात पण नरदेह प्रपंचाबरोबर परमार्थ पण करतो. ज्याने आपल्याला निर्माण केले त्याला शोधून काढण्याची शक्ती नरदेहातील जीवाला दिलेली आहे.इतर अनेक पदे मिळवली तरी सच्चिदानंद पदवी घेण्याचं सामर्थ्य नरदेहातील जीवाला जन्मत:च दिलेली आहे. नरदेह विचारशील,मननशील, श्रवणशील आहे म्हणून देह त्यागल्यानंतर सुद्धा आपल्याला कुठली गती प्राप्त करता येऊ शकते हे तो ठरवतो. भगवंताने नरदेहाला स्वातंत्र्य दिले आहे.त्याचा उपयोग करुन चांगलं काय वाईट काय,न्यायाचं काय अन्यायाचं काय कशा पद्धतीने जीवन जगून आपल्या जीवनाला सफलता प्राप्त होणार आहे या सर्व गोष्टींचा विचार मनापासून नरदेह करु शकतो.

जयाचेनि चुके आरिष्ट।यमयातनेचे।। समर्थ म्हणतात- माणूस जेव्हा निरनिराळ्या व्याधी ग्रस्त होतो,त्यावेळी त्याची अवस्था अत्यंत दयनीय होते.तो ज्या आजाराचे दु:ख भोगत असतो त्याने स्वत:स तर मरणयातना होत असतात पण आजूबाजूचे लोक देखील कंटाळतात.कितीही उपचार केले तरी हा काही वाचत नाही,बरा होत नाही.थोडे दिवस सर्व जण मदत करतात पण रोज मरे त्याला कोण रडे?याचा अनुभव येतो. जन्म मरण आपल्या हातात नसते केवळ प्रयत्नच आपल्या हातात असतात त्यासाठी स्वत: चांगले जीवन प्रयत्नपूर्वक जगणे.परमेश्वराशी एकरुप होणे.सत्य स्वीकारण्यास तयार असणे. आहे त्या परिस्थितीला तोंड देणे असे केल्याने यमयातना चुकवणे शक्य होण्यास मदत होईल असे समर्थ सांगतात.

---

## ३ नोव्हेंबर २०२३

**संत आनंदाचे स्थळ |संत सुखाचि केवळ |**
**नाना संतोषाचे मूळ |ते हे संत ||१/५/१६**

श्री समर्थांनी पहिल्या दशकातील पाचव्या समासात ओवी क्रमांक पंधरा ते वीस मध्ये संत कोणाला म्हणावे आणि कसे ओळखावे ते सांगितले .संत म्हणजे आत्मस्वरूप होय. आत्मस्वरूपाचे वर्णन करता येत

नसल्यामुळे या ठिकाणी शब्दाचा उपयोग होत नाही. मायेच्या पलीकडे जे आत्मस्वरूप आहे ते कसे प्राप्त करून घ्यावे याचा उपाय जे सांगतात त्यांना संत म्हणतात. संताला खरे आत्मज्ञान प्राप्त झाल्यामुळे. त्या ज्ञानाग्नित आपल्या अहंकाराची, मी पणाची आहूती दिल्यामुळे संत अत्यंत निस्वार्थी होतात. संत सत्याला कधीच सोडत नाही.

संताचे चरित्र म्हणजे सफल जीवनाचे दृश्यरूप होय. संत हे आनंदाचे ,सुखाचे व संतोष असे केवळ एक मात्र मुख्य ठिकाण आहे. या तीनही गोष्टी त्यांच्याजवळ आहेत त्यांनी त्या प्राप्त केल्यामुळे त्यांना संत हे सुखाचे आगर असे सुद्धा म्हटले जाते. आता या ठिकाणी आपण आनंद म्हणजे काय ते बघूया संतांचा आनंद हा बाह्य गोष्टीवर अवलंबून नसतो. तो आत्मिक असतो आपल्या आत मध्येच असतो. आनंदामुळे अंतरंगाला समाधान प्राप्त होते .आनंद म्हणजे ब्रह्मानंद त्याची कशाचीच बरोबरी होत नाही. तो आनंद संतांनी प्राप्त केलेला असतो म्हणून संत आनंदाचे स्थळ.

संत सुखाची केवळ असं का म्हणतात तर संतांचे सुख हे कोणत्या एखाद्या गोष्टीवर अवलंबून नसतं .बाह्य वस्तूवर त्यांनी सुखाची प्राप्ती केलेली नसते . संतांच्या सुखाचा दृष्टिकोन म्हणजे एक त्यांच्या ब्रह्मानंद हाच असतो. केवळ दुसरे काहीच त्यांना प्राप्त करायचे नसते.म्हणून संत सुखाची केवळ असेही म्हटले जाते. नाना संतोष याचे मूळ म्हणजे संत वैराग्याच्या आधारे विषयांना बाहेर घालवून ते मनाच्या वृत्ती अंतर्मुख करीत असतात .त्यामुळे त्यांच्याजवळ संतोष म्हणजेच समाधान. हे सगळ्याच मूळ आहे आणि ते संतांजवळ असतं म्हणून त्यांना संत म्हटले जाते. समर्थांनी मनाच्या श्लोकाच्या १६८ व्या श्लोकात सांगतात.

**करी वृत्ती जो संत तो संत जाणा । दुराशागुणे जो नव्हे दैन्यवाणा ।**
**उपाधी देहबुध्दिते वाढविते । परी सज्जना केवि बाधू शके ते ।।**

अशी व्याख्या केलेली आहे ज्याची वृत्ती शांत स्थिर प्रसन्न आणि निर्विकार झाली तो संत होय. संतत्व क्षणाक्षणाला सिद्ध व्हावे लागते. विवेक शक्ती शाबूत आहे बुद्धीला कशाचा ही मोह नाही .कोणत्याही संकटाने मन विचलित होत नाही. कोणाकडून कशाचीही अपेक्षा नाही. लेश मात्र ममत्व नाही तो खरा संत. तुकाराम महाराज पण संतांची व्याख्या करताना म्हणतात तुका म्हणे तोचि संत । सोशी जगाची आघात ।। संतांना कुठलीही भौतिक अभिलाषा नसल्यामुळे ते विकले जात नाहीत. मंत्र्यांच्या आणि पुढाऱ्यांच्या नादी लागत नाहीत ते स्वतःमध्येच रंगलेले असतात.

**आहे तितुके देवाचे । ऐसे वर्तण निश्चयाचे ।**
**असे मूळ तुटे उद्वेगाचे। येणे रिती।। देवाच्या इच्छेने वर्तावे ।**
**देव करील ते मानावे । तरीच मग स्वभावे। कृपाळू देव।।**

समर्थ रामदास स्वामींनी व स्वामी विवेकानंदांनी एवढे मोठे कार्य उभे केले पण देह ठेवताना त्यांचे मन कुठेही आसक्त नव्हते किंवा गुंतलेले नव्हते. संत एकनाथ व संत रंगनाथ स्वामी हे राजयोगी होते. त्यांना कधीच मोह कशाच झाला नाही. प्रत्येक जातीत संत झाले त्यांनी आपली जात कधी लपवली नाही.आपल्या जातीचा उल्लेख करत अभंग लिहीले.पंढरपूरला संत चोखामेळा यांना मंदिरात प्रवेश नव्हता तरी त्यांनी वारीला आल्यावर चंद्रभागेच्या वाळवंटात कीर्तन करीत असत. कीर्तन ऐकण्यासाठी देवाचे मंदिराच फिरले भगवंतांनी कीर्तन ऐकले तेव्हा पासून वारीचे कीर्तन वाळवंटात करतात. म्हणून संत आनंदाचे स्थळ संत सुखाची केवळ नाना संतोषाचे मूळ ते हे संत असं म्हणतात.

**४ नोव्हेंबर २०२३**

**संत विश्रांतीची विश्रांती। संत तृप्तीची निजतृप्ती।**
**नांतरी भक्तीची फळश्रुती। ते हे संत ॥ श्रीराम ॥१.५.१७**

सरलार्थ - संतांपाशी अखंड विश्रांती व कायमची तृप्ती असते. भक्तीचे पर्यवसान झाले की संतपण येते.

भावार्थ - दासबोध ग्रंथ लेखनारंभी समर्थ अत्यंत सद्गदित भावाने वंदन करत आहेत. गणेश, शारदा याबरोबरच सद्गुरु व संत यांनाही ते मनोभावे वंदन करतात. ही त्यांची महान विनम्रताच आहे. थोरामोठ्यांनी थोरांना केलेले वंदन सुद्धा थोरच. वंदनाबरोबरच ते त्यांची थोरवी वर्णन करतात. त्यांच्या स्तवनातून आपल्याला त्यांचे अनेक गुणपैलू ऊलगडून दाखवतात. जे आपल्या सामान्य बुद्धीला सहजासहजी लक्षात आले ही नसते. समर्थ संतस्तवन या समासात सर्व संतांना नमन करतात.

आपण व्यवहारात म्हणतोच ना सबसंतन की जय. पण समर्थांचा हा जयकार काही वेगळाच. ते म्हणतात की हि संतमंडळी परमार्थाचा आधार आहेत. आत्मज्ञानी असणारा संत हा समर्थांचा आदर्श आहे. खरेतर संतांची व्याख्या करणे किंवा त्यांचा महिमा सांगणे हे ही अवघडच. परंतु समर्थ ते करु जाणे. संतांचे वर्णनही ते सांकेतिक रुपात करतात अलौकिक व दुर्लभ असा परमात्मा त्याची ओळख केवळ संतांमुळेच होऊ शकते.

शब्दशः शब्दांच्या पलिकडे तो परमात्मा आहे. जिथे पंचेंद्रियांचे कार्य समाप्त होते त्या पलिकडे तो आहे. मग तो आपल्याला कळावा कसा ? तो सूक्ष्माहून सूक्ष्म आहे संतांना या सूक्ष्म अशा आत्मस्वरुपाचे ज्ञान प्राप्त झालेले असते. म्हणून त्यांना वंदन करणे हे योग्यच आहे. वंदन केल्यावर ते जो आशीर्वाद देतात तो म्हणजे आत्मसाक्षात्कार होण्याची युक्ती सापडणे जणू. तुकोबाराय म्हणतात त्याप्रमाणे उरलो उपकारापुरता. हीच संतांची खरी ओळख असते.

संतांच्या ठायी देहभावना कशी ती नसतेच. त्यामुळे ते ऐहिक सुखदुःखाच्या पार असतात. ठेविले अनंते तैसेचि रहावे। चित्ती असो द्यावे समाधान, देहबुद्धी नाही की देहभावना नाही. त्यामुळे त्याला जोडून सुख ही नाही आणि क्लेशही नाहीतच.

समर्थ म्हणतात की साक्षात विश्रांती सुद्धा पळभर विश्रांती साठी संतांच्या चरणीच येत असेल इतके ते महान असतात. थकले भागले जीव संसार तापाने पोळून निघाले की हक्काची व खात्रीची विश्रांतीची जागा शोधत असतात. ती जागा म्हणजे संत. संत देहरुपाने जरी नसतील तरीसुद्धा त्यांच्या स्थानात आजही त्यांच्या उपासनेच्या प्रखर ऊर्जालहरींचा प्रभाव असतो. आपण तिथे जातो तेव्हा आपोआपच त्या तेजोवलयात प्रवेश करतो. त्या तेजापुढे दुःख व निराशा काळजीचा तम अर्थातच जळून जातो. हो अगदी शब्दशः जळून जातो. एकप्रकाची आश्वासकता आपल्याला जाणवते. श्री गजानन महाराज म्हणतात त्याप्रमाणे

**मी गेलो ऐसे मानू नका**
**भक्तीत अंतर करु नका**

परमेश्वराच्या निजध्यासात राहिलात की ही अपूर्व विश्रांती अनुभवायला येतेच. ती पुरवण्याची सेवा संतमंडळी करतात हो. इतके ते कृपाळू असतात. गोंदवले येथील त्या आमटीभाताला कशामुळे इतकी सुंदर

चव प्राप्त होते. का तो खाऊन तृप्तीची ढेकर येते. तिथला मसाला विकता आणून घरी करुन पाहिली तर तशी आमटी का होत नाही ?? स्थान माहात्म्य ! संतांच्या पदस्पर्शाने ती भूमी पावन झालेली असते. म्हणून तिथे तृप्तता मिळते.

अचानक दुसरीकडे गेलो असताना तिथे नेमके आपले श्रद्धास्थान असलेल्या संतांचे फक्त फोटो तील दर्शनही आपल्याला दृष्टीची तृप्ती देते ना. लगेच मनात येतं. महाराजांनच काळजी माझी, म्हणून इथेही माझे दर्शन चुकू दिले नाही. ही जी ओढ किंवा तळमळ असते ना ती संतमंडळी पूर्ण करुन आपल्याला तृप्त करतात. आपल्यातला भक्तीभाव पूर्ण जागृत झाला की तो आपल्याला अधिकाधिक तृप्त करत जातो. कारण ऐहिक गोष्टींचा हळूहळू विसरच पडतो ना. उरते ती फक्त नामभक्तीची गोडी. ती जितकी करावी तितकी अधिक गोड होत जाते. आणि मनाला तृप्त करत जाते.

या सर्वांचे पर्यवसान संतपणात होते असं समर्थ म्हणतात. देव पहाया जाता जाता भक्त होतसे देव तत्त्वतः असे काहीसे घडते. संतांचा सहवास हा परिस स्पर्शच जणू. अशा या थोर संतांना समर्थांचे वंदनअतिशय यथोचित आहे.

---

## ५ नोव्हेंबर २०२३

**चिंतनास प्राप्त ओवी**

**संत धर्माचे धर्मक्षेत्र । संत स्वरूपाचे सत्पात्र ।**
**नातरी पुण्याची पवित्र । पुण्य भूमी ।।०१-०५-१८।।**

संतांचे स्तवन करताना समर्थांनी या समासात विविध विशेषणे लावून पाहिली आहेत आणि शेवटी हे देखील सांगितले आहे की, "बोलिजे तितुकी उणी उपमा" (ओवी क्र. २६) आणि खरोखरीच संतांना कोणतीही उपमा दिली तरी कमीच आहे. अठराव्या ओवीत समर्थांनी ३ महत्वाच्या उपमा किंवा गौरव बिरुदे संतांना बहाल केली आहेत. त्यातील एकेका गौरवाचा गर्भितार्थ शोधण्याचा प्रयत्न करुया.

समर्थ म्हणतात, संत धर्माचे धर्मक्षेत्र! धर्माची सुंदर व्याख्या समर्थांनी दासबोधातच देऊन ठेवली आहे, "सकळ धर्मामध्ये धर्म । स्वरूपी राहणे हा स्वधर्म । हेचि जाणे मुख्य वर्म । साधुलक्षणाचे ।।०८-०९-५४।।" संतांनी जाणलेला आणि अंगिकारलेला धर्म कुठला तर अखंड स्वरूपी राहणे! म्हणजेच काय तर त्या निर्गुण परब्रह्माशी अखंड संलग्न राहणे, जोडलेले राहणे होय. अर्थात स्वधर्माची व्याख्या इतकीच मर्यादित नसून ती अतिशय व्यापक आहे कारण दुर्जनांचा विनाश करण्यासाठी श्रीविष्णूंना अवतार घेऊन कार्य करावे लागले हा त्यांचा स्वधर्म होता.

छत्रपती शिवाजी महाराजांना समर्थांनी 'धर्म स्थापनेचे नर । ते ईश्वराचे अवतार ।।' असे संबोधिले कारण त्यांनी आपला स्वधर्म जाणला होता. नरदेहस्तवन समासात प्रत्येक मनुष्याचा स्वधर्म समर्थांनी सांगितला आहे. धर्म या शब्दाची संस्कृत उत्पत्ती धृ धातूपासून झाली आहे, ज्याचा सरलार्थ, एखादी गोष्ट स्वभावतः धारण करणे किंवा त्याचा संपूर्ण अवलंब करणे होय. म्हणजेच सर्व संतांनी धारण करुन आपल्या आचरणात उतरवलेला सर्वात महत्वाचा स्वधर्म हा 'मानवता' असला पाहिजे, आत्मज्ञानाचे ग्रहण असले पाहिजे, भक्ती-ज्ञान-वैराग्य यांचा संगम म्हणजे स्वधर्म असला पाहिजे. याचा दाखला म्हणजे समर्थांनी दिलेली पुढील ओवी होय,

**म्हणोनि ज्ञान वैराग्य आणि भजन । स्वधर्मकर्म आणि साधन ।**
**कथा निरुपण श्रवण मनन । निती न्याये मर्यादा ।।०५-०२-५२।।**

एकाच ओवीमध्ये समर्थांनी संतांच्या स्वधर्माचे १३ पैलू उलगडून दाखविले आहेत. म्हणूनच की काय पुढे जाऊन ते संतांना धर्माचे 'धर्मक्षेत्र' असे म्हणतात. क्षेत्र म्हणजे स्थळ, जागा, वास्तव्य असण्याचे ठिकाण! याचाच अर्थ वरील वर्णन केलेले सर्वच सद्गुण ज्या संतांच्या स्थायी असते ते खरोखरीच 'धर्मक्षेत्र' आहेत. यासाठीच आपण तुकोबांचे देहू, ज्ञानोबांची आळंदी, समर्थांचा सज्जनगड, एकनाथांचे पैठण असे म्हणतो.

आता, संत स्वरुपाचे सत्पात्र असे जेव्हा समर्थ म्हणतात तेव्हा हे स्वरुप कोणते हे शोधायचा प्रयत्न करुया. स्वरुपाची व्याख्या करताना समर्थ म्हणतात,

**जेथे नाही दृश्यभान । जेथे जाणीव हे अज्ञान ।**
**विमळ शुद्ध स्वरूपज्ञान । यासि बोलिजे ।।०५-०६-०५।।**

खरोखरीच संतांचे असणे असेच असते. दृश्याचे भान त्यांना उरत नाही कारण सदैव त्या परमात्म्याशी ते एकरुप असतात, जाणीव आपल्याला असते, संत मात्र जाणीव-नेणिवेपलीकडे असतात, देही असून देहातीत असतात आणि म्हणूनच जे ना बद्ध ना मुक्त असे ते विमळ परब्रह्म, त्याच्याशी संतांची समाधी कधीच लागलेली असते. इथे समर्थांनी 'सत्पात्र' ही संज्ञा वापरली आहे. खरंतर जन्माला आलेला प्रत्येक मनुष्य देह हा ते स्वस्वरुप जाणून घेण्यासाठी पात्र असतो परंतु ते संतच असतात ज्यांना तो गवसतो, सापडतो आणि त्यांचा उद्धार होतो. यापुढे जाऊन समर्थ संतांना पुण्याची पवित्र पुण्यभूमी असे म्हणतात. पुण्यभूमी कोणती? हे सांगताना समर्थांनी स्पष्ट दाखविले आहे,

**ज्ञानियांचे जे शरीर । ते मिथ्यत्वें निर्विकार ।**
**जेथे पडे तेचि सार । पुण्यभूमी ।।०७-१०-१०।।**

इथे पुण्यभूमी म्हणजे संतांचा पुण्यवान देह आणि क्षेत्र असा दोन्ही अर्थाचा श्लेष काढता येईल. अर्थातच, संतांनी जिथे देह ठेवला, त्या पावन क्षेत्राला आपण पुण्यभूमी म्हणतो आणि वर्षानुवर्षे त्याची पूजा करतो, त्याला तीर्थ क्षेत्र म्हणून नतमस्तक होतो. या ओवीत समर्थांनी संतांनाच पुण्यभूमी म्हंटले आहे आणि खरोखरीच जिथे विकार निर्विकार झालेले असतात, जाणीव-नेणीव संपलेली असते, कुठलेही द्वंद्व उरलेले नसते असे संत स्वतः पुण्यभू झालेले असतात असे समर्थ म्हणतात. म्हणूनच की काय काशी, हृषीकेश, हरिद्वार, देहू, आळंदी इ. पुण्यक्षेत्रावर जाऊन देह त्यागण्याची इच्छा बऱ्याच लोकांमध्ये दिसते कारण त्यांना त्या क्षेत्रातील पुण्याचा महिमा माहित असतो. पुण्याची व्याख्या देताना समर्थ म्हणतात,

**प्रखर वैराग्य उदासीन । प्रत्ययाचे ब्रह्मज्ञान ।**
**स्नानसंध्या भगवद्भजन । पुण्यमार्ग ।।१२-०४-१८।।**

ही व्याख्या सर्वच संतांना अगदी चपखल बसते. म्हणूनच आपण आपल्या संतांनी दाखविलेल्या मार्गाने चालण्यासाठी प्रवृत्त व्हायला हवे कारण त्यांच्याच चरणी विश्रांतीची विश्रांती आपल्याला लाभणार आहे. याचसाठी आपल्या दैनंदिन उपासनेत जेव्हा आपण समर्थांची आरती म्हणतो त्यातील एक चरण,

**सज्जनगडनिवास माझे रामदासमाये ।**
**पंचही प्राणांचा दीपक लाविला आहे ।।**

असा पंच प्रणांचा दीपक आपल्याकडून सद्‌गुरूंनी लावून घ्यावा आणि हा जन्म कृतार्थ करून घ्यावा ही आपली नित्य प्रार्थना असावी असे वाटते.

---

**६ नोव्हेंबर २०२३**

**ओवी २२**
**संत समाधीचें मंदिर । संत विवेकाचें भांडार ।**
**नातरी बोलिजे माहेर । सायोज्यमुक्तीचें ।।१-५-१९**

पहिला दशक स्तवनांचा आहे पाचवा समास हा संतस्तवनाचा आहे. आत्मस्वरूपाचे ज्ञान करून घेणा-या व सत् शिष्याला ती अनुभूती प्राप्त करवून देणारे जे महात्मे असतात त्यांना संत म्हणतात.त्यांचे स्वरूप हे ब्रह्मरूपी एकरूप असे असते.परब्रह्माप्रमाणेच ते पूर्ण काम निर्वासन विरक्त असतात. आपल्याला आली तशी अनुभूती इतर साधकांना यावी म्हणून ते पथदर्शी कार्य करतात



शिष्याची सहजप्रवृत्ती ओळखून त्याला योग्य साधन उपासना सांगतात, करवून घेतात. मार्गातल्या अडचणी निवारतात. समर्थ त्यांना समाधीचें मंदिर म्हणत आहेत.आपण श्रीरामाचे श्रीकृष्णाचे विठ्ठल यांची मंदिरे पहातो. वाग्देवता मंदिरात पूजनीय असे श्रवणीय असे ग्रंथ असतात. मंदिराचे बाह्य स्वरूप असते आणि गर्भगृह असते. संत समाधीचे मंदिर.म्हणजे त्यांचा देह हा पवित्र देवळाचा बाह्य भाग म्हणता येईल. तो शृंगारणे हा संतांचा स्वभाव नव्हे.अंतर्गृह शृंगारणे हा संतांचा स्वभाव.आपण याच्या अगदी उलट वागतो. मंदिराच्या गाभाऱ्यात 'समाधी स्थिती' आहे.

परमेश्वराशी एकरूपता इथे कसोशीने जपलेली असते. त्यामागे त्या संतांची तपस्या असते, निरंतर साधना असते, आणि आत्मानुभूती घेतल्यानंतर ही स्थिती सहजभाव बनलेली असते.ईश्वरलीन अंत:स्थिती व देहाने साधना, अत्यंत निर्मळ आचार विचार,दया क्षमा शांती युक्त परोपकारी जीवनप्रवाह संत चरित्रात आढळून येतो.

विवेक म्हणजे काय हे शब्दात मांडण्यापेक्षा संत कसे वागतात कोणत्या परिस्थितीत कसा विचार करतात,कसे निर्णय घेतात हे अभ्यासले तर सारासार विवेक नित्यानित्य विवेक नीट समजतो. व आपण संत विचारांचा मागोवा घेत आपल्या आयुष्यात तो विचार आणायचा प्रयत्न करू शकतो.सर्वांना मार्गदर्शन होईल एवढा अनुभवांचा साठा संतांनी साहित्यात करून ठेवला आहे.त्याला शहाणिवेचे भांडार म्हणता येईल.

संत म्हणजे सायोज्य मुक्ती चे माहेर म्हटले आहे. मोक्षश्रीया आळंकृत ऐसे हे संत श्रीमंत| असेही म्हटले आहे. विवाहित स्त्रीला विश्रांती तिच्या माहेरी मिळते. तिथे प्रेमाचे मायेचे वैभव तिच्यासाठी सावली म्हणून सदैव असते.

संतांना माउली म्हणतात. शिष्यांसाठी ते विश्वासाचे श्रद्धेचे ठिकाण असते. चिरस्थाई शांती फक्त परमेश्वराशी अद्वैत झाल्याने मिळते. हे शिष्याला संत सद्गुरू प्राप्त करवून देतात. सायोज्यमुक्तीचे परम आनंदाचे अत्यंत प्रेमाचे हृदय जिथे लाभते ते संत असे समर्थ या ओवीतून आपल्याला सुचवीत असावे.

---

## ७ आणि ८ नोव्हेंबर २०२३

**७ नोव्हेंबर मंगळवार**

**ओवी २२) संत सत्याचा निश्चयो । संत सार्थकाचा जयो ।**
**संत प्राप्तीचा समयो । सिद्धरूप ।।१-५-२०**

**८ नोव्हेंबर बुधवार**

**ओवी २३) मोक्षश्रिया आळंकृत । ऐसे हे संत श्रीमंत ।**
**जीव दरिद्री असंख्यात । नृपती केले ।।१-५-२१**

दोन्ही ओव्या पहिल्या दशकातील पाचवा समास संतस्तवन यातील आहेत समर्थ संतांना वंदन करताना त्यांची महती सांगत आहेत. संत सत्याचा निश्चयो म्हणजे सत्याला अगदी निष्ठेने घट्ट धरून असतात.सत्य म्हणजे परमात्मा त्याची अनुभूती घेतलेली असते त्यामुळे कोणताही संदेह उरलेला नसतो.जगातील केवळ सत्य परब्रह्म त्याच्याशी एकरूप झाल्याने संत हे सत्य स्वरूपच असतात असे समर्थ निश्चयाने आपल्याला सांगत आहेत. सार्थक म्हणजे साफल्य. स्वस्वरूप जाणणे खरा देव जाणणे हे ज्याच्या आयुष्यात साध्य होते,त्याचे म्हणजे संतांचे आयुष्य ख-या अर्थी सार्थकी लागले असे म्हणता येते.संतांचे आयुष्य हेच आदर्श उदाहरण असते . म्हणून त्यांच्या नावाचा जयजयकार इतकी शतकं उलटून गेली तरी दुमदुमतो आहे.

संत भेटणे म्हणजे आपली मोक्षाची वेळ जवळ आली आहे असे समजावे असे समर्थ खात्रीने सांगत आहेत. मोक्ष श्री म्हणजे मोक्षरूपी ऐश्वर्याने संत मंडित आहेत.ते त्यांचे वैभव आहे.त्याच्यासमोर इतर सारे तुच्छ आहे.ही संतांची आंतरिक श्रीमंती आहे. संत खूप उदार आहेत.आपला अनुभव इतरांना देऊन इतरांना आपल्या इतकेच भाग्यवान करणे ही संतांची उदारता आहे.अनेक दरिद्री जीव संतांनी उद्धरिले.म्हणजे जे जीव प्रपंचात अडकून पडले होते त्यांना संत परमार्थ मार्गाची गोडी लावतात.मार्गदर्शन करतात. अडचणी सोडवतात.साधना करवून घेतात. चुकत असला तर चूक दुरुस्त करायला लावतात. प्रसंगी कठोर ही होतात. पण जो संतांना शरण जातो त्याचे कल्याण संत करतातच. संतांच्या मार्गदर्शनामुळे कृपेमुळे राजासारखे वैभवशाली केले.

बीभीषणाला लंकेचे राज्य दिले.कृष्णाने बालसवंगडी सुदाम्याचे आयुष्य बदलून टाकले.समर्थ कृपेने , मार्गदर्शन मिळाले व त्यामुळे शिवाजी महाराज हे अखंड सावधान साक्षेपी साधनी राहिले.अफझलखानाच्या स्वारीच्या वेळी समर्थांनी त्यांना सावध केले होते.आग्र्याहून सुटून महाराज महाराष्ट्रात सुखरूप पोहोचले त्यामागे समर्थ मठांची साखळी व तिचे योगदान मोठे होते.स्वातंत्र्य लढ्यात अनेक क्रांतिकारकांना तत्कालीन संतांचे आशीर्वाद व मार्गदर्शन होते.

अज्ञानी माणसांना आत्मज्ञानानं परिपूर्ण केले.वाल्याकोळी हे उदाहरण महत्वाचे आहे. इथे नारदमुनी कुठलाही चमत्कार करीत नाहीत.ज्ञान होण्यासाठी साधना केली पाहिजे.ती वाल्याकोळ्याकडून नारद करवून घेतात व त्यामुळे त्याचे अंतरंग व बहिरंग पालटले.नारद हे महान भक्त,संत मुनी होते.त्यांच्या निर्भिड असण्याचा, रोखठोक असण्याचा,भक्तीच्या पावित्र्याचा प्रभाव पडल्यामुळे हे वृत्यंतर घडले हे महत्वाचे आहे.

---

## १० नोव्हेंबर २०२३

**जन्मा आलियाचे फळ । काही करावें सफळ।**
**ऐसें न करीत निर्फळ । भूमिभार होये ।दास. २-४-१२**

स्तवनांच्या दशकानंतर समर्थ विरळ असे मूर्खलक्षण निरूपण करतात. माणसांच्या ठायी असलेला मूर्खपणा म्हणजेच अविचारी वागणूक जाणून समर्थ आपल्याला सावधान व्हा असा इशारा देतात! जन्मा आलियाचे फळ । काही करावें सफळ ओवी च्या पूर्वार्धात काय करावे याचे मार्गदर्शन समर्थ करीत आहे.

**धन्य धन्य हा नरदेहो | येथील अपूर्वता पाहो |**
**जो जो कीजे परमार्थ लाहो | तो तो पावे सिद्धीते|| १/१०/१|| दासबोध**

समर्थ म्हणतात - अनंत जन्मांच्या पुण्याईने मनुष्याच्या जन्माला आला आहात.

**शुभैः प्राप्नोति देवत्वम निषिद्धदैरनारकी**
**उभाभ्यां पुण्य पापाभ्यां मनुष्यम लभतेऽवशः ।।४१।। नैष्कर्म्य सिद्धी भावदर्शन**

पुण्यपाप समान झाल्यावरच मनुष्य जन्म मिळतो. अनेक प्रयत्नांनी हाती आलेला हा दुर्लभ मानवी जन्म, ह्या सुवर्णसंधीचा सदुपयोग करून घ्यावा. विचारसागर मध्ये ह्या शरीराला भोगायतन म्हणून संबोधिले

आहे. कर्मविग्रहातून मिळालेले हे मानवी शरीर अतिशय दुर्लभ आहे हे आपल्याला आधी पटले पाहिजे. सहसा मानवी वृत्ती अशी असते कि हातून निसटून गेले कि मग त्याचं महत्व जाणवतं.

फक्त मनुष्यजन्मातच आपल्याला सारासार विवेक करण्याची क्षमता आणि त्यातून ब्रम्ह वस्तू जाणण्याची व अहं ब्रम्हास्मि हा अनुभव घेण्याची संधी मिळते. आणि आत्मज्ञान होणे म्हणजेच हा जन्म सफळ होणे. ह्याची देही ह्याची डोळा अज्ञानरूपी अंधःकारातून मुक्तीचा सोहोळा बघण्याची संधी फक्त मनुष्यजन्मातच मिळू शकते. तरी त्यासाठी आपला अधिकार वाढवून, मुक्तीकडे वाटचाल करा असे मार्गदर्शन समर्थ करतात.

**ऐसें न करिता निर्फळ । भूमिभार होये ।**

नरदेहाचेनि संबंधे बहुत पविले उत्तमपदे हे आपण आधी शिकलो. ओवीच्या उत्तरार्धात क्रमविकासाने अधिकार प्राप्ती करत करत आत्मज्ञान प्राप्तीच्या दिशेने जर आपण प्रयत्न न करता हा अमूल्य वेळ म्हणजेच हा जन्म वाया घालवला तर आपल्यासारखे करंटे आपणच.

परमार्थ हा पूर्णपणे पुरुष प्रयत्न प्रधान आहे. साधन चतुष्टय संपन्न होऊन जगत-सत्य ह्या भ्रांतीतून सुटका व मोक्ष प्राप्ती करणे म्हणजे मनुष्य जन्म सार्थकी लावणे. तसे न करून घेतल्यास आपल्या अस्तित्वाचा फक्त भूमीला भार होईल. मनुष्य जन्मास येऊन आपल्याला मिळालेल्या एकमेवाद्वितीय संधीचे आपण जर सोने केले नाही तर त्यासारखे दुर्भाग्य नाही. हे आत्मज्ञान न मिळवता जो वागतो तो इतर जीवमात्राप्रमाणे उगाचच पृथ्वीला भारभूत होतो.

शास्त्राने व संतांनी सांगितल्याप्रमाणे माझ्याकडून विवेकी वर्तन घडो, केतुलेनी ढाळे ढाळे म्हणजेच थोडी थोडी प्रगती करत अज्ञानाचा अंधःकार दूर होऊन, आत्मज्ञान होवो, अशी समर्थ चरणी प्रार्थना करून हे ओवी चिंतन सद्गुरुचरणी अर्पण करते. परम ज्ञान, प्रशांती, समाधान, प्रसन्नता म्हणजेच खरे धन -

---

## ११ नोव्हेंबर २०२३

**जन्मला जयांचे उदरीं । तयांसी जो विरोध करी ।**
**सखी मानिली अंतुरी । तो येक मूर्ख ।। दा.२-१-८।।**

समर्थांच्या दासबोध ग्रंथातील निवडक ओव्यांचे आपण चिंतन करीत आहोत. मी वर दिलेल्या ओवीचे चिंतन दिलेल्या वेळेच्या मर्यादेत करण्याचा प्रयत्न करणार आहे, आपण लक्ष देऊन वाचावे ही विनंती.

माझ्या मते समर्थांनी दासबोधाचा उपदेश याच ओवी पासून द्यायला सुरु केला आहे. पहिला दशक केवळ स्तवनाचा आहे. आणि दुसऱ्या दशकाच्या प्रथम समासातील गणेश, शारदा, सद्गुरुचे स्तवन झाल्यावर याच ओवीपासून मूर्खलक्षणे सांगायला समर्थ सुरुवात करीत आहेत. मूर्खलक्षणांचा हा समास मूर्खपण त्यागण्याकरिता समर्थांनी सांगितला आहे. समर्थांनी याच समासाच्या अंतिम दोन ओव्यात ही बाब नमूद करून ठेवली आहे. त्यागणे म्हणजे झाडा करणे, झाडून टाकणे. सुरुवातीला मनाच्या मूर्खपणाचा झाडा करायला सांगून ग्रंथाच्या अखेरीस "सकळ देहयाचा झाडा" करायला समर्थ सांगत आहेत. प्रथम मनाचा व अखेरीस देहाचा झाडा केल्यावर शिल्लक काय उरणार आहे? ते आत्मतत्व, तो भगवंतच फक्त शिल्लक रहातो. त्या

परमात्म्या पर्यंत जायचे असेल तर मूर्खपण त्वरेने त्यागावे लागेल. मूर्खपणाचे प्रथम लक्षण वर्णन करतांना या समासात समर्थ दोन ओव्या सांगत आहेत -

**जन्मला जयांचें उदरीं । तयांसी जो विरोध करी ।**
**सखी मानिली अंतुरी । तो येक मूर्ख ।।**
**सांडून सर्वहि गोत । स्त्रीआधेन जीवित ।**
**सांगे अंतरींची मात । तो येक मूर्ख ।।**

सगळ्या शास्त्रांमध्ये, पुराणांमध्ये माता - पित्याची थोरवी वर्णन केली आहे. तैतरीय उपनिषदात हा मंत्र आला आहे -

**सत्यं वद । धर्मं चर । स्वाध्यायात मा प्रमद ।मातृदेवो भव ।**
**पितृदेवो भव । आचार्य देवो भव । अतिथि देवो भव।**

या यादीत माता-पिता सर्व प्रथम येतात, हे आपण लक्षात घ्यायचे आहे. मातेचे, पित्याचे स्थान आपल्या जीवनात सर्वोच्च असलेच पाहिजे. काहीही केले तरी माता-पित्याचे ऋण फिटत नसते. माता-पिता नसते तर आपण अस्तित्वात आलोच नसतो. परन्तु हा करंटा मनुष्य कामवासनेपायी आपल्या पत्नीचा गुलाम बनतो. तिची प्रत्येक इच्छा पूर्ण करायला एका पायावर तयार असतो.

सदसदविवेक गमवून तो त्या स्त्रीची इच्छा पूर्ण करायचा आटापिटा करीत असतो. असा मनुष्य स्त्रीचे इच्छेकरिता बिनदिक्कत आपल्या माता-पित्याचा अनादर करतो. अशा करंट्याला समर्थ मूर्ख म्हणत आहेत. ज्या आई बापाने जन्म दिला, पालन-पोषण केले, वाढविले, शिकविले त्यांच्यावरच तू आता उलटतो आहेस! धिक्कार असो तुझा ! आपल्या पत्नीला मित्र मानतोस पण तीच तुला माता-पित्याचा अनादर करायला सांगत आहे आणि तू खुशाल त्यांचा अपमान करतोस! नाही, तुला त्यांचा विरोध करायचा अधिकारच नाही.




संन्यासी सर्व नातेवाईकांचा संबंध सोडतो. पण त्याला देखील आपल्या आईचे ऋण मानावेच लागतात. खुद्द समर्थांनी भारत भ्रमण केल्यावर आपल्या मातेची भेट घेतली आहे, तिला दृष्टी प्रदान केली आहे. आदि शंकराचार्य मातेच्या अंतीम समयी उपस्थित होते. तिच्या अंत्यसंस्कारास हातभार लावणाऱ्या नंबूद्रि ब्राह्मणांना अखंड वैभवाचा आशिर्वाद त्यांनी दिला होता. स्वामी विवेकानंदांना खेतरीच्या महाराजांनी फार आग्रह केला तेव्हा स्वामीजींनी आपल्या मातेच्या उदरनिर्वाहाची सोय करण्यास सांगितले होते.

समर्थ उत्तम मनस्विद - मानसशात्रज्ञ होते. साधारण सांसारिक माणसाचे मन ते जाणत होते. संसारात गुरफटलेला माणूस आई, बाप, गुरु, देव यांना न मानणारा असतो, हे त्यांना पूर्णतः ठाऊक होते. चंचल बुद्धीचा मूर्ख मनुष्य आपल्या जिवलगांना कधीच प्रेमाने वागवीत नाही.

मनुष्याचा हा स्वभाव बदलला पाहिजे असे समर्थांना प्रकर्षाने वाटत असे, म्हणून त्यांनी दासबोध ग्रंथाची सुरुवात मूर्खलक्षणांपासून केली आहे. सुरुवातीला ही लक्षणे वाचतांना ते आपलेच वर्णन आहे असे प्रत्येकाला वाटते. ही लक्षणे त्वरेने त्यागावी असे वाटते आणि मनुष्य त्या दिशेने प्रयत्न सुरु करतो. मनुष्य स्वभावाचा हा पहलू समर्थांना ठाऊक होता म्हणून त्यांनी ही लक्षणे त्यागार्थ आहेत हे सांगितले आहे.

---

## १२ नोव्हेंबर २०२३

**मान अथवा अपमान । स्वयें करी परिच्छिन्न ।**
**सप्त वेसनी जयाचें मन ।तो येक मूर्ख ।। दासबोध २ - १ - १६।।**

समर्थांनी दासबोध ग्रंथात अगदी सुरुवातीलाच मूर्ख लक्षणे सांगितली आहेत, त्यांचा उद्देश्यच मुळी साधकाने आधी हे दुर्गुण टाळावे असा आहे . जो पर्यंत दुर्गुण अर्थात् मूर्ख लक्षणे विद्यमान आहेत तो पर्यंत मनुष्य मुमुक्षू बनू शकत नाही. जेव्हा माणसाला आपल्या दुर्गुणांची जाणीव होते व त्या दुर्गुणांमुळे आपले आयुष्य वाया जात असल्याचे लक्षात येते त्या वेळी तो या दुर्गुणांना सोडायचा विचार करतो. अर्थात् ज्या सद्गृहस्थाने त्याचे हे दुर्गुण दाखवून दिले, त्यालाच तो यातून बाहेर पडण्याचा मार्ग विचारतो. समर्थ सद्गृहस्थ नाहीत तर आत्मज्ञानी सद्गुरु आहेत. त्यामुळेच ते योग्य मार्गदर्शन करीत आहेत.

समर्थ तुमचे दोष अकारण दाखवीत नाहीत. तुम्हाला डिचविण्याचा किंवा चिडविण्याचा त्यांचा हेतु नाही. प्रत्येक मनुष्य योग्य मार्गावर जावा अशी तळमळ, पोटतिडीक त्यांच्या मनात आहे. केवळ करुणेपोटी ते मार्गदर्शन करीत आहेत. आणि हे त्यांनी सांगून ठेवलेच आहे. समर्थ म्हणतात –

**आमुची प्रतिज्ञा ऐसी ।कांहीं न मागावे शिष्यासी ।**
**आपणामागें जगदीशासी ।भजत जावें ।। दा १२-१०-३४।।**

लोक भक्तीमार्गी व्हावे, त्यांनी स्वतःचे कल्याण करून घ्यावे या करूणेपोटी समर्थ आपल्याला मूर्ख लक्षणे सांगत आहेत. चिंतनाला घेतलेल्या आजच्या या ओवीमध्ये दोन दुर्गुण समर्थ दाखवीत आहेत. पहिला दुर्गुण हा दुर्गुण आहे हे लवकर लक्षात येत नाही. आपल्याला मिळालेला थोडा बहुत मान आणि आपला झालेला अपमान स्वतःच लोकांना सांगत बसणे हा मूर्खपण आहे ही गोष्ट समर्थ आपल्या लक्षात इथे आणून देत आहेत. दूसरा दुर्गुण मात्र महा भयंकर आहे. लक्षात तर लगेच येतो पण सोडायची इच्छा होत नाही. अहो साधा तंबाखू सोडता सुटत नाही, ही तर सात व्यसने आहेत. कोणती सात व्यसने आहेत ही ?

१. जुगार, २. बाहेरख्यालीपणा, ३. चोरी, ४. चहाडी, ५. परस्त्री गमन, ६. पाखरांची (कोंबड्याची) झूंज, आणि ७. नायकिणीचे गायन ऐकणे.

आजच्या युगात यामध्ये अधिक भर पडेल. ही सारी व्यसने कशी असतात आणि त्यांचे दुष्परिणाम काय असतात हे आपण लोक जाणता. खरे म्हणजे या शब्दांचा पुनरुच्चार देखील करायची माझी इच्छा नाही. ज्याच्यावर भगवंताची कृपा होणार असेल असाच मनुष्य यातून सुटण्याचा मार्ग शोधतो अन्यथा लोक तर त्या मुल्ला नसरुद्दीन सारखे असतात. हो त्याची कथा सांगितल्याशिवाय ते कळणार नाही. ती कथा अशी आहे.

युरोपातील एक छोटसं गांव आहे तिथे हा मुल्ला नसरुद्दीन रहात असतो. एका गंभीर आजाराने त्याला ग्रासले असते व डाक्टर म्हणाले की हा आता ४-६ तासांचाच सोबती आहे. त्यांच्या धर्मातील प्रथेप्रमाणे चर्चमधील पाद्र्याला निमंत्रण पाठविले जाते, पाद्री लगेच हजर होतो. पाद्री मुल्लाला सांगतो की जर माझ्यासमोर तू आपल्या पापांची कबूली दिलीस तर तुला मुक्ति मिळेल, तुला पुनः जन्म घ्यावा लागणार नाही. मुल्ला होकार भरतो. आता पाद्री एक एका पापाचा उच्चार करतो,व मुल्लाला विचारतो की हे पाप तू केले आहेस काय ? पाद्री म्हणतो तू कधी चोरी केली आहेस काय तेव्हा मुल्ला होकार भरतो. मग चहाडी, व्यसन वगैरे पापांबद्दल विचारल्यावर मुल्लाच्या लक्षात येते की त्याने केवळ ५ -६ च पापे केली आहेत. मुल्ला पाद्र्याला विचारतो कि एकंदर किती पापांची यादी आहे. तेव्हा पाद्री म्हणतो अजून शंभर पापांची यादी आहे. तेव्हा मुल्ला म्हणतो ही पापे मला आधी माहित असती तर मी ती नक्कीच केली असती. पाद्री महाशय मला मुक्ति नको, पुढच्या जन्मात मी ही सारी पापे करीन मग तुम्ही मला मुक्त करा.

तात्पर्य माणसाला पाप करण्यात अधिक रस असतो, त्या पाद्र्यासारखी मुक्ति समर्थ देणार नाहीत पण तुम्हाला त्याच्या परिणामांची जाणीव करून देतात, त्रिविध तापांची जाणीव करून देतात, आणि समझदार मनुष्य हे दुर्गुण त्यागायला लगेच तयार होतो. आपण असे समजदार व्हावे अशी समर्थांची इच्छा आहे. व्हाल ना समजदार ?

श्री समर्थ वरील ओवी मधून श्रीमद् दासबोध पठण केल्याने काय लाभ किंवा फायदे होणार आहेत, याबाबत सांगतात. श्री समर्थ सुरवातीलाच असे सांगतात की दासबोधात भक्ती मार्ग सांगितला आहे.

**ग्रंथा नाम दासबोध | गुरू शिष्यांचा संवाद |**
**येथ बोलिला विशद | भक्तिमार्ग || दास. १-१-२**

जे आपल्या ऐहिक व पारमार्थिक जीवनात आळशी आहेत,कंटाळा करतात , ते प्रयत्न पूर्वक कार्यशील होतील. प्रापंचिक जीवनात कळत नकळत पापे घडतात, अथवा इच्छा नसताना देखील परेच्छा प्रारब्धा मुळे दुष्कृत्ये करतात. जगात वावरताना कायम परनिंदेची माळ जपतात किंवा परनिंदा हे पाप आहे हे माहित असूनही वारंवार ते कृत्य घडते. ते दासबोध या ग्रंथाचा अभ्यास केल्याने निश्चय पूर्वक भक्ती मार्गावर अनुत्क्रमण करतील असा विश्वास श्री समर्थ आपणांस देत आहेत.

---

**१८ नोव्हेंबर २०२३**


**औषध न घे असोन वेथा | पथ्य न करी सर्वथा |**
**न मिळे आलिया पदार्थां | तो येक मूर्ख ||दा २ - १ - २२||**

समर्थांचे निरीक्षण फारच सूक्ष्म आहे. त्यांच्या मते हा मानव देह आपल्याला साधना करण्यासाठी मिळाला आहे. या देहाकडून साधना नियमित करून घ्यायची आहे तर हा देह सुस्थितीत राखायला नको काय? मग त्याला आवश्यक असेल तेव्हा औषध पाणी करायला नको काय? त्या देहाला त्रासदायक ठरणारे पदार्थ टाळायचे पथ्य करायला नको का? आपण ऑफीसला जाण्यासाठी स्कूटर, कार वापरतो. ऐन वेळी तिच्यात बिघाड होऊ नये म्हणून तिची निगा राखतो. आवश्यक तेव्हा पेट्रोल भरतो. म्हणजे आपल्या नियमित कामाची ती वस्तु सतत कार्यरत राहील असे पहातो. समर्थ म्हणतात हाच नियम शरीरासाठी लावला पाहिजे.

"या शरीरा ऐसे यंत्र आणिक नाही", हे शरीर रत्नांची पेटी आहे, घबाड आहे म्हणून याची निगा तुमच्या कार किंवा इतर यंत्रांपेक्षा अधिक राखली पाहिजे.

मूर्खपणाचे आणखी एक लक्षण म्हणजे "न मिळे आलिया पदार्था।" याचा अर्थ जीवनात आपल्या वाट्याला येईल ते आवडून न घेणे. खरे तर या जीवनात जी जी वस्तु, व्यक्ति, परिस्थिति आपल्या वाट्याला येईल त्याचे कारण आपण स्वतःच असतो. पटते का? आपण जस-जशी कर्मे करतो तस-तशी फळे आपल्याला मिळतात हा कर्मविपाकाचा सिद्धांत आहे. म्हणूनच तर भगवंत गीतेमध्ये म्हणतात,

**"कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन ।**
**मा कर्मफलहेतुर्भुर्मा ते सङ्गोऽस्त्वकर्मणि ।। गीता २ - ४७।।**



या श्लोकात भगवान अर्जुनाला म्हणतात की तुझा अधिकार फक्त कर्म करण्याचा आहे. कर्माच्या फलावर तुझा मुळीच अधिकार नाही. म्हणून तू निरंतर कर्माच्या फळाचे चिंतन करू नकोस, आणि कर्माचा त्याग देखील नको करूस. कर्माच्या फळाची इच्छा ठेवून कर्म जर करशील तर कर्म फलाचे कारण तू ठरशील.

या ओवी मध्ये अशाच मनुष्याची कथा आहे ज्याने पूर्व जन्मात वा या जन्मात केलेल्या कर्मांची फळे आता त्याच्या वाट्याला आली आहेत पण तो ती फळे नाकारतो आहे. तूच केलेल्या कर्माची ही फळे आहेत, आता नकारण्यात काय अर्थ आहे. तुझी आवड-नावड बाजूला सारून तुला ती फळे भोगावीच लागणार आहेत, मग आनंदाने भोगून टाक. अन्यथा तुझ्यासारखा मूर्ख तूच आहेस असे समर्थ म्हणतात. मग काय करावे ? गीतेच्या २ -५६ या श्लोकात उपाय सांगितला आहे. हा श्लोक आहे -

**दुःखेष्वनुद्विग्न मनाः सुखेषु विगतस्पृहः ।**
**वीतरागभयक्रोधः स्थितधीर्मुनिरुच्यते ।। गीता २ - ५६।।**

दुःखकारक प्रसंगाने ज्याचे मन उद्विग्न अर्थात् दुःखी होत नाही व सुख प्राप्तिची ज्याला मुळीच इच्छा नाही, तसेच ज्याचे प्रीती, भय व क्रोध नाहिसे झाले आहेत, असा मुनि स्थिर बुद्धीचा म्हटला जातो. आपण सारे दासबोधाचे अभ्यासक आहाेत, आपण तरी आलेल्या दुःखाला नाकारायला नको. आपल्याच कर्माचे ते फळ असल्यामुळे आपण ते फळ आनंदाने भोगले पाहिजे.

**२०  नोव्हेंबर २०२३**

**घरीच्यावरी खाय दाढा । बाहेरी दीन बापुडा ।**
**ऐसा जो का वेड मूढा । तो येक मूर्ख ।। दा २ - १ - २८।।**

समर्थांना समाज एकत्र करावयाचा असल्याने त्यांना माणसाची पारख करणे आवश्यक होते. लोकांच्या मनाचा अभ्यास करता करता समर्थांना माणसाचे सद्‌गुण, दुर्गुण पक्के माहित होऊ लागले होते. या लोकांनी दुर्गुण टाकून दिले तर हेच आपल्या कार्यासाठी उत्तम कार्यकर्ता म्हणून तयार होतील असा समर्थांचा कयास होता. आपल्या संप्रदायातील अनुयायाने उत्तम नागरीक व्हावे म्हणून समर्थांनी मूर्खलक्षणांचा समावेश ग्रंथराज दासबोधात केला आहे.

कधी कधी समर्थ आपली पोल खोलून देतात. मी ऑफीसमध्ये, जनामध्ये कसा वागतो ते माझ्या कुटुंबीयांना माहित नसते आणि समर्थ माझ्या पत्नीला येऊन सांगतात की "हा घरी तुझ्यावर डाफरतो पण ऑफीसमध्ये मात्र 'भीगी बिल्ली' बनून रहातो." आहे की नाही गम्मत. आपण असे नमूने बघत असतो. काही लोक ऑफीसमध्ये सतत चुका करतात आणि मग बॉसची बोलणी खात रहातात. काय करतील बिचारे काम जमत नाही, कोणी मदद करीत नाही, मग खा शिव्या. असा माणूस ह्याचे उट्टे घरी येऊन पत्नीवर काढतो. एखाद्या बायकोला नवऱ्याची ही सवय माहित असते म्हणून ती मुकाट्याने ऐकून घेते. एखादीला कळतच नाही असे का होते. ती आपल्या नशीबाला दोष देते. असो !

समर्थांना मनुष्य स्वभावाचे हे बारकावे माहित आहेत. त्यावर उपाय देखील त्यांना माहित आहेत. म्हणून तर अशा माणसाला ते मूर्ख, वेडा म्हणतात. निदान त्यामुळे तरी त्याचा घरी असणारा आक्रस्ताळेपणा संपेल, काही सुधारणा निश्चित होईल. समर्थांनी या समासात व पुढल्या समासात असे किती तरी बारीक सारीक दोष सांगितले आहेत. समर्थांना आपला संप्रदायिक अनुयायी आदर्श आचाराचा हवा आहे.

या ठिकाणी समर्थांनी दोष तर दाखवून दिले आहेत पण त्यावर punishment सांगितली नाही. काही ठिकाणी समर्थांनी अशांचे तोंड पाहू नका म्हटले आहे पण इथे मात्र दोष दाखवून ते त्यागा म्हटले आहे. समर्थांना माहित आहे की हे दोष सहज त्यागता येणार आहेत आणि आपला सांप्रदायिक मनुष्य सहज हा त्याग करू शकेल.

पहिल्या समासात समर्थांनी भक्तीचा महिमा सांगितला आहे. असा वेडा, मूर्ख माणूस भक्तीला लागेल तर त्याचा चंचल स्वभाव स्थिर होईल. त्या कारणाने समाजात, ऑफिसात होणाऱ्या चुका कमी होतील व त्याला बोलणी खावी लागणार नाही. मनाच्या श्लोकात 'मना बोलणे नीच सोशित जावे ।' असे समर्थ म्हणतात. याचा अर्थ असा की कोणी वाईट बोलले, घालून पाडून बोलले तर मनाला लावून घ्यायची गरज नाही. म्हणजे मनुष्याच्या स्वभावात आमूल परिवर्तन होणे शक्य आहे हे समर्थ जाणून आहेत.

या २८ व्या ओवी पर्यंत आपण फारच कमी दोषांची चर्चा केली आहे. मला वाटते आपण प्रत्येक दोषावर चिंतन करणे आवश्यक आहे अन्यथा कित्येक दोष आपल्या मनात वस्ती करून राहतील, त्यांना बाहेर काढणे आवश्यक आहे. आपल्या दोषांचे सतत चिंतन करणे आवश्यक आहे.

आपण एकदाच अभ्यासून हा समास सोडून देतो. तसे न करता ह्या समासाचे अधून मधून चिंतन करायला पाहिजे. आयोजकांनी ही संधी दिलेली आहे, त्याचे सोने करायला हवे अन्यथा "तो येक मूर्ख" अशी

आपली हेटाळणी होणे सहज शक्य आहे. मला वाटते की या रिव्हिजन मधून एक-दोन तरी दोषांनी आपली साथ सोडावी म्हणजे या उपक्रमाचे सार्थक होईल.

---

## २३ नोव्हेंबर २०२३

**पुत्र कळत्र आणी दारा । इतुकाचि मानुनियां थारा ।**
**विसरोन गेला ईश्वरा । तो येक मूर्ख ।। दासबोध ।।२ - १ - ४०।।**

समर्थांनी 'आधी प्रपंच करावा नेटका' असे एका ठिकाणी म्हटले आहे. काही लोक त्या ओवीचा अर्थ असा करतात कि आधी प्रपंच वगैरे करून घ्या मग परमार्थ सवडीने करूया. चिंतनासाठी घेतलेल्या या ओवीत मात्र समर्थ प्रपंचात गुंतलेल्या माणसाला मूर्ख म्हणत आहेत. समर्थ एका ठिकाणी एक सांगतात आणि दुसऱ्या ठिकाणी वेगळेच सांगतात असा काही लोकांचा समाज होणे शक्य आहे. पण जरा नीट व बारकाईने त्या ओव्यांकडे बघितले तर योग्य बोध होईल. समर्थ चुकीचे सांगत नाहीत तर तुमच्या चुका दुरुस्त करायला सांगतात.

मनुष्य अत्यंत स्वार्थी असतो. प्रथम तो स्वतःचा एकट्याचा विचार करतो, नंतर बायको, मुले यांचा विचार करतो. अहो, आपल्या आई-बापाला देखील तो आपले कुटुंबीय मानत नाही. मग इतरांची गोष्ट तर सोडूनच द्या. समाजाच्या प्रत्येक घटकाचे आपल्यावर काही ना काही उपकार असतात. समाजाचं ऋण निरनिराळ्या प्रकारे फेडणे आपले कर्तव्य आहे. आपण ते कर्तव्य बजावतो काय, हा प्रश्नच आहे. समर्थ तर इथे ईश्वराप्रति असलेल्या आपल्या कर्तव्याची आठवण करून देत आहेत. आपण ईश्वराचे काही देणे लागतो काय? ज्याने आपल्याला मानव देह दिला त्याचे किती उपकार मानावे? एकीला तिचा पति नथ घेऊन देतो तर त्याचे गुणगान करत ती गावभर फिरते. यावर एक संत म्हणतात, "जिस यार ने नथ दी उसका सुमिरन बार-बार, और जिसने नाक दी उसको भूल गयी पार?" भगवंताची आपल्यावर अपार कृपा आहे त्याचे नाम स्मरण करणे आपले परम कर्तव्य आहे.

मला असे वाटते की आपण चिंतनाला घेतलेली ही ओवी बघतांना दशक तीन समास दहा, वैराग्यनिरूपण मधील ५१, ५२, ५३ या ओव्या जरुर पहाव्या. मला तर ९त्यापूर्वीच्या ओव्या देखील साद घालतात. ज्यांना तू माझे माझे म्हणतोस ते तर फक्त सुखाचे सोबती आहेत. एका क्षणात पटकन मेलास तर भगवंताची आठवण करायला देखील वेळ मिळणार नाही. मृत्युनंतर कोण तुझ्याबरोबर येणार आहे? पत्नी दारा पर्यंत येते, आप्त स्मशाणापर्यंत सोबत असतात. हा देह चिते पर्यंत येतो. पुढे काय येणार? तुझी कर्म तुला पुढच्या प्रवासात सोबत करणार आहेत. माझी पत्नी, माझी मुलं म्हणतोस, पण त्यांचा हिशेब तरी मांडला आहेस काय ? समर्थांनी तो मांडला आहे. समर्थ म्हणतात -

**तुवां भोगिल्या पुनरावृत्ती । ऐसीं मायबापें किती ।**
**स्त्री कन्या पुत्र होती । लक्षानलक्ष ।। ३ - १० - ५१।।**
**कर्मयोगें सकळ मिळालीं । येके स्थळीं जन्मास आलीं ।**
**तें तुवां आपुलीं मानिलीं । कैसीं रे पढतमूर्खा ।।५२।।**

जिथे हे शरीरच तुझे नाही तर शरीराचे नातेवाईक तरी तुझे कसे बरें? इथे एक कथा आठवते. एका राजाचा एकुलता एक मुलगा आजारी पडतो. आजार गंभीर असतो, वैद्य म्हणतात आजची रात्र कठीण आहे.

रात्रभर औषधाचे चाटण राजकुमाराला द्यायचे आहे. राजा, राणी त्याच्या उशाशी जागत बसतात. राजाला डुलकी येते, पण राणी मात्र औषध चाटवत रहाते. अचानक राणीच्या लक्षात येते की राजपुत्राचे प्राण गेले आहेत. ती जोराने टाहो फोडते. राजाला जाग येते. तो बघतो आणि गोष्ट त्याच्या लक्षात येते. राणी म्हणते, आपला बाळ गेला हो! आणि राजा हसायला लागतो. मंत्री विचारतो, "हसायला काय झाले?" राजा म्हणतो स्वप्नात माझे आठ तरुण पुत्र होते आणि विशाल साम्राज्य होते. जाग आल्यामुळे ते सारे पुत्र, सारे साम्राज्य नष्ट झाले. त्याकरिता शोक करू कि या एकासाठी शोक करू? सारे काही मिथ्या आहे, एक परमात्मा तेवढा शाश्वत आहे. त्याचे स्मरण, त्याचे पूजन आवश्यक आहे, हे समर्थ आपल्याला वेळोवेळी बजावत आहेत. आपण ऐकणार आहोत का त्यांचे ?

**जो अन्न देतो उदरासी । शेरीर विकावें लागे त्यासी ।**
**मां जेणे घातलें जन्मासी । त्यासी कैसें विसरावें ।। दा ३- १० - ५५।।**

समर्थांनी दासबोधासारखा महान ग्रंथ आपल्या हाती दिला आहे हे आपले भाग्यच आहे. हा ग्रंथ आपल्या जीवनात किमया करीत आहे, हे नाकारता येत नाही. आपण कूपमंडूक वृत्तीने वागून भगवंताला, समाजाला विसरू नये येवढीच माफक अपेक्षा समर्थ आपल्या पासून या ओवीत ठेवत आहेत. त्यांच्या अपेक्षेची पूर्तता व्हावी एवढीच विनंती. दासबोध ग्रंथाचा अभ्यास, मनन, चिंतन या निमित्ताने घडते आहे त्याबद्दल संयोजकांना धन्यवाद.

---

## २४ नोव्हेंबर २०२३

**जैसें जैसें करावें ।तैसें तैसें पावावे ।**
**हे जयास नेणवे ।तो येक मूर्ख ।दास. २.१.४१ ।।**

मूर्खलक्षण निरूपण - या दशकातील पहिल्या समासाच्या सुरुवातीला समर्थांनी

**'जे प्रापंचिक जन । जयास नाही आत्मज्ञान ।**
**जे केवळ अज्ञान । त्यांची लक्षणें ।। ७।।**

असे म्हणून आत्मज्ञानाचा अभाव व मूर्खपणा ह्यांचा संबंध जोडला आहे. हा संपूर्ण दशक व्यावहारिक शिकवणुकीचा असून त्यात विधी आणि निषेध सांगितले आहेत. खाजगी, कौटुंबिक व सामाजिक जीवनात माणसाने कसे वागावे याचे अत्यंत मार्मिक वर्णन समर्थांनी अत्यंत प्रभावीपणे केले आहे. माणसाच्या मनाच्या कंगोर्यांचे सूक्ष्म निरिक्षण करून माणूस बदलावा ह्या तळमळीतून त्यांनी माणसांना उपदेश केला आहे.

**जैसें जैसें करावें ।तैसें तैसें पावावे ।**

अनेक पेरावे तेच उगवते अशी म्हण आहे. 'जैसी करनी वैसी भरनी' हि म्हण ह्याच आधारावर प्रचलित झाली असेल. समर्थ सांगतात की समाज हा आरसा आहे. त्यांस तुम्ही जसे सामोरे जाल तसेच प्रतिबिंब तुम्हांस दिसेल. चांगल्यास चांगले वाईटास वाईट असा सहसा समाजवागणुकीचा नियम. आपण अन्यायाने वागून, दुसऱ्याकडून चांगुलपणाची अपेक्षा करणे खचितच गैर आहे. पण हे अनेकांस उमगत नाही. आणि तेच त्यांच्या दुः खाचे कारण होते. परपीडा, परनिंदा करणे तसेच दुसऱ्याचे धन, वस्तू अथवा स्त्री चे हरण करणे थोरांस योग्य तो आदर न देणे स्व बळावर उन्मत्त होऊन दुसऱ्या त्रास होईल असे वागणे पाप

आहे. असे केल्याने दुष्कीर्ती होऊन अधोगती होते. ह्यात कर्माचा सिद्धांत समजून प्रपंचात निष्काम कर्म करून फलेच्छा सोडून द्यावी. कारण फळ हे पूर्वसंचिताप्रमाणे वेगवेगळे असणार . ह्या विरुद्ध जैसे कराल तसे पावेल ह्या नियमाप्रमाणे परमार्थ करावा कारण परमार्थ हा पूर्णपणे पुरुष प्रयत्न आहे.

**प्रयत्नाद्यतमानस्तु योगी संशुध्दिकलबिष:**
**अनेकजन्मसंसिद्धस्ततो याति परां गतिम ।।गी. ६-४५।।**

पूर्व जन्मात केलेल्या प्रयत्नापेक्षाही वर्तमान जन्मात अधिकाधिक प्रयत्न करणारा, ज्याचा पापरूपी मल धुऊन गेला आहे, अनेक जन्माच्या संस्काराने व पुण्याने ज्याचा अधिकार संपन्न झाला आहे, असा तो योगी ब्रह्मज्ञान झाल्याने मोक्षरूप परमगतीला प्राप्त होतो. ह्या जन्मी प्रयत्न केल्यास मोक्षापर्यंत वाटचाल अशक्य नाही.

**हे जयास नेणवे ।तो येक मूर्ख**

कृतीप्रमाणे फळ हा नियम ज्याला माहित नाही किंवा माहित असूनही जो हे विसरतो व त्यानुसार वर्तन व प्रयत्न करत नाही त्याला प्रपंचात व परमार्थात दोन्ही मध्ये फक्त दुःखच वाट्याला येते. आपल्या आजच्या परिस्थितीला आपली पूर्वकर्मेच जबाबदार आहेत हा शास्त्राचा ठाम सिद्धांत आहे. हे लक्षात न घेता माणसे आपल्या प्राप्त परिस्थितीबद्दल भोवतालच्या लोकांना किंवा प्रारब्धाला दोष देतात.

काहीही अकस्मात व उगाच घडत नाही सर्व आपल्या पूर्वकर्माचेच फळ असते , पण हे आपण विसरल्यामुळे अकस्मात भासते. सर्वांशी न्यायाने व नीतीने वागले पाहिजे, हा स्वहिताचा धंदा ज्याला कळत नाही तो मूर्ख होय असे समर्थ म्हणतात. घडे भोगणे सर्वही कर्मयोगे हा सिद्धांत जे समजून घेत नाहीत त्यांना समर्थ मतिमंद म्हणतात.

**जनीं सर्व सुखी असा कोण आहे**
**विचारें मना तूंचि शोधूनि पावें**
**मना त्वांचि रे पूर्वसंचित केले**
**तयासारखे भोगणे प्राप्त झाले ।। मनोबोध ११ ।।**

समर्थ म्हणतात, हे मना तूच स्वतःच्या अंतरंगात डोकावून बघ. आणि हा प्रश्न स्वतःलाच विचार या जगामध्ये कोण पूर्णपणे सुखी आहे? तर तुला हे लगेचच लक्षात येईल कि कुणीच नाही. कारण प्रत्येकाचे आयुष्य अपूर्णच आहे. प्रत्येकजण स्वत:च्या सुखासाठी झटतो. सुखासाठी धडपडतो. पण तरीही कुठेतरी दु:खिच असतो.

कारण हे मना आता जे घडतंय,होतंय ते सर्व काही आधिपासूनच ठरलेले आहे,हे सगळे तूझ्या मागील कर्मानुसार प्राप्त होते आणि कर्मे हि प्रत्येकाची सारखी नसतात. त्यामुळे प्रत्येकाला त्यासारखेच भोग भोगावे लागतात. मना सज्जना जागा हो आणि हरिचिंतनातच खरे सुख आहे हे जाणून त्या दिशेने वाटचाल कर म्हणजे आत्मज्ञानाच्या शाश्वत सुखापर्यंत तुझा प्रवास पूर्ण होईल.

**२५ नोव्हेंबर २०२३**

**परपीडेचें मानी सुख ।परसंतोषाचें मानी दुःख ।**
**गेले वस्तुचा करी शोक ।तो येक मूर्ख ।। दा २ - १ - ४५।।**

आज मी एक कथा सांगून चिंतन सुरु करणार आहे. अरबस्थानच्या वाळवंटी प्रदेशातील ही कथा आहे. एका गावाच्या बाहेर एक आंधळा उभा असतो. त्याला पलिकडच्या गावाला जायचे असते. वाट वाळवंटाची, दिवसा भयंकर ऊन आणि रात्री कडाक्याची थंडी. दोन दिवसांचा पायी प्रवास, हा आंधळा एकटा काठी घेऊन कसा करणार? तो बघतो कि कोणी सोबती मिळाला तर बरे होईल. त्या वाटेने एक साधु निघाला असतो, तो या आंधळ्याला सोबत घेतो. दिवसभराच्या प्रवासात त्यांची चांगली मैत्री होते. अंधार पडल्यावर वाटेतच रेतीवर ते झोपतात.

सकाळी उजाडायच्या आधी प्रवास सुरु करायचा असतो. आंधळा जरा लवकर उठतो, आपली काठी शोधायला सुरुवात करतो. त्याला त्याच्या काठीचे ऐवजी एक गुळगुळीत काठी सापडते. त्याला आनंद होतो, इतकी छान काठी मिळाल्याबद्दल तो देवाचे आभार मानतो. तो साधुला जागे करतो. जाग आल्यावर साधू बघतो की आंधळ्याच्या हाती गारठलेला साप आहे. थंडी मुळे गारठून तो निश्चेष्ट झाला आहे. दिवस उजाडताच त्याची चेतना परत येणार आहे. साधू त्या आंधळ्याला वस्तुस्थिति सांगतो आणि ती तथाकथित काठी टाकून द्यायला सांगतो. आंधळा तर आंधळाच असतो पण अज्ञानी देखील असतो. त्याला वाटते की साधूला माझ्या काठीचा मोह झाला आहे व त्यामुळे मला ही काठी टाकायला तो सांगत आहे, मी टाकली की हा ती काठी उचलून घेईल. तो ऐकत नाही आणि सूर्य उगवल्यावर उष्णतेने त्या सापाची चेतना परत येते, तो साप आंधळ्याला चावतो. परिणामी आंधळा मरतो. साधुला कणव येते, करुणेपोटी तो आंधळ्याला पोटतिडिकेने विनवणी करीत होता पण मूर्खपणा पायी आंधळा आपला जीव गमावतो.

साधु-संतांना लोकांप्रति करुणा येते म्हणून ते उपदेश करीत असतात. पण आपली गत त्या आंधळ्यासारखी असते. मूर्ख-लक्षणे सांगण्यात समर्थांचा कोणता असा स्वार्थ आहे बरे ! पण "बुडते हे जन देखवे ना डोळा । म्हणूनी कळवळा येतो आम्हा।" या उक्ति प्रमाणे समर्थ उपदेश देत आहेत, पण आम्ही मूर्खच आहोत आणि मृत्युला कारण होऊ शकणारे दुर्गुण आम्ही त्यागत नाही, हा आमचा दोष नव्हे काय?

आमच्या मध्ये असलेली तामसी वृत्ती समर्थ आजच्या या ओवीतून समर्थ दाखवीत आहेत. दुसऱ्याला त्रास झाला की आम्हाला पाशवी आनंद होतो. शेजारच्या मुलाला कमी मार्क पडले, त्यांच्या मुलीला नापसंती आली की आम्हाला (आसुरी) आनंद होतो. त्यांचा मुलगा मेरिट येतो, ही आमच्या साठी वाईट बातमी ठरते, ही तामसी वृत्ती आहे. ही वृत्ती चांगली नाही. दुसऱ्याच्या दुःखाने आमचे मन व्यथित व्हायला हवे, दुसऱ्याची चांगली बातमी आमच्याही आनंदाचा विषय व्हायला हवी, पण ईर्ष्येपोटी तसे होत नाही. आमच्या या ईर्षाळू वृत्तीचा आम्हाला कुठे तरी विचार करावा लागेल. अन्यथा आम्ही मूर्खच आहोत.



दूसरा दुर्गुण "गेले वस्तुचा शोक करी" हा आहे. लोकमान्य टिळकांची कथा आहे. 'केसरी' कार्यालयात ते अग्रलेख लिहीत बसले होते. एवढ्यात त्यांच्या घरून निरोप आला कि त्यांचा मुलगा प्लेग ने वारला. त्यावर ते म्हणाले कि, "गावात होळी पेटली आहे, त्यात प्रत्येक घरची गोवरी जाणारच, एवढा अग्रलेख लिहून पूर्ण करतो आणि निघतो." शोक कशाचा करायचा, ज्याचा होता त्याने नेला. या उलट काही लोकांचे पाहिले, दागिन्यांची बॅग ट्रेनमध्ये हरविली तर यांनी मनाला इतके लावून घेतले की मनावर कायमचा आघात झाला. हे योग्य नव्हे. वस्तू हरविली तर वाईट वाटणे स्वाभाविक असले तरी त्याचा किती शोक करावा? त्या वस्तूचा आमचा एवढाच संबंध होता, शोधायचा पुरेपुर प्रयत्न केला, पण जाऊ दे.

समर्थांनी मूर्ख लक्षण आणि पढतमूर्ख लक्षणाच्या समासातून आपल्याला आपले बारीक-सारीक दोष देखील दाखवून दिले आहेत. हे सारे समर्थांनी सांगण्याचा उद्देश्य एवढाच आहे की आम्ही ते त्वरीत टाकून द्यावे. पण काही लोक मात्र या ओव्यांचा उपयोग दुसऱ्याचे दोष दाखविण्यासाठी करतात, हे बरे नव्हे. समर्थांनी या साठी या ओव्या लिहिल्या नाहीत. आपण आपल्या पुरते चिंतन करावे आणि दोष त्यागावे एवढाच समर्थांचा हेतु आहे. समर्थांनी या द्वारे आपल्यावर अनंत उपकारच केले आहेत.

---

**२६ नोव्हेंबर २०२३**

सांडूनियां जगदीशा | मनुष्याचा मानी भर्वसा | सार्थकेंविण वेची वयसा | तो एक मूर्ख ||२/१/५४

ईश्वराला सोडून जो माणसावर भरोसा ठेवतो काही सार्थक न करता आयुष्याचे दिवस घालवतो. ही या समासाची त्यागार्थ लक्षणे आहेत. त्यागार्थ म्हणजे टाकून देण्याकरता सांगितली आहेत .प्रथमता ज्यांना आत्मज्ञान नाही आणि जे केवळ अज्ञानी आहेत असे 'जे प्रापंचिक जन' आहेत त्यांचीही लक्षणे आहेत. प्रपंच परमार्थाचा पुरस्कार केल्यानंतर प्रपंच हा परमार्थाला विरोधी न होता उपकारक व्हावा म्हणून प्रापंचिकांनी कोणते दोष टाळले पाहिजेत ते समर्थांनी सांगितले आहेत.

या ओवी मध्ये श्री समर्थ उल्लेख करतात की ज्या माणसांना परमेश्वरापेक्षा संपत्ती व माणसे यांचा भरोसा जास्त वाटतो अशा माणसांनांचे ज्ञान कितपत आहे ते लक्षात येते.जीवन जगण्यासाठी संपत्ती आवश्यक आहे याबद्दल दुमत नाही. समर्थांसारखा लोकसंग्रहावर विलक्षण भर देणाऱ्या सत्पुरुष विरळाच असतो. सहकार्य, प्रेम, लोकसंग्रह व समुदाय संघटन यांचे मानवी जीवनातील महत्त्व समर्थ पूर्णपणे जाणून आहेत. पण पैसा व माणसे म्हणजे सर्वस्व नाही ते साधन असून भगवंत साध्य आहे.

ईश्वर प्राप्ती करताना त्याचा अडथळा आला किंवा होणार असेल तर त्या क्षणी त्यापासून दूर होण्याचे मनोबल माणसाजवळ असायला पाहिजे. माणसे व लक्ष्मी परिवर्तनशील आहे. श्रीमंत लोक भिकेला लागू शकतात व गरीब लोकांचे नशीब पालटू शकते. पैसा काय श्रीमंती काय ऊन पावसाचा खेळ असल्यासारखा असतो आज आहे तर उद्या नाही ही स्थिती होते.माणसाने लक्षात घेतले पाहिजे सर्वश्रेष्ठ काय आहे. त्याकडे आपण लक्ष देऊन त्या पद्धतीने वागले पाहिजे. भगवंताची साथ असेल तर बाकी कोणाच्याही साथीची गरज नसते. नातेवाईक उलटू शकतात मित्र शत्रू होतात व शत्रू मित्र बनतात. एकेकाळी आपले ज्यांचे खूप जवळचे संबंध असतात  आज त्यांचे तोंड सुद्धा पाहावेसे वाटत नाही. या सर्व परिवर्तनामध्ये या बदलांमध्ये फक्त भगवंत एकदम कृपाळू असतो. तो नेहमी आपल्या सोबतच असतो. माणसाची प्रेम करण्याची व सहकार्य देण्याची एक मर्यादा ठरलेली असते.

भगवंताची नसते भगवंत अखंड प्रेमाचा सागर असतो .तो सारखा आपल्याला  देत असतो. पण फक्त आपली वेळ जेव्हा आलेली असते तेव्हाच भगवंत देत असतो . तोपर्यंत आपण धीर धरला पाहिजे .धीर आला पाहिजे हा धीर येण्यासाठी आपल्याला उपासनेची गरज असते .'देर है लेकिन अंधेर नाही' हे जसं म्हणतात त्या पद्धतीची गोष्ट आहे.  जोपर्यंत तुम्ही भगवंताचे होत नाहीत तोपर्यंत या गोष्टी लक्षात येत नाही. आता भगवंताचे होणे म्हणजे काय तर आपल्या धैर्य वाढवण्यासाठी आपलं मन घट्ट करण्यासाठीच ही उपासना आहे बाकी कशासाठी नाही. की हे धैर्य आणि उपासना  या मध्ये सातत्य असणे म्हणजेच भगवंताची प्राप्ती होणे. ईश्वराच्या कृपेने आपण जे कार्य करतो ते कार्य करीत असताना एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे. समर्थ ही म्हणतात," आम्ही काय कुणाचे खातो रे," श्रीराम आम्हाला देतो रे". म्हणजे शेवटी भरोसा परमेश्वराचाच आहे.

माणूस कधी उलटल हे सांगता येत नाही . माणसाची शंभर कामे केलेली असली आणि एखाद्या काम जरी नाही केलं तर न केलेल्याच कामाचं सर्वश्रुत होतं त्यामुळे केलेली 99 कामे पाण्यात जातात म्हणून माणसापेक्षा माणसापेक्षा ईश्वरावर प्रेम असावे. भगवंत आपल्याला कुठे ही कमी पडू देत नाही.फक्त श्रध्दा पाहिजे.वेळेनुसार सगळे देतो.हा माझा अनुभव आहे.




उदा. द्रौपदी वस्त्रहरणाच्यावेळी ती कुरुराज्याची साम्राज्ञी असून ही तिच्यावर काय वेळ आली. त्यावेळेस सत्ता असूनही पैसा असून ही  ५ नवरे कामाला आले नाही की मोठी माणसे कामाला आला नाहीत की राजा कामाला आला नाही. फक्त एकटे श्रीकृष्ण लज्जा रक्षणार्थ आले . भगवंताचे बोट तिने कापले तेव्हा करंगळीला बोटभर चिंधी बांधायला दिली तर आज भगवंताने तिच्या  लज्जा रक्षणार्थ किती मोठी साडी वापरली म्हणजे

आपण किती देतो हे पाहिल्या जात नाही तर कसा भाव दिला जातो ते पाहून भगवंत परतफेड करत असतो म्हणून भगवंतावर नितांत श्रद्धा असली पाहिजे.

या ओवीचा शेवटी मतितार्थ असा निघतो की एका जगदीशाला सोडून दिले तर आपल्या जीवनाचा काहीच उपयोग नाही.जीवनाचे सार्थकच भगवंताला ओळखण्यात आहे.नुसते जीवन जगण्याला काही अर्थ नाही.आला का आणि गेला का एवढेच.

---

## २८ नोव्हेंबर २०२३

**अनीतीनें द्रव्य जोडी ।धर्म नीती न्याय सोडी ।**
**संगतीचें मनुष्य तोडी ।तो येक मूर्ख ।। दा २ - १ - ५९ ।।**

समर्थांनी 'प्रपंची पाहिजे सुवर्ण ' असे म्हटले आहे. इथे सुवर्ण या शब्दांचा शब्दशः अर्थ न घेता द्रव्य किंवा पैसे असा अर्थ घ्यावा. संसार करायचा म्हणजे रोजच्या रोज खर्चायला पैसे हवेत. दळभद्री जीणे समर्थांना पसंत नाही. प्रपंच नेटका झाला पाहिजे यावर समर्थांचा कटाक्ष असे. प्रपंचाला लागणारा हा पैसा आणायचा कोठून ? तुकाराम महाराज म्हणतात - 'जोडोनिया धन उत्तम व्यवहारे । उदास विचारे वेच करी ।।'

संतांना अनीतीचे द्रव्य नापसंतच आहे. समर्थांनी सद्विद्या लक्षण समास २ - ८ मध्ये द्रव्यसुची बद्दल ओवी २० मध्ये सांगितले आहे. तुमच्या प्रारब्धात असलेले द्रव्य तर तुम्हाला मिळणारच आहे. मग का लांड्या-लबाड्या करता? अनीतीनें आणलेला पैसा सोबत त्याचे दुष्परिणाम घेऊन येत असतो. हा पैसा अधर्माचा आहे. त्याचा स्वीकार करू नका. "श्री सूक्ता"मध्ये अनपगामिनी म्हणजे मागच्या दारानी लक्ष्मी आणू नका म्हटले आहे. लक्ष्मी पुढच्या दाराने वाजत गाजत आली पाहिजे.

उत्तराखंडच्या एका योग्याकडे एक धनाड्य मनुष्य जातो आणि विनंती करतो की मला योगासने शिकवा. योगी यम-नियमापासून शिकवायला सुरुवात करतो. तेव्हा धनपति म्हणतो, सदाचार, अचौर्य वगैरे तर आम्ही लहानपणापासून शिकत आलो आहोत, तुम्ही मला ध्यान, धारणा, समाधी वगैरे शिकवा. यावर तो योगी विचारतो, " अष्टांगयोग सिखोगे या विकलांग योग सिखोगे? ब्लॅक मनी पर आसन बिछाओगे तो ध्यान लगेगा क्या?" योगाची आठ अंगे आहेत, क्रमाने ती सारी शिकावी लागतील, त्यातील एक दोन टाळून अभ्यास होणार नाही. धर्म, नीती, न्याय माणसाच्या जीवनाचा पाया असायला हवे. माणूस म्हणून जगायचे असेल तर नीतीने वागणे आवश्यक आहे. चाणाक्य नीति मध्ये एक श्लोक आहे. –

**येषां न विद्या न तपो न दानं ज्ञानं न शीलं न गुणो न धर्मः ।**
**ते मृत्युलोके भुवि भारभूता मनुष्यरूपेण मृगाश्चरन्ति ।।**

या श्लोकात धर्म, नीती, न्याय नसणारा व्यक्ति मनुष्य नसून पशु आहे असे चाणाक्य म्हणत आहेत. सर्व जगत् नीती धर्माच्या पायावर चालले आहे. त्यात अनीती, अधर्म अन्याय आचरणारे काही लोक असणारच आहेत. त्यांना काय करायचे ते करू द्या. त्यांचे अनुकरण करू नका. कांहीं लोकांच्या मनात प्रश्न येतो की अनीती, अधर्म, अन्यायाने वागणारे, वाम मार्गाने अमाप पैसा मिळविणारे सुखात, आरामात, चैनीत रहात आहेत. त्यांना तर काहीही होतांना दिसत नाही. मग आम्ही त्यांचे अनुकरण केले तर काय हरकत आहे?

कर्मविपाकाचा सिद्धांत सांगतो कि प्रत्येक कर्माचे फल तयार होत असते व उचित समयी ते फल कर्त्याला मिळते. ते केव्हा मिळावे हे दैवाधीन आहे. गीता अध्याय २ मधील हा ४७ वा श्लोक बघा –

**कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन ।**
**मा कर्मफलहेतुर्भूर्मा ते सङ्गोऽस्त्वकर्मणि ।।**

कर्म करण्याचा तुझा अधिकार आहे, त्याच्या फळावर नाही. तुझ्या कर्माची फळे तर नियती देणारच आहे. म्हणून वाईट कर्मांचा त्याग आवश्यक आहे. आज वाम मार्गाने धन कमाविणाऱ्याचे नशीबात पूर्वपूण्याईचे धन होते. त्यांनी वाममार्गाचा अवलंब केला नसता तरी त्यांना हे धन मिळणारच होते पण आज ते अवलंबित असलेल्या वाममार्गाची फळे त्यांना जरूर मिळणार आहेत. संतांना हे पक्के ठाऊक असते म्हणून ते असे द्रव्य घेऊ नका असा आग्रह करतात.

**नको रे मना द्रव्य ते पुढिलांचे ।अतिस्वार्थ बुद्धी न रे पाप साचे ।**
**घडे भोगणे पाप ते कर्म खोटे ।न होता मनासारिखे दुःख मोठे ।। म श्लो ९।।**

समर्थांनी १०३ व्या मनाच्या श्लोकात देखील परद्रव्य नको म्हटले आहे. द्रव्य शुचि, दारा शुचि वर समर्थांचा कटाक्ष आहे. संगतीचे मनुष्य तोडणाऱ्याला' समर्थांनी मूर्ख म्हटले आहे. का आपल्या माणसाला सोडू नये? शिवाजी महाराजांच्या निर्वाणानंतर संभाजी राजांनी शिवबाच्या विश्वासातील काही सरदारांचा वध केला. त्या प्रसंगामुळे व्यथित झालेल्या समर्थांनी राजे संभाजींना पत्र पाठविले, त्यात ते म्हणतात,

**"काही उग्र स्थिती सांडावी। काही सौम्यता धरावी।**
**मागील अपराध क्षमावे । कारभारी हाती धरावे।**
**सुखी करून सोडावे । कामाकडे।।**

आपल्या कामावर असणारा कर्मचारी आपल्याला एकनिष्ठ असतो. त्याला अचानक काढून टाकणे उचित नसते. नोकर असो वा नातेवाईक, हे कठीण समयी कामाला येणार आहेत. क्षुल्लक कारणावरून त्यांचेशी दुरावा घेऊ नये. आपल्या मित्राला, नातेवाईकाला, नोकराला शक्यतो त्यांच्या चुकांबद्दल माफ करून टाकावे. दुरावा घेऊ नये असे समर्थांचे म्हणणे आपण गंभीरपणे मनावर घ्यावे.

आजवर इतक्या दुर्गुणांबद्दल लिहिले, पुढेही लिहिणारच आहे. दासबोध हाती आल्यापासून त्या दुर्गुणांना घालविण्याच्या प्रयत्नात आहे, यश ही मिळत आहे. उरलेले दुर्गुण लवकर जातील अशी आशा आहे. उरलेले व माहित न झालेले दुर्गुण लवकर जावे अशी समर्थ चरणी प्रार्थना आहे. आपण देखील माझ्यासाठी व स्वतःसाठी देखील प्रार्थना करा अशी विनंती करतो व आपल्या हृदयस्थ परमेश्वराला प्रणाम करतो, माझ्या प्रणामांचा कृपया स्वीकार करावा.

## ३०  नोव्हेंबर २०२३

**कळह पाहात उभा राहे । तोडविना कौतुक पाहे ।**
**खरें अस्तां खोटें साहे ।तो येक मूर्ख। ।। दा २ - १ - ६७।।**

या आठवड्यातील मूर्ख लक्षणांची ही शेवटची ओवी. या समासात जवळपास २५० लक्षणे समर्थांनी सांगितली असून त्यापैकी फारच थोडी आपण इथे बघितली आहेत. उरलेल्या ओव्यांचा अभ्यास होमवर्क म्हणून आपला आपणच करायचा आहे. पुढच्या आठवड्या अखेर मूर्ख लक्षणे संपणार व पुढे पढत मूर्ख लक्षणे पहावी लागणार. त्याकरिता आता पासूनच मनाची तयारी करूया.

आजच्या ओवीमध्ये समर्थांनी सर्वसामान्य भारतीय माणसाची सवय दाखवून दिली आहे. आपण वाटेने जात आहोत, वाटेत दोघे जण भांडत आहेत. आपण तास -अर्धातास तो तमाशा पहात उभे असतो पण भांडण सोडविण्याचा प्रयत्नच करीत नाही. तसे पाहिले तर ते भांडण किरकोळ असते, आपण तिथे तमासगीर म्हणून थांण्याची गरज नसतांना देखील आपण उभे राहून तमाशा (समर्थ त्याला कौतुक म्हणतात) बघत उभे रहातो. हा मूर्खपणा आहे. आपण थांबलोच आहोत तर भांडण सोडवावे की नाही पण तमाशा बघण्यात आपल्याला रस असतो, तेवढीच करमणूक होते. पण हे चूक आहे. क्षुल्लक कारणावरून ते भांडतात आणि आपण तिथे थांबून आपला वेळ वाया घालवितो हे बरे नव्हे. किरकोळ भांडण उग्र रुप घेते. एक बाई भांडतांना सवतीला म्हणते, "भलेही माझा नवरा मरो, पण तुला विधवा झालेली पाहूनच मला आनंद होईल."

दुसरा दुर्गुण सांगतांना समर्थ म्हणतात, " खरें अस्तां खोटे साहे । तो येक मूर्ख ।।" जो माणूस खरे बोलतो त्याची बाजु न घेता आपण खोट्याची बाजु कां घेतो? कारण अगदी क्षुल्लक असते. खोटे बोलणारा आपला माणूस असतो. आपले हितसंबंध खोट्या माणसाशी गुंतलेले असतात, म्हणून आपण खोट्याची बाजु घेतो. समर्थ याला मूर्खपणा म्हणतात आणि टाकायला सांगतात. अहो कौरवाची बाजु खोट्याची आहे हे माहित असून देखील त्यांच्या बाजूने लढायला लोक तयार झालेच ना. अर्थात् त्यांना त्याचे फळ मिळाले.

समर्थ कानी कपाळी ओरडून सांगतात मग आपण हा साधा दुर्गुण टाकायचा नाही काय? बघा आपण काय करायचे ते. मी मात्र खोट्याची बाजू घेणे सोडले आहे. खरं पाहिलं तर या गोष्टी आम्हाला ठाऊक नाहीत असे नाही. तमाशा बघु नये, खोट्याचा पक्ष घेऊ नये हे आम्हाला माहितच आहे. समजते पण उमजत नाही. काय करणार? म्हणून तर समर्थ म्हणतात,

**हे अवघे आपणापासी । येथे बोल नाही जनासी ।**
**सिकवावे आपल्या मनासी । क्षणाक्षणा ।। दा १२ - २ - २३ ।।**

---

## १  डिसेंबर २०२३

**आपलें काज होये तंवरी । बहुसाल नम्रता धरी ।**
**पुढिलांचें कार्य न करी ।तो येक मूर्ख ।। दा २ २ ६९।।**

तसं पाहिलं तर प्रत्येक जणच स्वार्थी असतो. आपले काम कुणाकडे असेल तर दहा वेळा आपण त्याचेकडे खेटे घालु, त्याच्याशी गोड-गोड बोलून आपले काम काढून घेऊ. गरज वाटेल तर त्याची स्तुती करू,

खोटी खोटी का होईना नम्रता धारण करू. हे ठीकच आहे. याला मूर्खपणा म्हणण्यापेक्षा चातुर्य म्हणता येईल. पण हा मूर्खपणा केव्हा होईल ते समर्थ तिसऱ्या चरणात सांगत आहेत. तुम्ही जसे दुसऱ्याकडून काम काढून घेता तसे त्याचे काम करायला किती तत्पर असता हे महत्त्वाचे आहे. स्वतःच्या कामासाठी लाळघोटेपणा कराल अन् इतरांच्या कामातून अंग काढून घ्याल तर तो तुमच्या धूर्तपणा असेल. यालाच समर्थ मूर्खपणा म्हणतात. सरल स्वभावी मनुष्य असे मुळीच करणार नाही. एखाद्याने आपले काम केले नसेल तरी त्याच्या प्रसंगाला धावून जातो तो साधु असतो.

**मृदु सबाह्य नवनीत।तैसे सज्जनाचे चित्त ।**
**तोचि साधू ओळखावा ।देव तेथेचि जाणावा ।।**

तुकाराम महाराजांचे हे वचन आपल्याला ठाऊकच असेल. निर्हेतुक इतरांच्या कामी पडणारा साधू असतो. साधू प्रत्येक जीवामध्ये भगवंताला बघत असतो. रामकृष्ण परमहंस यालाच "शिवभावे जीवसेवा" म्हणत असत. प्रत्येक जीवामध्ये त्या परमात्म्याला बघायचे आणि त्याची सेवा करायची हे त्यांच्या शिष्यांचे, संन्याशांचे व अनुयायांचे धोरण आहे. रामकृष्ण मठाच्या संन्याशांचे घोष वाक्य आहे. "आत्मनो मोक्षार्थ जगत् हिताय च" हा संन्यासी स्वतःच्या मोक्ष प्राप्तीसाठी जप-ध्यान तर करेलच पण जिथे गरज असेल तिथे सर्वांची सेवा देखील करेल. किती तरी आपदा प्रसंगी रामकृष्ण मठाने सेवाकार्य केल्याचे आपण बघतो.

समर्थ इथे आपल्याला सांगतात की इतरांचे काम करणे आवश्यक आहे. तुम्ही इतरांचे कामी पडाल तेव्हाच समाज तुमच्या कामी पडेल. तुमचे काम आपोआप होईल. समाजाचे काम हाच आपला स्वार्थ समजावा आणि प्रत्येक गरजूला मदत करावी हेच या ओवीतून समर्थ आपल्याला सांगत आहेत.

---

## २ डिसेंबर २०२३

**अक्षरें गाळून वाची । कां तें घाली पदरिचीं ।**
**नीघा न करी पुस्तकाची । तो येक मूर्ख ।। २-७-१० ||**

सरळ अर्थ:- जो वाचन करताना अक्षरे गाळत गाळत वाचतो किंवा जे ग्रंथात नाही ते पदरचे घालून वाचतो,पुस्तक नीट सांभाळता येत नाही तो मूर्ख. मूर्ख हा त्याच्या चुकीच्या विचार वर्तन व्यवहार व धारणांनी ओळखला जातो. अलिकडे 'त्याने काय फरक पडतो....' असे बोलून अनेक महत्त्वाच्या गोष्टी निकालात काढल्या जातात. पुस्तक नीट ठेवावे वेडेवाकडे नका ठेऊ.... **(त्याने काय फरक पडतो?)** पुस्तकाची पाने दुमडू नका... खूण म्हणून बुक मार्कर ठेवा..**(पण का? दुमडले पान काय बिघडणार आहे?)** पुस्तकात पेन पेन्सिल ठेऊ नका... बांधणी खराब होते... **(झाली तर काय फरक पडतो?)** वाचून पुस्तक जागेवर ठेवा... सापडते.... **(नाही सापडले..काय फरक पडतो?)** ज्यांच्याकडून आणले त्याला पुस्तक वेळेवर परत करा... **(त्याच्याकडे खूप आहेत...एकाने काय फरक पडतो?)** कंसात आहेत ती समर्थने आहेत चुकीच्या वागण्याची... चूक मान्य न करण्याची... सुधारणेचा रस्ता आपल्याच हाताने बंद करण्याची सवय लागते.

नीट वाचन करणे ही शिस्त आहे.पुस्तक नीट वापरणे ही शिस्त आहे.जे ग्रंथकाराने लिहिले आहे त्यामागे त्यांचा विचार आहे, अभ्यास आहे.जे लिहिले ते गाळून वाचण्याने अर्थाचा अनर्थ तर होतोच पण मूळ बोध आपल्याला व्हावा अशी लेखकाची तळमळ असते त्याला हरताळ फासला जातो. आपण अर्धवट वाचतो

,अर्धवट समजते, आचरणात काही येत नाही...आचरण बिघडत जाते.उफराटी चुकीची विचारसरणी निर्माण होते.ती सर्वच क्षेत्रात झिरपत जाते.एकंदर व्यक्तिमत्वाचा -हास होत जातो.हे असे घडते आहे हेही समजत नाही म्हणून मूर्ख.समजून उमजून तसेच वागत राहिला तर पढतमूर्ख!

मग प्रश्न येतो असे आपण का वागतो?

**विसरास विसरला| आळसाचा आळस केला |**
**सावध नाहीं दुश्चित्त झाला| दुश्चित्तपणासी ||५८|| ५ .९ .५८**

१) आळस :- कृती करण्याचे टाळणे,पुढे ढकलणे
२) दुश्चित्त :- नीट लक्षच नसणे
३) आपलेच खरे करण्याचा दुराग्रह ( चूक ही चूक वाटतच नाही.)
४) हरेक सूचना उडवून लावणे
५) गांभीर्य न समजणे

**म्हणोन आळस सोडावा| येत्न साक्षेपें जोडावा |**
**दुश्चितपणाचा मोडावा| थारा बळें ||८||१२ .९.८**

समर्थ यावर उपाय पण सांगतात.आळस आपला आपण जात नाही.प्रयत्न लागतात.उद्यमशीलता अंगी बाणवावी लागते.चुकीच्या सवयी निर्धाराने बदलाव्या लागतात.मनात घट्ट बसलेला हा दुर्गुण काढायला कठीण असतो.एखादा घरभाडेकरू जसा कोर्टात खेटे घातल्याशिवाय जात नाही तसेच हे दुर्गुण असतात. मूर्खाची समस्या ही असते की हे चुकते आहे हे त्याला कळत नाही.संत सद्गुरू सांगतात,चूक दाखवून देतात.त्याप्रमाणे आपण वागायला मात्र हवे.चूक दाखवण्या मागचा उद्देश आपली सुधारणा व्हावी हा आहे हे लक्षात घ्यायला हवे.

प्रस्तुत चिंतनात एक चूक अनवधानाने झाली आहे.आदरणीय समर्थ भक्तांनी फोन करून निदर्शनास आणून दिली आहे.ती सुधारणा केली आहे. ओवी ५-९-५८ चा अर्थ द्विरुक्ती मुळे निराळा होतो आहे. साधक लक्षण निरूपण संदर्भात तो आळसाला विसरला,म्हणजे आळस नसतो असा होतो आहे.

---

## ३ डिसेंबर २०२३

**आपण वाचीना कधीं ।कोणास वाचावया नेदी ।**
**बांधोन ठेवी बंदीं ।तो येक मूर्ख ।। दा. २-२-७१।।**

मूर्ख लक्षणाच्या समासातील हे शेवटचे मूर्ख आहे. पुस्तक लेखन आणि पुस्तकाचे जतन हे समर्थांचे आवडीचे विषय आहेत. लेखन क्रिया निरूपणाचा एक स्वतंत्र समास समर्थांनी या करिता दासबोधात लिहिला आहे. त्याकाळी पुस्तक हे तसे खर्चिक काम असे. पुस्तकें लिहिणारा ब्राह्मण वर्ग असे. ज्याचे अक्षर सुंदर आहे, जो एकटाकी लिहितो अशा लेखकाच्या पुस्तकाला फार मागणी असे.

आजकाल छपाई कलेचा व बाईंडिंगच्या तंत्राचा विकास झाल्यामुळे पुस्तक लेखन मागे पडले. पुस्तके विपुल प्रमाणात आणि स्वस्त दरात उपलब्ध झाली आहेत. संगणक तंत्राचा विकास झाल्यामुळे तर आजकाल 'ई' पुस्तक मिळायला लागले. अशी पुस्तकें चक्क फुकटात उपलब्ध झाली आहेत. आपल्या आनंद जोगळेकर आणि चमूने तर समग्र संत साहित्य आपल्याला एका क्लिक वर उपलब्ध करून दिले आहे. त्यांच कौतुक करावे तेवढे कमीच आहे. हा झाला पुस्तकांचा इतिहास. आपली आजची ओवी पुस्तकांच्या वापरावर आहे.

एखादा मनुष्य पुस्तक विकत तर घेतो पण वाचत नाही. दिखावा म्हणून त्याने पुस्तक घेतले तर आहे पण ना तो स्वतः वाचत ना इतरांना वाचायला देत. याचा अनुभव मी घेतला आहे, आपल्याला देखील अनुभव आला असेल. वाचायचा नाही अन् द्यायचाही नाही, फक्त बांधून ठेवायचा, मग ग्रंथ याने फक्त दिखाव्यासाठीच घेतला. अशा व्यक्तिला समर्थ मूर्ख म्हणतात.

---

**५ डिसेंबर २०२४**

**दोष ठेवी पुढिलांसी। तें चि स्वयें आपणापासी।**
**ऐसें कळेना जयासी।तो येक पढतमूर्ख।। ओवी क्र.२५**

सरळ अर्थ- जो दुसऱ्याचे दोष काढून त्याला नावे ठेवतो,पण तेच दोष स्वत:च्या अंगी आहेत हे ज्याच्या लक्षात येत नाही तो पढतमूर्ख होय.

जो मनुष्य सत्कर्म कोणते ते माहित असून दुष्कर्म करतो,चांगल्या गुणांची जाणीव सोडून दुर्गुण अंगीकारतो उत्तम लक्षणे जाणूनबुजून सोडतो व हीन लक्षणांना थारा देतो अशा मनुष्याला श्री समर्थ पढतमूर्ख म्हणतात. काही लोकांना सल्ले द्यायला आवडतात,तू हे असे कर किंवा तू हे असे का केलेस? मी असते तर असे केले असते, असे सल्ले दुसऱ्याला देणे खूप सोपे असते पण जेव्हा तिच परिस्थिती स्वत:वर येते तेव्हा सर्व माफ असते.स्वत:वर वेळ आली की, वर्तन बदलते,आणि त्या मनुष्याचे वर्तन खालील म्हणीप्रमाणे होते.

लोकांसांगे ब्रह्मज्ञान आपण मात्र कोरडे पाषाण उदा- आपण आपल्या मुलांना सांगतो जंक फूड खायचे नाही , आणि आपण मात्र रस्त्यावरुन जात असताना गरमागरम वडापाव चा वास आला की आपले पाय आपसूक वडापाव कडे वळतात.आज खाल्ला वडापाव तर काही होणार नाही,उद्यापासून नाही खायचा,अशी मनाची समजूत काढतो. उदा मुलांना सांगणे मोबाईल घेऊ नये आणि स्वत:मात्र तासानतास मोबाईल बघणे. असे वागले तर स्वत:ला ही शिस्त लागणार नाही आणि मुलांनाही शिस्त लागणार नाही.

अशा लोकांना श्री समर्थ पढतमूर्ख म्हणतात. दुसऱ्यांचे दोष न दाखवता,दुसऱ्यावर आलेल्या परिस्थीतीमधे स्वत:ला ठेवून ,परिस्थिती बघून वर्तन करणे अशी स्वयंम शिस्त स्वत:ला लावने योग्य आहे. कारण बोलै तैसा चाले ,त्याची वंदावी पाऊले असे तुकारामांनी आपल्याला सांगितले आहेच. म्हणूनच समाज देखील अशा व्यक्तींनाच किंमत देतो.(बोलणे सकारात्मक असले तर) त्यामुळे बोलण्याआधी विचार करा, बोलून झाल्यावर नाही.

---

**६ डिसेंबर २०२३**

**अभ्यासाचेनि गुणें ।सकळ विद्या जाणे ।**
**जनास निवऊं नेणें ।तो येक पढतमूर्ख ।। ।।दा २-१०-१५ ।।**

३ तारखेला मूर्ख लक्षणाची अखेरची ओवी आपण पाहिली व ४ तारखेपासून पढत मूर्ख लक्षणांना सुरुवात झाली आहे. मूर्ख आणि पढतमूर्खामध्ये काय फरक आहे असा प्रश्न आपल्याला पडला असेल. मूर्ख तो असतो ज्याला योग्य व अयोग्य यातील फरक कळत नाही पण पढत मूर्ख मात्र हा फरक जाणतो तरी विपरीत वागतो. अगदी उदाहरण देऊन सांगायचे म्हणजे सिगारेटच्या पाकीटावर वैधानिक इशारा असतो, त्यात स्पष्टपणे लिहिले असते की धुम्रपान आरोग्याला हानिकारक असते. हे वाचून देखील जो सिगारेट ओढतो तो पढतमूर्ख जाणावा. सद्गुणांची जाणीव असूनही दुर्गुणांचा अंगिकार करतो, सदाचाराची किमत ओळखूनही भ्रष्टाचार करतो, उत्तम लक्षणांचा त्याग करून हीन लक्षणे स्वीकारतो त्याला समर्थ पढतमूर्ख म्हणतात.

आपल्या अंतःकरणात आत्मबुद्धी व देहबुद्धी दोन्ही असतात. आत्मबुद्धी आपल्या हिताचे काय आहे ते सतत आपल्याला सांगते. देहबुद्धी मात्र देहाला तात्काळ काय हवे, त्याने लगेच सुख मिळेल काय, हे बघून निर्णय करते. कठोपनिषदात हा मंत्र येतो -

**अविद्यायामन्तरे वर्तमानः स्वयं धीराः पण्डितंमन्यमानाः ।**
**दन्द्रम्यमाणाः परियन्ति मूढाः अन्धेनैव नीयमानाः यथान्धाः ।। ।।कठोपनिषद १ - २ - ५ ।।**

अर्थ - अविद्येत बुडालेले असूनही स्वतःला बुद्धिमान, पण्डित समजणारे, अनेक वेड्यावाकड्या मार्गांचा अवलंब करणारे मूढ लोक, आंधळ्यामागे जाणाऱ्या आंधळ्यांप्रमाणे मार्ग हरवून भटकत रहाता. आजच्या चिंतनाला आपण घेतलेली ओवी अगदी याच आशयाची आहे. हा पढतमूर्ख स्वतः तर भटकतोच पण लोकांना देखील भटकवत रहातो. अश्या माणसाच्या शिक्षणाचा काय फायदा?

प्रापंचिक माणसात देहबुद्धीचा जोर असणे स्वाभाविक आहे पण शिकल्या सवरल्या माणसाने श्रेयस काय आणि प्रेयस काय हे ओळखायला हवे, जो हे जाणूनही विपरीत वागतो त्याला समर्थ पढतमूर्ख म्हणतात. प्रापंचिक माणसाने श्रेयसाची निवड करावी म्हणून समर्थ या समासात इशारा देत आहेत. ज्याला तो समजतो तोच समजदार (समझदार को इशारा काफी है). असा पण्डित दूसऱ्याला योग्य सल्ला देतो पण स्वतःवर तसाच प्रसंग आला असता मात्र विपरीत वागतो.

**जाता जाता आपण श्रेयस आणि प्रेयस म्हणजे का ते देखील बघून घेऊ -**

**श्रेयश्च प्रेयश्च मनुषमेतस्तौ सम्परीत्य विविनक्ति धीरः ।**
**श्रेयो हि धीरोऽभिप्रेयसो वृणीते प्रेयो मन्दो योगक्षेमादवृणीते ।। कठो. १ - २ - २।।**

अर्थ - श्रेय आणि प्रेय हे दोन मार्ग मनुष्यापुढे उपस्थित असतात. त्यांचा नीट विचार करून बुद्धिमान मनुष्य त्यातील एक निवडतो. तो प्रेयापेक्षा श्रेयाचे श्रेष्ठत्व बघून श्रेयच निवडतो. परन्तु निव्वळ योगक्षेमाची चिंता करणारा मन्दबुद्धीचा मनुष्य मात्र प्रेयच निवडतो.

श्रेय-प्रेयाचा विचार कठोपनिषदात विस्ताराने आलेला आहे. आपण दासबोधातही हा विचार शोधू शकतो. इथे तर स्वतःला विद्वान समजणारे तथाकथित पण्डित स्वतःच खड्ड्यात जात आहेत, ते इतरांना

काय वाट दाखविणार? एक आंधळा इतरांना वाट दाखविण्याच्या नादात स्वतः संकट सगळ्यांना खड्ड्यात नेईल. प्रपंचात सारा स्वार्थाचा बाजार असतो त्यामुळे तिथे पढतमूर्ख विपुल प्रमाणात आढळतात.

---

<u>**७ डिसेंबर २०२३**</u>

**जेणें उणीव ये आंगासी | तेंचि दृढ धरी मानसीं |**
**देहबुद्धी जयापासीं | तो येक पढतमूर्ख ||१७||२ .१० .१७**

**उणीव :- कमीपणा येणे,दोष लागणे, अपकिर्ती होणे. = आंगासी:- आपल्याला**

सरळ अर्थ :- एखादे कृत्य केले तर आपल्याला कमीपणा येईल, अपकिर्ती होईल हे माहिती असूनही जो तेच करतो,अगदी हट्टाने केल्यासारखे मुद्दाम करतो,जणू त्याच्या मनाचा तसे चुकीचे वागण्याचा निर्धार होतो .हे सगळे घडते कारण त्याची देहबुद्धी प्रबळ असते.अशा माणसाला समजून उमजून चुका करणा-याला समर्थ पढतमूर्ख म्हणतात. म्हणजे बुद्धी ला माहिती असते की आपण काय करायला हवं काय नको.काय हितकारक आहे व काय अहितकारक आहे.पण

**मन वढाय वढाय जसं पिकातलं ढोर|**
**किती हाकलं हाकलं तरी ते येतं पिकावर|| बहिणाबाई.**

बुद्धी व मन विरुद्ध दिशेने काम करीत असतील तर असे घडते.पढतमूर्खाचे नियंत्रण मनाच्या ताब्यात असते. आपण डॉक्टरांचे उदाहरण घेऊ.सगळेच डॉक्टर रुग्णांना सल्ला काय देतात? धूम्रपान करू नका.मद्य घेऊ नका.फार जागरण करू नका.पण खाजगी आयुष्यात जर हेच डॉक्टर असे चुकीचे वर्तन करत असतील तर काय म्हणायचं? दुष्परिणाम ठाऊक आहेत,त्याचे कुटुंब समाज यावर होणारे परिणाम माहिती आहे पण नाही थांबवू शकत स्वतःला चुकीचे वागण्यापासून.कोणीतरी ओढून नेल्यासारखी पावले तशा सोबत्यांकडे वळतात.मग विवेक शिक्षण आपली समाजातील पत सगळ्याचा विसर पडतो.

समाज आंधळा नाही बहिरा तर नाहीच नाही.ही गोष्ट लपवून लपत नाही.कानगोष्टींसारखी पसरते.बहुरंगी बनते व त्या डॉक्टरांची बदनामी होते.तेही समजते पण ओढ आसक्ती एवढी असते की दुर्लक्ष तरी केले जाते किंवा वर्तनाचे चुकीचे समर्थन केले जाते...आणि बुडत्याचा पाय खोलात तसे घसरणे सुरू रहाते. राम गणेश गडकरींनी एकच प्याला या नाटकात अशाच बुद्धीमान कीर्तीमान पण दारूपायी धूळधाण करून घेतलेला वकिलांचे पढतमूर्ख माणसाचे प्रातिनिधिक चित्रण केले आहे.

अनावर वासना बुद्धी वर हावी होऊन बुद्धी भ्रष्ट करते अशा जाणता असूनही नेणतेपणाने आपल्या पायावर धोंडा पाडून घेणा-या पढतमूर्ख माणसाची शोकांतिका समर्थ आपल्या समोर मांडत आहेत.
काम, क्रोध, लोभ, मोह, मद आणि मत्सर हे सहा दोष..... यांनाच "षड्रिपु" म्हणतात.

फार्सी भाषेत यांना "ऐब" म्हणतात. हे 'सहा ऐब' ज्याच्या अंगी ठासून भरलेले असतात त्याला "साहेब" म्हणतात.....

**या सहा दोषांना सहज 'धारण' करणाऱ्यास "साधारण" म्हणतात....**
**या सहांना 'मान्य' करणाऱ्यास"सामान्य" म्हणतात.....**
**या सहांना आपल्या 'धाकात' ठेवणाऱ्यास "साधक" म्हणतात....**
**या सहांना 'अधू' करणाऱ्यास "साधू" म्हणतात.....**
**या सहांचा संपूर्ण 'अंत' करणाऱ्यास  "संत" म्हणतात.....**

आणि या सहांचा 'अर्थ' नीट समजून घेऊन जो स्वतःची आत्मोन्नती करतो त्याला "समर्थ" म्हणतात...

---

## १० डिसेंबर २०२३

**प्रपंचविशी सादर। परमार्थी ज्याचा अनादर।**
**जाणपणें घे अधार ।तो येक पढतमूर्ख।।।। दा२-१०- २७।।**

ही प्रवृत्ती विज्ञानवादी, आधुनिक, धर्मनिरपेक्ष म्हणविणाऱ्या हिन्दूंमध्ये प्रकर्षाने आढळून येते. श्याम मानव सारखे तथाकथित अंधश्रद्धा निर्मूलन वाले या प्रवृत्तीला प्रोत्साहन देत असतात. आम्हाला देव देव करायला वेळ नाही, उपवास नाही केला तर काय बिघडते? वाढदिवस साजरा करतात, लोकांना पार्टी देतात पण औक्षण न करता मेणबत्ती विझवून केक कापतात. हे तथाकथित आधुनिक लोकच करतात.

मुख्य म्हणजे आम्ही प्रपंच मन लावून करू फक्त प्रपंचातून देवाला रिटायर करू अशी यांची भूमिका असते. पण हे जाणत नाहीत की त्याच भगवंताने आम्हाला मनुष्य देह दिला आहे. त्यानेच आम्हाला प्रपंच दिला आहे. त्यानेच सुबत्ता दिली आहे. फक्त मी आणि या देहाचे नातेवाईक इतकाच आपला प्रपंच असतो. संकट येईल तेव्हा देव वगैरे बघु अशी यांची भावना असते. अशा लोकांना समर्थ पढतमूर्ख म्हणतात.

एकवेळ मूर्ख परवडला, कारण आपण काय करतो, त्याचे परिणाम काय होतील हे तो जाणत नाही. शिवाय त्याच्या मूर्खपणाचे दुष्परिणाम फक्त त्यालाच भोगावे लागतात. पण पढतमूर्ख मात्र स्वतःच्या बरोबर इतरांचे ही नुकसान करतात. यांच्या मूर्खपणाचे परिणाम तो स्वतः तर भोगतोच पण समाजाला देखील भोगावे लागतात. वास्तविक ज्या भगवंताने आम्हाला मनुष्य जन्म दिला आहे, त्याचे उपकार जन्मभर विसरायला नको पण हे लोक भगवंतानी आम्हाला हा मनुष्य दिला आहे हे मानायला तयारच नसतात.

**जो अन्न देतो उदरासी ।शेरीर विकावें लागे त्यासी ।**
**मां जेणें घातलें जन्मासी ।त्यासी कैसें विसरावें ।।। दा ३ - १० - ५५।।**

अरे करंट्यांनो जर त्याने मानव जन्म दिला नसता तर कसचा प्रपंच करणार होता? त्याचे उपकार माना की इतकी नकारात्मक भूमिका घेउनही तो आम्हाला आनंदात ठेवतो. पण आपले धोरण मात्र अत्यादरे पिण्डपोषणम्' एवढेच असते. आपण हे विसरतो की पोट भरणे म्हणजे 'जाणिजे यज्ञकर्म' आहे अणि आपण जिभेचे लाड पुरवीत बसतो. ब्रह्मार्पणम् ही भावनाच राहिली नाही, कारण ब्रह्म वगैरे आम्ही मानतच नाही. पण लक्षात ठेवा -

**कोण समयो येईल कैसा ।याचा न कळे किं भर्वसा ।**
**जैसे पक्षी दाही दिशा ।उडोन जाती ।। दा ३ - १० - ३९।।**

भगवंताचा विसर पडणे, कामवासना, पैसा आणि लौकिक यांच्या आधीन होणे हे पढतमूर्खाचे प्रमुख लक्षण आहे. जो कोणालाच मानत नाही, बोलतो एक आणि करतो भलतेच, स्वहित करून घेत नाही तो पढतमूर्ख होय.


---

**११ डिसेंबर २०२३**

**रात्रंदिवस करी श्रवण ।न संडी आपले अवगुण ।**
**स्वहित आपलें आपण ।नेणे तो येक पढतमूर्ख।। ।।दासबोध २ - १० - ३०।।**

इथे श्रवण याचा अर्थ ऐकणे व वाचणे असा घ्यावा. लोक अध्यात्म मार्गाला लागतात आणि निरनिराळ्या वक्त्यांची प्रवचने ऐकतात, निरनिराळे ग्रंथ भरपुर वाचतात. इतकी प्रवचने एकली, इतके ग्रंथ वाचले तरी यांच्यात यत्किंचितही बदल झालेला दिसत नाही. याचं कारण शोधले तर असे आढळून येते की हे लोक करमणूक म्हणून प्रवचने ऐकतात वा वाचन करतात. स्वतःमध्ये बदल घडवावा हा त्यांचा उद्देश्यच नसतो. तुमचे कसे चुकते हे तुम्हाला वक्त्यांचे, लेखकाचे दाखले देऊन दाखवून देतील, पण स्वतः धडा घेणार नाहीत. अशा लोकांसाठी शैतानाच्या हाती बायबल ही म्हण परफेक्ट लागू पडते.

एकदा चर्चमध्ये एक पाद्री प्रवचन देत होता. बोलता बोलता त्याने येशूचे एक वचन सांगितले. "येशू म्हणतात की कोणी जर तुमच्या उजव्या गालावर थापड मारली तर डावा गाल पुढे करा." हे ऐकून एक उपद्रवी माणूस पुढे आला व त्याने पाद्र्याच्या उजव्या गालावर थापड मारली. पाद्र्याला राग तर भरपूर आला होता पण काय करेल बिचारा, आत्ताच तर त्याने येशूचे वचन वाचून दाखविले होते. बिचारा बघतो आणि डावा गाल पुढे करतो. तो माणूस तयारच होता, त्याने डाव्या गालावर देखील ठेवून दिली. आता मात्र पाद्री अधिकच संतापला. त्याने त्या माणसाचे बकोट धरले आणि त्याला येथेच्छ बुकलून काढला. लोकांनी मध्यस्थी केल्यावर पाद्री म्हणाला, दुसऱ्या गालावर थापड मारल्यावर काय करायचे हे येशूने सांगितले नाही त्यामुळे मी त्याचा सूड घेणारच.



येशूचा उद्देश्य काय आणि पाद्री मनमाने कसा वागला यावरून हे दिसून येईल की पाद्र्याने नीट श्रवण केलेच नव्हते. जर धर्मगुरुची ही अवस्था तर सामान्य माणसाने श्रवण केलेल्या उपदेशाच्या विपरीत वागणूक केली तर त्याला कसा दोष देणार. पण लोक स्वतःचा स्वभाव बदलायला तयार नसतात आणि मन

मानेल तसे वागतात. मनावर ताबा कसा ठेवावा या विषयावर प्रवचन देणारा माणूस लगेच आपल्या सहकाऱ्यावर रागावला, त्याला आठवण दिली तर तो म्हणतो की तुम्ही वागताच असे की माणसाला राग यावा.

दुसरा दोष म्हणजे 'स्वहित आपलें आपण नेणे' माणूस रागाच्या भरात आपलेच नुकसान करून बसतात. सम्यक विचार नसतो, राग लगेच अनावर होतो व आपले हित, अहित विसरून जातो. विवेक नसल्याने असे होते. छोट्या छोट्या गोष्टीवरून मोठे नुक़सान करून बसतो. अशा माणसाला समर्थ पढतमूर्ख अकारण म्हणत नाहीत.

---

## १२ डिसेंबर २०२३

**ज्ञान बोलोन करी स्वार्थ| कृपणाऐसा सांची अर्थ|**
**अर्थासाठीं लावी परमार्थ| तो येक पढतमूर्ख ||३५||**

परमार्थाला अर्थार्जनासाठी वापरणारा, स्वार्थासाठी वापरणारा जो लबाड असतो त्याला समर्थ पढतमूर्ख म्हणत आहेत. ज्ञान बोलोन करी स्वार्थ:- सध्या आपण काही तथाकथित बाबा , प्रवचनकार पहातो जे एकेका प्रवचनाचे १५-२० लाख रुपये घेतात. लोकांना वैराग्य सांगतात पण स्वतः महागड्या गाड्यांमधून फिरतात. मंत्री राजकारणी त्यांच्या कडे जमणारी गर्दी पाहून नतमस्तक होतात.त्यांचाही स्वार्थ साधतो, राजाश्रयाने या बाबांची दुकाने उत्तम चालतात. फसतो तो साधा भोळा सामान्य जो काही समस्येमुळे उपाय शोधत असतो,मनाची शांतता शोधत असतो.त्याची फसगत तर होतेच पण ज्या ज्ञानाच्या गोष्टी हे तथाकथित संत बोलत असतात त्याच्याशी विसंगत वागून ज्ञ्यानाशी सुद्धा प्रतारणा घडत असते.

ज्ञानाचा विपरीत उपयोग करणे हे पढत मूर्ख माणसाचे लक्षण आहे.यातून कोणाचे हित साधणार? एकवेळ प्रामाणिक प्रापंचिक परवडला .तो स्वतः बरोबर प्रामाणिक असतो.इतर कोणाची फसवणूक तर करत नाही.समर्थ कृपण असे विशेषण वापरतात. त्याचा अर्थ अत्यंत कंजुषी करणारा.असा माणूस अत्यंत स्वार्थी आत्मकेंद्री व संकुचित असतो.

परमार्थासाठी आवश्यक विशाल मन, वैराग्य, उदारता, परोपकारी वृत्ती यापासून हे कितीतरी विसंगत आहे. परमार्थ बोलण्याची हुशारी, लोकांना खिळवून ठेवणारी वक्तृत्व शैली त्यांच्याकडे असते.काही चमत्कार सदृष युक्त्या पण असतात .त्यांच्या जोरावर हा फसवणूक करायचा धंदा सुरू असतो. समर्थ या प्रवृत्ती वर कडक टीका करतात आणि अशा भोंदू लोकांपासून आपण सावध रहावे असे सांगत आहेत.असे गुरु अडक्याला चार मिळाले तरी त्यांच्यापासून लांब रहावे.यांची संगती प्रपंच व परमार्थ दोन्हींची हानी करणारी ठरते.

**ऐसे कैसे जाले भोंदू । कर्म करोनि म्हणति साधु ॥१॥**
**अंगी लावूनियां राख । डोळे झांकुनी करिती पाप ॥२॥**
**दावुनि वैराग्याची कळा । भोगी विषयांचा सोहळा ॥३॥**
**तुका म्हणे सांगों किती । जळो तयांची संगती ॥४॥**

तुकाराम महाराज तर जळो त्यांची संगती म्हणतात.यांचे वैराग्य हा देखावा असतो.अंतरंग विषयांनी लडबडलेले असते असे या दोन्ही संतांचे स्पष्ट मत आहे.

---

**१३ डिसेंबर २०२३**

**ईश्वरें मोठें सूत्र केलें ।मनुष्य मात्र गुंतोन राहिलें ।**
**लोभाचें गुंडाळें केलें ।उगवेना ऐसें ।। १७ २ ३०।।**

परब्रह्म व पुढे मायेपासून ही सृष्टी कशी तयार झाली हे सांगतांना दासबोधात वर्णन आले आहे कि पृथ्वी, आप, तेज, वायु व आकाश ही पंचमहाभूतें आणि सत्व, रज व तम हे तीन गुण मिळून ही अष्टधा प्रकृती बनली आहे. एका ओळीत सांगितला असला तरी विषय फार मोठा आहे.

भगवंतानी ही सृष्टी बनवतांना एक गुंतागुंत करून ठेवली आहे हे या ओवीत सांगितले आहे. या सृष्टीची निर्मिती करतांना भगवंतानी नर-नारी भेद करून जीव सृष्टीच्या विस्ताराची व्यवस्था करून ठेवली आहे. सगळ्या प्राण्यांना वासनेत गुंतवून ठेवले आहे.

**नाना पुरुषांचे जीव । नाना स्त्रियांचे जीव ।येकचि परी देहस्वभाव । वेगळाले ।।**
**नवरीचें मन नवऱ्यावरी । नवऱ्याचे मन नवरीवरी ।ऐसी वासनेची परी । मूळींहून पाहावी ।।**

नर आणि मादीला परस्पर आकर्षणात गुंतवून भगवंताने जीवसृष्टीच्या विस्ताराची व्यवस्था करून ठेवली. जसे सृष्टी निर्मितीचे गुढ आहे तसेच हे नर-मादी भेदाचे गूढ आहे. भगवंताची ही करणी सहजा सहजी कळत नाही. पण ही व्यवस्था परमेश्वराने नसती केली तर प्रजोत्पादन झालेच नसते. त्या ईश्वराने नर-नारीला परस्पराच्या आकर्षणात गुंतवून ठेवले आहे आणि त्यामुळे त्याचे सृष्टी विस्ताराचे काम अव्याहतपणे चालू आहे. ईश्वराने या युक्तीने स्त्री-पुरुषांना परस्परात गुंतवून ठेवले आहे, प्रपंचात अडकवून ठेवले आहे. त्याने असे कां केले हे गूढच आहे. लोभाच्या गुंताड्यात त्याने स्त्री-पुरुषांना कां गुंतविले हे एक कोडेच आहे.

इतकी प्रखर गोडी परमेश्वराने स्त्री-पुरुषांमध्ये निर्माण करून ठेवली आहे तरी कित्येक स्त्री-पुरुष संन्यास स्वीकारतात. जर ही गोडी नसती किंवा किंचित जरी कमी असती तर संन्याशांची संख्या प्रचंड वाढली असती. पुनरोत्पादनाची प्रक्रिया थांबली असती. ओशोची **commune** ची संकल्पना प्रत्यक्षात उतरली असती तर सर्वत्र स्त्री-पुरुष साधुंच्या वस्त्याच दिसल्या असत्या. गृहस्थ क्वचितच आढळले असते.

स्थूलाचे मूळ वासना आहे. वासना आहे तोवर निर्मितीचे कार्य अव्याहतपणे सुरु रहाणार आहे. ही वासना दिसत नाही ती गूढपणे रहाते. मूळात वासना अभेद असली तरी ती या सृष्टीत स्त्री-पुरुष भेदाने आढळते. तिच्यामध्ये बांधून ठेवण्याची विलक्षण शक्ति आहे. आणि या बंधनात भले-भले अडकतात. ती वासना आहे म्हणून कुटुंब संस्था आहे. वासना नसती तर कोणी कोणाकडे कशाला पाहिले असते? म्हणून तर ईश्वराला हे सूत्र बनवावे लागले आहे. स्त्री-पुरुष भेदाचे मूळ शिवशक्तीमध्ये आहे.

**१५ डिसेंबर २०२४**

**माझें घर माझा संसार | देव कैंचा आणिला थोर |**
**ऐसा करी जो निर्धार | तो रजोगुण |**

सरळ अर्थ - हें घर माझें, हा संसार माझा आहे. त्यांत देव श्रेष्ठ म्हणून कुठला आणला |

रजोगुणी माणूस प्रपंचामध्यें माझेंपणाने ,ममत्वाने कसा गुंतलेला असतो याचें वर्णन ओवीमधे केलेले आहे. हे घर माझे आहे,मी स्वत: कष्ट करुन वैभव मिळवले आहे,मी माझ्या घरच्यांच्या सगळ्या गरजा भागवतो,मी माझ्या नातेवाईकांना, ओळखीतील लोकांना नोकरी ला लावतो इ....... असा मी पणा व्यक्तीमधे असतो , आणि यामधे तो परमेश्वराला विसरतो....या व्यक्तींनाच श्री समर्थ रजोगुणी माणूस म्हणतात. मीच काय तो सर्वेसर्वा .....मी म्हणेल ती पूर्वदिशा.तो स्वत:,घरं, बायको, मुलं एवढचं त्याच विश्व. उदा- आई तिच्या मुलाला शाळेत जाताना डबा, पाण्याची बाटली देते,आणि त्या मुलाला सांगते तू एकटाच डबा खा,एकटाच पाणी पी... दुसऱ्याला देऊ नकोस. असे जर जिजाऊ मातेने मुलाला शिकवले असते,तर शिवराय घडलेच नसते.

अशी संकुचित वृत्ती मनामधे न ठेवता 'हे विश्वचि माझे घर' या उक्तीप्रमाणे मनाची व्यापकता वाढवली पाहिजे. आपल्या शूर नेत्यांनी,वीरपुरुषांनी फक्त स्वत:पुरता विचार न करता देशाच्या प्रगतीसाठी,समाजासाठी लढले. आणि समाजापुढे आदर्श निर्माण केले. नवीन पिढीने सुध्दा ही विचारसरणी आत्मसात करायला हवी.यासाठी मी पणा सोडून ,अहम वृत्तीचा त्याग करुन समाजापुढे आदर्श निर्माण केले पाहिजेत,आणि हे सर्व करण्यासाठी आपल्याला परमेश्वरावर विश्वास ठेवला पाहिजे, परमेश्वरावर श्रद्धा ठेवली पाहिजे,जे काही करणारा आहे तो परमेश्वर आहे, आपण मात्र निमित्त आहोत ही भावना मनात निर्माण झाली पाहिजे असे श्री समर्थ आपल्याला सांगतात.

आम्ही देवाच्या घरात राहतो आणि त्याने दिलेले संसार रुपी कर्तव्य पार पाडतो आहोत ही भावना जेव्हा मनात जागृत होईल त्यावेळी मनुष्याची रजोगुणाकडून सत्वगुणाकडे,बद्धाकडून मुमूक्षू कडे वाटचाल सुरु होईल. हे जो पर्यंत होत नाही तोपर्यंत तो मी,माझे आणि भ्रांतीचे ओझे यातच अडकून पडतो.

---

**१७ डिसेंबर २०२३**

**दशक २ मूर्खलक्षणांचा समास ५ रजोगुणलक्षण**
**कैंचा धर्म कैंचे दान ।कैचा जप कैंचे ध्यान ।**
**विचारेना पापपुण्य |तो रजोगुण ॥ ०२.०५.११||**

**अर्थ:** परमार्थामध्ये दानधर्म, जप- ध्यान यांना महत्त्व असते. पण रजोगुणी माणसाला या सर्व गोष्टींचा तिरस्कार वाटतो. वरील गोष्टी तो मुळीच मानत नाही. पाप पुण्याचा विचार तो कधी करीत नाही.

**प्रस्तावना :** आपण सर्वसामान्य प्रापंचिक माणसे ज्यांच्या अंतःकरणात आत्मज्ञानाचा प्रकाश अजूनही पडलेला नाही. पण जसं "कल्याणकारी रामराया" मध्ये म्हणतात की "हे जन हाती धरी" अशा लोकांना रामाला सन्मुख करण्याचे काम ज्या समर्थांनी केलं त्यांचा हा एक 'मातृवात्सल्य' भावातून लिहिलेला हा समास आहे.

जगात जे शाश्वत आहे कल्याणकारी आहे सुखकारक आहे ते मिळवण्याचा प्रयत्न माणसाने करावा म्हणून समर्थांची तळमळ आणि आग्रह आहे. त्यासाठी आपल्या कुवतीनुसार, अधिकारानुसार कर्म उपासना इ. विधिवत करून जीवनाचे सार्थक करावे, या नरदेहाच्या योगाने परब्रम्हाचा शोध करणे हेच आणि केवळ हेच ध्येय असावे असे श्री समर्थ सांगतात.

**भावार्थ :** भक्ती मार्गातील मनुष्यास (साधक) स्नानसंध्या, पूजाअर्चा, देवधर्म, जप ध्यान, दानधर्म यांत समाधान वाटते तर देहाभिमानी मनुष्यास किंवा जो दुर्जन आहे, रजोगुणी आहे, ज्याला आपली शेती-भाती, उद्योगधंदा, नोकरी यातच समाधान वाटते. तो दैनंदिन व्यवहारात कसा वागतो हे वरील ओवीमध्ये नमूद झालेले आहे. रजोगुणी माणसाचे खाणे-पिणे, येणे -जाणे, चालणे-बोलणे याची ओढ संपत नाही. ते सारे सोडून थोडा तरी जप कर म्हटले तर ऐकत नाही.समर्थ सांगतात, येता -जाता खाता -पिता चालता -बोलता नाम सोडू नये!

कर्मांमधील आसक्तीने गुंतण्याची गती केवळ याच उपायाने खुंटणार आहे. आपली सगळी "भक्ती " दुःखाचच बोट पकडून त्या परिघातच फिरत असते. त्यामुळे खरा जप, खरं ध्यान, खरा धर्म, खरं व्रत, खरी उपासना आपण जाणत नाही. अंत:करणातला "मी" पणा ज्यायोगे उपसला जातो, ती खरी उपासना. ज्याने वृत्तीची सुधारणा होते, घडण होते ते खरं व्रत. ज्यायोगे अहंचा त्याग घडतो तो खरा त्याग, ते खरं दान. ज्यांने आपण पूज्य म्हणजे शून्यवत होतो आणि परमात्म्याची पूज्यता वाढते ती खरी पूजा. ज्यायोगे अंतरंगात शाश्वताचा निश्चय धारण केला जातो तो खरा धर्म. ज्यायोगे "मी" चा ध्यास संपून "तू"चा ध्यास सहजतेने स्थिर होतो ते खरे ध्यान, तो खरा जप. पण हे सारे वाचून, बोलून, ऐकून रजोगुणी माणसाला समजू शकत नाही. एकनाथ महाराज म्हणतात,

**नामाविण मुख सर्पाचे ते बीळ|**
**जिवा नव्हे काळसर्प आहे|**

परमेश्वरप्राप्तीचे अनेक मार्ग आहेत. प्रकृती उत्तम राखायची असेल तर व्यायाम करणे अनिवार्य ठरते. त्याप्रमाणे मोक्षप्राप्तीसाठी काही उपासना करणे महत्त्वाचे असते. हे सर्व सोपस्कार करायचे म्हणजे त्यात सातत्य हवे. स्वाभाविकच शरीरावर, मनावर बंधने आली. या सर्व गोष्टी सामान्य मनुष्यास "संकटे" वाटतात. म्हणून तो तिकडे वळतच नाही. कारण मनुष्याला सर्व सहज विनासायस हवे असते.

कोणताही धार्मिक विधी जसे व्रते, दाने, उद्यापने यासाठी सर्वात आधी आवड हवी, मग सवड हवी. आर्थिक बाजू भक्कम हवी आणि हे सर्व करताना मन देवाच्या स्मरणात असावे. आजची एकूण परिस्थिती बघता असे करण्यात मनुष्याचा वेळ आणि पैसा खर्च होतो असे म्हणावे लागते.

**१९ डिसेंबर. २०२३**

**कां मागें जें जें भोगिलें ।तें तें मनीं आठवलें ।**
**दुःख अत्यंत वाटलें ।तो रजोगुण ||२१||**

ज्या सुखाचा अनुभव घेऊन झाला आहे,त्यांच्या स्मृती रंजनात अडकून रहाणे व ते सुख आता सरले असे आठवले की त्या कल्पनेतील वियोगाने अतिशय दु:खी होणे हे रजोगुणाचे लक्षण आहे.

माणसाला सुख लाभते असे वाटते ते स्थावर जंगम मालमत्ता धारण करणे,स्वजन सहवास, उत्तम अन्न पदार्थ,वस्त्र प्रावरणे,धन संचय ,लोकांनी कौतुक करणे,मान देणे,जे दुसऱ्या चे आहे ते मिळवणे, इ. गोष्टींमध्ये.याच गोष्टी चिंता करायला लावतात. म्हणजे आसक्ती, इच्छा, अधिक मिळावे ही तृष्णा आपल्याला प्रथम सुख आणि नंतर दु:ख यांना कारण ठरते.जे आज आहे ते सतत राहू शकत नाही.क्षय होणं हा वस्तू चा स्वभाव आहे.

काल मान परिस्थिती बदलत असते. त्या योगे गोष्टी मिळतात हरवतात.माणसं भेटतात जोडली जातात आणि वियोग होतो.पण यांच्या योगाने सुख होतं दु:खही होतं.अपेक्षेनुसार वागले तर सुख नाही तर दु:ख.सहवासाचं सुख वियोगाने दु:ख होत रहाते. आपल्या आनंदाचे कारण बाहेर अन्य कशावर तरी अवलंबून रहाते.त्याच गोष्टी चिंतनासाठी मनात येत रहातात व आपली आंतरिक स्थिती आंदोळत रहाते.

भौतिक गोष्टी,इंद्रिय सुख यांचा प्रत्यक्ष अनुभव संपर्क फार कमी काळ असतो.रेंगाळत रहातात त्या स्मृती.त्या सुखकर अथवा दु:खकर असतात.त्यात अडकून रहाणे ही रजोगुणी मनुष्याची प्रधान समस्या आहे. मुळात या सर्व गोष्टी आपल्या बरोबर जोडल्या जातात त्या आपल्या देह,उपाधी ,व तद्जन्य अहंकार व आसक्ती मुळे.दु:ख होतं ते आता ते सुख 'मला' म्हणजे देहाला आता उपलब्ध नाही याचे आणि इतर कोणी तरी आत्ता ते उपभोगत आहे याचे दु:ख अधिक असते.

यावर विवेक गरजेचा आहे.मुळात मी म्हणजे हा देह ही ओळखच सुधारून घ्यायला हवी.त्यानंतर नित्यानित्य विवेकाने भौतिकाचे विनाशी असणे समजून घेणे तसेच काल मान परिस्थिती हे बदलणारेच आहेत हे ध्यानात घ्यायला हवे.मग मन या गोष्टीचा सारसार विचार करून विषयात गुंतून रहाणार नाही. लक्ष कोठे असावे हे नीट कळले की कुठल्या गोष्टीला किती किंमत द्यायची,खरेच मौल्यवान असे काय आहे की ज्याचे चिंतन करावे,त्याचा ध्यास घ्यावा आणि चिरंतन सुख प्राप्त कसे करावे हे ध्यानात येईल.नाही ध्यानात आलं तर अधिकारी अनुभवी सद्गुरू यांची मदत घ्यावी एवढे तरी जाणवेल.

हे आपण ध्यानात घ्यावे म्हणून समर्थ हा बोध करीत आहेत.ओव्या वाचताना या आपल्याला सर्वाधिक लागू आहेत असे जाणवते.गुरु शिष्य संवादातून हे असे जे विचार प्रगट होतात ते सुस्पष्ट आहेत.इतरांशी जाउद्या स्वतः बरोबर तरी प्रामाणिक राहून आपले दुर्गुण समजून उमजून स्वीकारले तर त्यात सुधारणा होण्याची शक्यता निर्माण होते.

एकदा श्रीसमर्थ रामदास स्वामी पुरंदर किल्ल्यावरून चाफळला जाताना जेजुरी वरून चालले होते. तेवढ्यात एक धनगर, घोड्यावरुन समर्थांसमोर आला. त्याने समर्थांचे दर्शन घेतले व म्हणाले, "महाराज खंडोबाच दर्शन घेवून जाना." तेव्हा समर्थ हसून म्हणाले, "अरे बाबा, मी रामाचा सेवक आहे. मी रामा

व्यतिरिक्त इतरांना राम स्वरूपातच पाहतो. तुझ्या खंडोबाला इथूनच नमस्कार करतो. आता गड चढायला मला जमणार नाही."

त्यावर तो धनगर म्हणाला, "अहो महाराज, तुमच्या रामाने प्रत्येक वेळी शिवलिंग स्थापून शिवाची मनोभावे पूजा केली त्या रामाच्या दैवताला तुम्ही दर्शन घेणार नाही म्हणता, हे जरा अचंबित करणारे आहे". हे त्या धनगराच्या मुखातील शब्द ऐकून समर्थ चमकले. मनात विचार केला, ही माझ्या रामाची आज्ञा दिसत आहे. हे पाहून नाईलाजाने धनगराच्या घोड्यावर बसून वर जेजुरी गडावर आले.

त्यावर धनगर म्हणाला, "महाराज, तुम्ही दर्शन घ्या. मी घोड बांधून येतो." समर्थ मंदिरात गेले तिथे खंडोबाचे लिंग पाहून महाराजांचे मन प्रसन्न झाले. त्यांच्या डोळ्यातून घळघळा अश्रू वाहू लागले. अंगाला कंप सुटला. वाणी सद्गदित झाली आणि त्यांच्या मुखातून शब्द निघाले,

**पंचानन हयवाहन सुरभूषितनीळा ।खंडामंडित दंडित दानव अवलीळा ॥**
**मणिमल्ल मर्दुनियां जों धूसुर पिवळा ।हिरे कंकण बासिंगे सुमनांच्या माळा ॥**
**जय देव जय देव जय शिव मल्हारी ।वारीं दुर्जनअसुरा भवदुस्तर तारी ॥**
**सुरवरसंवर वर दे मजलामी देवा ।नाना नामे गाइन ही तुमची सेवा ॥**
**अघटित गुण गावया वाटतसे हेवा ।फणिवर शिणला किती नर पामर केवा ॥**
**रघुवीरस्मरणी शंकर हृदयीं निवाला ।तो हा मल्लांतक अवतार झाला ॥**
**यालागीं आवडे भाव वर्णीला ।रामी रामदासा जिवलग भेटला ॥**

म्हणजे, श्री रामाचा भक्त असून रामाचे नाव घेत असताना माझ्या हृदयात प्रत्यक्ष शंकर अवतरले. ही अनुभूती समर्थांना आली. दर्शन घेऊन बाहेर येतात तर, तो घोडा ही नाही आणि तो धनगर ही नाही. समर्थांनी ओळखले की प्रत्यक्ष श्री खंडोबा समर्थांना गडावर घेऊन आले होते. मी देवाला कष्ट दिले याचे समर्थांना फार वाईट वाटले. हीच खंडोबाची आरती सर्व महाराष्ट्रभर प्रचलित आहे.

---

## २० डिसेंबर २०२३

**जें जें दृष्टीस पडिलें ।तें तें मनें मागितलें ।**
**लभ्य नस्तां दुःख जालें ।तो रजोगुण।। दा २- ५ - २३।।**

हावरट स्वभावाच्या मनुष्याचे वर्णन इथे समर्थांनी केले आहे. रजोगुणी माणूस १००% संसारात बुडालेला असतो हे अनुभवावरून आपणास ठाऊक आहे. शेजाऱ्याकडे नवा टीव्ही आला की आम्ही देखील त्याचे वरचढ मॉडेल आणू. त्याने कार घेतली तर आम्हीही कार घेण्याचा आटोकाट प्रयत्न करू. पण आर्थिक परिस्थितीमुळे कार घेता येत नाही तर आम्हाला पराकोटीचे दुःख होते. जेलसी हा रजोगुणी माणसाचा स्थाई भाव असतो. त्याला दुसऱ्याचे वैभव देखील पहावत नाही.

**वैभव देखोन दृष्टी । आवडी उपजली पोटीं ।आशागुणें हिंपुटी । करी तो रजोगुण।।२२।।**
**जें जें दृष्टीस पडिलें । तें तें मनें मागितलें ।लभ्य नस्तां दुःख जालें। तो रजोगुण ।। २३।।**

दुसऱ्याचे चांगले झाले, आम्हाला ते न मिळाले की आम्हाला लगेच दुःख होते. म्हणून समर्थ सांगतात की रजोगुणातून बाहेर पडा, निदान सत्वगुण तरी अंगिकारा. भगवान श्रीकृष्ण तर म्हणतात की त्रिगुणाच्या पलिकडे जा, "निस्त्रैगुण्यो भवार्जुन" समर्थ रजोगुणातून बाहेर पडायचा उपाय मनाच्या श्लोकात सांगत आहेत.

**नको वासना वीषईं वृत्तिरूपें ।पदार्थीं जडे कामना पूर्वपापे ।**
**सदा राम निष्काम चिंतीत जावा ।मना कल्पना लेष तो ही नसावा ।। म. श्लो. ५८।।**

अर्थात् हे मना ! दृश्य वस्तूमध्यें वृत्तीरूपाने वासना गुंतवून ठेवू नकोस. याच कारणाने पूर्वपापांमुळे दृश्यात कामना चिकटते. म्हणून रामाचे निष्काम भावाने 'चिंतन' कर. शिवाय मनामध्ये कल्पनेचा मागमूसही नसावा. मनामध्ये वृत्ती रूपाने वासना असणे हे पाप आहे आणि रजोगुणी माणूस हे पाप बिनदिक्कत करत असतो.

आपल्याला जर अध्यात्म मार्गात प्रगती करायची असेल तर रजोगुणी वृत्तीपासून लगेच दूर जावे लागेल. मला एक भगवंत हवा, अन्य काही नको ही वृत्ती बाणायचा सतत प्रयत्न केला पाहिजे. महाभारत युद्धाचे वेळी अर्जुनाने सैन्य न मागता फक्त भगवंत मागितला होता, कारण त्याला माहित होते कि -

**"यत्र योगेश्वरः कृष्णो यह पार्थो धनुर्धरः ।**
**तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम ।।**

काय मागावे हे कळले पाहिजे, भगवंताकडे काही मागण्यापेक्षा भगवंतच मागुन घ्यावा. मला कशाची गरज आहे हे माझ्यापेक्षा भगवंताला चांगले कळते मग कशाला हे हवे अन ते हवे करायचे? शेजाऱ्याला जे मिळाले ते त्याच्या प्रारब्धानुसार मिळाले, भगवंत मला काही कमी पडू देणार नाही हा विश्वास हवा.

द्रौपदीला पुरविलेच ना त्याने वस्त्र. काही मागू नका, तो उपेक्षा कधीच करीत नाही. मी इथे सतत दुर्गुणांबद्दल लिहितो, आपण ते लक्षपूर्वक वाचत आहात, या वाचनातून माझे व आपले काही दुर्गुण नष्ट झाले तर माझ्या या लिखाणाने माझ्या जीवनाचे कल्याण होणार आहे.

आपण उत्साहाने, लक्षपूर्वक मला समजून घेत आहात हे बघून आनंद होतो आहे. आपल्या अंतःस्थ परमेश्वराला मी प्रणाम करतो, त्या प्रणामाचा कृपया स्वीकार करा.

---

## <u>२१ डिसेंबर २०२३</u>

**टवाळी ढवाळी निंदा ।सांगणे घडे वेवादा ।**
**हास्य विनोद करी सर्वदा ।तो रजोगुण ।। दा २- ५ - २५।।**

रजोगुणी माणूस जीवनाबद्दल कधीच सिरियस नसतो. आपण आनंदात आहोत म्हणजे सारे जगच आनंदी आहे अशी याची धारणा असते. बोलतांना काय बोलावे, काय बोलू नये याच तारतम्य त्याला नसते.

आता इथेच बघाना समोरच्याचा मूड कसा आहे, तो कोणच्या विचारात आहे हे न बघताच त्याची टवाळी, थट्टा करायला हा सुरुवात करतो. हे योग्य नाही असे समर्थ सांगतात.

तुकाराम महाराज तर पराकोटीचे सज्जन आहेत. ते तर म्हणतात की, "निंदकाचे घर असावे शेजारी. कबीर ही म्हणतात की "निंदक नियरे राखिये।", पण समर्थ तर त्या निंदकाला काठीने हाणतील.

सदा सर्वदा हास्य विनोद करणे चांगले नाही. हा रजोगुण आहे असे समर्थ म्हणत असले तरी हा टोकाचा दुर्गुण आहे हे आपण लक्षात घ्यावे. रजोगुणी माणसाची कार्य करण्याची क्षमता वाखाणण्या जोगी असली तरी टवाळी, निंदा वगैरे दुर्गुण लगेच टाकुन द्यायचे आहेत. विनोद, श्रुंगार, निंदा हे दुर्गुणच आहेत. यांना त्यागायचा प्रयत्न आहे पण थोडे बहुत शिल्लक आहेतच. या चिंतनाचे निमित्ताने ते आता जातील. आळस, करमणूक तर गेले आहेत. हे ही जातील.

निंदा द्वेष तुम्ही तेव्हाच करू शकाल जेव्हा तो आपल्या पासून वेगळा असेल, म्हणजे अद्वैताची अवस्था अजून आलेली नाही, आपण फार दूर आहोत. तो मनुष्य वाईट असला तरी तुम्ही चांगले नाही आहात, हे या निमित्ताने दिसून पडते असे कबीर सांगत आहेत.

कबीर निंदक नियरे राखिये म्हणत असले तरी निंदकाची ते हजेरीच घेतात. ते म्हणतात 'निंदक तो है नाक बिन' म्हणजे निंदकाला मान सन्मान नसतोच. संकीर्ण दृष्टी असेल तर साधुची देखील निंदा घडते. असे निंदक तुम्हाला पाणी व साबणाशिवाय स्वच्छ करतात असे कबीर सांगत आहेत.

या ओवीच्या निमित्ताने आपण निंदकाची निंदा तर करीत नाही ना? नाही हे गुण आमच्यात आहेत, ते काढून टाकायच्या निमित्ताने निंदकाची चर्चा अपरिहार्य आहे. हे चिंतन आहे आपल्याच दोषांचं जमेल तर ते काढून टाका अन्यथा कबीर म्हणतात की निंदकाचे नाकच नसते.

टवाळा आवडे विनोद …….

**टवाळा आवडे विनोद । उन्मत्तास नाना छंद।**
**तामसास अप्रमाद । गोड वाटे ।।७ -९ -५१।।**

समर्थांची ही ओवी आहे. टवाळखोराची समर्थ कशी हजेरी घेत आहेत हे इथे दिसून पडते. आज सकाळी अचानक हे आठवले आणि पूर्व तयारी नसता आजचे हे चिंतन लिहून काढले. आपण इतक्या मोठ्या संख्येने या चिंतनाला दाद दिलीत हे पाहुन भारावून गेलो. इतक्या लोकांनी हे वाचलं, त्यावर मनन केलं ही खरच कौतुकाची गोष्ट आहे. आपल्या या अभ्यासू वृत्तीला मनापासून प्रणाम.

---

## २२ डिसेंबर २०२३

**देव करणी लाजाळु|उदरा लागी कष्टाळु|**
**प्रपंची जो स्नेहाळु| तो रजोगुण ||२-५-३०**

प्रापंचिक माणसांमध्ये सत्व तमोगुणा पेक्षा रजोगुण अधिक असतात पण या ओवी तर रजोगुणाचे प्राबल्य जास्त आढळते .या ओवीत ज्याला देवकार्य करायला लाज वाटते पण पोटासाठी पुष्कळ कष्ट करतो आणि ज्याचे मन प्रपंचामध्येच गुरफटून जाते प्रपंचा विषयीच प्रेम वाटते घर कुटुंब नातेवाईक व्यवसाय यातच हा मनुष्य गुरफटून जातो .खावे प्यावे मजा करावी अशा प्रकारची वृत्ती या मनुष्याच्या ठिकाणी दिसून येते

ज्याला परमार्थ करायला क्लेश वाटतात, लाज वाटते त्याला समर्थ परमार्थ तो राजधारी| परमार्थ नाही तो भिकारी|| ज्याला परमार्थ करावा वाटत नाही समजत नाही त्याला समर्थ भिकारी म्हणतात .रामकृष्ण परमहंस म्हणतात त्याप्रमाणे प्रपंचातील एखादी वस्तू मिळाली नाही तर घागर भर रडाल पण या देवासाठी , कालीमातेसाठी मात्र डोळ्यातून दोन अश्रू सुद्धा येणार नाहीत.

तुकाराम महाराजांनी घरदार पैसा अडका यात गुंतलेल्या सासूबाईच्या मनाचं वर्णन एका अभंगात केले आहे .आवा चालली पंढरपुरा यामध्ये भीतीपोटी आवा परमार्थ करायला पंढरपूरला निघाली आहे .पण तिचा रजोगुण पुन्हा पुन्हा घर संसार इकडे आणतो. वेशीवर जाते आणि परत येते .असा हा रोजोगुण मनुष्याला देवकार्य न करता पोटासाठी अगदी धड पडेपर्यंत धडपडायला लावतो. समर्थ म्हणतात

**प्रपंच भुलला प्राणी व्यर्थ आयुष्य वेचले ।**
**देव ना धर्म काही ऐसा हा सहावा रिपु ।**

षड्रिपु निरूपण मध्ये समर्थ म्हणतात हे देहाचा उपयोग भगवंताच्या भक्तीसाठी कार्यासाठी न करता कुटुंबासाठी स्वतःच्या स्वार्थासाठी करतो आणि यातच आयुष्य संपून जाते

**साहेबास लोटांगणी जावे |नीच्या सारीखे व्हावे|**
**आणि देवास न मानावे |हे कोण ज्ञान ||**

प्रपंचासाठी अगदी साहेबाच्या पुढे पुढे करतो तिथे अगदी नीचपणा पत्करतो .पण देवाला मानत नाही .असा हा रजोगुणी देवाच कार्य करायला मात्र लाजतो आणि प्रपंचासाठी अहोरात्र कष्ट करतो .हा या ओवीमध्ये समर्थ आपल्याला अर्थ सांगताहेत.म.श्लोक क्र.६५ मधे

**नको दैन्यवाणें जिणे भक्तिऊणें|**
**अती मुर्ख त्या सर्वदा दु:ख दूणें|**

भक्ती शिवाय जगणे हे मनुष्याच्या जन्मात दीन होवून जगणे आहे.पण मुर्खाला ते कळतं नाही.

**मना जे घडी |राघवेवीण गेली|**
**जनीं आपुली ते | तुवां हानी केली.**

रजोगुणी व्यक्तीला जो पर्यंत देवकार्य करायला लाज वाटते तोपर्यंत त्यांचे जीवन व्यर्थ आहे. असे सद्गुरू समर्थ आपल्याला इथे सांगताहेत.

---

## २३ डिसेंबर २०२३

**शेरीरीं क्रोध भरतां । नोळखे माता पिता ।**
**बंधु बहिण कांता । ताडी तो तमोगुण ।।२-६-३**

संसारात दु:ख हे असणारच.त्याचा परिणाम म्हणजे क्रोध.त्याला समर्थ 'अद्भुत आला' क्रोध म्हणतात.म्हणजे अचानक येणारा राग.त्याची तीव्रता आणि अचानक येणे यामुळे तो अनावर असतो.एखादं

वादळ येतं तसा.क्रोध या शब्दाचा अर्थ संतापाचा भडका असा आहे.गवताची गंजी अचानक पेटते भडकते तसा.ठिणगी पडायचा अवकाश.दु:ख अनावर झाले की माणूस स्वतः वर तरी रागावतो किंवा जगावर तरी.

समर्थ शरीरी क्रोध भरता असे म्हणतात.क्रोध संपूर्ण शरीराचा ताबा घेतो.मन बुद्धी यांचा ताबा घेतोच पण शरीर सुद्धा हिंसक उक्ती कृती करायला सज्ज होते.मुठी आवळल्या जातात.पाय आपटले जातात.वस्तू फेकल्या तोडल्या जातात.कोणी भिंतीवर धडका घेतात,डोके आपटतात.किंवा दुसऱ्या कोणावर राग काढतात.

समर्थ या दुसऱ्या प्रकारच्या रागाबाबत बोलत आहेत .मन बुद्धी वरील नियंत्रण गमावले की काय बोलत आहोत कोणाला बोलत आहोत,त्याचे तात्कालिक व दीर्घ काळ काय परिणाम होऊ शकतात? याचा विचार होणं थांबते.

आपण ज्यांना बोलत आहोत त्यांचे नाते काय,वय काय , अधिकार काय कशाचाही विवेक रहात नाही.मग अद्वातद्वा बोलले जाते.' नोळखी' म्हणजे ओळख विसरली जाते.आब रहात नाही.तारतम्य सुटते.ज्यांना जन्मल्या पासून ओळखतो किंवा विवाहापासून ओळखतो त्यांच्यावर अनोळखी असल्यासारखे तोंडसुख का बरे घेतले जाते?

एकतर मनात बरेच काही साठत गेले असते.वेळच्यावेळी निचरा झालेला नसतो.संस्कार विवेक यांमुळे काही संयम बाळगलेला असतो.ते योग्य आहे कारण मनात येईल ते सारे माणूस बोलत राहिला तर घरोघरी महायुद्ध पेटतील.काही गोष्टी समजून उमजून सोडवायच्या असतात काही विशिष्ट चौकटीत संवादातून सोडवायच्या असतात तर काही चक्क सोडून द्यायच्या असतात.हे तारतम्य हवे. समयसूचकत्व हवे. काळ वेळ प्रसंग भान हवे. त्यासाठी मनावर बुद्धीचं नियंत्रण हवं. मग हे भान रहाते. पण जर क्रोधाने मन बुद्धी चा ताबा घेतला तर काय घडते? नियंत्रण सुटलेल्या गाडीचे कुठेतरी जाऊन धडकणे क्रमप्राप्त असते तसे हे क्रोधाने ताबा घेतलेले मन स्वजनांना धडकते. अपघात होतो. इजा होते . जखमा होतात. फक्त या मानसिक अधिक असतात.

समर्थ याही पुढे जाऊन स्वजनांना मारहाण घडते असे सांगतात. स्व नियंत्रण एवढे सुटते ते नशेमुळे किंवा अति क्रोधाने. क्रोधाने नशा सदृष स्थिती येते का? स्वनियंत्रण हरवणे हे तर समान आहे. सद्भाव लोपून आसुरी संताप व हिंसक वृत्ती तयार होणे हेही समान आहे.बेभान होणे आहे. बुद्धीचे विवेक हरवणे आहे. मनुष्यत्व जाऊन पशुवत वागणे बोलणे आहे. क्रोधाचा संबंध सहनशीलतेशी आहे. जेवढा दृष्टीकोन संकुचित तेवढी सहनशीलता कमी रहाते. ज्ञानदेव तुकाराम यांची दृष्टी विशाल होती. म्हणून समाजाने कितीही त्रासदायक वागणूक दिली तरी अंतरंग शांती अभंग राहिली. मुखातून विश्वाचे कल्याण मागणारे पसायदान प्रगटले. हे सगळे तमोगुणामुळे घडते असे समर्थ सांगत आहेत.ही प्रवृत्ती असते. प्रसंग घटना केवळ ठिणगी टाकायचे काम करते. समर्थ आपल्याला मुळापर्यंत जाऊन विचार करायला सांगत शिकवत आहेत.

## २४ डिसेंबर २०२३

**दुसऱ्याचा प्राण घ्यावा। आपला आपण स्वयें द्यावा ।**
**विसरवी जीवभावा । तो तमोगुण ।।दा २-६-५ ।।**

तमोगुणाचे मूळ कारण अज्ञान आहे. गीतेच्या १४ व्या अध्यायात सत्व, रज, तमोगुणांची चर्चा भगवंतानी केलेली आहे. तमोगुणाची चर्चा करतांना भगवंत म्हणतात -

**रजस्तमस्त्वज्ञानजं विद्धि मोहनं सर्वदेहिनाम् ।**
**प्रमादआलस्यनिद्राभिस्तन्निबध्नाति भारत ।। गीता १४ - ८।।**
**सत्वं सुखे सञ्जयति रजः कर्मणि भारत ।**
**ज्ञानमावृत्य तु तमः प्रमादे सञ्जयत्युत ।। गीता १४ - ९।।**
**अप्रकाशोऽप्रवृत्तिश्च प्रमादो मोह एव च ।**
**तमस्येतानि जायन्ते विवृद्धे कुरुनन्दन।। गीता १४ - १३।।**

श्लोकांचे अर्थ पहाण्यासाठी आपण कृपया गीता बघा. आठव्या श्लोकात म्हटले आहे कि देहधाऱ्यांना मोहित करणारा हा तमोगुण अज्ञानापासून निर्माण होऊन प्रमाद, आलस्य, निद्रा या तीन गुणांद्वारा या देहीला देहात बांधतो. हा आत्मा, ज्याला इथे देही म्हटले आहे तो मुळात गुणातीत असूनही शरीराव्दारे त्याचा गुणाशी संबंध जोडल्यामुळे तो संबंधित गुणाद्वारा बांधला जातो. तमोगुण अज्ञानाची निर्मिती आहे, हा ज्ञानाला झाकून टाकतो, त्याला प्रमादात गुंतवितो व माणसावर ताबा मिळवितो, म्हणून बुद्धिमान माणसाने याचेवर सतत लक्ष ठेवले पाहिजे. तमोगुण वाढला असता अप्रकाश, अप्रवृत्ति, प्रमाद आणि मोह या वृत्ती उत्पन्न होतात.

हे गुण प्रकृतीचे कार्य आहेत म्हणजे आपल्या दैनंदिन जीवनावर प्रभाव पाडणार आहेत. हे गुण आपल्या ताब्यात असले की आपल्याला हवे तसे आपण यांना राबवू शकतो पण आपण यांच्या ताब्यात गेलो की हे आपल्यावर प्रभाव गाजवितील. तमोगुण तर आपल्या आयुष्याची वाट लावेल. कशी ते समर्थांनी या समासात विस्ताराने सांगितले आहे. घोड्याचे लगाम सारथ्याचे ताब्यात नसतील तर घोडे त्या रथाला खड्ड्यात नेतील तद्वतच हे त्रिगुण रूपी घोडे आपल्या शरीररूपी रथाची वाट लावतील, त्यातल्या त्यात तमोगुण तर माणसाचं माणूसपण हिरावून टाकेल.

ह्या ओवीचे चिंतन करण्यापूर्वी आपण तमोगुणाचे प्रधान लक्षण बघितले. आता ओवी बघुया. क्रोध हा माणसाचा शत्रु आहे आणि तमोगुण क्रोधातूनच उत्पन्न होत असतो. तसे बघितले तर सगळेच षड्रिपु तमोगुणाचे मित्र आहेत.

क्रोध अनावर झाला की मती भ्रष्ट होते आणि माणूस स्वतःचा जीव देखील देऊन टाकू शकतो. मुलाच्या रागावर स्वतःला जाळून घेणारी आई मी बघितली आहे. आता माझ्या जगण्याला काही अर्थ नाही असे वाटून अशी व्यक्ति आत्मघात करून बसते. ज्या व्यक्ति मुळे क्रोध आलेला आहे त्याच्या जीव देखील तो घेऊ शकतो. अशी व्यक्ति आपली जीवा भावाची असली तरी माणूस खूशाल त्याला मारून टाकेल. छोट्या छोट्या वादातून बाप-मुलगा एकमेकांच्या जीवावर उठल्याचे आपण बघत असतो. क्रोध जर माणसाच्या ताब्यात असेल तर असे आततायी कृत्य माणसाच्या हातून होणार नाही. जे कृत्य केल्याने आपलेच नुकसान होणार आहे असे कृत्य देखील करायला माणूस प्रवृत्त होतो कारण त्याच्या बुद्धीवर तमोगुणाचे आवरण आलेले असते.

मनाच्या सहाव्या श्लोकात **"नको रे मना क्रोध हा खेदकारी।"** असे समर्थांनी सांगितले आहे. क्रोध हा माणसाला पशू बनवितो, तो खेदकारी आहे. म्हणून माणसाने सतत सजग असले पाहिजे. क्रोध आल्यावर लगेच react न होता थोडा वेळ जाऊ द्यावा.

अमेरिकेत असतांना स्वामी रामतीर्थांना लोकांनी दगड मारले. त्यावर प्रतिक्रिया न देता परत आल्यावर त्यांनी सांगितले की आज लोकांनी 'राम' ला दगड मारले.

आपला अहंकार जर ताब्यात असेल तर क्रोध येणार नाही. अहंकार हा क्रोधाला कारणीभूत होतो. असा अहंकारी माणूस आपल्या क्रोधाला समोरच्या माणसाला जवाबदार धरतो आणि म्हणतो, "तुम्ही वागताच असे म्हणून मला क्रोध येतो. जाता जाता क्रोधाचे परिणाम काय होतात ते बघुन घेऊया.

**क्रोधाद्भवति सम्मोहः सम्मोहात्समृतिविभ्रमः ।**
**स्मृतिर्भ्रंशाद् बुद्धिनाशो बुद्धनाशात्प्रणश्यति ।। गीता २ - ६३।।**

अर्थ अगदी सोपा आहे. क्रोधाने संमोह (मूढभाव) वाढतो, त्यातून स्मृति नष्ट होणे परिणामी बुद्धीचा नाश आणि अखेर पतन ठरलेलेच आहे. हा श्लोक नीट समजून घ्यायचा असेल तर ६२ ते ६५ हे चारही श्लोक अभ्यासावे. होमवर्क समजून हे करावे.

---

**२५ डिसेंबर २०२३**

**प्रीतिपात्र गेलें मरणें ।तयालागी जीव देणें ।**
**स्वयें आत्महत्या करणें ।तो रजोगुण।। दा २ - ६ - १०।।**

शबल रजोगुणी असो वा तमोगुणी असो यांची वृत्ती आततायी असते. अविद्या किंवा अज्ञानाचा पूर्ण प्रभाव या व्यक्तीवर असल्याचे आपण बघु शकतो. पशूंमध्ये तमोगुण प्रबल असतो व तमोगुणी मनुष्यामध्ये काही प्रमाणात पशूची वृत्ती वास करीत असते. एकांतीकपणा, आततायीपणा, अघोरीपणा हा यांचा स्थायीभाव असल्याचे दिसते. अमर्यादित स्वार्थ, अवास्तव आसक्ती, आततायी अनुष्ठाण करणे यांचा स्वभाव होऊन जातो.

तमोगुणी मनुष्य परमात्म्याला कधीही प्राप्त करू शकत नाही. तो वारंवार जन्म मरणाच्या चक्रात फिरत रहातो. अशा आशयाचा मंत्र कठोपनिषदात येतो. अविद्येची, अज्ञानाची मूर्छा अशा माणसाला परत परत जन्म घ्यायला लावते.



आपण काय करीत आहोत, आपल्या जीवनाचा उद्देश्य काय आहे याचे त्याला भानच नसते. तमोगुणी माणूस आयुष्यात कित्येक वेळा क्रोध करतो, त्याचे दुष्परिणाम भोगतो पण त्यापासून धडा मात्र घेत नाही आणि पुनः पुनः क्रोध करीतच रहातो. असा मनुष्य आपले जीवन बेहोशीमध्ये व्यतीत करतो, त्याला वास्तवाचे ज्ञान होता नसते. कळते पण वळत नाही. असा माणूस कारागृहात झोपून असलेल्या माणसाप्रमाणे असतो. जागा झाला तर येथून सुटायचा मार्ग तरी शोधेल पण झोपेत असल्याने मी कैदेत आहे याचे त्याला भान नसते व त्यामुळे तो तिथून निघायचा विचार करू शकत नाही.

तमोगुणी माणूस अशा निद्रेत असल्याने आपण काय करीत आहोत हे विसरतो आणि प्रसंगी स्वतःचा जीव देखील देऊन टाकतो. जीवनात आपल्याला अत्यंत प्रिय व्यक्तीच्या विरहात हा आपले आयुष्य संपवून टाकतो. हे सारे टाळता येऊ शकते पण हा मोह निद्रेत असतो. हा माणूस माणूस म्हणविण्याच्या लायकीचा ही नसतो पण केवळ मनुष्य देह आहे म्हणून हा माणूस ठरतो.

**येषां न विद्या न तपो न दानं । न ज्ञानं न शीलं न गुणो न धर्मः ।**
**ते मृत्युलोके भुविभारभूतः । मनुष्य रूपेण मृगःश्चरन्ति ।।**

असा माणूस मनुष्य दिसत असता तरी पशू असतो. म्हणून आपण सतत तमोगुण ताब्यात ठेवावा.

---

## २६ डिसेंबर २०२३

**कळह व्हावा ऐसें वाटे ।झोंबी घ्यावी ऐसें उठे ।**
**अंतरीं द्वेष प्रगटे ।तो तमोगुण।। दा २ - ६ - १५।।**

पशु आपसात अकारण भांडत असतात, कुत्रे, म्हशी वगैरे पशु भांडतांना आपण नेहमीच बघत असतो. तमोगुणाचे कारणाने त्यांची अशी प्रवृत्ति होत असते. तमोगुणी माणसे आपल्याला झोपडपट्टीमध्ये पहायला मिळतात. ते लोक नेहमीच कचा-कचा भांडत रहातात, अगदी हातापायी होते. अशावेळी आपल्याला ही ओवी आठवते.

तमोगुणी माणूस मनुष्य कमी आणि पशूच जास्त असतो. असा माणूस सतत कोणाचा तरी द्वेष करीत असतात. एकांतिकपणा, आततायीपणा, अघोरीपणा यांच्यात शिगोशिग भरलेला असतो. कालच आपण बघितले होते की हे लोक "मनुष्य रूपेण मृगाश्चरन्ति" असतात.

तमोगुणाची वैशिष्ठ्ये या समासात विस्ताराने सांगितली आहेत. तमोगणी मनुष झोपलेला असतो हे आपण जाणतो. झोपून रहायच अणि जागेपणी स्वप्न बघायच असा तमोगुणी माणसाचा खाक्या असतो. रावण हा तमोगुणाचा पुतळाच होता. त्याचे उदाहरण समर्थांनी मनाच्या श्लोकात दिले आहे.

**मना सांग पां रावणां काय जालें । अकस्मात ते राज्य सर्वै बुडाले ।**
**म्हणोनि कुडी वासना सांडि वेगी । बळें लागला काळ हा पाठिलागी ।।**

वासनेपायी रावणाला आपला जीव आणि राज्य गमवावे लागले, दुष्ट वासना असणारा माणूस तमोगुणी असतो.

---

## २८ डिसेंबर २०२३

**मत्सरें भक्ति मोडावी।देवाळयें विघडावीं ।**
**फळतीं झाडें तोडावीं ।तो तमोगुण ।। दा २ - ६ - १७।।**

तमोगणी माणसाबद्दल काय लिहावे? आपल्याला जे जे नकोसे असते तेच नेमके या तमोगुणी माणसाला करावेसे वाटते. सत्वगुणी माणूस याला जवळ पास ही नको असतो. हिरण्यकश्यपु आपल्याला ठाऊक आहे. कोणी विष्णुचे नाव जरी घेतले तरी याचा संताप अनावर होई. पोटच्या पोराला याने अघोरी शिक्षा केल्या आहेत. माझीच पुजा करा, कोणी त्या विष्णुची भक्ती करेल तर याद राखा, माझ्या राज्यात मंदिर असता कामा नये असे फर्मानच याने काढले होते, कारण तमोगुण. फळांनी लडबडलेल झाड पाहून सत्वगुणी माणूस सुखावतो पण तमोगणी माणूस त्या झाडाला नष्ट करायचा प्रयत्न करील.

तमोगण हा तोडफोडीत आनंद मानणारा असतो. असा माणूस पशूतुल्य असतो. अशा व्यक्तीचे वर्णन करतांना आपल्याला कष्ट होतात. पण आपण असे नसावे याकरिता हा समास अभ्यासावा लागतो.

आपण इतिहासात बघतो कि यावनी सत्ताधारी लोकांनी हिंदूची अनेक देवळे उध्वस्त केलीत. हा तमोगुणच आहे. पांचशे वर्षापूर्वी तोडलेले रामललाचे मंदिर आज पुनः वैभवात उभे होत आहे. सिक्ख गुरुच्या दोन पुत्रांना भिंतीत चिणून मारले, हिंदूत्व सोडत नाही म्हणून राजा संभाजीची निर्घृण हत्या केली हे सारे तमोगणी प्रवृत्तीचेच प्रकार आहेत. तमोगण वाढल्याने काय होते याची चर्चा भगवान श्रीकृष्ण खालील श्लोकात करतात -

**अप्रकाशोऽप्रवृत्तीश्च प्रमादो मोह एव च ।**
**तमस्येतानि जायन्ते विवृद्धे कुरुनन्दन ।। गीता १४ - १३।।**

अर्थात् - हे अर्जुना! तमोगण वाढल्यावर अंतःकरण व इंद्रिये यात अंधार, कर्तव्यकर्मात प्रवृत्ती नसणे, व्यर्थ हालचाली आणि झोप इत्यादि अंतःकरणाला मोहित करणाऱ्या वृत्ती, हे सारे उत्पन्न होतात. एकवेळ रजोगुण परवडला पण तमोगण तर नर्कातच नेणारा आहे. "अधो गच्छन्ति तामसाः असे भगवान म्हणतात. तेव्हा चुकुनही तमोगुणांची वृत्ती मनात बाळगु नये.

---

**२९ डिसेंबर २०२३**

**सत्कर्मे ते नावडती । नाना दोष ते आवडती ।**
**पापभय नाहीं चित्ती । तो तमोगुण ।।१८।।**

तमोगुण म्हणजे सत्वगुणाच्या १८० अंशात विरुद्ध स्वभावाचा माणूस. सत्कर्म म्हणजे ज्या योगे स्वतःचे ,समाजाचे भले होते असे कृत्य. शाश्वत स्वरुपाचे काम. ज्या योगे आपली सत्कीर्ती मृत्यू पश्चात टिकून राहते असे कृत्य. जे कार्य संत सज्जनांना मान्य आहे, नीती शास्त्र यांच्या चौकटीत बसणारे आहे असे कर्म . ते आपोआप घडत नाही. करावे लागते. पण त्यासाठी सकारात्मक विचार व ऊर्जा हवी. पण आळस हा तमोगुणाचे प्रधान लक्षण आहे.विपरीत विचार हाही तमोगुणी माणसाचा स्थायीभाव आहे. त्याला सत्कर्मच काय सत्कर्मी लोकही आवडत नाहीत. हिरण्यकश्यपु, असुर ही उदाहरणे आहेतच. सध्या आपण काहीतरी कुरापती काढून युद्ध प्रवण नेते जगात पाहतो आहोतच.

कायिक वाचिक व मानसिक दोष आवडतात. ज्यांची घृणा वाटायला हवी ते आवडणे ही गंभीर समस्या आहे. चूक दुरुस्त करता येईल पण जर तसेच वागणे आवडत असेल तर मात्र कठीण आहे. हाताबाहेर गेलेली केस असे म्हणावे लागेल.

पण समर्थांसारखे संत मात्र अशांना ही मार्गावर आणतात. वाल्या कोळ्याला दरोडा घालणे आवडत होते पण केवळ एक प्रश्न विचारून नारदांनी त्याचे डोळे उघडले. देहबुद्धी आत्मबुद्धी करायचा शाश्वत मार्ग सांगितला .म्हणजे त्यागार्थ सांगीतलेला हा तमोगुण कसा सोडवायचा याचा उपाय सद्गुरू जाणतात.

माणूस चुकीचे काम करण्यापासून परावृत्त होण्यासाठी पाप हातून घडेल ही भीती महत्वाची असते.आपल्या पापात वाटेकरी व्हायला कोणी तयार नाही. हे महापाप आपल्याच माथी येणार ही उघड उघड भीतीच तर होती. तिने काम केले. वाल्याचा वाल्मिकी झाला.पण हिरण्यकश्यपू कडे हे भयही वाटू नये इतका मोठा बलाचा अहंकार होता. देवाचा सज्जनांचा तिरस्कार होता. काय घडले? दारुण मरण आले.

समर्थ आपल्याला बोध करत आहेत की या पैकी काही आपल्या अंतरंगात शिरले असेल तर वेळीच सावध व्हा.दुर्गुणाचा वृक्ष होण्या पूर्वी च स्वपरीक्षा करा.शक्य नसेल तर संतांना शरण जा.ते तुमचा वृत्तीदोष खात्रीने घालवून देतील हा विश्वास बाळगा व लवकर कृतीशील व्हा.

---

**३१ डिसेंबर २०२३**

**ईश्वरीं प्रेमा अधिक ।प्रपंच संपादणें लोकिक ।**
**सदा सन्निध विवेक।तो सत्वगुण।। दा २ - ७ - ९।।**

आज श्रीमद्भगवद्गीतेच्या दोन श्लोकांनी मी चिंतन सुरु करीत आहे. गीतेचा १४ वा अध्याय गुणत्रयविभागाचा आहे. सत्व, रज आणि तमोगुणांची चर्चा या अध्यायात करण्यात आली आहे.

आपण आज सत्वगुणाची चर्चा सुरु करीत आहोत म्हणून मी या अध्यायातील खालील दोन श्लोक निवडले आहेत.

**सर्वद्वारेषु देहेऽस्मिन्प्रकाश उपजायते ।**
**ज्ञानं यदा तदा विद्याद्विवृद्धं सत्त्वमित्युत ।।**
**यदा सत्त्वे प्रवृद्धे तु प्रलयं याति देहभृत् ।**
**तदोत्तमविदां लोकानमलान्प्रतिपद्यते ।।**
**(गीता अध्याय १४ श्लोक ११, १४)**

भावार्थ - ज्यावेळी या देहात तसेच अंतःकरणात व इंद्रियांत चैतन्य आणि विवेकशक्ती उत्पन्न होते, त्यावेळी सत्त्वगुण वाढला आहे असे समजावे. जेव्हा मनुष्य सत्वगुण वाढलेला असतांना मरण पावतो, तेव्हा तो उत्तम कर्मे करणाऱ्यांच्या निर्मळ, दिव्य स्वर्गादि लोकांत जातो.

दिव्य लोकात जायची फॅसिलिटी केवळ सत्वगुणी मनुष्यालाच उपलब्ध आहे. निदान या साठी तरी आपण सत्त्वगुणी असायला हवे आहे. आपण सारेच जाणतो की तीन्ही गुण बन्धनाला कारणीभूत आहेत. तमोगुण लोखंडाची बेडी आहे, रजोगुण चांदीची बेडी तर सत्वगुण सोन्याची बेडी आहे. जर तीन पैकी एक निवडायची असेल तर सोन्याची बेडी का न निवडा? अर्थात् या तिन्ही गुणांच्या पलिकडे जायची सोय आहे. अर्जुनाला भगवान दुसऱ्याच अध्यायात 'निस्त्रैगुण्यो भवार्जुन' असा सल्ला देत आहेत.

जीवामध्ये तीन्ही गुण विविध प्रमाणात असतात. मनुष्येतर जीवांमध्ये सत्वगुण नगण्य असतो. सत्वगुणाची देणगी फक्त मनुष्य प्राण्यालाच मिळाली आहे असे समजण्यास हरकत नाही. असे असून देखील कित्येक लोग सत्वगुणापासून दूर रहायचा प्रयत्न करतात. त्यांचे पूर्वजन्मीचे संस्कार त्यांना असे वागायला लावतात. खरा सत्त्वगुणी मनुष्य इतरांपेक्षा जास्त प्रेम ईश्वरावर करतो. चारचौघांसारखा तो प्रपंच करतो पण तिथेही ईश्वराला विसरत नाही. याच्या हृदयात विवेक सदैव जागा असतो.

परमार्थाची आवड, हरिकथेची गोडी हे सत्त्वगुणी माणसाचे लक्षण आहे. सत्वगुणी माणूस देवाला सर्वस्व मानतो त्यामुळे तो भगवंतचे अखंड स्मरण करतो. सत्त्वगुणाची माणसाची प्रवृत्ती जगापासून काही घेण्यापेक्षा जगाला काही तरी देण्याची असते. याची दृष्टी विशाल असते, सर्व जीवांवर हा प्रेम करतो. राम,कृष्ण आदि देवतांनी युद्ध केले आहे म्हणून ते तमोगुणी ठरत नाही तर विशिष्ट कार्य पूर्ण करायला तमोगणाचा अविर्भाव त्यांनी आणलेला असतो. असे अवतार त्याच कार्यासाठी आलेले असतात.

मुळात ते सत्त्वगुणी असतात. देहाभोवती जे जीवन कैंद्रित झालेले असते तो प्रपंच असतो तर देवाभोवती जे जीवन कैंद्रित झालेले असते तो परमार्थ होय. देवाला सर्वस्व मानल्याने भगवंताचे अखंड स्मरण आणि त्यामुळे देहाचे आपोआपच विस्मरण होते. सत्वगुण संसारातील दुःखाचा विसर पाडतो, भक्तीमार्ग स्पष्ट दाखवितो आणि प्रत्यक्ष भजन करायला लावतो. आपण सारेच भक्तीमार्गाला लागलो आहोत तेव्हा आपण देखील सत्वगुणी आहोत हे लक्षात घ्यावे.

दासबोधातील या ओव्यांचे चिंतन करता करता गीता, उपनिषद या सारख्या ग्रंथांचा ही अभ्यास होतो, हा आपला फायदाच आहे. हे चिंतन आपण मोठ्या प्रेमाने वाचून दाद देता यामुळे मी अनुग्रहित आहे. आपल्या हृदयस्थ परमेश्वराला प्रणाम करतो, माझ्या प्रणामाचा कृपया स्वीकार करावा.

**१ जानेवारी २०२४**

**दशक २ मूर्खलक्षणांचा समास ७ सत्वगुणलक्षण**
**परमार्थाची आवडी| उठे भावार्थाची गोडी|**
**परोपकारी तातडी |तो सत्वगुण|| ०२.०७.११||**

**अर्थ :** सत्वगुण जेव्हा शरीरामध्ये प्रकट होतो तेव्हा त्या माणसाची वर्तणूक कशी असते हे सांगताना श्री समर्थ म्हणतात, त्या माणसामध्ये परमार्थाची आवड उत्पन्न होते, त्याला अध्यात्माच्या भावार्थात गोडी लागते आणि तत्परतेने परोपकार त्याच्या हातून घडतो.

**प्रस्तावना :** हा समास प्रामुख्याने उत्तम गुणांच्या अभ्यासासाठी व आचरणासाठी श्री समर्थांनी सांगितला आहे. या ब्रम्हांडामध्ये तमोगुणांचे प्राबल्य जास्त आहे. त्या पाठोपाठ रजोगुणांचे प्राबल्य आहे. शुद्ध सत्वगुण हा अगदी विरळ आहे. असे हे ब्रम्हांडाचे त्रिगुणांचे रूप आहे. जीवनामध्ये आपल्याला आपली प्रवृत्ती कुठे न्यायची आहे, कुठपर्यंत आपले वृत्यंतर करायचे आहे, आपल्याला काय साधायचे आहे, आपल्याला तो शुद्ध सत्वगुण आपल्या जीवनामध्ये साधायचा आहे आणि ज्याने हा शुद्ध सत्वगुण आत्मसात केला, ज्याच्या जीवनामध्ये भगवंताविषयी अनन्य प्रेम निर्माण झाले, त्याची लक्षणे सांगणारा हा समास आहे.

**भावार्थ :** परमात्मा हा सत्यसंकल्पी आहे. अर्थात तो जो संकल्प करतो, तो तडीस जातो. त्याचाच अंश असलेल्या जीवाची इच्छा पूर्ण व्हायला मात्र अनेक जन्मही जाऊ शकतात. याचे कारण जीवातील चैतन्यशक्ती एकच असली तरी त्रिगुणांमुळे जीव भिन्नरसी झाला आहे. हे त्रिगुण म्हणजे सत, रज आणि तम. तुकाराम महाराजांचा एक अभंग आहे,

**इच्छा चाड नाही |न धरी संकोचही काही ||१||**
**उदका नेले तिकडे जावे |केले तैसे सहज व्हावे ||२||**
**मोहरी कांदा उस |एक वाफा भिन्न रस||३||**
**तुका म्हणे सुख |पीडा इच्छा पावे दुख||४||**

ही सृष्टी म्हणजे जणू वाफा आहे आणि त्यात सत्वगुणी ऊस, रजोगुणी मोहरी आणि तमोगुणी कांदा अशा तीनही तऱ्हेचे लोक एकत्र नांदत असतात. या तिघांची मूळ शक्ती जी चैतन्य शक्ती ती एकच आहे. आपल्या जीवनाचे शिल्प सद्गुरु घडवतो. आपण या रज, तम गुणांनी भरलेलो आहोत. आपण कच्चे आहोत. पण आपल्या हृदयामध्ये कुठेतरी सत्वगुणाचा अंश आहे. त्या शिल्पाला घडवणे हेच सद्गुरूंचे आपल्या जीवनातील कार्य आहे. त्यामुळे शुद्ध सत्वगुण हा प्रारब्धाने, संचिताने एखाद्याच्या आयुष्यात येऊ शकतो. जसे जसे मन हे ईश्वराभिमुख होऊ लागते, भगवंताचे स्थान त्याच्या हृदयात वृद्धिंगत होऊ लागते, तसे तो या ईश्वरप्रेमाची वृद्धिंगता आपल्या जीवनामध्ये अनुभवू लागतो.

असा सत्वगुणी मनुष्य हा संसार करीत असतो. त्याचा संसार ही उत्तम चाललेला असतो. पण त्यात त्याला रस असत नाही. विहित कर्मे म्हणून तो संसारातील सर्व कर्मे करतो. पण त्याचे खरे प्रेम भगवंताविषयी असते. पूजा-अर्चा, दानधर्म, ग्रंथांचे अध्ययन सण आणि उत्सव साधूसेवा, परोपकार या सगळ्यांमध्ये त्याला खरोखर रस असतो.अध्यात्माच्या भावार्थात त्याला गोडी वाटू लागते आणि तत्परतेने परोपकारही त्याच्या हातून घडू लागतो. हाच सत्वगुणाच्या दिशेने आपला सुरू झालेला प्रवास आहे असे श्री समर्थ सांगतात.

पण जसे जन्माला आलेलं मूल हे एकदम पदवीधर होऊ शकत नाही. त्याने आयुष्याची १४-१५ वर्षे शिक्षणात घालवल्यानंतर तो जसा पदवीधर होतो, त्याप्रमाणे परमार्थ देखील एक दिवसाचा नाही. हा प्रदीर्घ प्रतीक्षेचा मार्ग आहे. आपल्या जीवनात सत्वगुणांचा उदय हा सत्संगतीच्या आधाराने होतो. पहिल्या टप्प्यावर जेव्हा सत्संगती खऱ्या अर्थाने उतरू लागते तेव्हा काय होते श्री गोंदवलेकर महाराज म्हणायचे की एकदा का तुमच्या जीवनात उपासनेचे अधिष्ठान आले की सत्कर्मे टाळता येत नाहीत.

मुळातच सद्‌गुरूंचे अधिष्ठान हे जीवनात उपासनेच्या आधारे येते आणि उपासना ही आत्मसाक्षात्कारानंतरही सोडता येऊ शकत नाही. उपासना ही सत्संगतीच्या आधारे जीवनामध्ये येऊ लागली की ती कृतींमध्ये बदलू लागते. परंतु उपासनेला देहाची निर्मळ अवस्था गरजेची आहे. जसे संत तुकाराम महाराज म्हणतात की, **"देह शुद्‌ध करूनी भजनी भजावे..."** त्याप्रमाणे उपासनेला जो मनुष्य सत्संगतीच्या आधाराने लागतो त्याची ही प्रथम अवस्था आहे.

---

## २ जानेवारी २०२४

**लावी वनें उपवनें ।पुष्पवाटिका जीवनें ।**
**निववी तापस्यांचीं मनें ।तो सत्वगुण।। दा २ -७ - २१।।**

सत्वगुण वर्णन। करतांना समर्थांनी पर्यावरणाचा विचार देखील केला आहे हे या ओवीत दिसून पडते. तुकाराम महाराज देखील म्हणतात, **"वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे।"** वृक्षतोड होऊ नये, सतत वृक्षारोपण व्हावे, वनांचे संगोपन व्हावे. आणि हे सारे आपल्याच हितासाठी आहे हे या संतांच्या काव्यातून दिसून पडते. वृंदावने, तुळसीवने लावा, तळी विहिरी बांधा हा सारा पर्यावरण संवर्धनाचा कार्यक्रम राबवायला हे संत आम्हाला सांगत आहेत. ही सारी कार्ये सत्वगुणी आहेत हे आवर्जून लक्षात घ्यावे.

समाजाच्या, वन्य जीवांच्या उपयोगी पडणारे सारे कार्य सत्वगुणी आहे हे समर्थांनी ४०० वर्षांपूर्वी सांगून ठेवले आहे. साऱ्या जगताचे रक्षण, संवर्धन करण्याचे कार्य भगवंतानी मनुष्याला दिलेले आहे, त्याकरिता पुरेपूर सत्वगुण आपल्याला दिला असून सत्वगुणाचे फायदे समर्थांनी याच समासात सांगितले आहेत. समर्थ म्हणतात की -

**सत्वगुणें भगवद्भक्ती ।सत्वगुणे ज्ञानप्राप्ती ।**
**सत्वगुणें सायोज्यमुक्ती । पाविजेते।। दा. २ - ७ - ८६।।**

सत्वगुणाची इतकी थोरवी समर्थांनी वर्णन केली तरी काही लोक मात्र सत्वगुणाचा अंगिकार करायला राजी नाहीत. या लोकांना देवाच्या अस्तित्वावरच संदेह असतो. सत्व, रज आणि तम हे तीन गुण आहेत तरी काय असा या लोकांना प्रश्न पडतो. आपण यावर थोडा विचार करूया!

या सृष्टीची निर्मिती अष्टधा प्रकृतीने झाली आहे. पंचमहाभूतें व सत्व, रज, तम हे तीन गुण मिळून अष्टधा प्रकृती बनते. या जगतातील प्रत्येक सजीव, निर्जीव वस्तू या अष्टधा प्रकृतीची बनली आहे. पृथ्वी, आप, तेज, वायु, आकाश ही पाच भूते तर आपल्या परिचयाची आहेतच. यांचे सोबत हे तीन गुण असले की

सृष्टीची प्रत्येक वस्तु बनते. तीन गुणांपैकी जो गुण अधिक परिणाम देतो त्या गुणाचे प्राबल्य त्या वस्तु, व्यक्तीमध्ये असते. निर्जीवामध्ये हे गुण सुप्त असतात पण सजीवात मात्र ते दिसून येतात.

**सत्त्वं रजस्तम इति गुणाः प्रकृतिसम्भवाः ।**
**निबध्नन्ति महाबाहो देहे देहिनमव्ययम् ।। गीता १४ - ५।।**

अर्थात् हे अर्जुना! सत्व, रज, तम हे तीन ही गुण प्रकृतीपासून उत्पन्न होऊन अविनाशी जीवाला शरीरात बांधून ठेवतात. त्या जीवात जो गुण prominent असेल त्या गुणाचा तो जीव असतो. गुणांचे प्रमाण प्रत्येक व्यक्ति मध्ये भिन्न भिन्न असते.

---

## २ जानेवारी २०२४

**लावी वनें उपवनें । पुष्पवाटिका जीवनें ।**
**निववी तापस्यांचीं मनें । तो सत्वगुण ।।२-७-२१**

सत्वगुणी माणूस हा कृतीशील असतो.वृक्ष लावणे त्यांचे रक्षण करणे ,बाग बगीचे तयार करणे, सुंदर फुलबाग लावणे,पाण्याची सोय करणे आणि तपस्वी लोकांना मन:शांती देतो.हे सारे तो देवाप्रती सेवा भावनेने करतो.देवालयाचे सौंदर्य पावित्र्य कसे वाढेल हे तो पहातो. समर्थ या समासात सत्वगुणी माणसाच्या कृती व प्रेरणा यांची अनेक उदाहरणे देतात .

त्या काळी परकीय आक्रमकांनी देवालयांचा मूर्तींचा प्रचंड विध्वंस केला होता.सनातन हिंदू धर्म अत्यंत हलाखीच्या स्थितीतून जात होता.त्याचे पुनरुज्जीवन करायचे हे मोठं आव्हान होतं म्हणून साधकांना कशा प्रकारे कृतीशील करून देवालय ही संस्था नव्याने उभारता येईल यांचा विचार प्रस्तुत समासात व या श्लोकात त्या अनुषंगाने आला आहे.

देवालय उभारणे, त्यांचे उत्सव दिमाखात साजरे व्हावे यासाठी देवालयाची स्वतःची जमीन, पाणी व्यवस्थापन, प्रसादासाठी व्यवस्था, येणा-या भक्तांची निवास व्यवस्था, मन शांत प्रसन्न होईल असे वातावरण, नित्य उपासना उत्साहात चालू रहाण्यासाठी आखीव दिनक्रम व त्याची तजवीज सगळे लागते.

सगुणोपासना उत्तम चालली तर त्यातून उत्तम साधक तयार होतील व निर्गुणोपासनेचे ध्येय साध्य करू शकतील त्यासाठी समर्थ किती बारकाईने विचार करतात ते वाचून थक्क व्हायला होते. देउळ टिकले पाहिजे, त्यांचे रक्षण हाही विचार भुयारे, तळघरे यात असावा.उत्तम समाज निर्माण करणे , उत्तम राजकारणी निर्माण करणे , बलसागर भारत निर्माण करणे यातील महत्त्वाची कडी म्हणजे देवालये,मठ निर्मिती. इथे उत्तम साधना व्हावी म्हणून परिसर सुंदर असायला हवा.बागा बगीचे असतील तर मन निवते, शांत होते.



प्रपंचाच्या गोंगाटापासून दूर येणारा सामान्य दर्शनार्थी असो की तप करणारा तपस्वी शांत सुंदर निसर्ग रम्य परिसर ही गरज असते.मन अंतर्मुख होण्यासाठी या गोष्टी मदत करतात. तिरुपतीचा स्वच्छ सुंदर परिसर, कर्नाटकात असलेली घनदाट वृक्षराजी असलेली पुढे विशाल तळे असणारी देवळे खूप छान मनस्थिती निर्माण करतात.

देवळाची भव्यता, सुंदर मूर्ती व छान बांधलेली पूजा, फुलांची सजावट, बागेतील पक्षी या गोष्टी किती छान परिणाम करतात हे आपण अनुभवलेले असते. वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरी असे तुकोबा म्हणतात. मी पणातून बाहेर यायला निसर्ग मदत करतो. माणूस मुळात निसर्गाचे अपत्य असल्याने तो हिरवाईत रमतो. स्वच्छ पाणी असो की खळाळते पाणी असो काही क्षण त्या दृष्याशी तादात्म्य पावतो.हेही एक प्रकारचे ध्यान आहे.

अशा प्रकारे व्यवस्था निर्माण करावी त्यासाठी आपण काया वाचा मन याने झिजावे असे वाटणे व त्यादष्टीने कार्यरत रहाणे, निस्पृह सेवा करणे हे सत्व गुणांचे लक्षण आहे.





सज्जनगड शिबिरात आल्यावर असे सत्वगुणी साधक सेवा देताना दिसतात.कोणी जलाशयात डोकावून पाहत असेल खडे टाकत असेल, परिसर अस्वच्छ करीत असेल किंवा शिस्त पाळली जात नसेल तर हे साधक समजावून सांगतात, रागावून सांगतात. परिसर निर्मळ रहावा म्हणून त्यांची तगमग ही या सत्वगुणाच्या श्रेणीतील वाटते.तो प्रसंग घडून गेल्यावर त्यांच्या मनात काहीही नसते.तो रागही प्रसंगोपात काही सुयोग्य हेतूने आणलेला असतो.

एखाद्याने जिवापाड कष्ट करून सांभाळलेल्या बागेचे तळ्याचे कोणी नुकसान करीत असेल तर अशा सत्वगुणी माणसाला क्रोधही आणावा लागेल.

व्यवस्था उभारणे, तिचे रक्षण करणे व उत्तरोत्तर ती अधिक चांगली करत जाणे ही समर्थांची दृष्टी अलिकडच्या काळात बाबा आमटे व कुटुंबाने आनंद वन हेमलकसा उभारताना ठेवली. म्हणून शेताला पाणी द्यायचे आहे ना मग मधे कारंजी बनवा आनंद घेत पाण्याला पुढे जाऊ द्या ही ती निर्मळ दृष्टी. त्यामुळे भाज्या फळफळावळ उत्तम तर झालीच, आनंदवनाची गरज भागवून हातीपायी धड असलेल्यांना सुद्धा उत्तम ते देता देता कुष्ठरोग असणा-या आश्रमवासींच्या जीवनात सुद्धा मळे फुलले, आनंदाची कारंजी थुईथुई नाचू लागली.

---

**३ जानेवारी २०२४**

**ऐसी भक्तीची आवडी । नीच दास्यत्वाची गोडी ।**
**स्वयें देवद्वार झाडी । तो सत्वगुण ।।२-७-३०-||**

भक्ती म्हणजे भाव, श्रध्दा, विश्वास.भक्ती हे जीवनाचे Expression आहे ही सहजगोष्ट आहे,ती तुमच्या हृदयाची अभिव्यक्ती झाली पाहिजे, तुमचे भाव डोळ्यातल्या वाहणाऱ्या अश्रूंबरोबर सहजपणे वाहिले पाहिजे, मग ती मूर्ती देखील डोलू लागेल. त्यामूळं भक्तिला उपाधिची, लौकिकाची, सूर, स्वरांची, तालवाद्यांची, कशाचीही गरज नाही.भक्तिला केवळ तुमच्या हृदयस्थ असलेल्या भगवंताचे चिंतन करणारे शूद्ध मन पाहिजे, एकदा का ते शुध्द मन तुम्ही श्री भगवंताच्या चरणी वाहिले की या देहाच्या आधाराने होणारी कर्म ही उदात्त कर्मे होवून जातात. असे हे भक्तिचे महात्म्य आहे.

भक्ती ही तीन प्रकारची असते सकाम भक्ती, निष्काम भक्ती, ज्ञानपुर्ण भक्ती सकाम भक्ती ही भक्ती करीत असताना मनुष्य काही कामने पोटी भगवंतांच्या नजिक जातो भगवंत ही त्याला हवे ते देतो अशा पद्धतीने भगवंताशी व्यवहार साधला जातो दुसरी भक्ती निष्काम भक्ती या मध्ये कुठल्याही प्रकारचा व्यवहार नाही.

तिसरी भक्ती ही ज्ञानपुर्ण भक्ती या भक्तीमध्ये भगवंताला ओळखले जाते पण भगवंताला ओळखणे हि सोपी गोष्ट नाही कारण भगवंताला ओळखावयास गुरूंचे साह्य असावे लागते किंवा गुरूंची कृपा असावी लागते आपल्याला आपले आई,वडील ओळखता येत नाही मग देव कसा ओळखता येईल यासाठी समर्थ म्हणतात पहावे आपणासी आपण या नाव ज्ञान परमार्थ मार्गातील पहिली पायरी आहे आपले दोष तपासणे ज्यावेस आपण आपले दुर्गुण काढून टाकतो त्यावेळेस भग्वत भक्तीचे बी आपल्या मनामध्ये रुजायला लागते आणि म्हणूनच समर्थांनी आपल्याला मुर्ख लक्षणे, कुविद्या लक्षणे सांगितली आहेत.

जन्माला येउन काहितरी आत्महित करावे असे समर्थ माउली सांगत आहे या पैकी काहिच न करता तो मनुष्य जिवंत असून मेल्या सारखा आहे तेव्हा समर्थ माउली आपल्याला कळकळीने सांगत आहेत कि भगवत भक्ती करून स्वता:चा उद्धार करून घ्या.

दासबोधातील दुसऱ्या दशकातील चवथ्या समासात समर्थांनी भक्तीची लक्षणं सांगितलेली आहेत.समर्थांचा एक अभंग आहे..........

रामभक्तिविण आण नाही सार |

सारांचे हे सार रामना कृतींमधून कर्मांच्या आधाराने व्यक्त करणं हे या भक्तीमधील कर्म आहे. समर्थ भक्ती मधील वेगवेगळे कर्म ज्या द्वारे आपल्या अंतःकरणा मधील भाव भगवंताच्या चरणी आपण वाहू शकतो अशा कर्मांची यादी सांगतात.

फळ, पाणी यापैकी कशानेही भगवंताची पूजा करावी, आणि आपल्या जन्मांचे सार्थक करून घ्यावे. हे समर्थांनी बहूजनांसाठी भक्तिचे मार्ग सांगितलेले आहे. त्यामुळे पश्चातापाने संसाराचा त्याग करावा हे भक्तिमधिल लक्षण आहे पण  संसाराच्या कटकटींमूळे पळून जायचे असं भक्ती कधीच सांगत नाही उलट संसाराच्या त्रासांपासून तितिक्षा निर्माण करून ते स्विकारावे ही भगवंताची इच्छा आहे म्हणून स्विकारण्याची इच्छा हेच भक्तिचं मर्म आहे.

त्यामूळे समर्थ आपल्याला ज्या भक्तिमार्गाचे प्रतिपादन करतात  यातिल मार्गच आपण हरवून बसलो तर हे थोतांड होवून जाईल. बोधामृतात माझ्या गुरुमाऊलींनीं हेच सांगितले आहे काही शरीरावर, काही बायकोवर, काही पोरांवर, काही लौकिकांवर, काही देवावर असे दहा ठिकाणी वाटले गेलेले प्रेम खरी भक्ति नसून, केवळ परमेश्वर हाच आपला सर्वस्व मानणे, त्याच्या ठिकाणीच सारे प्रेम केंद्रित करणे हीच खरी भक्ति होय.(परमपूज्य कलावती आई, बेळगाव)

अर्चनभक्ती परिपक्व झाली असता त्यातून दास्य भक्ती विकसित होते.देवाचे व श्रीगुरुचे वैभव वाढवावे.छत्रपती शिवाजी महाराजांना समर्थ म्हणाले होते - जैसे जैसे चाफळचे रामाचे वैभव वाढेल तैसे तैसे स्वराज्य वर्धिष्णु होत जाईल.संत ज्ञानेश्वर महाराज म्हणतात -

**देवांगण मिरवणीया । अंगोपचार पुरवणीया ।**
**करावया म्हणीया । शोभती हात॥ १७-२०३॥**

हाताचे सार्थक देवमंदिराचे अंगण झाडून रांगोळी काढून ते सुशोभित करण्यात आहे. देवाच्या पुजेकरिता सर्व उपचार त्याने जमविणे ही दास्यभक्ती आहे.देवद्वारी किंवा गुरुद्वारी स्वतःच्या प्रतिष्ठेविषयीच्या सर्व कल्पना बाजूला ठेवल्याशिवाय खऱ्या अर्थाने दास्य भक्ती होत नाही. देव किंवा श्रीगुरु सुप्रतिष्ठीत असल्यामुळे म्हणजे सच्चिदानंद रुपाने अख़ंड असल्याने त्यांचीच प्रतिष्ठा सत्य असते.

माणसाची परिस्थिती सापेक्ष प्रतिष्ठा सांभाळण्याच्या प्रयत्नामुळे का होईना माणूस सदाचार सांभाळण्याचा प्रयत्न करतो.अनेक लोकप्रतिनिधी व सरकारी अधिकारी आपण येत असल्याची पूर्वसूचना देऊन आपल्या प्रतिष्ठेला साजेशा पध्दतीने देवळात किंवा सत्पुरुषांकडे जातात.,( आत्ताची राजकीय परिस्थिती तशीच आहे नाही का?) त्यावेळी स्वतःचा बडेजाव मनात तसाच ठेवून वरवर जेव्हा नम्रतेचा आव आणला जातो तेव्हा त्यातून काहीच निष्पन्न होत नाही.

सत्वगुणी व्यक्ती सार्वजनिक हिताच्या बाबींविषयी अजिबात मागे असत नाही.पवित्र तीर्थक्षेत्रांना व देवालयांना तो जमीन इत्यादी देतोच.पण त्या बरोबर विहिरी,तळी, बागा, वृक्षारोपण,नदीतीरी स्नानादीसाठी घाट, इत्यादी कामांत पुढाकार घेतो.समाजाचे वैचारिक आरोग्य सांभाळून व भावनेला भाव देण्यासाठी मंदिरे आवश्यक असतात.मंदिरे व त्यातील दैवते यांचे वैभव सत्वगुणी माणसाला आनंद देते.(जय श्री राम)

**५ जानेवारी २०२४**

**आले अतीत अभ्यागत ।जाऊं नेदी जो भुकिस्त ।**
**येथानशक्ति दान देत ।तो सत्वगुण ।। दा २-७-५३।।**

आज ही कित्येक घरांमध्ये अशी प्रथा आहे की घरी येणाऱ्या प्रत्येकाला काही तरी खाऊ घातल्या शिवाय जाऊ देत नाहीत. गृहस्थांचा हा दंडक आहे. भोजन समयी घरी आलेल्या अभ्यागतास आपल्या पंगतीला बसवून गृहस्थ जेऊ घालतात. दान देणे हे तर गृहस्थाचे कर्तव्यच आहे. त्यातही सत्त्वगुणी मनुष्य दान देतो तेव्हा तो दान स्वीकार करणाऱ्यावर उपकार करीत नसून दान स्वीकारणाराच आपल्यावर उपकार करीत आहे अशा भावनेने दान देतो. "तुझेच तुला देत आहे." किंवा संपत्ति देणारा तो भगवंतच त्यातून काही मागायला याचकाच्या रूपात आलेला आहे अशी देणाऱ्याची भावना असते. महादानी कर्णाच्या दारातून याचक विन्मुख जात नसे. कर्ण इतका पराकोटीचा दानी होता की त्याने आपली कवच कुंडले देखील देऊन टाकली. उत्तरेकडे संतकवि रहीम असाच दानवीर होता. त्याची कथा इथे सांगावीशी वाटते.

महादानी रहीमचे एक वैशिष्ट्य होते कि दान देते वेळी जेव्हा दान देण्यासाठी ते हात उचलत तेव्हा त्यांची नजर खाली झुकत असे. याचकाला ही गोष्ट विचित्र वाटे. वास्तविक देणाऱ्याने उपकार कर्त्याचा आव आणावा अशी प्रत्येकाची अपेक्षा असते, पण रहिमचे वागणे विपरीत होते. ही गोष्ट जेव्हा गोस्वामी तुलसीदासजींना कळली तेव्हा त्यांनी चार ओळी लिहून रहिमकडे पाठविल्या-

**ऐसी देनी देन जु, कित सिखे हो सेन ।**
**"ज्यों ज्यों कर ऊँचौ करौ" , त्यों त्यों नीचे नैन ।**

अर्थात् हे रहिम आपण असे दान देणे कुठून शिकलात, कि दान द्यायला जसा जसा तुमचा हात वर जातो तस तशी तुमची नजर खाली झुकते? रहिम देखील कवी होते, त्यांनी कवितेतच उत्तर दिले, रहिम लिहितात -

**देनदार कोई और है, भेजत है दिन रैन ।**
**लोग भरम हम पर करें , तासौं नीचे नैन ।।**

अर्थात् देणारा (मी नसून) कोणी तरी वेगळा (परमात्मा) आहे. तो परमेश्वर रात्रंदिन पाठवत असतो, परंतु लोकांना भ्रम होतो की मीच देत आहे म्हणून मला लाज वाटते व लाजेने माझी नजर, मान खाली झुकते. हाच सत्वगुण आहे.

समर्थांनी सत्वगुणांची फार मोठी यादी दिली आहे कारण काही सद्गुण आपण देखील आपल्यात बाणावे. सतीबाई शहापुरकरने पोतेरे दिले ते देखील समर्थांनी सहर्ष स्वीकारले, कधीही काहीही न देणाऱ्या स्त्रीने निदान देण्याची सुरुवात तर केली याचा त्यांना आनंद झाला. भगवंतच अतिथि वा अभ्यागताचे रूपात येत असतो, त्याची सेवा त्यानेच आपल्याला दिलेल्या संपत्तीतून करायची असते. दानाचे सात्विक, राजसिक व तामसिक असे तीन प्रकार श्रीमद्भगवद्गीतेत सांगितले आहेत. त्यातील सात्विक दानाचे वर्णन करतांना भगवंत म्हणतात -

**दातव्यमिति यद्दानं दीयतेऽनुपकारिणे ।**
**देशे काले च पात्रे च तद्दानं सात्विकं स्मृतम् ।। गीता १७ - २०।।**

अर्थात् दान देणेच कर्तव्य आहे, या भावनेने जे दान देश, काल आणि पात्र मिळाले असता उपकार न करणाऱ्याला दिले जाते, ते दान सात्विक म्हटले गेले आहे. ज्या वस्तूंना मी आपले मानले आहे, ज्यांचा मी स्वीकार केला आहे त्यांचे दान देण्याची जवाबदारी माझी आहे, या कर्तव्य भावनेने फळाची अपेक्षा न करता दान दिले गेले पाहिजे.

दान कोणाला, कोठे, केव्हा द्यावे हे सांगतांना भगवान म्हणतात - ज्याने कधी आपल्यावर उपकार केला आहे, करणार आहे किंवा करीत आहे त्या दिलेले दान या सदरात येत नाही. ज्या देशात (स्थळी) ज्या काळी ज्या वस्तूची गरज आहे त्या काळी ती वस्तु अभावग्रस्ताला दान द्यावी. तीर्थ क्षेत्री पवित्र पर्वावर वेदपाठी ब्राह्मण, सदाचारी भिक्षुक, याचक यांना दान द्यावे.

---

## ७ जानेवारी २०२४

**विषईं धांवे वासना।परी तो कदा डळमळिना ।**
**ज्याचें धारिष्ट चळेना ।तो सत्त्वगुण।। दा २-७-५९।।**

कठोपनिषदामध्ये आत्म्याला रथाचा स्वामी, शरीराला रथ, बुद्धीला रथाचा सारथी आणि मनाला लगाम म्हटले आहे. तसेच इंद्रिये हे त्या रथाचे घोडे असून विषय हे त्यांचे मार्ग मानले जातात. शरीराचा हा रथ स्वामीच्या मर्जीनुसार सारथी हाकत असतो. लगामांद्वारा तो सारथी घोड्यांना योग्य मार्गावर नेत असतो. घोडे नाठाळ असले, सारथ्याचे लिए नसले, लगाम व्यवस्थित नसले तर शरीर रूपी हा रथ योग्य मार्गावर चालणार नाही. हा रथ नीट चालावा ही स्वामीची इच्छा आहे काय हा पहिला प्रश्न आहे. याचे उतर होय असेल तर त्याने सारथी, लगाम, घोडे व योग्य मार्गाचे चयन करायचे असते.

आता ही ओवी बघा. विषयी धावे वासना म्हणजे घोडे भलतीकडेच जायचा प्रयत्न करीत असतांना स्वामीच्या मर्जीनुसार बुद्धीरूपी सारथी मनाचे लगाम वापरून त्या घोड्यांना योग्य मार्गावर ठेवतो. म्हणजे सारथी, लगाम व घोडे या तीहीवर स्वामीचे नियंत्रण आहे. स्वामीचे नियंत्रण नसेल किंवा स्वामीलाच दुसऱ्या मार्गाचा मोह झाला तर रथ ठरलेला मार्ग सोडून वेगळ्याच दिशेने जाईल. त्याचे मनाचे लगाम पक्के असल्याने त्याचे मनोधैर्य ढळत नाही. असा हा रथी किंवा रथाचा स्वामी सत्वगुणी आहे असे समजायला हरकत नाही. कठोपनिषदातील दोन श्लोक आपण बघुया-

**यस्त्वविज्ञानवान्भवत्ययुक्तेन मनसा सदा ।**
**तस्येन्द्रियाण्यवश्यानि दुष्टाश्वा इव सारथेः ।। तृतिय वल्ली ५।।**
**यस्तु विज्ञानवान्भवति युक्तेन मनसा सदा ।**
**तस्येन्द्रियाण्यवश्यानि वश्यानि सदश्वा इव सारथेः ।। तृतिय वल्ली ६।।**

शब्दार्थ – जो बुद्धिरूप सारथी अविवेकी आहे त्याच्या मनरूपी लगामावर त्याचा कधी ताबा रहात नाही आणि मग नाठाळ घोडे जसे सारथ्याच्या काबूत रहात नाहीत, तशीच इन्द्रियेही त्याच्या (बुद्धीच्या) ताब्यात रहात नाहीत. जो बुद्धिरूप सारथी विवेकी आहे त्याचे मनरूपी लगामही त्याच्या ताब्यात नीट रहातात व मग चांगले घोडे जसे सारथ्याच्या ताब्यात रहातात तशी इन्द्रियेही त्याच्या (बुद्धीच्या) ताब्यात रहातात.

माणसाचं शरीर एक गोष्ट करायला सांगतं तर मन वेगळाच विचार सांगतो. विवेक अजुन काही सुचवितो आणि गोंधळाची स्थिती उत्पन्न होते. अर्थात् सत्वगुणी मनुष्य या गोंधळातून योग्य मार्ग काढून गोंधळातून बाहेर निघेल. अशा माणसाचा -

**देह आपदेनें पिडला। क्षुधे तृष्णेनें वोसावला ।**
**तरी निश्चयो राहिला । तो सत्वगुण ।।**

सत्वगुणी माणसाचे चित्त ठिकाणावर असते म्हणून तो विषयाचे आधीन जात नाही. त्याचे मन, इंद्रिये त्याच्या ताब्यात रहातात.

---

**९ जानेवारी २०२४**

**आपकार्याहून जीवीं । परकार्यसिद्धी करावी**
**मरोन कीर्ती उरवावी । तो सत्वगुण ।।**

ओवी क्रमांक ८ पर्यंत सत्वगुणाची प्रंशसा केली आहे. ओवी क्रमांक ९ ते ८५ यात सत्वगुणांची लक्षणे सांगितली आहेत. चिंतनाच्या दशक २ समास ७ ओवी क्रमांक ६५.

**साधा सरळ सोपा अर्थ :-** स्वतः चे काम करण्यापेक्षा दुसऱ्याचे काम करण्याची ओढ लागते,मरून कीर्ति उरवावी अशी ज्याची वागणूक असते तो सत्वगुण होय. स्वतः च्या कामापेक्षा दुसऱ्याचे काम करण्यासाठी त्याला मदत करावी,अशाप्रकारे ‘ परोपकार: पुण्याय । पापाय परपीडनम् । या पाप पुण्याच्या व्याख्या लक्षात घेऊन आपले जीवन जगतो व अजरामर होतो. तो सत्वगुणी होय. इथे एक मनाचा श्लोक एकदम चपखल बसतो.तो असा:-

**देह त्यागितां कीर्ती मागें उरावी। मना सज्जना हेचि क्रीया धरावी।**
**मना चंदनाचे परी तां झिजावे। परी अंतरी सज्जना नीववावे॥८॥**

श्रीसमर्थ हे लोकशिक्षक होते.एखादी गोष्ट पुनः पुन्हा समजावून सांगत असत. कधी मनाच्या श्लोकातून तर कधी दासबोधातून.

**२-७-६५ आपकार्याहून जीवीं ।परकार्यसिद्धी करावी ।मरोन कीर्ती उरवावी । तो सत्वगुण ।।६५।।**
**१८-४-२६ जे जे देहे धरुनी आले। ते ते कांहीं करून गेले ।हरिभजनें पावन जाले। कितीयेक ।।२६।।**

श्रीरामवतारातील श्रीरामाची ‘श्रीरामनिती’ आज काही हजार वर्षापर्यंत अतिगौरवाने टिकली आहे.सत्याचे राज्य आणि नितीचे साम्राज्य ह्या गोष्टी सर्वकाळ अमरच ठरल्या आहेत.याचे कारण ‘देव भक्तांचा कैवारी। देव पतितांसी तारी।‘असे हे परमेश्वराचे ब्रिदवाक्यच आहे.भारतामध्ये आत्ता पर्यंत परमेश्वराचे अनेक अवतार झाले, ते सर्व अवतार देशावर,धर्मावर,समाजावर कठीण प्रसंग आले म्हणूनच झाले आहेत.

चंदनाचे वाळलेले लाकूड दगडाच्या सहाणेवर उगाळले,घासले की चंदन स्वतः झिजून अनेकांना आपला सुगंध देत असते.हाच न्याय मानवी जीवनात मानवांनी सांभाळला तर तो योग्यच दिसतो.असे हे अत्यंत महत्त्वाचे पारमार्थिक जीवन जगत असताना मितभाषा असावी,मृदुमधुर बोलण्याचा अभ्यास करावा.आपण ज्या मानवी समुदायामध्ये राहतो त्यांना आपल्या सत्कृतीनेच समाधान प्राप्त करून द्यावे.परमार्थ-मार्गार वाटचाल

करीत असताना सद्गुरूकृपेने हे सर्वही सद्गुण साधकाच्या अंगी प्राप्त झालेले असतात.कोणतीही गोष्ट अथवा कार्य 'केल्याने होत आहे रे।आधी केलेचि पाहिजे.

सर्व योनीतं नरदेह श्रेष्ठ, कारण नरदेहाचे ठिकाणी असलेले ज्ञान होय.येवढा जर मानवाला श्रेष्ठ अधिकार आहे, तर त्याचेकडून कार्यही श्रेष्ठ दर्जाचे झाले पाहिजे. नाहीतर तो नुसता नावाचा मानव किंवा मानवच नव्हे. मम वर्त्मानुवर्तन्ते मनुष्याः पार्थ सर्वशः (भ.गी. ३- २३) कीर्तीस उरवावे। येणें प्रकारें ।। (दा. १२-१०-१३) यानेच सज्जनांना संतांना - संतोष - होतो. देह आला तसा जाणार. पण आत्मस्वरूपाने तू मागे उरावेस. म्हणजे तू तू आत्मज्ञान करून घ्यावेस. हे ज्ञान संतकृपेने होते. म्हणून त्यांना प्रणिपात करून परिप्रश्न, सेवा इत्यादि मार्गानी संतुष्ट ठेवावे.

**आता श्रवण केलियाचें फळ । क्रिया पालटे तात्काळ ।**
**तुटे संशयाचें मूळ । येकसरा ।। १ - १ - २८।।**

तसे पाहिले तर या सर्व ओव्यांचा अर्थ बेलसरेंनी दिलेला आहे. ही ओवी व इथून पुढे येणाऱ्या ओव्या फलश्रृतीच्या आहेत. ग्रंथाचा अभ्यास केल्याने मला काय मिळेल असा प्रश्न वाचकाच्या मनात येणे सहाजिकच आहे. त्या प्रश्नांचे उत्तर समर्थ या ओव्यांमधून देत आहेत. आपणही श्रद्धापूर्वक या ग्रंथाचा अभ्यास कराल तर ही फले आपण देखील प्राप्त करून घेऊ शकता.

या ओवीच्या प्रथम चरणात समर्थ हेच सांगायला सुरुवात करीत आहेत. 'क्रिया पालटे तात्काळ' याचा अनुभव अभ्यासकाला लगेच येतो. दासबोधाचा अभ्यास करता करता आपल्या लक्षात येते की आपल्या वागण्यात बदल होत आहे. पुर्वी लहान सहान बाबीं वर चिडणारा मी आता शांत रहायला शिकलो आहे. बारीक सारीक बदल लगेच लक्षात येतात तर काही बदल कालांतराने दिसू लागतात. तीसरा चरण आहे 'तुटे संशयाचे मूळ येकसरा ।' माणसाला सर्वात मोठा संशय असतो की परमात्मा आहे की नाही? 'दूसरा संशय हा कि समर्थ सांगतात ते खरेच आहे काय?' हे दोनच नव्हे तर मनातले सारे संशय तिरोहित होतात. इथे संशयाचे मूळ तुटे म्हटले आहे. म्हणजे आपली संशय घेणरी प्रवृत्तीच नाहीशी होते.

आता पुढची ओवी बघा - 'मार्ग सापडे सुगम।' दासबोध अभ्यासाचा सोपा मार्ग तर सापडतोच पण परमात्म-प्राप्तीचा मार्ग देखील सोपा होत जातो. अगदी सोपी साधना करून हे साध्य होते. सायोज्यमुक्ती हा शब्द समजून घ्या म्हणजे या चरणाचा अर्थ देखील लक्षात येईल. गृहपाठ म्हणून हे करा. बाकी साऱ्या ओव्यांचा अर्थ सोपाच आहे सहज समजतील

---

## १० जानेवारी २०२४

**नीच उत्तर साहाणें । प्रत्योत्तर न देणें ।**
**आला क्रोध सावरणें । तो सत्वगुण ।। (२-७-६७) .**

मागच्या ६६ व्या ओवीत सांगितले आहे की सत्वगुण वाढीस लावायचा असेल तर ' नका करू गुणदोष उठाठेवी । विवेकें लावावी बुध्दि जनां ॥

साधा सरळ सोपा अर्थ :- दु:ख गिळणे,निंदकावर उपकार करणे,इंद्रिय दमन करणे,नामस्मरणी विश्वास असणे,संताला शरण जाणे,त्याची कृपा होणे,ग्रंथाचे वाचन, श्रवण,मनन करणे ही सत्वगुणाची लक्षणे आहेत. आपण अन्याय केला नसताना कोणी आपल्याला टोचून बोलतात,अनेक प्रकारे दु:ख देतात,ते सगळे जो शांतपणे सहन करतो तो सत्वगुण होय.( आपण हे पहात आहोत.) समर्थांच्या काळात आणि वर्तमान काळात परिस्थिती तशीच आहे फक्त नावे बदलली आणि कार्यं बदलली.

**बोलता बोलता नीच उत्तरे । ताडित उडाले परस्परे ।**
**श्रोते आणि वक्ते रुधिरे । उभे न्हाले ॥ ३.२३ ॥ जुना दासबोध**

इथे परत एकदा मनोबोधातील ७ वा श्लोक जुळून येतो.

**मना श्रेष्ठ धारिष्ट जीवी धरावे । मना बोलणे नीच सोशीत जावें ॥**
**स्वयें सर्वदा नम्र वाचे वदावे । मना सर्व लोकांसि रे नीववावें ॥ ७॥**

धैर्य, वादळी मेघांना तोंड देत उभे असलेल्या पर्वत - शिखरासारखे स्थिर असले पाहिजे. मानसिक पातळीवर उपेक्षा, तुच्छता, तिरस्कार, अवहेलना, निंदा राहते आणि म्हणून साधकाने ह्या बाबतीत जितका ठेवता येईल तेवढा सोशिकपणा ठेवला पाहिजे.

परिस्थितीवर कोणाचेही नियंत्रण नसते. ती खऱ्या अर्थाने कोणी सुधारू शकत नाही.बिघडणे आणि सुधारणे हे दोन्हीहि स्वतःपुरतेच मर्यादित असते. तुम्ही बोलत राहा. मी ऐकतच नाही असे नको. शब्द सौम्य आणि उच्चारण नम्रतेचे असले पाहिजे आपली भूमिका काय आहे ते अवश्य स्पष्टपणे सांगितली पाहिजे.

आपल्या भोवती जसे सगळेच ज्ञानेश्वर - तुकाराम नसतात, त्याप्रमाणे सगळेच दुर्योधन - दु:शासन नसतात. दुष्टावा नाहीसा करता येत नाही पण अपसमज दूर होऊ शकतात. प्रत्येक माणूस आपल्या विचारशक्तीने बऱ्याच बऱ्यावाईट विचार प्रतिमा निर्माण करतो.माणूस ज्या प्रकारची भाषा वापरतो त्या तऱ्हेचा आकार त्या प्रतिमांना येतो.या कारणामुळे संतांच्या विचारांचा प्रभाव शतकानुशतके जशाच्या तसाच टिकून राहतो.

**गुणातीत होणे म्हणजे काय ?**

माणूस सत्व, रज वा तमोगुणी असू शकतो. त्याच्या वागण्यावरून, स्वभावावरून कोणत्या गुणाचा प्रभाव त्याचेवर आहे हे समजू शकते, पण गुणातीत म्हणजे काय, हा माणूस दिसतो वागतो कसा हा प्रश्न उठणे स्वाभाविक आहे.

याचे निराकरण व्हावे म्हणून आपल्याला गीतेच्या १४ व्या अध्यायात २४, २५ व २६ हे श्लोक अभ्यासावे लागेल. त्यात भगवंतानी मान-अपमान, प्रिय-अप्रिय वगैरे विरुद्ध गुणांच्या जोड्या देऊन या मध्ये जो सम असतो तो मनुष्य गुणातीत असतो असे भगवंतानी सांगितले आहे. कुणी मला दुषण दिले तर मला वाईट वाटेल तर माझी स्तुति केली तर मला आनंद होईल. सामान्य माणसाच्या बाबतीत असे होणे स्वाभाविक आहे पण गुणातीत मनुष्य अशी कोणतीही प्रतिक्रिया देणार नाही. सर्व सामान्य माणसा सारखी प्रतिक्रिया नसणे हे गुणातीताचे लक्षण आहे किंबहुना कोणतीही प्रतिक्रिया नसहा गुणातीताचा स्थायीभाव असतो.

एकदा स्वामी रामतीर्थ फिरायला एकटेच निघाले तेव्हा वाटेत मुलांनी त्यांना दगड मारले, ते मुलांना काहीही म्हणाले नाहीत पण घरी आल्यावर त्यांनी सांगितले, "आज बड़ा मजा आया, बच्चों ने राम (स्वामी रामतीर्थ) को पत्थर मारे." म्हणजे हे शरीर व मी वेगळा आहे, जे झाले ते शरीराला झाले, माझा त्याचेशी संबंध नाही. अशी अवस्था ब्रह्म प्राप्ति झालेल्या पुरुषाची असते म्हणून त्यांना नेमके काय वाटते हे आपण समजू शकणार नाही.

आपण सत्वगुणी तर होऊ शकतो पण गुणातीत व्हायचे असेल तर मात्र कठोर साधना करावी लागेल. ब्रह्म प्राप्ति झालेला पुरुष गुणातीत असतो, ज्याने तीन्ही गुणांचे अतिक्रमण केले आहे असा पुरुष गुणातीत असतो. अवलिया असलेले गजानन महाराज हे गुणातीत होते असे म्हणता येईल. विकल्पांच्या पलिकडे गेलेला म्हणून निर्विकल्प म्हणता येईल.

ज्ञानी पुरुष विषमतेने व्यवहार करीत असल्यासारखा दिसतो पण त्याची अंतःकरण वृत्ती सम अशा परब्रह्माचे ठिकाणी स्थिर झाली असल्याने त्याच्या अंतःकरणात विषमता उत्पन्न होत नाही. त्याचे व्यवहार केवळ प्रारब्धानुसार असतात, तो सदा साक्षी बनून रहातो.

---

## ११ जानेवारी २०२४

**मन भलतीकडे धावें ।तें विवेकें आवरावें ।**
**इंद्रियें दमन करावें ।तो सत्वगुण।। दा २ - ७ - ७०।।**

दोन तारखेला मी चिंतनासाठी घेतलेली ओवी क्रमांक ५९ आणि आजची ही ७० वी ओवी यामध्ये साम्य आहे. मनाचे भलतीकडे धावणे व विवेकाने त्याला आवरणे या संबंधीच्याच दोन्ही ओव्या आहेत. संत बहिणाबाईंनी मनाबद्दल लिहितांना म्हटले आहे -

**मन वढाय वढाय । उभ्या पिकातलं ढोर ।**
**किती हाकला हाकला । पुन्हा येते पिकावर ।।**

नाठाळ गुराची उपमा बहिणाबाई या ठिकाणी मनाला देत आहेत. मनाबद्दल असे प्रश्न सामान्य माणसाला देखील पडत असतात. श्रीमद्भगवद्गीतेमधे अर्जुन देखील भगवंताला आपली ही अडचण सांगतो-

चञ्चलं ही मनः कृष्ण प्रमाथि बलवद्दृढम् ।
तस्याहं निग्रहं मन्ये वायोरिव सुदुष्करम् ।। गीता ६ - ३४।।

भावार्थ – कारण हे कृष्ण! हे मन फार चंचल, दुस्तर, मोठे दृढ आणि बलवान आहे. त्यामुळे त्याला वश करणे वाऱ्याला अडविण्या सारखे अत्यंत कठीण आहे. याचा अनुभव आपल्याला देखील आहेच. पण आपण यावर काही उपाय शोधला आहे काय? नाही. भगवंताने यावर उपाय पुढच्याच श्लोकात सुचविला आहे. भगवान म्हणतात -

**असंशयं ही महाबाहो मनो दुर्निग्रहं चलम् ।**
**अभ्यासेन तु कौन्तेय वैराग्येण च गृह्यते ।। गीता ६ - ३५।।**

भावार्थ – हे महाबाहो! हे मन फार चंचल आहे आणि याचा निग्रह करणेही फार कठीण आहे हे तुझे म्हणणे अगदी योग्य आहे. परंतु हे कौन्तेय! अभ्यास आणि वैराग्याद्वारा याचा निग्रह केला जातो.

या नाठाळ मनाला वारंवार ध्येयाकडे लावणे हा अभ्यास आहे, हा अभ्यास निरंतर करायला हवा. अभ्यासाच्या मदतीसाठी वैराग्य देखील हवे. संसाराच्या भोगाची आसक्ती जेवढी कमी होईल तेवढे मन परमात्म्यात लागेल. ही आसक्ती कशी कमी करावी याचे उपाय रामसुखदास महाराजांनी साधक संजीवनी या पुस्तकात दिले आहेत. ज्याला हे जमले तो सत्त्वगुणी आहे असे समर्थांनी या ओवीत सांगितले आहे.

मन ताब्यात आले की इंद्रियांचा संयम जमतो, अभ्यासाने मन आवरता येते. सत्वगुण वाढवायचा, जोपासायचा आहे म्हणजे मन आपोआपच ताब्यात रहाते. रथाचा मालक संयमी व विवेकी असेल तर बुद्धी सहजच त्याच्या ताब्यात रहाते. मन भगवंतात लावले की वैराग्य सहज अंगी बाणते. आपली साधना, उपासना वाढवत राहिली पाहिजे. साधनेत निरंतर वाढ व समर्थांना सतत प्रार्थना हाच उपाय आहे.

---

## १२ जानेवारी २०२४

**संत देखोनि धावें । परम सुख हेलावे ।**
**नमस्कारी सर्व भावें । तो सत्वगुण ।। २-७-७७**

श्लोकाचा सरळ अर्थ:- सत्वगुणी माणसाला संत भेटीचे मोठे महत्त्व असते.संत भेटीसाठी आतुर असल्याने तो अक्षरशः धावत सुटतो.ही भेट म्हणजेच सर्वोच्च सुख आहे अशी त्यांची भावना असते.अष्टसात्विक भाव जागृत होऊन वंदन घडते.अशी ज्याची अंतरस्थिती असते, तो सत्वगुणी समजावा. वारीचे वारकरी पंढरपूर जवळ येताच अक्षरशः धावत सुटतात. वास्तविक शरीर दमलेले, पाय भेगाळलेले पण ईश्वर भेटीची जेवढी भूक तेवढीच तहान वाळवंटी जी संत मंडळी भेटतात त्यांना भेटण्याची. भेटल्यावर आनंद सोहळा कसा तर एकमेका लोटांगणे जाती. सारेच विठ्ठल भक्त सारेच विठ्ठलमय.. अद्वैत सोहळा अनुभवण्यासाठी आतुर. म्हणून हे धावणे.

संत कोणाला म्हणावे? समर्थ सांगतात जो भगवंत जाणून आहे.इथे माहिती नाही तर सूक्ष्म जाणीवेने प्रत्यक्ष अनुभव अनुभूती घेतलेली आत्मप्रचीत विभूती अपेक्षित आहे.

**६ .१ .१६ जो जाणेल भगवंत | तया नांव बोलिजे संत |**
**जो शाश्वत आणि अशाश्वत | निवाडा करी ||१६||**

शाश्वत काय अशाश्वत काय याचा निवाडा झालेला असून तो कसा करावा हा बोध इतरांना व्हावा म्हणून विदेह स्थिती असूनही देह धरुन असतात. ते संत.

**१ .५ .१६संत आनंदाचें स्थळ| संत सुखचि केवळ |**
**नाना संतोषाचें मूळ| ते हे संत ||१६||**

संत चिदानंद स्थितीत सतत असतात.परमसुखाचे अधिकारी असतात.ब्रह्ममय झाल्याने संत व परमानंद एकच असतात.ते नाना संतोषाचे मूळ म्हणजे प्रत्यक्ष परब्रह्म स्वरूप असतात.त्यांची श्रीमंती अपूर्व असते.ते मोक्षाचे अधिकारी असतात.

**१ .५ .२१ मोक्षश्रिया आळंकृत| ऐसे हे संत श्रीमंत |**
**जीव दरिद्री असंख्यात| नृपती केले ||२१||**

जीव दरिद्री का तर तो द्वैतात जगत असल्याने तो अद्वैत आनंदाला पारखा होतो.प्रपंच सन्मुखतेने परमात्म्याला ओळखत नाही, विन्मुख होतो.हे त्याचे जन्मोजन्मीचे दारिद्र्य घालवायचा अधिकार संतांचा असतो.गुरुचरित्रात स्वामी एका रजकाला पुढील जन्मी राजाचा जन्म देतात असे एक कथानक आहे व ती इच्छा पूर्ण झाल्यावर भेट देऊन मुक्त करतात असे वाचायला मिळते. ही संतांची महती जो जाणून असतो,जो स्वतःचा उद्धार करून घ्यायला उत्सुक असतो तो सत्वगुणी संत भेटल्यावर देहभान विसरून धावतच जाणार.

---

## १३ जानेवारी २०२४

**भाविक सात्विक प्रेमळ ।शांति क्ष्मा दयासीळ ।**
**लीन तत्पर केवळ ।अमृतवचनी ।। दा २ - ८ - ३।।**

दुसऱ्या दशकातील आठवा समास सद्विद्येचा आहे. कुविद्या लक्षण तमोगुणी माणसाचे असते तर या उलट सत्त्वगुणी माणसाचे लक्षण सद्विद्येचे असते. या समासात समर्थांनी सत्वगुणी माणसाची सद्विद्येची लक्षणे दिली आहेत. यावरून आपला सत्वगुण किती प्रबळ आहे ते लक्षात येईल. समर्थ म्हणतात -

**ऐका सद्विद्येची लक्षणे । परम शुद्ध सुलक्षणें ।विचार घेतां बळेंचि बाणे । सद्विद्या आंगीं ।।**
**सद्विद्येचा जो पुरुष । तो उत्तम लक्षणी विशेष ।त्याचे गुण ऐकतां संतोष । परम वाटे ।।**

सद्विद्येची लक्षणे कशाकरिता आहेत, हे शुद्ध लक्षणाचे गुण ऐकून माणसाला संतोष वाटतो हे सांगून समर्थांनी ही लक्षणे सांगायला सुरुवात केली आहे. सर्व प्रथम आजच्या चिंतनाचीच ओवी आली आहे.

**भाविक सात्विक प्रेमळ । शांति क्ष्मा दयासीळ ।**
**लीन तत्पर केवळ । अमृतवचनी ।।**

इतर ओव्यांमध्ये विरुद्ध अर्थाचे गुण दिले आहेत पण या ओवीत मात्र एक एक गुणच वर्णन केले आहेत. सत्वगुणी माणूस भाविक आणि प्रेमळ असणारच आहे. त्याचे चित्त सदा शांतच असते. क्षमा आणि दया सत्वगुणी माणसाचा स्थाई भाव असतो. त्याचे वागणे लीन, सर्व कार्यासाठी सदा तत्पर असतो. याची वाणी गोड असते. समर्थांनी अमृतवचनी हा विशेष शब्द योजिला आहे.

सज्जनाची व्याख्या करतांना तुकाराम महाराज म्हणतात, मृदु सबाह्य नवनीत। ऐसे सज्जनाचे चित्त ।" सत्वगुणी माणूस अगदी मऊ व स्वार्थरहित असतात. या समासातील बहुतेक लक्षणे या माणसापाशी असतात. कुविद्या लक्षणे असतील तर ती टाकून सद्विद्येची ही लक्षणे अंगिकारावी म्हणून ही लक्षणे समर्थांनी आवर्जून सांगितली आहेत. आध्यात्मिकता अंगी बाणायची असेल तर आधी आपली वर्तणूक सुधारावी लागेल. तुमचे वागणे आदर्श नसेल तर तुम्ही परमार्थिक होऊच शकत नाही. म्हणून मला माझ्या विचारांमध्ये, वर्तनामध्ये सुधारणा करावी लागणार आहे. समर्थ मनाच्या श्लोकात सांगतात -

**दिनाचा दयाळू मनाचा मवाळू । स्नेहाळू कृपाळू जनीं दास पाळू ।**
**तया अंतरी क्रोध संताप कैचा । जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ।।५६।।**

ही सगळी लक्षणे सत्वगुणी माणसाची आहेत व ती आपल्या अंगी बाणायची आहेत. आज एवढे पुरे.

---

## १४ जानेवारी २०२४

**२ .८ .४ परम सुंदर आणी चतुर ।परम सबळ आणी धीर ।**
**परम संपन्न आणी उदार ।आतिशयेंसीं ।।४।।**

दुसरा दशक आठवा समास हा सद्विद्या निरूपण हा आहे.ही आदर्श पुरुषाची लक्षणे आहेत. श्रीरामचंद्र व मारुतीराय हे समर्थांचे आदर्श असल्याने हा समास वाचताना रामायण आठवत रहाते. हे सगुण रूप वर्णन केले आहे. ओवी क्रमांक ३-१० मधे सहसा एकत्र न आढळणा-या गुणांच्या जोड्या आहेत. त्या एकावेळी असणे हे आदर्श पुरुषाचे लक्षण आहे. सौंदर्य आणि चातुर्य एकत्र अभावाने दिसते.कारण मधे अहंकार येतो.

इथे रूपाइतकेच मनाचे सौंदर्य समर्थांना अपेक्षित असावे. परम सुंदर म्हणजे अतिशय सुंदर. बलवान माणसाकडे धीर अभावाने आढळतो कारण शक्तीचा प्रयोग करण्याचा उतावळेपणा असतो.( सध्या सुरू असलेली जागतिक युद्धे ही यांचे प्रमाण आहेत) धीर असलेला माणूस काहीवेळा आपल्या शक्तीचा वापर उशीरा करतो व बरेचदा योग्य वेळ हातून निसटते.( नेपोलियनला इंग्लिश खाडीत पाय ठेवायला काही मिनिटे उशीर झाला आणि सगळं गणितच बिघडले)

परम सबळ म्हणजे अत्यंत बलवान. मारुती रायांची भव्यता साक्षात डोळ्यासमोर येते. धीरवीर म्हणजे धैर्य व वीरता यांचा सुरेख संगम. संपन्न आणि उदार मीपण अशीच जोडी. कर्णासारखी संपन्नता आणि उदारता अभावाने आढळते म्हणून कर्णाचे नाव घेतले जाते.सुबत्ते बरोबर कंजुषी तरी येते किंवा उधळपट्टी तरी घडते.संपत्तीचा विवेकाने वापर व्यक्ती व समाज दोघांना हितकारक असतो. परम संपन्न आणि परम उदार म्हणजे अत्यंत उदार व अत्यंत संपन्न.असा तर परमेश्वरच असू शकतो.श्री आणि मोक्ष देणारा असा तोच असू शकतो. म्हणून या जोड्या महत्वाच्या आहेत.हे गुण आपण अंगी बाणवावे म्हणून समर्थ सांगत आहेत.

---

## १५  जानेवारी २०२४

**परम ज्ञाता आणि भक्त ।माहा पंडित आणि विरक्त ।**
**माहा तपस्वी आणि शांत ।आतिशयेंसीं ।। दा २ - ८ - ५।।**

सद्विद्या निरूपणाच्या समासात चवथ्या ओवीपासून दहाव्या ओवीपर्यंत समर्थांनी लक्षणांच्या काही जोड्या दिल्या आहेत. या जोडीतील एक लक्षण असेल तर दुसरे लक्षण सहसा नसते. ज्याच्या अंगी एक जरी जोडी असेल तो थोर म्हणविला जातो.

परम ज्ञाता आणि भक्त - ज्ञानी माणूस बहुश्रुत असतो, ज्ञानाचा त्याला अभिमान असतो. तो भक्त सहसा असत नाही पण जर कोणी ज्ञानी भक्त असेल तर सोन्याहून पिवळे. माहापंडित आणि विरक्त - पंडित माणसाचे आयुष्य ज्ञान ग्रहण करण्यात खर्ची पडते. एवढे ज्ञान मिळविले आता त्याचे जोरावर कमाई करायची इच्छा होणे स्वाभाविक आहे. विरक्ति यांचेपासून शेकडो मैल दूर असते.

दोन्ही गुण असणारा पुरुष दुधात साखर असतो, क्वचितच सापडतो. प्रवचनकारांचे दाखले देतांना कधी कधी सुनिल दादा सांगायचे कि जगत मिथ्या आहे यावर प्रवचन करायला इतके इतके रुपये मला द्यावे लागतील असे प्रवचनकार तोंडाने मागतो.

सदाशिव शास्त्र्याची एक कथा आपणास माहितच असेल पण ज्यांना ठाऊक नाही त्यांचेसाठी थोडक्यात देत आहे.

काशीचे सदाशिव शास्त्री येवलेकर गाढे विद्वान होते. ज्ञानाचा अहंकार झाला होता. गावो गावच्या शास्त्री पंडितांशी वाद विवाद करुन त्यांना हरविण्याचा त्यांनी चंगच बांधला होता. हाती एक मशाल व जानव्याला सुरी बांधून ते वाद करायसाठी जात. मी हरलो तर मशाल विझवून सुरीने आपली जीभ कापेन असा पण त्यांनी केला होता.

अखेर ते समर्थांकडे आले व वाद करण्यासाठी आग्रह करू लागले. तिथून एक मोळी विक्या चालला होता, त्याला समर्थांनी थांबविले. मोळी बाजूला ठेवून तो आला व सर्वांना त्याने प्रणाम केला. समर्थांनी त्याला विचारले, "तू कोण आहेस?" त्यावर त्याने उत्तर दिले, " मी महार आहे, चाफळच्या राम मंदिरात मोळी टाकतो." कल्याणाने त्याचे समोर एक रेघ ओढली, समर्थांनी त्याला रेषेच्या अलिकडे बोलावले व परत प्रश्न विचारला की "आता तू कोण आहेस?" त्यावर तो म्हणतो, "मी शूद्र आहे." कल्याणाने आणखी एक रेघ ओढली व समर्थांनी त्याला रेघ ओलांडायला लावले व विचारले, "आता तू कोण आहेस?" तो म्हणतो, "मी वैश्य आहे." पुनः पुनः रेघ ओलांडून त्याला समर्थांनी प्रश्न विचारले, त्यावर त्याने अनुक्रमे मी क्षत्रिय आहे, मी ब्राह्मण आहे असे उत्तर दिले. प्रत्येक वेळी त्याची कांती व रंग पालटत गेले. पुढे त्याने "मी दशग्रंथी ब्राह्मण आहे" असे उत्तर दिल्यावर सदाशिव शास्त्र्याला त्याचेशी वाद करायला सांगितले. या मोळी विक्याने शास्त्र्याचा तीन वेळा पराभव केला. पराभव मान्य करून अखेर शास्त्र्याने मशाल विझविली व जीभ कापणार इतक्यात समर्थांनी त्याला थांबविले. सदाशिव शास्त्र्याला केशवस्वामी नाव देऊन समर्थांनी आपला शिष्य केले.

माहातपस्वी आणि शांत - उद्दालिक, जमदग्नि आणि असे किती तरी तपस्वी पुराणात दिसतात कि जे क्रोधी होते. दोन्ही गुण असणारा व्यासांसारखा विरळाच. हे गुण अंगी असणे अशक्य नाही. या जोड्या अंगी असणारे महापुरुष आहेत. समर्थ स्वतःच असे महापुरुष आहेत. समर्थ दासबोध ग्रंथात काही ठिकाणी आपले आत्मचरित्रच सांगतात, त्यापैकी या ओव्या आहेत.

समर्थांनी या ओव्यांचा समावेश करून आपल्याला सांगितले आहे कि निदान चार सहा तरी गुण आपण अंगिकारावे, म्हणजे आपल्यातील सत्वगुण वाढीस लागेल

## १६ जानेवारी २०२४

**राजा आणी धार्मिक ।शूर आणी विवेक ।**
**तारुण्य आणी नेमक ।आतिशयेंसीं ।।दा २ - ८ - ७।।**

सद्विद्येच्या जोड्या असणाऱ्या सात ओव्यांमधील ही एक ओवी. दोन गुण जे सहसा एकत्र नांदतांना दिसत नाहीत, ते प्रत्येक चरणात समर्थांनी गुंफले आहेस. राजा आणी धार्मिक - साधारणतः राजाला कोणाचाही अंकुश स्वीकारणे मंजूर नसते. नाही म्हणायला छत्रपती शिवरायांसारखे काही राजे असतात. "हे राज्य व्हावे ही तो श्रींची इच्छा" असे त्यांचे मत होते. आपले राज्य समर्थांच्या झोळीत समर्थांनी याच कारणाने टाकले होते.

साधारणपणे जगातील सर्व धर्माचाऱ्यांना राज सत्तेवर वर्चस्व गाजवावेसे वाटते तर काही राज्यकर्त्यांना हे मंजूर नसते, त्यामुळे धर्मसत्ता विरुद्ध राज्यसत्ता असा संघर्ष झाल्याचे इतिहास सांगतो. युरोपातील एक राजाने (त्याचे नाव आठवत नाही) पोपचे वर्चस्व सहन न झाल्याने आपला नवीन पंथच निर्माण केला व आपल्या या पंथाचे नाव प्रोटेस्टंट पंथ असे ठेवले. त्याने पोपचे वर्चस्व अमान्य करून स्वतःलाच प्रोटेस्टंट पंथाचा प्रमुख घोषित केले.

शूर आणि विवेक – महाराष्ट्राच्या राजसत्तेचे वर्णन करतांना कवि म्हणतो, "विक्रम वैराग्य एक जागी नांदती ।" म्हणजे शौर्य व विवेक यांचा समन्वय इथे आहे. मोगली शासकांमध्ये शौर्य असेल तेथे विवेकाचा अभाव आढळतो. स्वतःच्याच वडिलांना तुरुंगात टाकणे, आपल्याच भावांची हत्या करणे असे अविवेकी प्रसंग आढळतात, पण मराठ्यांची सत्ता विवेकपूर्ण होती. तारूण्य आणी नेमक - याचा अर्थ तारुण्य असून अतिशय नियमाने चालणे असा होतो.

शिवाजी महाराजांच्या जीवनात असा एक प्रसंग आलेला आढळतो ज्यात महाराज निती-नियमांच्या बंधनात असल्याचे दिसून येते. कल्याणच्या सुभेदाराच्या सुनेची ही कथा आहे. शिवरायाचे सैन्याने कल्याणचा खजीना लुटते वेळी त्यासोबत असणाऱ्या सुभेदाराच्या सुनेला ताब्यात घेऊन महाराजांना नजराणा म्हणून पेश केले, तेव्हा राजांनी तिला ससन्मान साडी-चोळी देऊन परत पाठविले. शिवरायांच्या अशा काही कथा अजून आहेत पण विस्तार भयामुळे इथेच थांबतो.

---

## १७ जानेवारी २०२४

**प्रात:काळी उठावें ।कांहीं पाठांतर करावें ।**
**येथानुशक्ती आठवावें । सर्वोतमासी ||११.०३.१५||**

**प्रस्तावना :** रामाची भक्ती आणि सेवा करण्याकरिता भगवान शंकराने जे अकरा अवतार घेतले, त्यातील हनुमान हा अकरावा अवतार. हनुमंताला श्री समर्थ भीम म्हणतात. श्री समर्थांना अकरा आकड्याचे मोठे आकर्षण. हनुमान हा कर्म भक्ती आणि ज्ञान यांची सुंदर प्रतीक आहे. या दशकापासून श्री समर्थांना कर्म, भक्ती आणि ज्ञान यांचा समन्वय सांगावयाचा असल्यामुळे या दशकाला ते भीम दशक म्हणतात.

तसेच या समासात श्री समर्थ प्रपंच आणि परमार्थ यांचा समन्वय साधून प्रपंचात राहून परमार्थ कसा प्राप्त करावा आणि परमार्थ प्राप्तीचे ध्येय ठेवून प्रपंचात कसे आचरण करावे अशा दृष्टीने हा बोध या समासाच्या अंतिम टप्प्यामध्ये द्यायला सुरुवात करतात.

**भावार्थ :** सकाळी उठल्यापासून ते रात्री झोपेपर्यंत आपली दिनचर्या कशी असावी किंवा सांसारिक माणसाने आपला दिवस कसा व्यतीत करावा यावर प्रकाश टाकताना श्री समर्थ मनाचे श्लोक मध्ये देखील म्हणतात...

**प्रभाते मनी राम चिंतीत जावा | पुढे वैखरी राम आधी वदावा |**
**सदाचार हा थोर सांडू नये तो | जनी तोचि तो मानवी धन्य होतो ||४||**

प्रातःकाळी उठून "प्रभाते मनी राम चिंतीत जावा " ....ही जीवनाची खरी प्रभात आहे की ज्यावेळी मनुष्याला या निद्रेने खऱ्या अर्थाने पुन्हा एक दिवस जन्म दिला आहे. जीवन बदलण्याची केवढी सुंदर संधी नियतीने आपल्याला दिली आहे. असा जन्म प्राप्त झाल्यानंतर त्या दिवसाची सुरुवात भगवंताच्या स्मरणांनी करावी. त्याचबरोबर काही पाठांतर करावे.

लहानपणी आपली बुद्धी ज्यावेळी ग्रहण करण्याच्या ताकदीची असते अशा वेळेला आपण जे काही पाठ केले, जे काही आपल्या हातून गेलं त्याची विस्मृती काळ सहजासहजी मिटवू शकत नाही. त्यामुळे पहाटेचा वापर पाठांतरासाठी करावा. काहीतरी भगवद्गीतेचे श्लोक, पसायदान, मनाचे श्लोक, ज्ञानेश्वरी मधल्या काही ओव्या, तुकाराम महाराजांची काही अभंग हे पाठ असलेच पाहिजेत. सकाळची वेळ भगवंताच्या स्मरणासाठी अत्यंत अनुकूल आहे.

श्री गोंदवलेकर महाराज देखील हेच म्हणायचे की आपण सकाळी निद्रेतून बाहेर आल्यानंतर प्रथम भगवंताचे स्मरण करावे. त्या स्मरणाला स्नानाची आडकाठी ठेवू नये. ते स्मरण आपण पहिल्यांदा आपल्या कंठाशी धारण करावे. या स्मरणाचे आपल्याला प्रपंचामध्ये खूप मोठे फायदे होऊ शकतात.

सर्वात प्रधान गोष्ट म्हणजे स्मरणाने या उपासनेने आपले चित्त शांत होते. शांत चित्त मनुष्याला योग्य कर्म करण्याची दिशा देऊ लागते. गोंधळलेल्या मन:स्थितीत आपण कधीच नीट कर्म करू शकत नाही. जेव्हा आपले चित्त शांत आहे, सुप्रसन्न आहे, अशा वेळेला आपण जेव्हा कर्माला सुरुवात करतो तेव्हा ते कर्म देखील अत्यंत योग्य रीतीने पार पडू शकते.

अशीच आदर्श दिनचर्या श्री समर्थांनी बारावा दशक -विवेकवैराग्यनाम मधील समास नववा - येत्नसिकवण मध्ये देखील सांगितली आहे....

**प्रात:काळी उठत जावे| प्रातःस्मरामी करावे|**
**नित्यनेमे स्मरावे| पाठांतर ||१२.०९.०९||**

**१८ जानेवारी २०२४**

**ज्या ज्याचा जो व्यापार । तेथें असावें खबरदार**
**दुश्चितपणें तरी पोर । वेढा लावी ।।११-३-१९**

संपूर्ण दासबोधात व्यापार हा शब्दप्रयोग १२ वेळा १२ ओव्यामध्ये आला आहे. पंधराव्या ओवीत दिनचर्या कशी असावी, कशी दिवसांची सुरुवात करावी हे सांगितले आहे.

आजच्या धकाधकीच्या जीवनात सुध्दा ती लागू आहे. समर्थानी या १९ व्या ओवीत. प्रत्येकाने आपापल्या स्वभावाप्रमाणे कार्य करावे.व ते व्यवस्थित करावे किंवा करवून घ्यावे हे सुचविले आहे.

सरकारी नियम व्यावसायिक आचारसंहिता, कोणतेही काम करताना चित्त थाऱ्यावर ठेवून ते करावे.एखादी व्यक्ती जर दु:श्चितपणे काम करीत असेल तर चार प्रकारची त्याचा प्रत्यय किंवा प्रचिती त्या व्यक्तीला आणि इतरांनासुध्दा येते. १) चुका करणे २) फसविले जाणे, ३) एखादी गोष्ट विसरणे ४) पदार्थ सांडणे,लवंडणे आणि नंतर चरफडणे. ही सगळी आळशी आणि दुश्चि माणसाच्या वागणुकीची तऱ्हा असते.

चुकणे ही नैसर्गिक गोष्ट आहे पण चुकांमधून जर बोध घेऊन स्वतःचा वर्तनबदल करीत नसेल तर तो कसला मनुष्य ! ( निदान अभ्यास करू लागल्यावर आपले आपल्याच कळते असे मला वाटते ).११-३ मध्ये प्रापंचिकाची दिनचर्या तर १२-९ मध्ये महंतांची दिनचर्या सांगितली आहे.

---

**१९ जानेवारी २०२४**

**या कारणें सावधान । येकाग्र असावें मन ।**
**तरी मग जेवितां भोजन । गोड वाटे ।। ११-३-२१-**

ओवी क्रमांक १४ ते २७ ह्या ओव्यामध्ये समर्थांनी प्रयत्नशील व वैभवाची कास धरून अध्यात्मजीवन जगणाऱ्या पुरुषांची दिनचर्या कशी असावी ते सांगितले आहे. सरकारी नियम व व्यावसायिक आचारसंहिता,कायदे,व्यवस्थित हिशोब इ. बाबतीत जागरूक असावे.भोळेपणाने कोणाकडून फसू नये. भाबडा,भोळा आणि मूर्ख असा माणूस सात्विक असतो ही कल्पना चुकीची आहे. मनाची एकाग्रता करण्याची युक्ती ज्यांना साधली त्यांनी जीवनात फार मोठे यश संपादन केले.सगळ्यांना माहित असेलली एक गोष्ट पाहू.

भौतिक शास्त्रामध्ये नोबेल पारितोषिकाचा सन्मान प्राप्त करणारे सर सी.व्ही.रमण यांना ती साध्य झाली होती.लहानपणी ते एकदा बागेमध्ये काही प्रयोग करीत असताना त्यांचे वडील तिथे आले.कागदाच्या तुकड्यावर काचेच्या भिंगातून किरण पाडले असता त्यांची ठिपक्याएवढी प्रतिमा पडताच कागद जळू लागतो, हा प्रयोग होता. वडिलांनी चंद्रशेखरला विचारले, “भिंग न वापरता नुसत्या सूर्यकिरणामुळे कागद जळू शकतो का ?” “नाही. कितीही वेळ कागद उन्हात धरला तरीही जळत नाही.” चंद्रशेखर ने उत्तर दिले.” भिंगामुळे कागद का जळाला?” “ भिंगाने सूयकिएका ठिकाणी केंद्रित होतात. त्यामुळे त्यातील उष्णता एकत्र येते आणि त्यामुळे कागद जळतो.” फार छान उत्तर दिलंस.”

वडील पुढे म्हणाले , चंद्रशेखर ,तुझ्या मनाच्या साऱ्या शक्तीचे असेच केंद्रीकरण करायला शिक म्हणजे कोणतेही ज्ञान तुला सहज मिळेल. बालपणीचा हा छोटासा संवाद चंद्रशेखरच्या कायम स्मरणात राहिला आणि मनाची एकाग्रता करून त्यांनी जे नशा संशोधन केले त्यामुळे भौतिक विज्ञानामध्ये नोबेल पुरस्कार प्राप्त होऊन त्यांचे नाव अजरामर झाले आहे.

भोजन करताना सुध्दा जर मनुष्य व्यग्रचित्त असेल तर भोजन गोड लागणार नाही. मन त्यावेळी सुध्दा एकाग्र असले पाहिजे.( म्हणून जेवायला बसायच्या आधी देवाचे / सद्गुरूंचे नाम घेऊन आणि प्रत्येक घासाक्षणी मनात देवाचे नाव घेऊन जेवावे.)

---

## २० जानेवारी २०२४

**पुढें भोजन जालियांवरी ।कांहीं वाची चर्चा करी ।**
**येकांतीं जाऊन विवरी ।नाना ग्रंथ ।।दा ११-३-२२।।**

समर्थांनी दासबोधात सर्वच विषयांना स्पर्श केला आहे असे आपल्याला आढळून येते. अगदी धुणे कसे धुवावे इथपासून तर सायोज्यमुक्ति मिळविण्यास काय करावे हे सर्वच समर्थ समजवून सांगत आहेत.

समर्थांचे तंत्र तर इतके पावरफूल आहे कि "मतीमंद ते साधना योग्य होती" आणि साधकाला तत्काळ मोक्ष मिळवून देण्याची गॅरंटी समर्थ साधकाला दासबोधात देत आहेत.

नरेंद्र (पुर्वाश्रमीचे स्वामी विवेकानन्द) कोलकत्त्यातील सर्वच महापुरुषांकडे एकच प्रश्न घेऊन गेला, "तुम्ही देव पाहिला आहे काय?" हा प्रश्न तो प्रत्येकाला विचारीत असे. त्याला समाधानकारक उत्तर मिळाले नाही. अखेर त्याच्या महाविद्यालयातील इंग्रज प्राध्यापकाने त्याला दक्षिणेश्वरच्या पागल पुजाऱ्याकडे जायला सांगितले. ठाकुरांकडे जाऊन त्याने तोच प्रश्न विचारला. रामकृष्ण परमहंस त्याला म्हणतात, "होय, तुला जेवढ्या स्पष्टपणे बघतो आहे त्यापेक्षा जास्त स्पष्टपणे परमेश्वराला मी बघतो आहे. मी सांगतो तसे वागशील तर तुला देखील परमात्मा बघता येईल.  जी गॅरन्टी ठाकुरांनी नरेंद्रला दिली तीच गॅरन्टी दासबोधात समर्थ आपल्याला देत आहे. 'किती दिवसात मुक्ति मिळेल' असा प्रश्न जेव्हा शिष्य विचारतो तेव्हा समर्थ म्हणतात – "मुक्ती लाभे तत्क्षणीं । विश्वासतां निरूपणीं ।"(८-६-३) दासबोधाच्या सिकवणनिरूपण ( ११-३ ) या समासातील प्रस्तुत ओवी आहे.

या ओवीत प्रामुख्याने साधकाची दिनचर्या कशी असावी हे समर्थांनी सांगितले आहे. आपापला व्यवसाय खबर्दारीने, दुश्चित्तपणा न करता करावा. म्हणजे सारे हिशेब नीट जुळून येतात. अशा प्रकारे चित्त शान्त रहाते व संध्याकाळचे भोजन आनंदात करता येते असे सांगून समर्थ म्हणतात -

**पुढें भोजन जालियांवरी। कांहीं वाची चर्चा करी ।**
**येकांती जाऊन विवरी । नाना ग्रंथ।। दा ११- ३- २२।।**

दररोज संध्याकाळी स्वाध्याय करायला  समर्थ इथे सांगत आहेत. "स्वाध्यायात मा प्रमद" हा उपदेश शिक्षण पूर्ण झाल्यावर शिष्याला गुरु देतात हे वाल्मिकी रामायणात पहायला मिळते. त्याच शिकवणीनुसार समर्थांनी इथे भोजनोत्तर स्वाध्याय करायला सांगितले आहे.

माणसाने मनन करून आपल्या ज्ञानात वाढ करीत जावी. गीता, ज्ञानेश्वरी, भागवत, दासबोध, रामायण, महाभारत या सारख्या ग्रंथांचा अभ्यास करीत असावे. जे वाचन होते त्यावर किंवा इतर विषयांवर जाणकारांशी चर्चा करावी. आणि त्याहीपेक्षा महत्वाचे म्हणजे एकांतात मनन-चिंतन करावे.

ग्रंथ आपण कितीही वाचून "टाकले" असले तरी वारंवार त्यावर मनन-चिंतन आवश्यक आहे. मनन-चिंतन नाही केले तर काय होते? "तरीच प्राणी शहाणा होतो । नाहीं तरी मूर्खचि राहातो ।" अगदी स्पष्टच बोलतात समर्थ.

खरं तर या संपूर्ण समासावरच लिहायला हवे पण मर्यादा पालन आवश्यक आहे. आपण लक्षपूर्वक वाचता, प्रतिक्रिया देता हे बघून आनंद होतो. आपल्या चिअरिंग मुळे लिहायचा उत्साह वाढतो. आपल्या हृदयस्थ परमेश्वराला मी प्रणाम करतो, माझ्या प्रणामांचा कृपया स्वीकार करावा.

---

## २१ जानेवारी २०२४

**तरीच प्राणी शाहाणा होतो ।नाहींतरी मूर्खचि राहातो ।**
**लोक खाती आपण पाहातो ।दैन्यवाणा ।। दा ११ - ३ - २३।।**

संसारी मनुष्याच्या दिनचर्येचा हा समास आहे. दिवसभऱ्यात ग्रहस्थाने कोणत्या वेळी काय काय केले पाहिजे हे समर्थांनी व्यवस्थित मांडले आहे. हा सारा टाईम टेबल आजही अर्थपूर्ण आहे. दिवसभरात आपला व्यवसाय करून संध्याकाळी स्वाध्याय करणे किती आवश्यक आहे ते आपण काल बधितले आहे. समर्थांनी प्रपंची पाहिजे सुवर्ण म्हटले आहे म्हणून दिवसा आपला व्यवसाय, नौकरी करणे प्रापंचिक माणसास आवश्यकच आहे. अन्यथा पैसा मिळणार नाही अन् खायला मिळणार नाही.

आळशी मनुष्य अशी दिनचर्या पाळणार नाही आणि मग त्याची चर्या 'दीन' झालेली दिसते. समर्थांनी याच समासात आळसाबद्दल काय म्हटले आहे –

**आळस उदास नागवणा । आळस प्रेत्न बुडवणा ।**
**आळसें करंटपणाच्या खुणा । प्रगट होती।। ११ - ३ - १२।।**
**म्हणौन आळस नसावा । तरीच पाविजे वैभवा ।**
**अरत्रीं परत्रीं जीवा । समाधान ।।११ - ३ - १३।।**

आळस ही प्रवृत्ती लहानपणापासूनच वाढायला लागते. तिचा बंदोबस्त वेळीच केलेला बरा. या करिता पालकांना विशेष सायास करावे लागतात. अन्यथा तरूणपणी आळस बळावतो आणि निघायला तयार नसतो.

तरूण मंडळींना तर अभ्यास आणि कॉम्पिटीटीव परिक्षांची तयारी महत्त्वाची असते. एकदा वेळ गेली की आयुष्यभर पस्तावण्याशिवाय काहीही करता येत नाही.

**"अब पछतावा क्या करें ।चिड़िया चुग गयी खेत ।"**

अशी परिस्थिति येते. खरचं दीनवाणा चेहरा करून इतरांवर जळत आयुष्य कंठायची वेळ येते. समर्थांना मनुष्य स्वभावाची पारख असल्याने समर्थांनी आळस सोडा, शहाणपण स्वीकारा हे ४०० वर्षांपूर्वीच

सांगून ठेवले आहे. आदर्श दिनचर्या या आधीच्या चिंतनामध्ये आलेली आहे म्हणून ती पुनः सांगण्याचे कारण नाही. समजदार इशारा काफी है.

---

**२३ जानेवारी २०२४**

**कांहीं मेळवी मग जेवी ।गुंतल्या लोकांस उगवी ।**
**शरीर कारणीं लावी ।कांहीं तरी ।। दा ११ - ३ - २५।।**

समर्थांनी याच समासात 'आळस उदास नागवणा ।' असे म्हटले आहे. आळस हा माणसाचा एक नंबरचा शत्रु आहे. आळसावर, आळशी माणसावर समर्थांनी जागोजाग कोरडे ओढले आहेत. सुभाषितकार देखील आळशी माणसाला सुख मिळणे शक्य नाही असे सांगतात -

**अलसस्य कुतो विद्या अविद्यस्य कुतः धनं ।**
**अधनस्य कुतः मित्रं अमित्रस्य कुतः सुखं ।।**

आळसी माणूस दैन्यवाणा असतो असेही समर्थ म्हणतात. आळशी माणसाची जीवनावश्यक गरज देखील पूर्ण होत नाही हे सांगतांना समर्थ म्हणतात -

**आळसें शरीर पाळिले । परंतु पोटेंविण गेलें ।**
**सुडके मिळेनासें जालें । पांघराया ।। दा १९ - ३ - ११।।**

आशय सहज लक्षात येण्यासारखा आहे, म्हणून आळस त्यागण्याचा आळस करू नका. आणि तात्काळ कामाला लागा असे समर्थ सांगत आहेत. २१ तारखेच्या चिंतनात देखील आळसाबद्दल आलेले आहे. सदैव कार्यरत रहा हा समर्थांचा संदेश आहे. समर्थ म्हणतात -

**ऐक सदेवपणाचे लक्षण । रिकामा जाऊं नेदी येक क्षण ।**
**प्रपंचव्यवसायाचें ज्ञान । बरें पाहे ।।**
**कांहीं मेळवी मग जेवी । गुंतल्या लोकांस उगवी ।**
**शरीर कारणीं लावी । कांहीं तरी ।। गंग**

सतत कार्यरत रहा हा समर्थांचा गुरु मंत्र आहे हे लक्षात घ्या. तुम्ही काम करणार नाही तर जेवण कसे मिळेल. आपण तर कार्य करावे आणि इतरांना देखील सत्कार्य करावयास लावावे. 'गुंतल्या लोकांस उगवी' याचा सरळ अर्थ असा आहे की जे केवळ प्रपंचात गुंतले आहेत, निरनिराळ्या अडचणीत सापडले आहेत, त्यांना तिथून काढून परमार्थ मार्गाला लावावे. त्यांच्या प्रापंचिक अडचणी सोडवायला मदत करून त्यांच्या हाती दासबोध द्यावा, जेणे करून ते परमार्थ मार्गाला लागतील.

आपण आपले शरीर जर सतत सत्कार्यात ठेवले तर आळस आपल्याला स्पर्श करणार नाही. 'मना चंदनाचे परि त्वां झिजावे ।' हे समर्थांनी याच साठी सांगितले आहे.

---

## <u>२४ जानेवारी २०२४</u>

**आहे तितुकें देवाचें ।ऐसें वर्तणें निश्चयाचें ।**
**मूळ तुटें उद्वेगाचें ।येणें रीतीं ।। दा ११ - ३ - २८।।**

समर्थांनी एक त्रिकालाबाधित सत्य इथे सांगितले आहे. "आहे तितुकें देवाचें" हे ते सत्य आहे. तो परमेश्वरच या जगाचा स्वामी आहे. मग इथे मी कोण आहे?

**येक मुख्य परमेश्वरु । दुसरी प्रकृति जगदाकारु ।**
**तिसरा आपण कैंचा चोरु । आणिला मधें ।। दा ४ - ९ - ११।।**

मी जर नाहीच आहे तर जे काही माझे आहे असे मी म्हणतो ते माझे कसे असेल. माझे असते तर मृत्यु ते माझ्यापासून कसे हिरावून घेऊ शकेल? सिकन्दर जगज्जेता होता. मृत्युसमयी त्याने आपले मृत्युपत्र तयार केले. तो लिहितो - मी मेल्यावर माझे दोन्ही हात शवपेटीच्या बाहेर काढा, लोकांना हे कळू द्या की सारे जग जिंकणारा सिकंदर मरतांना रिकाम्या हाताने गेला. आज पर्यंत कोणीही संपत्ति सोबत घेऊन गेला नाही. तो पुढे लिहितो कि माझी सुश्रुषा करणारे सारे डाक्टर माझ्या शवयात्रेत पुढे चालावे, लोकांना कळू दे की इतके सारे डाक्टर असूनही याला मृत्यु आला.

समर्थांनी सांगितले आहे कि जे काय मज जवळ आहे ते सारे भगवंताचे आहे. मी केवळ त्या संपत्तीचा ट्रस्टी आहे, अशी भावना असेल तर मनुष्य दुःखी होणार नाही. या जगात मनुष्य आपल्या सुखासाठी संपत्ति जमा करतो पण हे विसरतो कि संपत्ति हे सुखाचे नव्हे तर दुःख-उद्वेगाचे कारण आहे, 'सुख सुख म्हणता हे दुःख ठाकुनी आले ।' म्हणून समर्थ म्हणतात की ही संपत्ति माझी नसून परमात्म्याची आहे अशी भावना असली की सगळ्या उद्वेगाचा समूळ नाश होतो. आपण काकड आरती मध्ये म्हणतो की, "तनुनिर्वाहा आवश्यक ते मी यत्ने संपादावे, अधिक लाभता सत्पात्री मी दान सुख घ्यावे" हा प्रपंच आपण भगवंताचे ट्रस्टी असल्याच्या भावनेने करावा त्यामुळे आपण जीवनात सदा सुखी राहू शकु.

बाबा बेलसरेंनी या समासाची प्रस्तावना लिहितांना १५ मण्यांची माळ सांगितली आहे. त्यातील १३ वा मणी गुंफतांना बेलसरे म्हणतात, "भगवंताचे आपण विश्वस्त आहोत या भावनेने आपला प्रपंच आपण करावा.

---

## <u>२५ जानेवारी २०२४</u>

**"येक सुखी येक दुःखी । प्रत्यक्ष वर्ततें लोकीं ।**
**कष्टी होऊनियां सेखीं । प्रारब्धावरी घालिती ।। १२-२-५-**

प्रत्यय या शब्दाचा अर्थ 'प्रचिती'! मानवी स्वभावच असा असतो की प्रत्येक गोष्टीत काय प्राप्त होणार हे बघणे. एकदा का मला काय मिळणार हे समजले की मनुष्य कर्म करायला प्रवृत्त होतो. सदर समासात समर्थांनी विवेक-वैराग्याचे अलंकार वापरुन मनुष्य आपले कर्म कसे बदलवू शकतो याची सूत्रे दिली आहेत.

अर्थात, कर्म घडले की मग त्याचे फळ हे ठरलेलेच आहे. मग योग्य भूमिकेतून अचूक केलेले कर्म हे सुखच आणते आणि चुकीच्या समजुतीतून केलेले कर्म किंवा चुकीच्या मार्गाने केलेले कर्म हे दुःखास कारणीभूत ठरते. म्हणजे काय तर 'पेरले ते उगवते' ही सरळ अर्थाची म्हण आपण अगदी शालेय जीवनापासून शिकलो परंतु त्याचा गहनार्थ कृतीत आणायला विसरलो. ज्या प्रकारचा कार्यकारण भाव असेल त्या प्रकारचे फळ हे मिळणारच आहे!

'प्रारब्ध' म्हणजे विधिलिखित किंवा दैव, भाग्य किंवा आपण ज्याला बोली भाषेत नशीब असेही म्हणतो. इथे एक छोटे उदाहरण बघूया, आपल्या समाजात अनेक प्रकारचे भ्रष्टाचार करणारे पुढारी उजळ माथ्याने समाजात वावरताना दिसतात. त्यांची भलीमोठी प्रॉपर्टी असते, मोठा परिवार असतो आणि भौतिक सुखाने ते लगडलेले दिसतात. संतसंग न लाभलेला सामान्य बद्ध मनुष्य याकडे ,'त्याचे काय सॉलिड नशीब आहे ना!' किंवा 'he is born with a silver spoon' अश्या भावनेने बघतो आणि अश्या पापी मनुष्याला सुखात लोळत असलेले बघून दुःखी होतो. 'माझे नशीबच फुटके!' असे म्हणून नशिबाला दोष देत राहतो.

संत कबीर म्हणतात, "कबीरा तेरा पुण्यका जब तक रहो भंडार । तब तक अवगुण माफ है, करो गुनाह हजार ।।" - म्हणजेच वरील उदाहरणातील नेत्याचे संचित प्रारब्ध जोपर्यंत चांगले आहे (पॉसिटीव्ह) तोपर्यंत तो सुख उपभोगतो, अर्थात ते सुख उपभोगताना तो दुसरी अनेक पाप कर्मे करत असतो ज्याचे फळ त्याच्या वाट्याला कधी ना कधी येणारच असते परंतु त्याची जाणीव मात्र त्याक्षणी त्याला नसते. म्हणून कबीर म्हणतात की अवगुण तोपर्यंतच माफ आहेत जोपर्यंत तुझ्या प्रारब्धाची पुंजी पॉसिटीव्ह मध्ये आहे. ज्याक्षणी ती संपेल, त्या क्षणापासून त्याचे आयुष्य बदलेल हे त्रिकालाबाधित सत्य आहे.

परंतु हा विवेक मनुष्याला संतसंगतीशिवाय समजणार नाही आणि म्हणूनच आपल्या वाट्याला आलेल्या दुःखाबद्दल वाईट वाटून त्याचे ओझे तो प्रारब्धावर घालत राहतो आणि अजून दुःखी होत राहतो. मनुष्याची एक गम्मत आहे की सुख असते तेव्हा त्याला कधीच वाटत नाही की अरे माझ्याच वाट्याला हे सुख का आले? तिथे तो मीपणाची शेखी मिरवितो परंतु दुःखाच्या वेळी मात्र 'देवा माझ्याच वाट्याला एवढी दुःखे का?' असे दूषण देवाला, दैवाला देत राहतो.

म्हणूनच समर्थांनी सांगून ठेवले आहे,

**आधी कर्माचा प्रसंग । कर्म केले पाहिजे सांग ।**
**कदाचित पडले व्यंग । तरी प्रत्यवाय घडे ।।११-०९-०१।।"**

सांग कर्म म्हणजेच योग्य प्रयत्नांनी केलेले कर्म हे सर्वप्रथम कर्तव्य आहे (आधी), त्यात थोडी जरी चूक झाली तरी त्यातून प्राप्त होणारे फळ बदलू शकते. म्हणूनच जोपर्यंत शाश्वत सत्य काय आहे, चिरंतन आनंद कशात आहे हे मनुष्य शोधणार नाही तोपर्यंत सुख-दुःखाच्या तरंगातून तो सुटणार नाही. या तरंगांतून सुटण्यासाठी विवेकातून कर्म करणे आणि 'रामची कर्ता, रामची भोक्ता' ही जाणीव ठेवून कार्य करणे हे महत्वाचे आहे. त्यातूनच हळूहळू दुःखाबद्दलची हळहळ कमी होऊ लागते आणि त्याबद्दलची तक्रार बंद होते. मी जे भोगत आहे ते माझ्याच कर्माचे फळ आहे (चांगले आणि वाईट) हे मनुष्य स्वीकारायला शिकतो.

## २६ जानेवारी २०२४

**१२ .२.६ अचुक येत्न करवेना| म्हणौन केलें तें सजेना |**
**आपला अवगुण जाणवेना| कांहीं केल्यां ||६||**

सर्व सामान्य माणसांना आपल्या अंतरंगात डोकावून पहायला समर्थ सांगतात.वासना तपासून पहा असे सांगतात.साध्यासुध्याच अपेक्षा असतात पण त्याही पूर्ण होत नाहीत.त्यांचे दु:ख मात्र भोगावे लागते.असे का घडते? आपली स्वाभाविक प्रवृत्ती प्रारब्धाला दोष द्यायची असते.

पण श्री समर्थांचे मत निराळे आहे. ते या श्लोकात रोखठोक मांडले आहे. अपयश का येते? दीनवाणे दारिद्र्य का येते? तर अचूक प्रयत्न होत नाही म्हणून.प्रयत्न म्हटला की त्याची दिशा योग्य हवी.योग्य काळात कार्य करायचे तर पुरेशी गती हवी.लगबग हवी.सर्व गोष्टींचा साकल्याने विचार हवा. योग्य नियोजन हवे.योग्य लोकांचे सहाय्य गरजेचे असेल तर घ्यावे लागते. Will Drive Motivation या तीन गोष्टी लागतात .निग्रह, इच्छा शक्ती, प्रयत्न करायला प्रेरणा हे लागते.तर अचूक प्रयत्न होतात.इथे कमी पडले तर जे केले जाते ते पुरेसे होत नाही .

केले ते सजेना म्हणजे मनाजोगते होत नाही. यात आपला अवगुण ध्यानात न घेता प्रारब्धाला दोष देऊन आपण सुधारणेचा मार्ग बंद करतो.अवगुण जाणवत नाही ही अधिक गंभीर समस्या समर्थ सांगत आहेत.

याचे कारण काय असावे? आपण जबाबदारी इतर कशावर तरी टाकतो.अंतर्मुख होत नाही.स्वत:ला सूट देतो आणि इतर प्रत्येकाला दोष देऊन मोकळे होतो.थोडा विचार केला तर हे समजून येणे कठीण नाही.पण त्यासाठी अंगी बाणलेली सवय सोडावी लागेल. थोडा तटस्थ पणे विचार करावा लागेल. 'स्व' च्या प्रेमातून बाहेर पडावे लागेल.घटनेची अपयशाची कारण मीमांसा तपासायची सवय लावून घ्यायला हवी. समर्थ रोखठोक बोलून आपल्याला सुधारणेच्या मार्गावर घेऊन जात आहेत .

---

## २७ जानेवारी २०२४

**आधीं कष्ट मग फळ ।कष्टचि नाहीं तें निर्फळ ।**
**साक्षेपेंविण केवळ ।वृथापुष्ट ।। दा ११- १०- २०।।**

दशक अकरा समास दहा निस्पृह वर्तणुक नामक समासातील ही विसावी ओवी आहे. एका एका व्यक्ति वरून समाज ओळखला जातो. समाजाचा दर्जा सुधारावा म्हणून महंताने पुढाकार घ्यायचा असतो. आपला महंत आदर्श असावा असा समर्थांचा कटाक्ष असे. महंताच्या अंगी कोणते गुण असावे याचा उहापोह समर्थ या समासात करतात. महंत हा आत्मसाक्षात्कारी असावा म्हणजे तो समाजाला योग्य वळण लावू शकेल असे समर्थांचे मत होते. हा महंत निःस्पृह असला पाहिजे, भक्त असला पाहिजे असा समर्थांचा विचार होता. लोकसमूहाकडून कार्य करवून घेण्याची कला त्याला अवगत असावी.

त्याने लोकांना उपासनेस लावावे. या करिता सतत प्रयत्नशील असावे. महंताला अशा प्रकारे मेहनत करतांना बघून लोक प्रभावित होतात. या महंताच्या आज्ञेप्रमाणे लोक वागायला लागतात. अपार कष्ट करायची

महंताची तयारी असावी लागते. साक्षेप म्हणजे उद्योगीपणा, कष्ट करण्याची तयारी. कष्ट केल्याशिवाय महान कार्ये होत नसतात.

जमलेल्या समुदायातील प्रत्येक व्यक्तीची कार्यक्षमता भिन्न भिन्न असते. त्याच्या त्याच्या क्षमते प्रमाणे त्याचे कडून कार्य करून घ्यायचे असते. ही हतोटी महंताला साधली पाहिजे. योग्य दिशेने कष्ट केले तरच फळ मिळणार आहे. कष्टच केले नाही किंवा चुकीच्या दिशेने कष्ट केले तर ते निर्फळ ठरणार आहेत. श्रम करावेच लागतील, विना श्रम निरुद्योगी मनुष्य ऐतखाऊ असतो. याला समर्थ वृथापुष्ट म्हणतात.

महंताने वृथापुष्ट राहू नये असा समर्थांचा कटाक्ष असे. ऐतखाऊ माणसाबद्दल समर्थांना चीड आहे. महंताने स्वतः तर कष्ट करावेच पण अनुयायांना देखील सतत कार्यरत ठेवावे. "रिकामा जाऊ नेदी येक क्षण" हे समर्थांचे धोरण होते. आपण देखील समर्थांचे महंतच आहोत म्हणून हा उपदेश आपण देखील पाळायला हवा, तेव्हाच समर्थ आपल्यावर संतुष्ट होतील अन्यथा वृथापुष्ट हे विशेषण आपल्याला चिकटेल. समर्थ संप्रदायाची चतुःसूत्री सांगतांना म्हणतात –

**मुख्य हरिकथा निरूपण । दुसरे तें राजकारण ।**
**तिसरें तें सावधपण । सर्वविषईं ।। ११ - ५ - ४।।**
**चौथा अत्यंत साक्षेप । फेडावे नाना आक्षेप ।**
**अन्याये थोर अथवा अल्प । क्ष्मा करीत जावे ।।११ - ५ - ५।।**

महंताने सतत कार्यरत असले पाहिजे हे इथे विशेषत्वाने सांगितले आहे. आपण नित्य समर्थांना प्रार्थना करतो, "मला वाटते अंतरी त्वां वसावे । तुझ्या दासबोधासी त्वां बोधवावे ।" समर्थ आपल्याला दासबोध निश्चितच समजवून सांगतात, आपल्या अंतर्मनात बसून ते समजवीत आहेत. तीच 'समर्थ कृपेची वचने इथे लिहायचा प्रयत्न आहे.' मी लिहिले असे म्हणणे हा अहंकार आहे. त्यांचेच विचार आपण सारे समजून घेत आहोत, त्यांनाच समर्पित आहेत.

---

## २८ जानेवारी २०२४

**जंवरी चंदन झिजेना ।तंव तो सुगंध कळेना ।**
**चंदन आणि वृक्ष नाना ।सगट होती ।। दा १२ - २ - १७।।**

मना चंदनाचे परि त्वां झिजावे। असे समर्थ ८ व्या मनाच्या श्लोकात सांगतात. याच श्लोकात समर्थ म्हणतात "देहे त्यागिता कीर्ति मागे उरावी ।" या समासात समर्थांनी सामान्य संसारी माणसाला उपदेश केलेला आहे. त्यातील ही ओवी विशेष आहे. आपल्याला जर लोकांनी चांगले म्हणावे, आपल्याशी लाेकांनी चांगले वागावे असे वाटत असेल तर आपण देखील त्यानुसार वागले पाहिजे. रानात सगळे वृक्ष सारखेच वाटतात, पण एखाद्या झाडाच्या खोडाला घासून पाहिले अन् त्याचा सुगंध आला तर ते झाड चंदनाचे म्हणून ओळखले जाते. त्याची विशेष किंमत होते. इतर वृक्षांची कदर न करता त्या एकाच वृक्षाला महत्व का दिले जाते? कारण तो वृक्ष चंदनाचा आहे. माणसाचे देखील अगदी तसेच आहे. तो समाजासाठी, इतरांसाठी झिजेल तर त्याची कदर होईल. तुमच्या गुणांची समाजात कदर होत असते. जनता रूपी जनार्दन एकदा प्रसन्न झाला की काही चिंता नसते.

आपण काकड आरतीमध्ये सद्गुरुला जे मागणे मागतो त्यात एक चरण असा आहे - "जगत दिसावे जगन्नाथमय त्याची करिता सेवा ।" गीतेत देखील "वासुदेवं सर्वमिति" म्हटले आहे. तुलसीदास रामायणात म्हणतात - "सियाराममय सब जग जानी ।" या जगाच्या रूपाने तोच नटलेला आहे, त्याची सेवा ही भगवंतानी पूजाच आहे. या जगतातील प्रत्येक व्यक्ति, प्राणी यांची शिव भावाने सेवा करा असा सल्ला स्वामी विवेकानंदांनी आपल्या गुरुबंधुंना आणि अनुयायांना दिला आहे. "शिवभावे जीवसेवा" हे आजही रामकृष्ण मठाच्या संन्याशांचे ब्रीद आहे.

आपल्या समोर याचक/ भिकारी उभा आहे, काही मानतो आहे आणि आपण त्याचेकडे एक रुपया भिरकावून घे भिकारड्या म्हणून त्याची बोळवण करतो हा माझा अहंकार आहे. उलट भगवंताने मला भरपूर दिले आहे. त्यातील थोडेसे मागायला तो या रूपात माझे समोर उभा आहे. त्याला दान देऊन मी त्याचेवर उपकार करीत नसून तोच दान स्विकारून मला उपकृत करीत आहे या भावनेने देणे ही "शिवभावे जीव सेवा" होईल.

संसारी स्त्री-पुरुषांना समर्थ या समासात विशेष उपदेश देत आहेत. समर्थ सांगतात – "आपणास आहे मरण । म्हणौन राखावें बरेंपण ।" हे जीवन क्षणभंगुर आहे, येवढ्याश्या आयुष्यात सत्कार्य जमेल तेवढे करावे.

एक इंग्रजी सुभाषित आहे - "When life is too short to love, why hate" क्षमा वृत्ती जोपासावी, कुणाचे वर्म काढू नये, सर्व लोकांना आपलेसे करून घ्यावे. स्वतः संन्यासी असलेले समर्थ संसारी माणसाचे मर्म जाणतात म्हणून तर त्यांनी अगदी परफेक्ट उपदेश दिला आहे.

समर्थांनी आदर्श समाजाची कल्पना केली व लोकांनी त्या बरहुकुम वागावे असे समर्थांना वाटत असे. काही थोड्या थोडक्या शिष्यांना आत्मज्ञानी करून समर्थ थांबू शकले असते. पण माझ्या महाराष्ट्रातील नागरिकाने जीवनात आदर्श व्यवहार ठेवला पाहिजे अश्या तळमळीतून समर्थांनी दासबोधात इतक्या बारीक सारीक गोष्टी सांगून ठेवल्या आहेत.

घोड्याला पाण्यापाशी नेता येईल पण पाणी तर त्या घोड्यानेच प्यायचे आहे. समर्थांनी एवढे पंचपक्वानाचे ताट दासबोध रूपात आम्हाला दिले आहे, खावे तर आम्हालाच लागेल. त्यातच आमचे भले होणार आहे.

---

## <u>३१ जानेवारी २०२४</u>

**आपणास आहे मरण । म्हणौन राखावें बरेंपण ।**
**कठिण आहे लक्षण । विवेकाचें ।। १२-२-२६**

संपूर्ण दासबोधात मरण हा शब्द असलेल्या १२ ओव्या आहेत. दशकाचे नाव विवेक वैराग्य ते ह्या दशकात जो चवथा समास आहे तो महत्वाचा आहे त्यावरून दिलेले.आहे. १४ व्या दशकाला सुध्दा असेच समासाचे नाव दिले आहे ( अखंड ध्यान नाम - समास आठवा). .ज्यावेळी आपण म्हणजे मी डोळे उघडून म्हणजे लक्षपूर्वक वाचते. थोडेफार चिंतन करते. तेव्हा ते लक्षात येते. असो.

या दशकामध्ये व्यावहारिक व आध्यात्मिक अशा दोन्ही विवेकाचा समावेश आहे. समासाचे नाव आहे प्रत्यय निरुपण.प्रत्यय या शब्दाचा प्रत्यक्ष अनुभव असा अर्थ आहे.समर्थांचा प्रत्ययावरती फार भर आहे.ज्या गोष्टींचा प्रत्यय घेता येत नाही वा येत नाही कशाला समर्थ अनुमान असे म्हणतात.या समासात समर्थ प्रत्येकाने स्वत:विषयीचा अनुभव तपासून घेण्यास सांगत आहेत व समाजात प्रत्यक्ष दिसणाऱ्या गोष्टींची आठवण करून देत आहेत. ह्या समासात प्रयत्नांवर भर दिला आहे.सामान्य मानव शक्यतो आहे त्या स्थितीत राहण्याचा प्रयत्न करतो.पण ज्याला पुढे जायचे आहे, यश मिळवायचे आहे, यशस्वी व्हायचे आहे, त्याने प्रयत्नांवर भर देणे आवश्यक आहे.

**आपणास आहे मरण । म्हणौन राखावें बरेंपण ।**
**कठिण आहे लक्षण । विवेकाचें ।।**

मृत्यू हे अंतिम सत्य आहे; पण तो कधी येणार हे माहिती नाही , त्यामुळे ते लक्षात घेऊन आपण विवेक - विचाराने , नीती-न्यायाने वागावे, दुसऱ्यांना दुखवू नये. जेव्हा आत्मपरीक्षण होईल. आपण नक्की कोण आहोत ? हे समजले की इतराची परीक्षा करता येईल त्यासाठी आपले अवगुण कोणते हे प्रामाणिकपणे शोधले जाईल, गुण अवगुणांची सतत परिक्षा करायची. आपल्याला त्याच विसंगतीत राहायचे आहे अशा मन:स्थातीत हाच विचार करायचा, की आपल्याला हे जग सोडून जायचे आहे बरोबर काय येणार? तर आपल्या गुण अवगुणांची कीर्तीच ना? इथे उगाचच एक हिंदी गाणे आठवले **खाली हाथ आए थे । खाली हाथ जाऐंगे ।** असो. याच दशकातील १० समास १३ वी ओवी मरणाचे स्मरण असावे. तेच सांगते.

**मरणाचें स्मरण असावें। हरिभक्तीस सादर व्हावें ।**
**मरोन कीर्तीस उरवावें। येणें प्रकारें ।।१३।।**

मनाच्या श्लोकातही श्लोक ११ ते २७ मानवी जीवनाची अपूर्णता समजावून सांगितली आहे आणि २८ ते ३७ परमेश्वराची स्तुती केली आहे मला भावलेला श्लोक क्रमांक २८

**दिनानाथ हा राम कोदंडधारी । पुढें देखतां काळ पोटीं तयारी ।**
**मना वाक्य नेमस्त हें सत्य मानी । नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ॥ २८ ॥**

---

## १ फेब्रुवारी २०२४

**विद्या उदंडचि सिकला। प्रसंगमान चुकतचि गेला ।**
**तरी मग तये विद्येला। कोण पुसे ।।१२-२-३०।।**

हा श्लोक प्रत्यय निरुपण या समाजातील शेवटचा श्लोक आहे.त्यात समासाचा अर्क उतरला आहे.अचूक यत्न कसा करावा,त्यांचे प्रपंच व परमार्थ यात काय महत्त्व आहे हे समर्थ समजावून सांगत आहेत. विद्या खूप शिकल्या पण प्रसंगाला अनुरूप वागता आले नाही तर त्याची विद्या काय कामाची? असे समर्थ खरंतर आपल्याला विचारत आहेत. विद्या म्हणजे ज्ञान , कौशल्य. एखाद्याविषयात प्राविण्य मिळवणे. त्या ज्ञानाचा आपल्याला काय उपयोग करायचा आहे हे स्पष्ट असायला हवे व त्या ज्ञानाने आपण सक्षम होणे गरजेचे असते. प्राविण्य मिळाले का? याची परीक्षा कधी होणार? जेव्हा application करायची वेळ येते तेव्हा.

वैद्यकीय शिक्षण घेताना आपण निदान करायला शिकतो.पुस्तक वाचतो. गुरुजनांच्या मार्गदर्शनाखाली आपण हॉस्पिटलमध्ये प्रत्यक्ष रुग्ण तपासणी करून जे शिकलो त्यांचे प्रात्यक्षिक करतो. परीक्षा देऊन व्यवसाय सुरू करतो.स्वतंत्र व्यवसाय करायला लागल्यावर जेव्हा रुग्णांची जबाबदारी घेऊन काम करतो तिथे कस लागतो. तेव्हा निदान करता आलेच पाहिजे. योग्य उपचार करता आला पाहिजे आणखी तज्ज्ञांच्या मदतीची गरज असेल तर ते सुचले पाहिजे. अन्यथा त्या शिक्षणा पदवीचा उपयोग होत नसेल तर त्याची किंमत शून्यच आहे असे समर्थ सांगतात.

कोणी उपासना करताना ध्यान लावायला शिकत असेल, त्यापूर्वी काही व्यायाम क्रीया शिकत असेल तर त्याचा कस कधी लागतो? हे सारे केल्यावर ध्यान व्यवस्थित लागले का? मन शांत झाले का? विचार तरंग शांत झाले का? समाधान वाटले का? ते टिकून रहाते की ध्यान स्थिती सुटली की सुटून जाते? काही अनुभव आला का? जाणिवेचा स्तर थोडा तरी उंचावला का? या प्रश्नांची प्रामाणिक उत्तरे आपणच आपल्याला द्यायची आहेत व जे शिकत आहोत त्याचा स्वतः ला इतरांना किती उपयोग होत आहे ते तपासून घ्यायचे आहे ,असे समर्थ आपल्याला सांगत आहेत.

परिणामकारकता ही कसोटी प्रयत्नांना लावणे गरजेचे आहे असे समर्थांना सुचवायचे आहे. ज्या विद्येची उपयुक्तता, परिणामकारकता सिद्ध होत नाही त्या विद्येला व ती विद्या ग्रहण केलेल्या माणसाला 'कोण पुसे' म्हणजे कोणी किंमत देत नाही.का द्यावी असा प्रश्न आहे. बरेचदा परीक्षा उत्तीर्ण होऊन सामान्य आयुष्य जगताना माणसे दिसतात. त्यात घेतलेल्या ज्ञानाचा प्रत्यक्ष उपयोग करण्यात कमी पडणे हे कारण असते.

**१) ज्ञान घेताना पुरेसे गांभीर्य नसते**
**२) ज्याच्या कडून घेतले ती व्यक्ती पुरेशी अनुभव संपन्न नसणे/ हातचं राखून शिकवते.**
**३) पुस्तक,शब्द यात अडकून पडल्याने वाच्यार्था पलीकडे आकलन न जाणे.गर्भितार्थ न समजणे**
**४) अल्पसंतुष्ट झाल्याने अनुभवच मर्यादित घेऊन पुढे प्रयत्न थांबणे**
**५) अनेक व्यवधाने ठेवल्यास लक्ष पूर्ण केंद्रित न झाल्याने half hearted efforts घेतले जाणे.**

अशी अनेक कारणे असू शकतील की ज्यामुळे प्रसंगास अनुचित असे वर्तन घडत नाही, प्रयत्न व परिणाम दिसून येत नाहीत.यासाठी अंतर्मुख होऊन शोध घ्यावा लागेल किंवा अधिकारी व्यक्ती कडून मार्गदर्शन घ्यावे लागते.त्यासाठी विनम्र होउन त्यांच्याकडे जावे लागते व ते सांगतील तसे स्वतः ला सुधारावे लागते.सद्गुरु संत सज्जन व आदरणीय शिक्षक यांचे महत्त्व अधोरेखित होते.

---

## २ फेब्रुवारी २०२४

**घालून अकलेचा पवाड । व्हावें ब्रह्मांडाहून जाड ।**
**तेथें कैंचें आणिलें द्वाड ।करंटपण ।। दा १२ - ९ - २९।।**

आधी केले मग सांगितले हा समर्थांचा स्वभाव आहे. जे त्यांनी केले आहे तेच ते सांगतात. समर्थांचा उपदेश त्यामुळे tested असतो. जे होऊ शकणार नाही ते करायला समर्थ सांगणारच नाहीत. या ठिकाणी देखील स्वतःचे आत्मचरित्र, स्वतःचा अनुभव सांगतांना समर्थ म्हणतात, निरोगी व अनासक्त वृत्ती लोकांना

आवडते. भगवद्कथा निरूपण तर लोकांना जास्तच आवडते. म्हणून "रामकथा ब्रह्माण्ड भेदून पैलाड न्यावी" असे समर्थ म्हणतात.

सर्वगुण संपन्न साधुला वैभवाची कमतरता नसते. समर्थांच्या भोवती अशा लोकांची प्रभावळ जमली होती की, "नभामाजी तारांगणें । तैसे लोक।" सर्वसाधारण संसारी मनुष्याला असे संत आवडतात. अशा संताकडे जाण्याने आपले कल्याण होईल अशी सामान्य माणसाची धारणा असते.

**जो उत्तम गुणें शोभला । तोचि पुरुष माहा भला ।**
**कित्येक लोक तयाला । शोधीत फिरती ।। १२ - १० - २९।।**

हिमालयात हिंडत असतांना समर्थांना देहत्याग करावासा वाटला, त्यांनी स्वतःला झोकून दिले, पण रामरायाने त्यांना अलगद झेलले, आदेश दिला - **"तुम्हास जगदोद्धार करणे आहे । तुमची तनु ते आमची तनु पाहे ।"** इथे समर्थांचे भाग्याचा उदय झाला, आणि ब्रह्माण्डाहून जाड व्हायची यात्रा सुरु झाली. १२ वर्षे परिव्राजक अवस्थेत घालवून समर्थांनी कृष्णातीरी प्रत्यक्ष कार्य सुरु केले. स्वतः आत्मज्ञान प्राप्त करून निर्भयपणे वावरून लोकांना कार्य प्रवृत्त केले. स्वतः निरपेक्ष राहून लोकांना गोड शब्दांनी आपलेसे केले. **"आमची प्रतिज्ञा ऐसी । कांहीं न मागावे शिष्यासी ।"** हा त्यांचा बाणा होता.

समर्थांच्या जीवनाकडे पाहिले तर असे लक्षात येते की योग्य रितीने, उत्तम बुद्धीने, योग्य दिशेने प्रयत्न केला की यश मिळते अन्यथा सुख, यश माणसापासून दूर निघून जाते. ब्रह्माण्डाहून जाड कशाला व्हायचे ? रामकथा ब्रह्माण्ड भेदून पैलाड न्यायची आहे. त्याकरिता आपल्या बुद्धीचे सामर्थ्य वाढवावे लागेल. बुद्धीचा विस्तार करावा लागेल.

आपण प्रज्ञावंत झालो की करंटेपण येणारच नाही. आपण मोठे होऊ शकू कि नाही ही आशंका अशाप्रकारे दूर होते व आपल्या विजय रथाची घोडदौड सुरु होते. हा समासच यत्ननिरूपणाचा आहे. जीवनात प्रयास करणारा मनुष्य सदा यशस्वी होत असतो हे समर्थांनी या समासात स्वतःच्या अनुभवावरून आपणास पटवून दिले आहे. बघा प्रयत्न करता येतो काय?

---

## ३ आणि ४ फेब्रुवारी २०२४

**कष्टेंविण फळ नाहीं । कष्टेंविण राज्य नाहीं।**
**केल्याविण होत नाहीं । साध्य जनीं ।।**
**आळसें काम नासतें । हें तों प्रत्ययास येतें ।**
**कष्टाकडे चुकावितें । हीन जन ।।**
**दासबोध ।। १८ - ७ - ३ आणि ४।।**

जनस्वभाव निरूपण नामक समासातील या दोन्ही ओव्या एका पाठोपाठ एक येतात. कष्ट व आळस हा समान धागा या ओव्यांमधे आहे व एकमेकांशी संबंधित असल्यामुळे दोन्हीचा एकत्र विचार करीत आहे.

जनस्वभाव निरूपण समासात समर्थांनी सर्वसामान्य लोकांना उपदेश दिलेला आहे. अगदी रोजच्या व्यवहारासंबंधी हा उपदेश असून कष्टाचे महत्त्व प्रामुख्याने इथे आलेले आहे. सामान्य माणूस लालची असतो हे ओपन सीक्रेट समर्थ सांगतात व म्हणतात की देवानी आम्हाला आधी काही तरी द्यावे म्हणजे मग आम्ही देवाची आराधना करू. फ्री मिळावे या मनुष्य स्वभावाचा व्यापारी लोक चांगलाच उपयोग करून घेतात व एकावर एक फ्री किंवा २५% एक्स्ट्राची लालूच देऊन ते ग्राहकांना चक्क लुबाडतात. या जगात फुकट काहीही मिळत नसते. कष्ट केल्याविण कांहींच मिळणार नाही हे आपण नेहमीच लक्षात ठेवायला हवे. "असेल माझा हरी, तर देईल खाटल्यावरी" ही म्हण तर आपण सारेच जाणतो तरीही विनासायास मिळावे ही इच्छा मात्र जात नाही.

मनुष्य भाग्यहीन वा करंटा का होतो याचे हे कारण आहे. विवेक विचार नाही आणि कष्ट करायची तयारी नाही म्हणून तो असा रहातो हे समर्थ आवर्जून सांगतात. "आळस हा घातघेणा"आहे असे समर्थ पुनः पुनः सांगतात. कष्ट करणाऱ्या विवेकशीलता माणसाच्या मागे भाग्य लागते असा त्यांचा विश्वास आहे.

जगात कष्टावाचून फळ मिळत नाही, राज्य मिळत नाही. शिवरायांना स्वराज्य स्थापनेसाठी किती कष्ट करावे लागले हे आपण जाणताच. कष्टावाचून जगात कोणतीही गोष्ट मिळणार नाही. आळशीपणाने कार्य नाश होताे असा प्रत्यक्ष अनुभव असूनही लोक कष्ट करण्यास चुकतात. जे लोक आधी कष्टाचे दुःख सोसतात ते पुढे सुखाचे फळ भोगतात. शालेय जीवनात भरपूर मेहनत घेणारी मुले पुढे यशस्वी होऊन जीवनात सुखी होतात. शाळेत असतांना अळंटळं करणारी मुले पुढे दुःख व ओढग्रस्तीचे जीवन कंठतात हे आपण नित्य बघत असतो.

समर्थांनी हे सारे सांगण्याचा खटाटोप का बरें केला असेल? मराठी माणूस प्रत्येक क्षेत्रात पुढे रहावा हे त्यांचे स्वप्न होते. ज्यांनी त्यांचे विचार प्रमाण मानून मेहनत केली ते पुढे जातच आहेत. इतरांना समर्थ "करंटा" म्हणून हिणवितात.

---




<u>५ फेब्रुवारी २०२४</u>

**जेहीं उदंड कष्ट केले । ते भाग्य भोगून ठेले ।**
**येर ते बोलत चि राहिले । करंटे जन ।।१८-७-१६**

समर्थ सामान्य माणसाच्या स्वभावतः असलेल्या दुर्गुणांवर नेमके बोट ठेवतात. तो लालची म्हणजे स्वार्थी असतो,देवही स्वार्थ साधण्याचे साधन म्हणून तो भजतो,कष्टाशिवाय सारेकाही मिळावे अशी आशा

त्याला असते,-हस्व दृष्टीने वागतो म्हणजे भविष्य वेधी नियोजन करीत नाही,त्याच त्याच चुका परत करून स्वहिताचे नुकसान करतो, अर्थहीन बोलतो.अशा माणसाला समर्थ 'करंटा' असे विशेषण वापरतात.हे करंटेपण प्रपंच व परमार्थ दोन्ही कडे आढळून येते.

**आधीं कष्टाचें दु:ख सोसिती| ते पुढें सुखाचे फळ भोगिती|**
**आधीं आळसें सुखावती| त्यासी पुढे दु:ख || १८-७-५**

ह्या ओवीचे मर्म जे सांभाळतात ते आपले ध्येय गाठण्यासाठी भरपूर कष्ट करतात .त्यांचे भाग्य उजळते. बाकीचे भाग्यहीन आयुष्य जगतात .कारण ते कष्ट करत नाहीत.समर्थांना योग्य दिशेने प्रयत्न अपेक्षित आहेत. ते दीर्घसूचना म्हणजे दूरदृष्टी,नियोजन , सुसूत्रता या गोष्टी सांगत असावेत .असे न करणे हा आत्मघात आहे असे समर्थ सांगत आहेत. काही न करणारे एक गोष्ट नक्की करतात व ती म्हणजे व्यर्थ बडबड.यात फुशारकी असते.तोंडची वाफ दवडणे असते.कृतीशून्यता असते. याचा काही उपयोग नाही असे समर्थ सांगत आहेत.

---

## ६ फेब्रुवारी २०२४

**रेखा तितुकी पुसोन जाते ।प्रत्यक्ष प्रत्यया येतें ।**
**डोळेझांकणी करावी ते ।कायेनिमित्य ।। दा १५ - ६ - ९।।**

कागदावर काढलेली रेष जशी पुसता येते तशीच भाग्यरेष देखील पुसता येते हे समर्थांचे ठाम प्रतिपादन आहे. समर्थ प्रयत्न वादाचे जबरदस्त समर्थन करतात. आपल्या प्रयत्नाने भाग्य देखील बदलता येईल असे त्यांचे ठाम प्रतिपादन आहे. अदृष्टाची गुप्त रेखा देखील पुसता येईल याकडे डोळेझाक करू नये.

रेखांचा विचार करतां असे सांगतात की त्या चार प्रकारच्या आहेत. उत्तम,मध्यम, कनिष्ठ आणि चौथी अदृष्टाची रेखा. या रेखा पाहून भविष्य वर्तवणाऱ्यांच्या भविष्याचा अनुभव काही समान नसतो. माणूस ज्ञानाने आपली प्रारब्ध रेखा देखील बदलू शकतो हा अनुभव आहे. ज्ञानाचा घट्ट आधार धरून माणूस प्रयत्न करू लागला तर प्रारब्ध रेखा तो सहज बदलू शकतो.

साक्षरता आणि ज्ञान प्रसार यावर समर्थांचा भर आहे. अज्ञाना पोटी अंधश्रद्धा जन्म घेते व असा माणूस प्रारब्धावर विसंबून रहातो व आपल्या अधोगतीला कारणीभूत होतो. म्हणून प्रारब्ध रेषेपेक्षा समर्थ कागदावरील रेषेला श्रेष्ठ मानतात. प्रारब्ध रेषा बदलण्याची ताकत कागदावरील रेषेत आहे असा समर्थांचा ठाम विश्वास आहे. समर्थांनी तर प्रयत्नाला देवाचा दर्जा दिला आहे.

**केल्याने होत आहे रे । आधी केलेचि पाहिजे ।**
**यत्न तो देव जाणावा । अंतरी धरिता बरें ।"**

ही समर्थांची उक्ति तर आपण जाणतोच. या बोधवाक्यातून समर्थ आपल्याला प्रयत्नाला देव मानावयास सांगतात. प्रयत्न ते ही अचूक हवे. **"अचूक प्रयत्न करवेना । म्हणून केले ते सजेना ।"** अचूक प्रयत्न व कष्ट करण्याची तयारी तुम्हाला यशाच्या शिखरावर नेतील, अन्यथा केवळ दैवावर हवाला ठेवून आळसात वेळ घालवाल तर रडत बसायचीच वेळ येणार आहे.

"**मनी धरावे ते होते । विघ्न अवघेचि नासोन जाते ।**" हे पुरुषार्थ करणाऱ्या व्यक्तीच्या बाबतीत अक्षरशः खरे आहे, तोच भाग्यरेखा बदलू शकतो. अशा मनुष्याच्या मनाचे सामर्थ्य इतके प्रचंड असते की त्याचे मनाने केलेला संकल्प साऱ्या विघ्नांना पार करून यश खेचून आणतो. **"Yes I can do it"** हा दुर्दम्य विश्वास माणसाला अर्धे यश मिळवून देतो. प्रयत्नाची कास न धरता केवळ दैवावर विसंबून राहिला व आळसात आयुष्य घालवू लागला तर अपयश पदरात पडणारच. दैववादापेक्षा कर्मवाद कधीही लाभदायक ठरतो. दैववादी माणूस फसतो तर प्रयत्नवादी माणूस तरतो. **"कठोर परिश्रमाला पर्याय नाही** " हे एक सूत्र इंदिरा गांधी यांनी दिलेल्या चतुःसूत्री तील प्रथम सूत्र आहे.

---

## ७ फेब्रुवारी २०२४

**रूप लावण्य अभ्यासितां न ये ।सहजगुणास न चले उपाये ।**
**कांहीं तरी धरावी सोये ।आगंतुक गुणाची ।। दा १४ - ६ - १।।**

१४ – ६ हा समास चातुर्य लक्षणाचा आहे. या आठवड्यातील सर्वच ओव्या याच समासातून घेतल्या आहेत. त्यामुळे विवेचन करतांना थोडी ओढाताण होणार आहे. आजच्या ओवीत "सहजगुणास न चले उपाये ।" म्हणून समर्थांनी माणसाची विवशता सांगितली आहे. तिसऱ्या ओवीपर्यंत विवशता कोणत्या आहेत ते सांगतांना समर्थ म्हणतात -

**काळें माणुस गोरें होयेना । वनाळास येत्न चालेना ।**
**मुक्यास वाचा फुटेना । हा सहजगुण ।।**
**आंधळें डोळस होयेना । बधिर तें ऐकेना ।**
**पांगुळ पाये घेईना । हा सहजगुण।।**

वनाळ म्हणजे चेहऱ्यावर असणारे व्रण कोणत्याही प्रयत्नाने जात नाहीत. इतर सारे शारीरिक दोष सहज समजण्यासारखे असल्याने विस्तार करीत नाही. हे सारे दोष (समर्थांनी गुण म्हटले आहे) जन्मजात आहेत. या व्यतिरिक्त देखील व्यंग्य असू शकतात, जे कोणत्याही उपायाने दूर करता येत नाहीत. मग असले तरी त्यांना असू द्या आणि "अगांतुक गुणाची" काही तरी सोय धरा असे समर्थ सांगतात.

एक गोष्ट म्हणजे आपल्या मध्ये जन्मजात नसणारे दुर्गुण लगेच टाकून द्यायला समर्थ सांगत आहेत. या शिवाय स्वप्रयत्नाने आपण निरनिराळ्या गुणांचा विकास करायला हवा. आपले व्यक्तिमत्व प्रभावशाली, impressive असायला हवे. आपण आपल्यात योग्य बदल घडवू शकलो तर आपल्या आसपासच्या लोकांमध्ये देखील सकारात्मक बदल घडवू शकतो. हे जरूर करावे. याने आपल्या आसमंतात प्रसन्नता येईल. याचा परिणाम आपल्याला जाणवेल.

**ऐसी प्रचित येते मना । तरी कां स्वहित करावा।**
**सन्मार्गें चालतां जनां । सज्जन माने ।। १४ -६ - ८।।**

जो माणूस सन्मार्गाने जातो तो सर्वमान्य होतो. तुमच्या आगंतुक गुणांमुळे जेव्हा तुम्ही मान्यता पावता तेव्हा तुमच्या जन्मजात गुणांकडे लोक सहजच दुर्लक्ष करतात. आपले नाव बहुतेक लोक घेतात.

लोकांच्या अंतःकरणात आपण प्रेमरूपाने भरून जातो. आपल्या उत्तम गुणांनी अनेक लोकांना आपण विवेकी बनवू शकतो.

**शाहाणे करावे जन । पतित करावे पावन ।**
**सृष्टीमध्ये भगवद्भजन । वाढवावें ।। १४ - ६ - ३३।।**

---

**अवगुण सोडिता जाती । उत्तम गुण अभ्यासिता येती ।**
**कुविद्या सांडोन सिकती । शहाणे विद्या ॥ १४-६-५ ॥**

कोणत्याही सामान्य माणसाच्या जीवनामध्ये सुख,समाधान व शांती लाभण्यासाठी या समासातील उपदेश अत्यंत उपयुक्त आहे.प्रत्येक ओवी अर्थ सहज प्रकट करणारी आहे.प्रयत्नाने माणूस स्वतःमध्ये आमूलाग्र बदल घडवू शकतो हा समर्थाचा ठाम सिध्दांत या समासात अंत्यंत प्रभावीपणे ते मांडतात.

समर्थाच्या सांगण्याचा भावार्थ असा –

**१) माणसाला शहाणपण शिकता येते.**
**२) अंगी नसलेल्या उत्तम गुणांचा मनापासून अभ्यास करावा**
**३) ऐश्वर्य मिळवून भोगावे.**
**४) शरीराने व मनाने झिजावे.**
**५) शहाणे करावे जन आणि पतित करावे पावन.**

आणि महत्वाचे म्हणजे आपण जन्माला आलो आणि परत जाताना काही तरी चांगला बदल आपल्यात आणि समाजात वावरताना कार्य करीत असताना दिसला पाहिजे.तरच जन्माला येण्याचे सार्थक होईल असे मला वाटते. २-८-३१ चे विस्तृत रुप म्हणजे हा समास आहे १४-६-१ समान ओव्या.त्या आत्ताच्या काळात सुध्दा लागू आहेत.

---

## ९ आणि १० फेब्रुवारी २०२४

**मूर्खपण सांडितां जातें ।शाहाणपण सिकतां येतें ।**
**कारबार करितां उमजतें ।सकळ कांहीं।। दा १४ - ६ - ६।।**
**मान्यता आवडे जीवीं ।तरी कां उपेक्षा करावी ।**
**चातुर्यैविण उंच पदवी ।कदापि नाहीं।। दा १४ - ६ - ७।।**

चातुर्य लक्षणाच्या या समासात समर्थांनी मूर्खपणाची देखील चर्चा केली आहे. जो आधी मूर्ख आहे तोच तर पुढे चतुर किंवा बुद्धिमान होणार आहे. अट एवढीच आहे की मी मूर्ख आहे हे त्याच्या लक्षात यायला हवे. जर का तो म्हणेल की मी शहाणाच आहे, ज्ञान वगैरे काही मला नको आहे तर मात्र त्याला इलाज नाही. पुढच्या श्लोकात समर्थ हेच सांगत आहेत.

मला मान हवासा वाटतो मग शहाणपण शिकण्यात हयगय का करावी? शहाणपण असल्याखेरीज समाजात मान्यता मिळत नसते. त्याकरिता तरी मूर्खपण सोडावे लागणार आहे. तुम्ही साज श्रृंगार कितीही करा पण अंगी शहाणपण नसेल तर सारा श्रृंगार वाया जाणार आहे. समर्थांनी मूर्खपणा व शहाणपण अर्थात् चातुर्य यावर या समासात भरपुर चर्चा केली आहे. मनाच्या २०५ व्या श्लोकात फलश्रुती सांगतांना समर्थ म्हणतात-

**"मनाची शते ऐकता दोष जाती । मतीमंद ते साधनायोग्य होती ।"**

इच्छा असेल तिथे मार्ग सापडतो. माझ्यातील मूर्खपणा लक्षात आला व तो दूर करायचे मी ठरविले तर ते सहज करता येईल. शहाणपण शिकता येते आणि मूर्खपण सोडता येते. उत्तम गुणांचा अभ्यास करून त्यांचा अंगिकार करता येतो, फक्त इच्छा शक्ति हवी. शहाणपण शिकता शिकताच मूर्खपण जाणार आहे.

तुम्हाला एखादा व्यवसाय, धंदा करायचा आहे, तर तो व्यवसाय करता करता त्याचे ज्ञान येणार आहे. ज्ञान मिळाल्यावर व्यवसाय करू म्हटले तर कधीच होणार नाही.

**मूर्ख येकदेसी होतो । चतुर सर्वत्र पाहातो ।**
**जैसा बहुधा होऊन भोगितो । नाना सुखे ।। ११ - १० - १।।**

मूर्ख माणूस केवळ आकुंचित दृष्टीने जगाकडे बघतो तर चतुर मनुष्याची दृष्टी व्यापक असते. याच कारणाने चतुर सुखे भोगतो आणि मूर्ख मात्र दुःखी होतो. कोणी एखादा म्हणेल की मला मूर्खपण त्यागायचे आहे, पण त्या दृष्टीने प्रयत्नच करणार नसेल तर काहीही उपयोग होणार नाही. प्रयत्न तर ज्याचे त्यालाच करावे लागणार आहेत. रेडिमेड शहाणपण मिळणार नाही, जर कोणी देतो म्हणेल तर तो लबाड आहे हे समजावे.

मला हे माहित आहे की मी जे इथे लिहीत असतो ते सारे आपणाला आधीच ठाऊक असते. मी फक्त आठवण द्यायचे काम करतो. धकाधकीच्या आयुष्यात कित्येक गोष्टी माहित असूनही विस्मरणात जातात, या चिंतनाने त्या पुनः आठविल्या जातात. आपण हे सारे प्रेमपूर्वक वाचता, मनन करता यामुळे मी अनुग्रहित होतो. आपल्या ह्रदयस्थ परमेश्वराला प्रणाम करतो, माझ्या प्रणामाचा कृपया स्वीकार करावा.

---

**११ फेब्रुवारी २०२४**

**अंतर्कळा श्रृंघारावी ।नानापरी उमजावी ।**
**संपदा मेळऊन भोगावी ।सावकाश ।। दा १४ - ६ - १०।।**

१४ - ६ हा समास चातुर्य लक्षणाचा आहे हे तर आपण जाणतोच. या समासातील ही १० वी ओवी. अंतर आणि बहिरंग श्रृगारासंबंधी दोन ओव्या पुढे येणार आहेत त्या आपण स्वतंत्रपणे बघणार आहोत. ही दहावी ओवी बघण्यापूर्वी आपणांस यापुर्वीची ९ वी ओवी बघावी लागेल. काय आहे ह्या नवव्या ओवीत? आधी ओवी वाचूया --

**देहे नेटकें श्रृंघारिलें । परि चातुर्येंविण नासले ।**
**गुणेंविण साजिरें केलें । बाष्कळ जैसें ।।**

एखाद्याने आपले शरीर भरपूर सजविले पण त्याच्या अंगी शहाणपण नसेल तर सारा साजश्रृंगार व्यर्थ ठरतो. गुणहीन वेड्याला साजश्रृंगार केला तसे हे वाया जाते. समर्थांनी दासबोधातच सांगितले आहे की गाढवाची चंदन, पुष्पाने पुजा करण्यात काही अर्थ नाही. अमेरिकेतील एक रूपवती नटी तिथले अध्यक्ष असणाऱ्या रुझवेल्टना म्हणाली की आपण लग्न करूया म्हणजे आपल्याला होणारे मूल माझ्यासारखे सुंदर आणि तुमच्यासारखे बुद्धीमान होईल. यावर रूझवेल्टनी उत्तर दिले की ते मूल माझ्यासारखे कुरुप आणि तुझ्यासारखे मूर्खही होऊ शकेल.

आजच्या आपल्या चिंतनाची ही ओवी शाळा कॉलेजच्या मुलांना जास्त उपयोगी आहे. तुमच्याजवळ चातुर्य नसेल तर शरीराची सजावट व्यर्थ ठरते. आवश्यक तेवढा नीटनेटकेपणा जरूर असावा पण अतिरेक नको. समर्थांचा भर अंतरश्रृंगारावर आहे. आपल्या बुद्धीचा विकास करावा भरपूर अभ्यास करावा आणि त्या बळावर चांगले उच्च शिक्षव व उत्तम नौकरी व्यवसाय करावा. शिक्षणाच्या रांगेत जो पुढे असतो तो जीवनात सदैव पुढेच रहातो. संपदा भोगायला त्यालाच मिळते. परवा आपण ७ वी ओवी बघितली होती तिचा आशय ही असाच आहे. अंगी चातुर्य नसेल तर आयुष्य ओढगस्तीचे होईल. अंतर्कळा सजविणे केवळ विद्यार्थी दशेतच आवश्यक आहे असे समजू नये. आपण आहात तिथेही नवनवीन ज्ञान मिळवून ते जीवनात उपयोगात आणू शकाल. ९ वी व १० वी ओवी बघितली. आता पुढची ११वी ओवी देखील बघुया.

**प्रेत्न करीना सिकेना । शरीर तें हि कष्टवीना ।**
**उत्तम गुण घेईना । सदा कोपी ।।**

जो प्रयत्न करीत नाही, शहाणपण शिकत नाही तो नक्की आळशी असला पाहिजे. असा मनुष्य सतत चिडचिडा असतो असे समर्थ म्हणतात. दुसरा कोणी चिडचिडा आहे का हे शोधू नका, आपली चिडचिड होते का ते तपासा. वेळ गेली नाही, अजूनही चातुर्य कमविता येईल. प्रयत्न ज्याचा त्यालाच करावा लागेल. संपदा देखील तुमची तुम्हीच भोगणार आहात ना.

---

## <u>१२ आणि १३ फेब्रुवारी २०२४</u>

**चातुर्ये अंतर श्रृंघारे ।वस्त्रें श्रृंघारे शरीर ।**
**दोहिमधें कोण थोर ।बरें पाहा ।। दा १४ - ६ - १८।।**

**बाह्यात्कार श्रृंघारिलें ।तेणें लोकांच्या हातासि काये आले ।**
**चातुर्यें बहुतांसी रक्षिलें ।नाना प्रकारें ।। दा १४ - ६ - १९।।**

शहाणपणाने अंतरंग श्रृंगारले जाते तर वस्त्राने शरीराचा श्रृंगार होतो. एखाद्याने आपले केवळ शरीरच श्रृंगारले आणि त्यापासून लोकांना कांहींच फायदा होत नसेल तर ते व्यर्थ आहे. माणसाच्या अंगी चातुर्य असेल तर तो पुष्कळांचे रक्षण करू शकतो. शहाणपणाने जो आपले अंतरंग सजवितो तो दुसऱ्याचा कार्यभाग करू शकतो. आपल्या शहाणपणाने जो लोकांना सुखी करतो तो खरा भाग्यशाली होय. माणसाने पुष्कळ गुण संपादन करावे, जगाच्या उपयोगी पडावे. अज्ञान्याला शहाणे करावे व भगवंताचे भजन वाढवावे. एकंदर काय तर गुणी माणसाने समाजाची सेवा परमात्म्याची सेवा समजून करावी.

देहाचे महत्त्व समर्थांनी १८ - ४ या समासात वर्णन केले आहे. देह हे परलोकीचे तारू आहे म्हणून त्याची काळजी घेणे तर आवश्यकच आहे पण अति देहबोध ही नको. आवश्यक तेवढे वस्त्र जरुर घालावे पण विनाकारण श्रृंगार नको. देह घबाड आहे, रत्नांची पेटी आहे म्हणून तर त्याला जपले पाहिजे पण त्याचा उपयोग समाजसेवा आणि परमेश्वर प्राप्ति साठी करून घ्यावा. देहाचे फाजिल लाड करू नये. एका स्त्रीला नवऱ्याने नथ आणून दिली. ती नथ घालून ही बाई गांवभर फिरून आपल्या नवऱ्याची तारीफ करीत सुटली. यावर एक कवी म्हणतो, "जिस यार ने नथ दी उसका सुमिरन बार बार। जिस यार ने नाक दी उसे भूल गयी पार।" समर्थांनी शाहिस्तेखानाच्या आक्रमण प्रसंगी शिवरायाला लिहिलेले पर दासबोध दशक १८ समास ६ मध्ये आलेले आहे. याच्या सुरुवातीच्या दोन ओव्या पहाणे प्रासंगिक ठरेल.

**नाना वस्त्रें नाना भूषणें । येणें शरीर श्रृघारणें ।**
**विवेकें विचारें राजकारणें । अंतर श्रृंघारिजे ।**
**शरीर सुंदर सतेज । वस्त्रें भूषणें केलें सज्जन।**
**अंतरी नस्तां चातुर्यबीज । कदापि शोभा न पवे ।**

अफझखान चालून येतो आहे, तो कपटी आहे, त्याचा नायनाट चातुर्याने करावा. भेटीचे वेळी राज शिष्टाचारा प्रमाणे वस्त्र प्रावरणे जरूर घाला. पण आतमध्ये चिलखत स्वसंरक्षणासाठी आवश्यक आहे हे समर्थांनी शिवरायाला इथे सुचविले आहे. चातुर्यबीज चा अर्थ चिलखत असा ही होतो.

बाह्य सौंदर्यापेक्षा अंतराचे सौंदर्य महत्त्वाचे आहे. चतुर मनुष्य लोकांच्या उपयोगी पडेल हे समर्थ जाणून होते म्हणून समर्थांनी अंतर सजविण्यावर भर दिला होता. आजच्या चिंतनाच्या ओव्यांत समर्थ प्रश्न विचारतात की अंतर श्रृंगार केलेला मनुष्य व बाह्य श्रृंगार करून नटलेला मनुष्य यात कोण चांगला आहे हे विचार करुन पहा. मारे मोठा साज श्रृंगार करून एक जण मिरवितो आहे, लोकांना त्याचा काय उपयोग? उलट कठीण प्रसंगी चतुर माणूस लोकांचे प्राण रक्षण करू शकतो.

आपण काय घालावे काय घालू नये हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे पण आत चातुर्य ठेवून समाजाच्या उपयोगी पडलेच पाहिजे, भगवंताची सेवा केलीच पाहिजे असा समर्थांचा विचार आहे.

**तनें मनें झिजावें । तेणें भले म्हणोन घ्यावें ।**
**उगें चि कल्पितां सिणावें । लागेल पुढें ।। १४-६-२१॥**

कोणत्याही सामान्य माणसाच्या जीवनामध्ये सुख, समाधान व शांती लाभण्यासाठी या समासातील उपदेश अत्यंत उपयुक्त आहे प्रत्येक ओवी अर्थ सहज प्रकट करणारी आहे.प्रयत्नाने माणूस स्वतःमध्ये आमूलाग्र बदल घडवू शकतो हा समर्थाचा ठाम सिध्दांत या समासात अत्यंत प्रभावीपणे ते मांडतात.

**शरीर परोपकारी लावावे। बहुतांच्या कार्यास यावे ।**
**उणी पडो नेदावे।कोणी येकाचे ॥**

इतरांशी मृदू भाषण करावे,त्यांच्या दु:खाने दु:खी व्हावे.अन्यायाची क्षमा करावी.लोकांनी धिक्कार केला तरी आपली शांती ढळू देऊ नये.

**लोकांस परिक्षीत जावे । नाना प्रकारे॥**
**स्वये आपण कष्टावे । बहुतांश सोशत जावे ॥**

**झिजोन किर्तीस उरवावे । नाना प्रकारे ॥**

झिजावें हा शब्दप्रयोग अजून एका ओवीत केला आहे.

**जाणत्याचे संगतीनें भजावें| जाणत्याचे संगतीनें झिजावें |**
**जाणत्याचे संगतीनें रिझावें| विवरविवरों |१८-२-५||**

प्रथम समर्थ सांगतात : आतापर्यंत जे बहिरंगात आचरण झाले ते झाले.त्याला इलाज नाही.पण श्री दासबोध चिंतनानंतर तरी यापुढे शहाण्यासारखे वागावे व त्यासाठी त्या त्या क्षेत्रातील शहाणा व जाणत्याची संगत धरावी.जाणत्याचे आचार व उच्चार यामागे त्याच्या ज्ञानाचा अनुभव उभा असतो.हे लक्षांत घेऊन त्याचे अनुसरण करावे. जो दुसऱ्याने केलेल्या सेवेचे यथार्थ गुणग्रहण करील अशाच समजदार व गुणग्राही पुरुषाचे सेवेमध्ये आपले शरीर झिजवावे.गुणवान माणसासाठी शरीरकष्ट करावे.मनाच्या आठव्या श्लोकातही हेच सांगितले आहे.

---

## १५ फेब्रुवारी २०२४

**म्हणोन दुसऱ्यास सुखी करावें । तेणें आपण सुखी व्हावें ।**
**दुसऱ्यास कष्टवितां कष्टावें । लागेल स्वयें ।।१४-६-२३॥**

या आठवड्यात १४-६ ( चातुर्य लक्षण समास) चिंतनासाठी आहे.समर्थांनी एकच गोष्ट किती प्रकारांनी समजावली आहे. त्याचे प्रत्यंतर ज्या वेळी आपण लक्षपूर्वक वाचू,ऐकू तेव्हा कळते.

या समासात जी १२ वी ओवी आहे त्याचे उत्तर २३ व्या ओवीत आहे असे मला वाटते. दुसर्यास हा शब्दप्रयोग आठ वेळा आला आहे.

**आपण दुसऱ्यास करावें| तें उसिणें सवेंचि घ्यावें |**
**जना कष्टवितां कष्टावें| लागेल बहु ||१२||**

अजून वेगळी उदाहरणे सूचत नाहीत.सगळे समर्थांनी सांगितले आहे.प्रत्येक जण आपल्या आयुष्यात ते पाहू शकतो.मुळात ह्या समुहात मीच लहान आहे. (ज्ञानाने) त्यामुळे अजून काही सूचत नाही.क्षमस्व.

---

## १६ फेब्रुवारी २०२४

**समजले आणि वर्तले| तेचि भाग्यपुरुष जाले |**
**यावेगळे उरले| तें करंटे पुरुष ||१४ .६.२५||**

चातुर्य लक्षण समासात जो शहाणपणाने आपले अंतरंग शृंगारतो , दुसऱ्याच्या उपयोगी पडतो तोच सुखी होतो.इतरांना दु:ख देऊन कोणी सुखी होऊ शकत नाही हे उघड सत्य आपण नीट पाहिले पाहिजे आणि

समजून घेतल्याखेरीज कामाला येत नाहीत हे समजून उमजून जे वागतात तेच भाग्यवान पुरुष आहेत बाकीचे करंटे असे समर्थ सांगत आहेत. समजले आणि वर्तले असे समर्थ सांगत आहेत.

आचरण घडले असे होता कामा नये.शिडाची नौका वार्याच्या मर्जीवर सोडून चालत नाही.तिला सुकाणू असते व ते अनुभवी तांडेल हाताळत असतो,नियंत्रित करत असतो हे महत्त्वाचे आहे.अन्यथा नाव भरकटायला वेळ लागणार नाही.खडकावर आपटून ठिक-या उडायला वेळ लागणार नाही. समर्थ हे यत्नाचे महत्त्व सांगणारे संत आहेत.म्हणजे आयुष्य घडवणे त्याला आकार देणे याला महत्त्व ते देतात.होईल तसे होऊ द्या हा भोंगळपणा समर्थ मान्य करीत नाहीत.म्हणून जी सत्य प्रगट आहेत ,जे अनुभव दिसतात येतात ते डोळे उघडून पहाणे,त्या गोष्टींचे मर्म समजून घेणे,त्यावर चिंतन करणे, आपल्याला ते कसे किती लागू पडते ते तपासणे व जो निष्कर्ष आला त्यावर तातडीने अंमलबजावणी करणे समर्थांना अपेक्षित आहे.

असे वागले तर काय घडू शकते? समर्थ भाग्यपुरुष असा शब्द वापरतात.स्वाधीन की दैवाधीन हा वाद विषय जुना आहे. समर्थ स्वाधीन या मताचे आहेत.आपले भाग्य आपणच डोळसपणे जो घडवतो, त्यासाठी आवश्यक ते ते सर्व काही जो करतो आणि प्रपंच असो की परमार्थ दोन्ही ठिकाणी अपेक्षित यश मिळवतो,उंची गाठतो,तो भाग्यपुरुष अशी सर्वसाधारण व्याख्या करता येईल. हे ज्यांना समजत नाही,किंवा जे लक्षात घेत नाहीत ते जैसे थे परिस्थितीत रहातात किंवा अवनतीचे अभाग्याचे धनी होतात व स्वतः स्वतःचे नुकसान करून घेतात.ज्यांना स्वहित कशात आहे हे समजत नाही,

जे त्याकडे डोळेझाक करतात ते केवळ जन्मले आणि मेले अशात जमा होतात.अशांसाठी समर्थ करंटा हा शब्द वापरतात. कठोर शब्दात मांडले आहे.पण त्याशिवाय आपण खडबडून जागे होत नाही.हे आपल्याकडून होत तर नाहीना असाही विचार होत नाही.म्हणून समर्थ इतके स्पष्ट रोखठोक बोलतात असे मला वाटते.

---

## १७ फेब्रुवारी २०२४

**जितुका व्याप तितुकें वैभव । वैभवासारिखा हावभाव ।**
**समजले पाहिजे उपाव । प्रगट चि आहे।। दा १४ - ६ - २६।।**

कालच्या ओवीत आपण भाग्यवान पुरुषाचे लक्षण बघितले होते. जे उद्यमी आहेत, जीवनाचा अर्थ समजून वागतात त्यांना समर्थ भाग्यपुरुष म्हणतात. जीवनाचा अर्थ जो समजतो, कार्य कशा प्रकारे करावे हे ज्याला कळते तो खरा विचारी पुरुष आहे. आजच्या या ओवीत जो जास्त व्याप करतो, जास्त कार्य करतो त्याला भगवंत वैभव देतो असे समर्थ म्हणतात. हा साधा निसर्ग नियम आहे.

एका कार्यालयात एक कारकुन आहे. दहा ते पाच काम करणे, तेही आपल्या टेबलवर येणारे मर्यादित काम बघणे या करिता त्याला मिळणारा पगार बघा आणि त्याच कार्यालयाच्या अधिकाऱ्याचा कामाचा व्याप, त्याला मिळणारी चारचाकी गाडी, त्याची बसायचीच्या खोलीचा थाट आणि त्याला असणारा पगार हे बघा. अधिकाऱ्याचे वैभव डोळ्यात भरते. त्याच्या कामाचा व्याप, जबाबदाऱ्या बघता ते योग्य ही आहे.

पंचायत समिति किंवा जिल्हापरिषदेचा पदाधिकारी आणि पंतप्रधान यांची तुलना करून पहा. पंतप्रधानांचा व्याप बघता त्यांना उचित वैभव व मान मिळणारच आहे. असा माणूस दिवसांचे वीस तास काम

करतो. आळश्याला ते पद कधी मिळेल काय? जो मनुष्य उद्यमी आहे, प्रयत्नशील आहे, त्यालाच उच्च पद-प्रतिष्ठा मिळत असते. समर्थांचा सारा भर उद्यमशीलते वर आहे.

माणसाने सतत कार्यरत असले पाहिजे. "आळस घातघेणा" आहे असे समर्थ म्हणतात. आणि हे ज्याला कळत नाही तो शहाणा म्हणविण्याच्या लायकीचा नाही. हा समासच चातुर्य लक्षणाचा आहे. ज्याचे अंगी चातुर्य असेल तो आळशी असणार नाही, तो सतत उद्यमी राहिल. अशा प्रकारे व्याप वाढवून तो वैभव भोगेल. अवगुण टाकले की श्रेष्ठत्व व पर्यायाने वैभव येणारच आहे. या जगात कठोर परिश्रमाला पर्याय नाही, शॉर्टकट नाही. स्वामी विवेकानंदांचे एक वाक्य आहे. **Awake, arise and stop not till the goal is reached.** उठा उभे व्हा झडझडून कामाला लागा आणि ध्येय प्राप्ति होई पर्यंत थांबू नका.

समर्थांनी श्रोत्यांना जगदीश मूर्ती म्हटले आहे. आपण सारेच दासबोधाचे अभ्यासक आहात. दासबोधाच्या माध्यमातून विविध गीता, उपनिषदे, पुराण आदि ग्रंथांचा अभ्यास आपणाला घडत आहे. मी आपल्याला काही सांगावे अशी माझी पात्रता नाही. फक्त आपल्याला आठवण देऊ शकतो. तेच इथे मी केलेले आहे. आपण यावर चिंतन अवश्य कराल अशी आशा करतो व प्रणाम करतो.

---

## १८ फेब्रुवारी २०२४

**मित्रि करितां होतें कृत्य । वैर करितां होतो मृत्यु ।**
**बोलिलें हें सत्य किं असत्य । वोळखावे ।।दा. १४ - ६ - २८।।**
**आपणास शाहाणें करूं नेणे । आपलें हित आपण नेणे ।**
**जनीं मैत्रि राखों नेणे । वैर करी ।। दा. १४- ६ - २९।।**

चातुर्य लक्षणाचा हा समास असून या ओव्या अगदी शेवटी शेवटी आल्या आहेत. चातुर्याचा समास असल्याने चातुर्याची एक कथा सांगून चिंतन सुरु करतो.

पाकिस्तान व बलुचिस्तानच्या सीमेवरील एका गावात मुल्ला नसरुद्दीन रहात असे. दर आठवडी बाजाराला मुल्ला गाढवावर लादून किराणा, धान्य, भाजी वगैरे वस्तु आपल्या गावातून सीमेपलिकडे बाजारात नेत असे. चेकपोष्टवर त्याचा माल तपासला जाई. तिथल्या कस्टम अधिकाऱ्याला संशय होता की मुल्ला काही तरी स्मगलिंग करीत आहे. दर वेळी कसून तपासणी होऊन ही काहीच सापडत नसे. या कारणाने कस्टम अधिकारी व त्याची मैत्री देखील झाली. अखेर तो अधिकारी निवृत्त झाला. वय झाल्याने मुल्लाने देखील आपला व्यापार बंद केला.

एक दिवस मुल्लाला तो अधिकारी भेटला व म्हणाला, आता तर मी निवृत्त झालो आहे, तू देखील धंदा बंद केला आहेस. तू कोणता माल स्मगल करीत होता ते आता तरी मला सांग. आता तुला शिक्षा होणार नाही. यावर मुल्लाने आपल्या धंद्याचे गुपित सांगितले. मुल्ला म्हणाला मी इथून गाढवं नेत होतो व मालासकट गाढवं विकून टाकत होतो. गाढवांना बलुचिस्तान मध्ये दीड-दुप्पट किंमत मिळत असे. पाकिस्तान सरकारने गाढवे बाहेर नेऊन विकण्यावर बंदी लादली होती. अर्थात् मी मालासकट गाढवं नेत असल्याने कुणाला संशय येत नव्हता. मुल्लाचे चातुर्य वर्णन करणारी ही कथा झाल्यावर आपली चिंतनाची ओवी बघुया.

व्याप वाढवायचा तर मित्र वाढवावे लागतात. मित्रत्व जोडल्याने कार्य सिद्धीस जाते. अर्थात् वैर केल्याने मरण देखील ओढवू शकते असे ही ओवी सांगते. ही गोष्ट स्पष्टच आहे. समर्थ आपल्याला हे आपल्या अनुभवाने ओळखायला सांगतात.

समर्थ पुढच्या ओवीत म्हणतात, आपण आपल्याला शहाणे कसे करावे ते कळत नाही. खरी गोष्ट तर अशी आहे की शहाणपण शिकता येते हे समर्थांनी सहाव्याच ओवीत सांगितले आहे. थोडे डोळे उघडे ठेवून जगाकडे बघितले की शहाणपण येते.

मुल्लाने गाढवांचे स्मगलिंग कसे केले असेल? त्याने नियमांचा अभ्यास करूनच मार्ग काढला होता. या कामी उगीच त्रास होऊ नये म्हणून त्याने कस्टम अधिकाऱ्याशी मैत्री देखील केली. जो मूर्ख असतो तो लोकांशी मैत्री न करता वैर करतो. अशा माणसाला अज्ञानी म्हणावे असे समर्थ ३०व्या ओवीत म्हणत आहेत. आणि भांडखोराला यश मिळत नसते.

**आपण येकायेकी येकला । सृष्टींत भांडत चालिला ।**
**बहुतांमध्यें येकल्याला । येश कैचें ।। ३१।।**

आता चातुर्य लक्षणाचा हा समास संपत आहे.

---

**१९ फेब्रुवारी २०२४**

**अवगुण सोडितां जाती । उत्तम गुण अभ्यासितां येती ।**
**कुविद्या सांडून सिकती । शाहाणे विद्या।।दा १४ - ६ - ५।।**

ओवी चरण देतांना थोडी गडबड झालेली दिसते. पहिला ओवी चरण द्यायला हवा होता त्या ऐवजी दुसरा चरण दिला गेला आहे. असो! या पुर्वी आपण याच समासाची पहिली आणि सहावी ओवी बघितली होती, त्यात काही तरी धरावी सोये। आगंतुक गुणांची असे दोन चरण आले आहेत. प्रस्तुतच्या ओवीतही हेच वेगळ्या प्रकारे सांगितले आहे.

अवगुण सोडतो म्हटले तर सहज सोडता येतात. फक्त इच्छा हवी. माणसाला उपजत जे गुण-दोष आहेत ते काही केल्या जात नाहीत. समर्थ देखील ते टाकुन द्यायचा आग्रह करीत नाहीत. पण अवगुण तर सोडता येतील ना? अवगुण गेले की उत्तम गुणांचा अभ्यास करून त्यांना आत्मसात करता येतात, फक्त इच्छा हवी, प्रयत्न करायला हवा. उत्तम गुण जर अंगिकारले तर ते आपल्याला फायद्याचे ठरणार आहेत. जीवनात जास्तीत जास्त लाभ पदरी पाडून घेणे व त्यासाठी प्रयत्न करणे मानवास शक्य आहे, तेवढे सामर्थ्य मनुष्याच्या अंगी निश्चितच आहे. त्यामुळे माणसाने प्रयत्न पूर्वक निरनिराळ्या गुणांचा विकास करावा जेणे करून आपले व्यक्तिमत्व प्रभावशाली होईल.

अर्थात् याला एक अट आहे. "कुविद्या सांडून सिकती । शहाणे विद्या।" म्हणजे मूर्खपण त्यागावे लागेल, शहाणपण अंगिकारावे लागेल. हे सहज शक्य आहे कारण ते अशक्य असते तर समर्थांनी सांगितलेच नसते. आपण स्वतःमध्ये सुधार केला की जग सुधरविण्याची कला माणसाला सहज प्राप्त होते. मी सुधारू शकलो म्हणजे दूसरा देखील सुधारू शकेल हा आत्मविश्वास येतो. एकदा का शहाणपण शिकला की आगंतुक गुणांची प्राप्ति करून घेता येते. याद्वारे ऐश्वर्य मिळविता येते व ते भोगता येते.

या साठी आळस त्यागा, प्रयत्नशील व्हा, मूर्खपण सोडा, शहाणपण शिका. समर्थांनी हाच संदेश संपूर्ण समासात दिला आहे. "असेल माझा हरी तर देईल खाटल्यावरी " ही वृत्ती नसावी. सतत उद्यमी असावे. "रिकामा जाऊ नेदी येक क्षण" ही वृत्ती असावी. मग त्याला काहीही कमी पडणार नाही हे समर्थांचे आश्वासन आहे.

---

## २० आणि २१ फेब्रुवारी २०२४

**बहुतांचे मुखी उरावें । बहुतांचे अंतरी भरावें ।**
**उत्तम गुणीं विवरावें । प्राणीमात्रासी ।। १४ - ६ - ३२।।**
**शाहाणे करावे जन । पतित करावे पावन ।**
**सृष्टिमधें भगवद्भजन । वाढवावें ।। १४ - ६ - ३३।।**

समर्थांचा सारा खटाटोप भगवद्भजन वाढविण्याचा आहे. आपण प्रथम स्वतःला शहाणे करावे व नंतर आसपासच्या लोकांना शहाणे करायचा प्रयत्न करावा. म्हणजे सारा समाजच शहाणा होईल. त्या कारणाने समाजातील भांडण तंटा, वैर-द्वेष वगैरे संपून जाईल आणि एक आदर्श समाज निर्माण होईल. असा समाज भगवद्भक्तीमध्ये लीन होईल. याकरिता चातुर्य संपन्न पुरुषाला हे दायित्व समर्थांनी सोपविले आहे. असा चतुर मनुष्य आपल्या कर्तृत्वाने समाजात लोकप्रिय होईल, त्याचे नाव प्रत्येकाच्या तोंडी असेल. प्रत्येकाची आस्थेने चौकशी करून त्यांच्या उत्थानासाठी प्रयत्न करून त्यांना देखील योग्य मार्गावर आणून समाजसेवा करून आपल्या जीवनाचे कल्याण करणारा पुरुष समर्थांना अपेक्षित आहे. चातुर्य लक्षणाचा हा समास समर्थांनी तेवढ्यासाठीच दासबोध ग्रंथात समाविष्ट केला आहे. समर्थांची ही इच्छा आपण पूर्ण करायला हवी.

या दोन ओव्यांच्या आधी समर्थांनी भांडखोर माणसाचे वर्णन ५ ओव्यांमधे केले आहे. अशा प्रकारे आपण भांडखोर असू नये, अशी वृत्ती असेल तर ती तत्काळ त्यजावी हे समर्थांना अपेक्षित आहे. समर्थांनी दासबोध केवळ आत्मज्ञान प्राप्ती साठी लिहिला नसून प्रत्येकात आमूलाग्र परिवर्तन समर्थांना अपेक्षित होते. आत्मज्ञान व मुक्ती साठी अन्य ग्रंथ आहेत हे समर्थ जाणून होते. पण या देशातला नागरिक पराधीन आहे, याला आधी योग्य मार्गावर आणून परकीय सत्तेविरूद्ध लढायला उद्युक्त करणे हा समर्थांचा हेतु होता. २०० समास अभ्यासतांना ही गोष्ट आपल्या लक्षात जरूर येईल. **"देव मस्तकी धरावा । अवघा हल्लकल्लोळ करावा ।"** हे समर्थांनी येवढ्यासाठीच लिहिले आहे, असे मला वाटते.

---

## २२ फेब्रुवारी २०२४

**हे सकळ गुणापासीं गती । सगुण भाग्यश्री भोगिती ।**
**अवगुणास दरिद्रप्राप्ती । येदर्थी संदेह नाहीं ।। द.९ स.४.ओवी ४**

दशक नववा समास चार ओवी क्रमांक ४ पहिल्या ३ ओव्यांचे उत्तर आहे. चिंतनाचे शिर्षक आहे की अवगुण सोडिता जाती. श्री समर्थांचा परमार्थ अत्यंत विवेक प्रधान आहे.ज्ञानाच्या सामर्थ्यावर शिष्याचा/साधकाचा दृढविश्वास पाहिजे.

आता थोड्याच दिवसात दासनवमी निमित्ताने पारायणे सुरू होतील.पण नुसती पारायणांची कवायत करून भागणार नाही. संतांचे म्हणणे काय आहे ते आपल्या कुवतीनुसार लक्षात घ्यायचे.त्यातून १% तरी आपल्याला समजले का? हे ज्याचे त्याने ठरवायचे.कारण प्रत्येकाचा पेपर वेगळा.परमार्थात copy चालत नाही. जाणत्याचें अनुकरण करावे.भलत्या सलत्याचे करु नये नाहीतर गडबड होते.असो.

अचूक प्रयत्न आणि उत्तम ज्ञान यांचे महत्त्व दशक ९ समास ४ मध्ये सांगितले आहे.पण यात प्रयत्न करण्यासाठी शरीर हे साधन वापरावे लागते.त्यामुळे ते उत्तम ठेवावे लागते.तसेच ज्ञान मिळवण्यासाठी बुध्दी लागते या दृष्टिकोनातून दोन्ही गोष्टी शारीरिक आहेत.

चारित्र्य आणि सद्गुण यांची उपासना करणाऱ्यांच्या गळ्यात यशश्री माळ घालते. सद्गुणांमुळे ऐहिक किंवा पारलौकिक वैभव माणसाला प्राप्त होते.मनाचे श्लोक क्रमांक १४१ यात सुध्दा जाणत्याचें पाय धरावे असे सांगितले आहे.

---

## <u>२३ फेब्रुवारी २०२४</u>

**हें तों प्रगट चि असे । जनीं पाहातां प्रत्यक्ष दिसे ।**
**विद्येवीण करंटा वसे । विद्या तो भाग्यवंत ।। ९-४-१०**

**१) विद्या २) बुध्दी ३ ) विवेक ४) दीर्घोद्योग ५) कौशल्य ६) महत्वाकांक्षा** यांच्या गुणांच्या अभावामुळे प्राणी कऱंटाच राहतो.

या समासातील ४ ते १९ या ओव्या प्रत्येक साधकाच्या खास करून युवकांच्या / तरुणांच्या नित्य मननात असाव्यात.( आजचे महाराष्ट्रातील राजकारण पाहून मन विषण्ण होते. जर संतसाहित्य अभ्यासक्रमात सुरुवातीपासून असेल तर समस्यांवर मात कशी करावी हे समजेल.असो.मी ज्यास्त काही लिहित नाही.असो)

करंटा आणि जाणता कोणाला म्हणायचे ते सांगून श्री समर्थ, गुण नसता जिणे व्यर्थ आहे ,हे पटवून देतात. मनाच्या श्लोकात सुध्दा ते म्हणतात,**मना सांग पां रावणा काय केले । अकस्मात ते सर्व राज्य बुडाले** ॥ त्याच्याजवळ बुध्दिमत्ता होती, ऐश्वर्य होते, तो ज्ञानसंपन्न दशग्रंथी ब्राह्मण होता पण अवगुण बरेच होते. ते त्याच्या नाशाला कारणीभूत झाले. प्रपंच आणि परमार्थ दोन्हीकडे जाणतेपण हवे. समर्थांचा परमार्थ विवेक विचारांवर अधिष्ठित आहे, विवप्रधान आहे. प्रापंचिक आणि पारमार्थिक दोघांना कर्म करावे लागते. पण जो जाणतेपणाने कर्म करतो, त्याला वैभव प्राप्त होते.तुलाच तुझ्या जीवनाचा शिल्पकार व्हायचे असेल,जीवनाती भाग्य निर्माण करायचे असेल तर जाणतेपणाने कर्म करुन गुणांचा विकास केला पाहिजे. परमार्थात सुध्दा जाणतेपण महत्वाचे असते.

---

## २४ फेब्रुवारी २०२४

**जैसी विद्या तैसी हांव । जैसा व्याप तैसें वैभव ।**
**तोलासारिखा हावभाव । लोक करिती ।।९ - ४ - १३।।**

जगात प्रत्येकाची आर्थिक, सामाजिक, कौटुंबिक परिस्थिती भिन्न भिन्न का असते याची चर्चा समर्थांनी या समासात केली आहे. कर्म करतांना जो जाणी पूर्वक कर्म करतो, त्याला यश हमखास मिळणार आहे. प्रयत्नवाद हा समर्थांचा परवलीचा शब्द आहे. प्रापंचिक असो वा परमार्थिक कर्म करणे भाग आहे. तूच तुझ्या जीवनाचा शिल्पकार आहेस. आपल्या जीवनात भाग्य निर्माण करणे निश्चित आपल्या हातात आहे. अवगुणी माणूस करंटा असतो. त्याला यश मिळणे संभव नाही.

**विद्या नाहीं बुद्धि नाहीं । विवेक नाहीं साक्षेप नाहीं।**
**कुशळता नाहीं व्याप नाहीं । म्हणौन प्राणी करंटा ।।१०।।**

अंगी काही गुण नसतील तर माणसाचे जीवन अगदी वाया जाते. कांहीं तरी विद्या, वैभव, महत्वाकांक्षा असली पाहिजे तरच मनुष्य प्रगति करू शकतो. ज्या माणसापाशी विद्या नाही, वैभव नाही तो भाग्यहीन असतो. माणसाची विद्या जितकी असते त्याच प्रमाणात त्याची महत्वाकांक्षा असते. माणूस जेवढा व्याप करेल, जेवढा उद्योग करेल तेवढे वैभव त्याला मिळते. माणसाचे सामर्थ्य जेवढे असेल तितकीच कर्तबगारी तो दाखवितो.

त्या काळात परकीय सत्तेच्या जुलमामुळे सर्वसाधारण माणूस दैववादी झाला होता. या नकारात्मक भुमिकेतून त्याला बाहेर काढणे गरजेचे होते. माणसाचा स्वतःच्या कर्तृत्वावर भरोसा असला की तो परसत्तेच्या विरुद्ध लढायला उठून उभा राहू शकेल. म्हणून समर्थांनी हा उपदेश केला.

---

## २५ फेब्रुवारी २०२४

**पशु पक्षी गुणवंत । त्यास कृपा करी समर्थ।**
**गुण नस्तां जिणे व्यर्थ । प्राणीमात्राचें ।। दा ९ - ४ - १५।।**

कालच्या ओवीत आपण गुणांची चर्चा केली होती . गुण मग ते सद्गुण असो की परिक्षेत मिळालेले गुण असाे, फार महत्वाचे ठरतात. अगदी एक एक गुणाने जेव्हा मेडिकल वा इंजिनियरींची एडमिशन हुकते तेव्हा त्या एका गुणाची किंमत लक्षात येते. असो!

आजची ओवी पशु पक्षांच्या गुणाबद्दलची आहे. साधा कुत्र्यांचेच बघा गल्लीत बेवारस कुत्र्यांना कोणीही विचारत नाही पण अल्सेसियन कुत्रा मात्र सेठ सोबत कार मध्ये बसतो. कित्येक लोक पोपट पाळतात. त्यांचे कोडकौतुक करतात. सर्कशीत तर विविध प्राण्यांचे खेळ दाखवितात. हे सारे त्यांचे अंगभूत गुणांमुळे होते. कोणी उंदीर पाळत नाहीत, मांजरीला मात्र दूध पाजतील. पोपट कसा चतुर असतो त्याची एक कथा सांगतो.

इराण मधला कोणी व्यापारी व्यवसाया निमित्त भारतात आला. इथल्या जंगलात त्याला पोपटांचे थवे दिसले, त्यातला एक पोपट पकडून तो गावी। घेऊन गेला. त्याला बोलणे शिकविले, पिंजऱ्यात ठेवले. सहा आठ महिन्यांनी तो व्यापारी भारतात आला. निघतांना त्याने पोपटाला ही बाब सांगितली आणि विचारले की

तुझ्या बांधवांना काही निरोप असेल तर सांग. पोपट म्हणाला मी तर काही निरोप देणार नाही पण तूच त्या कुटुंबियांना सांग की मी तुझ्या पिंजऱ्यात आहे हे सांग आणि त्यांचा निरोप मला सांग.

त्याप्रमाणे व्यापारी त्या जंगलात जाऊन तिथल्या थव्यांना ही बातमी सांगू लागला. इतक्यात एका पोपटाने मान टाकली व तो गतप्राण झाला. परत आल्यावर व्यापाऱ्याने ही घटना आपल्या पोपटाला सांगितली. ते ऐकुन पिंजऱ्यातला पोपट देखील मान टाकून खाली पडला. व्यापाऱ्याला वाईट वाटले, त्याने तो मृत पोपट पिंजऱ्यातून बाहेर काढला आणि बाहेर फेकला. व्यापऱ्याच्या हातून सुटताच पोपट उडू लागला. झाडाच्या फांदीवर बसून त्याने व्यापाऱ्याला सांगितले की जसा मी जीवन्त आहे तसाच जंगलातला तो पोपट देखील मेला नव्हता. त्याने तुझ्या माध्यमातून मला सुटण्याची कला सांगितली. आणि पोपट आपल्या वनाच्या दिशेने उडू लागला.

पशुपक्षांचे गुणांकडे आपण बघितले. समर्थ म्हणतात त्या प्राण्यांकडून शिका आणि "काही तरी आगंतुक गुणांची कास धरा. गुणवान पशु पक्ष्याला माणुस जवळ करतो. गाई, बैल, कुत्रा हे तर शेतकऱ्यांचे सवंगडी आहेत. मग मनुष्याने का गुणवान होऊ नये?

**गुण नाहीं गौरव नाहीं । सामर्थ्य नाहीं वैभव नाहीं । कुशळता नाहीं तर्क नाहीं । प्राणीमात्रासी ।।**
**या कारणें उत्तम गुण । तेंचि भाग्याचे लक्षण ।लक्षणें विण अवलक्षण । सहजचि जालें ।।**

संपूर्ण समासात उत्तम गुणांची महिमा समर्थांनी सांगितली आहे. आपण दासबोधाचा अभ्यास करतो ते स्वतःमध्ये बदल घडवून आणण्यासाठी. म्हणून आपण विविध गुण आत्मसात करूया. जी गोष्ट पशू पक्षांना जमते ती आपल्याला का जमणार नाही?

---

## २६ फेब्रुवारी २०२४

**जाणते लोक ते शाहाणे| नेणते वेडे दैन्यवाणे ।**
**विज्ञान तेहि जाणपणें| कळो आलें ||९.४.४१||**

जाणते नेणते,शहाणे वेडे असे विरुद्ध अर्थाचे शब्द समर्थ वापरतात.एक जोडी परमार्थाला लागू पडते तर दुसरी नित्य व्यवहारात .किती सहज आपण कोणाला शहाणा किंवा वेडा म्हणतो.आपण खरंच शहाणे असणे म्हणजे काय हे जाणून असे बोलतो का? ज्याला वेडा म्हणतो तो वेडा का ? तर आपल्याला वाटले म्हणून.पण आपली गणना शहाण्यात आपली आपणच करतो .त्याला आधार कशाचा?

समर्थ दैन्यवाणा असा शब्द वापरतात.त्याचा आधार घेऊन पाहू.दैन्यवाणे कोण असते? ज्याने विद्याभ्यास केला नाही म्हणून ज्ञानाचे कौशल्याचे दुर्भिक्ष आहे असा.किंवा ते केले पण त्याचा व्यवहारात उपयोग कसा करावा हे समजले नाही असा .त्यांचे जिणे दैन्यवाणे म्हणजे कोणीही कीव करावी असे असते.म्हणजे अगदी अन्न वस्त्र निवारा या मूलभूत गोष्टी मिळवण्यात अपयश येते.कुटुंबाची अन्नान्न दशाच होते असे नाही पण सर्व सामान्य किंवा त्यापेक्षा कमी दर्जाचे आयुष्य जगावे लागते. असे का घडते तर व्यावहारिक शहाणपणाचा आभाव . म्हणून वेडेपणाचा शिक्का बसतो. समर्थ जाणते पण दोन्ही अर्थी वापरतात

**११.३.२९ प्रपंचीं पाहिजे सुवर्ण| परमार्थी पंचिकर्ण |**
**माहावाक्याचें विवरण| करितां सुटे ||२९||)**

परमार्थात पिंड व ब्रह्मांड यांचे निखळ सत्य समजून घ्यायला ८२ तत्वे समजून घ्यावी लागतात.या तत्वांचे एकमेकांत मिसळून जाणे कालवले जाणे समजून घ्यावे लागते.विवेक विचार हाच मार्ग आहे. अगदी आपण रूढार्थाने ज्याला विज्ञान किंवा science म्हणतो त्यातही निसर्गाचे मूलभूत नियम निसर्गाची कार्यपद्धती समजून घ्यावी लागते.प्रयोग करावे लागतात.गृहीतके बांधावी लागतात व जे प्रयोगाच्या कसोटीवर खरे ठरते तो अनुभव नियम म्हणून मान्य केला जातो. परमार्थात ही प्रयोगशाळा मनाच्या पातळीवर असते.सदगुरु वचन ऐकणे त्यावर सखोल मनन चिंतन करणे व प्रत्यक्ष अनुभूती प्रचीती स्वतः घेणे ही प्रक्रिया आहेच.जे ज्ञान प्रत्यक्ष अनुभवास येते validate होते त्याला विज्ञान म्हणतात. यात फरक नाही.पण अनुभव ढोबळ स्थूल इंद्रिय गोचर असणे हे प्रपंचात घडते तर अनुभव सूक्ष्म असल्याने फक्त अनुभवता येतो वर्णन करणेही कठीण जाते हे परमार्थात घडते . प्रस्तुत श्लोकात जाणपणे कळो आले हे खूप महत्त्वाचे आहे.समजून उमजून डोळसपणे अनुभव घेण्याला समर्थ महत्त्व देत आहेत असे वाटते

---

## २७ फेब्रुवारी २०२४

**अतिवाद करूं नये। पोटीं कपट धरूं नये ।शोधिल्याविण करूं नये । कुळहीन कांता ।।**
**विचारेंविण बोलों नये । विवंचनेविण चालों नये ।मर्यादेविण हालों नये । कांहीं येक ।।**
**दा २ - २ - ३ आणि ४**

मनुष्य हा क्षुद्र स्वार्थ जपणारा प्राणी आहे. देहबुद्धीच्या प्रभावाखाली तो कधी कधी अनैतिक आचरण करतो. देहबुद्धी म्हणजे मी देहच आहे अशी बुद्धि. समर्थांचा भर माणसाच्या सुधारणे वर अधिक आहे. देहबुद्धी कमी करीत करीत तिला नष्ट करणे याकरिता समर्थ इथे मार्गदर्शन करीत आहेत. देहबुद्धी जाऊन आत्मबुद्धी येणे हा परमार्थ. त्याकरिता प्रथम "मी देह नाही, मी आत्मा आहे ही धारणा पक्की करावी लागते. भगवान श्रीकृष्ण गीतेच्या तेराव्या अध्ययात हा देह माझ्यापासून भिन्न आहे असे वर्णन करतांना म्हणतात –

**क्षेत्रज्ञं चापि मां विद्धि सर्व क्षेत्रेषु भारत ।**
**क्षेत्रक्षेत्रज्ञयोर्ज्ञानं यत्तज्ज्ञानं मतं मम ।। गीता १३ - २।।**

अर्जुनाला उपदेश करतांना भगवंत म्हणतात, "हे अर्जुना, संपूर्ण क्षेत्रात अर्थात् ह्या शरीरात मलाच क्षेत्रज्ञ समज, म्हणजे या शरीरात वसणारा परमात्मा समज. आणि क्षेत्रक्षेत्रज्ञाचे जे ज्ञान आहे, तेच माझ्या मते ज्ञान होय. कठोपनिषदात देखील शरीराला रथाची उपमा दिली आहे. या शरीरात वसणाऱ्या अंतरात्म्याला क्षेत्रज्ञ किंवा रथाचा स्वामी म्हटले आहे. देहबुद्धी कशी कशी डोकं वर काढते यावर बाबा बेलसरेंनी प्रकाश टाकला आहे. मूर्ख लक्षणांची चर्चा करतांना समर्थांनी देहबुद्धीचे विवरण केले आहे. आपली अडचण ही आहे की देह मी नाही हे मानायलाच तयार नाही. या समासात देखील काही मूर्ख लक्षणांची चर्चा आलेली आहे.

या ओव्यांमध्ये शहाण्याने काय काय करू नये याची चर्चा आलेली आहे. सूज्ञाने चुकूनही वादावादीत पडू नये, त्यात आपला वेळ अकारण खर्च होतो. कपटी नसावे, कुल-शीलाची चौकशी केल्याशिवाय मुलीशी

लग्न करू नये अर्थात् आंधळेपणाने सोयरीक करू नये. फसवणूक होण्याचा संभव असतो. बोलतांनी विचार पूर्वक बोलावे.  एखादे नवीन कार्य सुरु करतांना आधी त्याचा साधक बाधक विचार करणे गरजेचे आहे. समाजात वावरतांना नीति धर्माच्या मर्यादांचा विचार करणे गरजेचे आहे.

आपण प्रातः उपासनेत शंकराचार्यांचे आत्म शटक म्हणतो. शंकराचार्य म्हणतात "अहं निर्विकल्पो निराकार रूपो ।" या आत्मषटकाच्या प्रथम कडव्यात  मी मन नाही, बुद्धि नाही, हे शरीर ही मी नाही. चिंतनाच्या ओवीचा सारांश असा की साधकाने नीति नियमांचे पालन करावे.

---

## २८ फेब्रुवारी २०२४

विचारेंविण बोलों नये । विवंचनेविण चालों नये ।
मर्यादेविण हालों नये । कांहीं येक ।। दा २ - २ - ४।।

महंताने समाजात कसे वागावे हे समर्थांनी इथे सांगितले आहे. हा समास मुख्यत्वेकरून महंताच्या आचरणाच्या मर्यादा ठरवून देतो. असे असले तरी सर्व सामान्य माणसाला देखील या आज्ञा मार्गदर्शक आहेत. विचारेंविण बोलों नये याकरिता जैन साध्वी प्रितीसुधा महाराज म्हणत असत –

"शब्द सम्हालकर बोलिए । शब्द के हाथ न पाव ।
एक शब्द करें औषधि । एक शब्द करें घाव ।।"

बोलतांना तुमचे शब्दाचे चयन उचित असलेच पाहिजे. तुमच्या चुकीच्या शब्दाने कोण, केंव्हा दुखाविला जाईल सांगता येत नाही. बाण आणि शब्द हे एकदा निघाले की परत घेता येत नाहीत. ते आपल्या लक्ष्याला भेदल्याशिवाय रहात नाहीत. म्हणून loose talks करायची सवय चांगली नाही. समर्थांनी केलेली "कोमळवाचा दे रे राम " ही प्रार्थना आपण नित्य म्हणतो पण त्यावर विचार करीत नाही. त्या काव्यामध्ये माणसाचे वर्तन कसे असावे याचा पाठ दिला आहे. माझ्या शब्दाचा काय परिणाम होणार आहे याचा विचार करूनच बोलले पाहिजे. अन्यथा अनर्थ होण्याची शक्यता असते.

कोणतेही कार्य सुरु करायचे असेल तर त्याचा आराखडा आधी तयार करणे गरजेचे आहे. विवंचना म्हणजे साधक-बाधक विचार. एक व्यवसाय सुरु करतांना तो चालेल काय? आपल्या जवळ पुरेसे भांडवल आहे काय? कमी पडले तर जुळवाजुळव कशी करणार वगैरे बाबींचा आगाऊ विचार करणे आवश्यक आहे. घरात एखादे शुभ कार्य निघाले तर सारी व्यवस्था आधीच ठरवून ठेवतात. कार्याचा विचका होऊ नये असे planning केले जाते. महंताला तर प्रचंड मोठे कार्य करायचे असते आणि या कार्यासाठी त्याचे जवळ विविध स्वभाव असलेले कार्यकर्ते असतात.

तुमची सारी चळवळ समाजाच्या नीति बंधनांच्या चौकटीतच असली पाहिजे. समाजात महंताची बदनामी होता कामा नये. महंताने कार्यकर्त्यापुढे आदर्श प्रस्थावित करायचा असतो. पुढील कार्य करते वेळी मागील कार्याची रूपरेषा कार्यकर्त्याला ठाऊक असली पाहिजे. शासकीय नियमांच्या विरोधात जाऊन अथवा समाज रूढींच्या विरुद्ध काम होता कामा नये. कार्यकर्त्यापुढेच नव्हे तर समाजापुढे देखील महंताचे आचरण आदर्श असले पाहिजे.

या नंतरची ओवी देखील कार्यकर्त्याला मार्गदर्शकच आहे. कोणावर रागवायचे आणि कोणावर नाही हे माहित हवे अन्यथा कार्याचा विचका होईल. चोरास ओळखी पुसो नये याचा अर्थ अशा व्यक्तीशी संबंध ठेऊ नये. कारण हा माणूस तुमच्याकडून तुमच्या नातेवाईकाचा पत्ता घेईल आणि तुमचे नाव घेऊन त्या नातेवाईकाला गंडा घालेल. यांच्या पासून सावध असलेलेच बरे. त्या काळात प्रवासाची साधने नव्हती. पायी अथवा घोड्यावरून प्रवास करावा लागे. वाटे लुटारूंचे भय असे. म्हणून एकट्या दुकट्याने रात्रीचा प्रवास टाळण्यास समर्थ सांगत आहेत. आजही अगदी तसे तातडीचे काम असल्याशिवाय रात्रीचा प्रवास टाळला पाहिजे. सारा समास उत्तम लक्षणांचा आहे. सज्जन माणसाने ह्या सुचना पाळणे गरजेचे आहे. सामाजिक नीति नियम पाळून आपण उत्तम पुरुष आहोत हे आपण सहज सिद्ध करू शकतो.

---




<u>२९ फेब्रुवारी गुरुवार</u>

**जनीं आर्जव तोंडू नये ।**
**पापद्रव्य जोडूं नयें । पुण्यमार्ग॥ २-२-६ ॥**

आर्जव म्हणजे अंत:करण्याची कोमलता, अंत:करणात कठोरतेचा अभाव असणे .नम्रता, प्रेमळवाणी, मनाची कोमलता, सर्वांशी प्रेमळ वर्तन ही सर्व लक्षणे उत्तम दासाची आहेत. दास्यभक्ती नवविधा भक्तीतील सातवी भक्ती आहे. ह्यामध्ये लीनता, शरणागती असते. लीनतेशिवाय आर्जव आणि मार्दव दोन्ही अवघड आहे ( मार्दव म्हणजे कोमलता आणि आर्जव म्हणजे लाघवीपणा आणि मनाची सरलता, ऋजुता)

समर्थ म्हणतात आधी विचार करा, मग बोला कारण शब्द हे शस्त्र आहे.माणसावर जेवढी जबाबदारी जास्त,तेवढे त्यांनी विचारपूर्वक बोलावे.कारण एकदा का तोंडातून शब्द बाहेर पडताना चूक झाली की, नंतर सगळे निस्तरीत बसावे लागते. माऊली पण पसायदानात जे खळांची व्यंकटी सांडो । असे म्हणतात मृदू बोलण्यावर समर्थांचा फार भर आहे. ते म्हणतात

**जे दुसऱ्यास दुःख करी। ती अपवित्र वैखरी ।**
**आपुलाची पात करी । कोणे एके प्रसंगी ॥ १२-१०-२५ ॥**
**आर्जव नाहीं जनासी। जो अप्रिये सज्जनासी ॥**

दशक ५-३-८९ मध्ये समर्थ म्हणत आहेत. ७३ ते ९७ मध्ये शिष्य कसा नसावा याचे विवरण केले आहे. पाप द्रव्य जोडू नये म्हणजे फसवून कमवू नये.इमानदारीने कमवावे. इथे एक गोष्ट आठवली वाचलेली. शिवाजी महाराज एकदा स्वारीवर होते .ते डोणगाववरुन. पुढे जात असताना त्यांना भूक लागली. त्यांनी समोरच्या झोपडीतून भांडंभर दूध घेतले. मैलभर पुढे गेल्यावर महाराज पुन्हा परत आले.आणि अंगरख्यातील दोन नाणी काढून म्हातारीजवळ दिली. म्हातारीचा मुलगा म्हणाला, "महाराज, एवढ्याशा दुधाची ती काय किंमत? तेवढ्यासाठी आपण परत कशाला आलात?" महाराज म्हणाले, मला एकदा फुकट घ्यायची सवय लागली, की मग ती सवय वाढत जाईल.माझ्या सैन्यालाही ती सवय लागेल. महाराज पुढे हसत हसत म्हणाले, आणि *मीच प्रजेचे पैसे चुकवले, तर प्रजाही कर देणार नाही.*म्हातारीने आणि मुलाने खाली वाकून महाराजांना मुजरा केला.

**नम्रपणे पुसों जाणे। नेमस्त अर्थ सांगो जाणे ।**
**बोलो ऐसैं वर्तो जाणें । उत्तम क्रिया ॥दशक १९-४-८॥**

दुसऱ्याला लीनतेनें कसे विचारावें हें त्याला समजते ; कोणी त्याला विचारले तर तो नेमका अर्थ सांगू शकतो; बोलतो तसा वागतो; एवंच,त्यांचें सगळे काम उत्तम असते.

---

## १ मार्च २०२४

**निंदा द्वेष करूं नये । असत्संग धरूं नये ।**
**द्रव्यदारा हरूं नये । बळात्कारें ।। दशक २-२-७ ॥**

या समासात समर्थ देहबुद्धीच्या या प्रगटवृत्ती आवरून धरून टाळायच्या असतात म्हणून नकारात्मक पध्दतीने उत्तम लक्षणे सांगत आहेत. संपूर्ण दासबोधात निंदा हा शब्दप्रयोग १२ वेळा आला आहे. निंदा, द्वेष, मत्सर, हेवेदावे, पूर्वग्रह हे सर्व वाद वाढवणारे घटक आहेत. मानवनिर्मित आहेत. मनाचा श्लोक क्रमांक १८१ मध्ये पण तेच सांगितले आहे.

**नव्हे चेटकी चाळकु। द्रव्य भोंदु ।नव्हे निंदकु मछरू भक्तिमंदु ।**
**नव्हे उन्मतु वेसनीं संगबाधु ।जनीं ज्ञानिया तो चि साधु अगाधु॥**

लक्षात असू द्या कीं जो- अनुभूतिसंपन्न अगाध ज्ञानी व खरी साधुवृत्ति असलेला सद्गुरु असतो तो चेटके करणारा, भुलविणारा, द्रव्य उकळणारा, परनिंकरणारा, मत्सरग्रस्त, व्यसनाधीन, भक्तिहीन असा कधीही नसतो. त्यामुळे त्याची संगती कधीच बाधक, अपकारक ठरत नाही.

बध्द जीवामध्ये देहबुद्धीचे कामना वासना,आसक्ती चे प्राबल्य असते, तर मुमुक्षु जीवामध्ये पुण्यमार्ग,परमार्थ ओढ, सत्संगाची इच्छा असते, पण त्याचबरोबर प्रपंचाची आसक्तीपण असते.त्याचे दोन्ही दगडांवर पाय असतात.त्याला योग्य मार्गदर्शन मिळाले,तर तो साधक बनतो.संकल्प करावा,संतसगती करावी हे वाटणे म्हणजे मुमुक्षत्व.पण ते प्रत्यक्षात आणणे हे साधकत्व आहे.

---

**<u>२ मार्च २०२४</u>**


**अति क्रोध करूं नये । जिवलगांस खेदूं नये ।**
**मनीं वीट मानूं नये । सिकवणेचा ।। २-२-१०**

उत्तम लक्षणे या समाजातील ही ओवी आहे. समर्थ अती क्रोध नको म्हणतात.आवश्यक असा क्रोध कुठला? अन्यायाला विरोध करताना,सीमेवर शत्रूचा प्रतिकार करताना,मुलांचे चुकत असेल तर समज किंवा दंड देताना, आवश्यक क्रोध लागतोच.

अती म्हणजे अनाठायी किंवा गरजेपेक्षा तीव्र प्रतिक्रिया.अती क्रोध हा वैयक्तिक हानीकारक आहे.त्यामुळे दिवसभर मनस्थिती खराब रहाते. नातेसंबंध ताणलेले रहातात.कुटुंब स्वास्थ्य बिघडते.रक्तदाब वाढून मेंदूत रक्तस्त्राव होऊ शकतो.सामाजिक स्तरावर अतिक्रोध हा हिंसाचार घडवून आणतो.सलोखा नाहीसा होतो.राष्ट्रा राष्ट्रांमध्ये घडणारे संघर्ष जितके स्वार्थ मूलक असतात तितकेच क्रोधमूलक असतात हे आपण अनुभवतो आहोत. जिवलगांना दुखवू नये असे समर्थ सांगत आहेत.आपला मानसिक आधार, buffer , stress buster हे आपले मित्र स्वजनच असतात.त्यांना न दुखावणे खूप महत्त्वाचे असते.

तिसरा मुद्दा कोणी काही सल्ला दिला, अनुभव सांगीतला तर आपला अहंकार आड न येऊ देता त्यांच्या अनुभवातून शिकायची तयारी ठेवावी.शिकण्याचा वीट मानू नये.आपण एखाद्या गोष्टीला विटतो कधी तर त्या व्यक्तीबाबत मनात अनादर उत्पन्न झाला असेल,किंवा वारंवार तेच ते सांगीतले जाते तेव्हा.पण अनेकदा सांगूनही आपण आपल्यात बदल केलेला नसतो हे मात्र आपण सोयिस्कर विसरतो तरी किंवा दुर्लक्षित करतो हे आपण लक्षात घेत नाही.

---




**<u>३ मार्च २०२४</u>**

**क्षणाक्षणा रुसों नये । लटिका पुरुषार्थ बोलों नये ।**
**केल्याविण सांगों नये । आपला पराक्रमु ।। दा २ - २ - ११।।**

सद्या आपण उत्तम लक्षणांचा समास बघत आहोत. हा समास मुख्यत्वेकरून महंताच्या लक्षणांचा आहे. समर्थांच्या महंताला लोक संग्रह करायचा आहे. निरनिराळ्या प्रकारचे आणि विविध स्वभावाचे लोक एकत्र आणून कार्य करवून घ्यायचे आहे. कार्यात सुसुत्रता हवी, विसंवाद व्हायला नको म्हणून महंताने देखील

आपल्या स्वभावाला मुरड घालायला हवी. महंताला देहबुद्धीचा त्याग करायला समर्थ सांगत आहेत. प्रत्येक ओवीत विशिष्ट सूचना समर्थ देत आहेत. या आधीच्या ओवीत अति क्रोध करू नये, प्रेमाच्या माणसाला दुखवू नये, चांगले शिकण्याचा आळस करू नये असा उपदेश समर्थांनी दिला आहे.

आता ही अकरावी ओवी काय म्हणते? यात तीन बाबी आलेल्या आहेत. एक म्हणजे क्षणाक्षणा रुसों नये, अर्थात् पदोपदी रुसणे योग्य नाही. "लटिका पुरुषार्थ " न केलेला पुरुषार्थ सांगण्यात काहीच अर्थ नाही. आपण खोटे बोलत आहोत हे लगेच लक्षात येणार आहे. तीसरा मुद्दा "केल्याविण सांगों नये पुरुषार्थ आपला." कल्पनेतला किंवा कधीच न केलेला पुरुषार्थ लोकांना सांगू नये. अर्थात् फुकटच्या बढाया मारू नये. जे प्रत्यक्ष आपण केलेले आहे ते आपल्या अनुयायांना जरुर सांगावे पण खोटी आत्मस्तुती करायचे टाळले पाहिजे.

महंताला कार्यकर्त्यांची एक फळी उभी करायची असते. त्यांना बलोपासनेला तसेच रामोपासनेला लावायचे असते. प्रखर देशभक्ती त्यांच्यामध्ये रुजवायची असते. हे सारे करतांना आपला देश स्वाधीन कसा करता येईल याचा विचार लोकांच्या मनांत रुजवायचा असतो.

"सकळ करणे जगदीशाचे" म्हणणाऱ्या समर्थांच्या ओव्यांचा अर्थ सांगण्याचा प्रयत्न त्यांच्याच प्रेरणेने सांगायचा आहे. आपण काही करतो आहे हा भाव मनात न आणता हे लिहायचे आहे. आपण हे सारे गोड मानून घेत आहात, त्याने लिहायची प्रेरणा मिळते. समर्थ चरणी नतमस्तक होऊन पूर्ण करतो.

---

## ४ मार्च २०२४

**बोलिला बोल विसरों नये । प्रसंगीं सामर्थ्य चुकों नये ।**
**केल्याविण निखंदूं नये । पुढिलांसी कदा ।। दा २ - २ - १२।।**

समर्थ महंताला बारिक-सारिक सूचना करीत आहेत. महंताने छोटी-शी देखील चूक करता कामा नये असा समर्थांचा कटाक्ष होता. त्याच्या वागण्याचे अनुसरण लोक करणार आहेत हे समर्थ जाणून होते. म्हणून त्याच्या वागण्या बोलण्यात सूसुत्रता असली पाहिजे असा समर्थांचा कटाक्ष होता. मागच्या ओवीत समर्थांनी किरकोळ सूचना केल्या आहेत पण त्यांचे पालन झाले पाहिजे असा त्यांचा कटाक्ष असे.

एखाद्याला शब्द दिला असेल, मी येईन, मी करीन असे म्हटले असेल तर महंताने आपला शब्द जरुर पाळावा. दिलेल्या शब्दाला जागले पाहिजे. अटीतटीचा प्रसंग आला असेल, आता बल प्रयोग केल्याविण गत्यंतर नसेल तर बल प्रयोग जरुर करावा. धटास उद्धट व्हावे लागेल.

महंत व्यायाम शाळेत जाऊन बलाची उपासना करणारा आहे, त्याने वेळप्रसंगी बलाचा उपयोग करण्यास कचरू नये. महंताने प्रत्येक बाबतीत सक्षम असले पाहिजे. इतरांना जमणार नसलेले काम महंताने स्वतः केलेच पाहिजे. स्वतः काम करून दाखविल्याशिवाय दुसऱ्याला दुषण देऊ नये. दुसऱ्याचा अकारण उपहास करू नये. ही गोष्ट महंताने जाणून असावे.

नीतिचे आचरण आणि वैराग्य हे महंताचे मुख्य गुण आहेत. महंताने हे सतत ध्यानात ठेवले पाहिजे. महंत हा समाजात धर्माचा आणि राजकारणाचा स्तंभ असतो. समाजाची बांधणी करणे त्याचेकडून

अपेक्षित असते. त्यामुळे त्याने स्वतः आदर्श वागणूक ठेवली पाहिजे. त्याने युक्तीने लोकसंग्रह करून लोकांना बलोपासना आणि ईश्वर उपासनेला लावले पाहिजे. येवढी अपेक्षा समर्थ आपल्या महंताकडून ठेवत आहेत.

---

## ५ मार्च २०२४

**सुखा आंग देऊं नये ।प्रेत्न पुरुषें सांडूं नये ।**
**कष्ट करितां त्रासों नये ।निरंतर ।। दा २ - २ - १४।।**

एक म्हण आहे. "असेल माझा हरी तर देईल खाटल्यावरी।" म्हणजे मला सगळे आयतेच मिळायला हवे. कष्ट मी मुळीच करणार नाही. या आधीच्या ओवीतही आळसे सुख मानूं नये असे सांगितले आहे. आळस हा घातघेणा, उदास नागवणा आहे हे समर्थांनी दासबोधातच सांगितले आहे. महंत असो वा साधक हा आळशी कधीही नसावा. "सुखा आंग देणे" हा देखील आळसाचाच प्रकार आहे. समाजकार्य करणाराने सतत कष्ट करण्याची तयारी ठेवली पाहिजे. दुसरा कोणी काम करेल आणि मी मात्र पडून राहीन ही वृत्ती असेल तर कार्य नाश होतो. देह तर सतत कार्यरत असला पाहिजे.

एखाद्या कार्यात अपयश आले तरी पुनः पुनः ते कार्य करावे. अपयशाने खचून जाऊ नये. "प्रयत्ने वाळूचे कण रगडिता, तेल ही गळे" हे लक्षात ठेवून सतत प्रयास करीत राहिलें पाहिजे. थकून जाऊन अथवा निराश होऊन कार्य नाश होईल. सतत श्रम करायची तयारी हवी. आपण कष्ट केले तर आपले सहकारी देखील कष्ट करतील. "कष्ट करिता सेत पिकते" हा मंत्र लक्षात असू द्यावा.

**कष्टेंविण फळ नाहीं । कष्टेंविण राज्य नाहीं ।**
**केल्याविण होत नाही । साध्य जनीं ।।१८ - ७ - ३।।**
**आळसें काम नासतें । हें तो प्रत्ययास येतें ।**
**कष्टाकडे चुकावितें । हीन जन ।।४।।**

प्रयत्न वाद, कष्ट आळस हे शब्द समर्थांचे फार आवडीचे आहेत. दैववादावर समर्थांचा विश्वास नाही. प्रयत्न वाद समर्थांचा परवलीचा शब्द आहे. एक सुभाषित आहे-

**अलसस्य कुतो विद्या अविद्यस्य कुतः धनं ।**
**अधनस्य कुतः मित्रं अमित्रस्य कुतः सुखं।।**

सुख मिळविण्यासाठी आळस त्यागावा लागणार आहे

---

**आज दासनवमी लेख थोडा मोठा आहे.**
**वेळ काढून वाचवा ही विनंती.**

आज श्री रामदास स्वामींना समाधी घेवून ३४३ वर्षे झालीत तरी आज पण त्यांनी रचलेली ग्रंथ संपदा आपल्या सर्वांचे मार्गदर्शन करत आहे..असे थोर संत महाराष्ट्रात झाले हे आपले भाग्यच..अश्या थोर संताच्या चरणी विनम्र भावनेने नतमस्तक.

काहीकाही दिवस लिहिण्यासाठी शब्द शोधावे लागत नाही.तसाच आजचा दासनवमीचा दिवस..! सज्जनगढ,शिवथरघळ,चाफळ अशा प्रत्येक समर्थठिकाणी,प्रत्येक समर्थभक्तांच्या चेहऱ्यावर बघितलं की ते शब्द दिसू लागतात..अंतरीचा शब्द जाणवतो,तो समर्थ स्पर्श दिसतो..

धगधगत वैराग्य,अपार उत्साह पूर्ण,उस्फूर्त चर्या,हनुमंता सारखी पिळदार शरीरयष्ठी ,सुर्या सारखी तेजस्वीता,ससाण्या सारखी चाणाक्ष नजर,अचूकपणे चौफ़ेर निरीक्षण,सागरा प्रमाणे गहर ज्ञान,हिमालयासारखी उत्तुंग बांध प्रतीथी,उसळत्या गंगेसारखी ऋतंभरा प्रज्ञेची वैभव संपन्न रत्नखाण,पराकोटीची संवेदनशीलता,मायेहून ही मवाळ आणि बुडत्या जणांचा आधार,अपरंपार विशाल हृदय,अपार भगवतप्रेम,दास्यत्वाची चरम अनुभूती सांगणारी अनन्य शरणागती या आणी अश्या असंख्य सद्गुणांची प्रसन्नमूर्ती म्हणजे राष्ट्रगुरु श्री समर्थ रामदास स्वामी महाराज...

प्रभु श्रीरामाला व हनुमंताला उपास्य मानणाऱ्या समर्थांनी परमार्थ, स्वधर्मनिष्ठा, राष्ट्रप्रेम यांच्या प्रसारार्थ महाराष्ट्रात प्रबोधन व संघटन केले. ते संत तुकारामांचे समकालीन होते.

धर्मरक्षणार्थ समर्थ रामदासांनी समर्थ संप्रदाय स्थापन केला.अखंडपणे सावध राहून कार्य करावे हे त्यांच्या शिकवणुकीचे सूत्र होते.सजग राहून त्यांनी राजकारण, धर्मकारणात आपला वेगळा ठसा उमटवला.संत परंपरेतील समर्थ रामदासांचं स्थान स्वतंत्र होय .

अखंडपणे सावधान राहून धर्मप्रसाराचे कार्य त्यांनी केले. धर्मरक्षणासाठी समाज बलवान झाला पाहिजे, असे त्यांना वाटे. आधी केले मग सांगितले अशी त्यांच्या मनाची धारणा होती. ते स्वतः नित्य सूर्यनमस्कार करत असत.रामाची उपासना करून भक्तिमार्ग पुढे घेऊन जाण्यासाठी त्यांनी 'समर्थ' संप्रदाय सुरू केला. हनुमंत ही शक्तीची देवता मानतात. हनुमानालाच कुळदैवत मानून त्यांची ते आराधना करतात. हनुमंताप्रती असलेली श्रद्धा खालील रचनेतून व्यक्त होते.

**आमुचे कुळी हनुमंत । हनुमंत आमुचे दैवत ।**
**तयाविण आमुचा परमार्थ । सिद्धांते न पावे की ।।**

सर्वसामान्य जनतेचे दु:ख दूर व्हावे म्हणून देवीसमोर संकल्प करून कार्यासाठी शक्ती मागितली. संत रामदासांनी तुळजाभवानी स्तोत्रं लिहिली त्यावरून लक्षात येते. खालील स्तोत्र पाहा -

**अंतरी कल्पना केली । एकांती बोलिले बहू ।**
**रक्षिता देव देवांचा । त्याचा उच्छाव मांडिला ।।**

आळस हा माणसाचा शत्रू आहे. त्याच्या नादाला लागू नका. अभ्यासाने प्रत्येक गोष्ट साध्य होते. कर्मच केलं नाही तर फळ कसं मिळणार? हे सोप्या भाषेत रामदासांनी जीवनाचं तत्त्वज्ञान सांगितलं ते असं...

**केल्याने होत आहे रे । आधी केलेचि पाहिजे ।।**

प्रपंच असो किंवा साधना, कोणतेही कार्य करण्यासाठी सुरुवात करून मग त्याचा सराव करावा. कोणतीही गोष्ट करण्यासाठी साधना करणे आवश्यक आहे. सर्व नशिबावर सोडून चालणार नाही. नशीबही शेवटी आपल्या कर्मातूनच घडते. त्यामुळे नशीब चांगले घडवण्यासाठी सदैव सावध राहिले पाहिजे. या ठिकाणी संत रामदास म्हणतात -

“संसारी असावे सावध ”कर्म करायच्या वेळेला जर आपण गाफील राहिलो तर कर्म कराताना चूक होऊ शकते. पुढे त्याचे वाईट परिणाम भोवे लागतील. त्यामुळे सदैव सावध राहून कार्य करावे.

**अखंड सावधान असावे । दुश्चित कदापि नसावे ।।**
**तजविजा करीत बसावे । एकांत स्थळी ।।**

शके १५७१मध्ये रामदासांनी शिवाजी महाराजांना पत्र लिहिले ते असे -

**निश्चयाचा महामेरू । बहुत जनांचा आधारू ।अखंड स्थितीचा निर्धारू । श्रीमंत योगी ।।**
**यशवंत कीर्तिवंत । सामर्थ्यवंत वरदवंत ।पुण्यवंत नीतिवंत । जाणता राजा।।**
**देव धर्म गोब्राम्हण । करावया सरंक्षण | हृदयस्थ जाला नारायण । प्रेरणा केली ।।**

अशा प्रकारे ओवीरूपात असलेल्या पत्रात शिवाजीराजांची स्तुती केली. आणि संभाजी महाराजांना पत्र लिहिलं, त्यामध्ये शिवरायास आठवावे अशी त्यांनी सूचनाही केली. यावरून संत रामदासांचे वेगळेपण आणि श्रेष्ठत्व लक्षात येते. वेगळेपणामुळेच महाराष्ट्रातील संतपरंपरेतील समर्थ रामदासाचे स्थान अतिशय स्वतंत्र असे आहे. मनाला शुद्ध करण्यासाठी त्यांनी मनाचे श्लोक लिहून विचारांना शुद्ध केले.

श्री मनाचे श्लोकां’ची जन्मकथा लक्षात घेतल्याशिवाय त्या श्लोकांचा हेतू, त्यांचा रोख आणि त्यांचा गूढार्थ लक्षात येणार नाही. ही कथा अशी सांगतात..

श्री क्षेत्र चाफळ! समर्थ रामदास स्वामी तिथं रामनवमीचा उत्सव दरवर्षी मोठय़ा भक्तिप्रेमानं साजरा करीत. छत्रपती शिवाजी महाराजांकडूनही या उत्सवासाठी धनधान्य येत असे. या निसरडय़ा कडय़ावरून जाताना आपल्या शिष्यांना सांभाळण्याची गरज मग समर्थाना जाणवली. कारण एकदा राजाश्रय प्राप्त झाला की, त्या आधाराचा प्रभाव आणि पगडा मनावर पडल्याशिवाय राहत नाही! राजाच पाठीशी आहे तर मग चिंता कसली, ही वृत्ती बनते. मग भगवंताच्या आधारापेक्षा भौतिकाचा आधार अधिक आश्वासक वाटू लागतो!

शाश्वत आत्मकल्याणाच्या ओढीनं आपल्याकडे आलेल्या शिष्यांच्या मनात अशाश्वत भौतिकाचा आधार निर्माण होणं सद्गुरूला शिष्यांच्या मनात अशाश्वत भौतिकाचा आधार निर्माण होणं सद्गुरूला कसं रुचेल? शिष्यांच्या मनात भौतिक सुखाधीनतेचं तण माजलं असेल तर शुद्ध ज्ञानाचं बी पेरूनही आत्मसुखाचं खरं पीक येणं नाही! का ते उत्तम बीज परी समंध। खडकेंसी पाडिला।।’ (दासबोध, दशक ५) अशी गत व्हायची! म्हणजे बी उत्तम आहे, पण ते खडकाळ, दगडगोटय़ांनी भरलेल्या, तण माजलेल्या जमिनीत पेरून काही उपयोग नाही! आपल्या शिष्यांच्या मनात भौतिक आधाराचं तण माजू नये म्हणून समर्थानीच एक लीला केली.

एका उत्सवाआधी ठरलेल्या मुदतीत महाराजांकडून धनधान्य पोहोचू शकलं नाही. आता उत्सवाचं काय होणार, या चिंतेचा ज्वालामुखी शिष्यांच्या मनात उसळला. समर्थांपर्यंत ही चिंता गेली, ते हसून म्हणाले, 'ज्याचा उत्सव आहे तो पाहील!' चिंता नव्हती ती एकाच शिष्याला.. कल्याण स्वामींना! 'सद्‌गुरुवचनी विश्वास पूर्ण। अनन्यभावे शरण।।' असं सद्‌शिष्याचं एक लक्षण 'दासबोधा'च्या पाचव्या दशकात सांगितलंय. तसे कल्याण स्वामी होते. समर्थांनी एके रात्री त्यांना बोलावून घेतलं आणि आज्ञा केली.. 'लिहून घे!' रात्रीचा तो नीरव प्रहर. समर्थांच्या घनगंभीर विरक्त पण मनुष्य मात्राच्या मुक्तीसाठी कारुण्य भावानं ओथंबलेल्या स्वरापाठोपाठ बोरूतून अवतरत असलेल्या अक्षर पावलांचाच काय तो आवाज! 'श्रीमनाचे श्लोक' असे जन्मले!!

एकापाठोपाठ एक असे दोनशे पाच श्लोक समर्थांनी सांगितले आणि कल्याणानं लिहिले. मग त्याच रात्री त्याच्या प्रती काढल्या गेल्या. शिष्यांमध्ये वाटल्या गेल्या. भल्या पहाटे घराघराबाहेर खडय़ा आवाजात ते श्लोक शिष्यांच्या मुखातून निनादले.. त्या श्लोकांनी निद्रिस्त मनं जागी झाली.. धनधान्याची भिक्षा झोळीत पडू लागली. नेहमीपेक्षा अधिक शिधा जमला आणि पाठोपाठ महाराजांकडूनही धनधान्य आलंच! त्या वर्षीचा उत्सव अधिकच थाटात झाला, कारण जन्म केवळ श्रीरामांचा नव्हता तर श्रीसद्‌गुरू मयना शिकविणाऱ्या 'श्री मनाचे श्लोकां'चाही होता! खरा सत्संग आणि खरी नि:संगता शिकविणाऱ्या दिव्य स्तोत्राचा होता!!

संत रामदासांच्या एका एका मनाच्या श्लोकामध्ये इतकं सामर्थ्य आहे की, ते समजून घेऊन अंगीकारले तर जीवनाची दिशा आणि दशा बदलू शकते. प्रपंच आणि परमार्थाची सांगड घालणारा ग्रंथ म्हणजे, 'दासबोध' होय. त्याकाळी समाजात अनेक पंथ होते आणि सर्व संप्रदाय आपापल्या परीने समाजप्रबोधनाचे कार्य करत होते, त्यामध्ये विठ्ठलभक्ती असलेला वारकरी संप्रदाय समाज प्रबोधनाचे कार्य करत होता, त्याच काळात समर्थ रामदासांनी 'दासबोध' ग्रंथ लिहिला आणि त्यामध्ये प्रपंच आणि परमार्थ यांची सांगड घालून नवा भक्तीसंप्रदाय स्थापन करण्यासाठी लोकसंग्रह करावा असे ठरविले. त्यासाठी त्यांनी स्त्री पुरूष असा भेदभाव न करता अनेक शिष्य निर्माण केले आणि धर्माचा प्रचार आणि प्रसार केला. रामदासांनी समाजाला सतत सावधतेचा इशारा दिला.

दांभिक लोक भोळ्याभाबड्या लोकांना फसवत असत. त्यांचे शोषण करत. समर्थ रामदासांच्या जय जय रघुवीर समर्थ" या गर्जनेने मरगळलेला महाराष्ट्र जागा झाला. दऱ्याखोऱ्यातून, डोंगरकपारीतून एकच नाद घुमला. सह्याद्रीच नव्हे, तर गंगायमुना आणि कावेरीची खोरीही या घोषणेने दणाणून टाकली. आसे मठमहंत निर्माण करून, निःस्पृह नेतृत्व समाजात निर्माण करून त्यांनी राष्ट्रउभारणीच्या कार्याला पूरक असे कार्य साधले. धर्मसत्ता व राजसत्ता यांचा अपूर्व समन्वय साधून सशक्त तरुणांची मने राष्ट्रवादाने भारून टाकली. प्रभु श्रीरामचंद्र, आदिशक्ती तुळजाभवानी आणि शक्तिउपासनेसाठी मारुतीराया या तीन देवतांचा जागर त्यांनी समाजात मांडला.

परधर्मीय राज्यकर्ते पराभूत करून महाराष्ट्रात रामराज्य स्थापन व्हावे ही समर्थ रामदासांची इच्छा होती.हिंदवी स्वराज्य स्थापण करणाऱ्या शिवरायांना रामदासांच्या भक्तिसंप्रदायाने साहाय्य केले.

शेकडो मारुतीमंदिरांची स्थापना त्यांनी केली. स्वतः डोंगरदऱ्यांत, घळीत राहून समाजाच्या कल्याणाचेच चिंतन केले. समाजातील अनाथ, निराधार बालकांना, स्त्रियांना सन्मार्गाचा, आत्मोद्‌धाराचा मार्ग दाखविला. समर्थांवर संत एकनाथांच्या वाङमयाचा प्रभाव असल्याने दिसून येते. प्रपंच आणि परमार्थ नेटका करण्यासाठी विवेकसंपन्न व्हा, असा उपदेश केला. आनंदवनभुवनाचे स्वप्न पाहिले.

हिंदुस्थान बलसंपन्न व्हावा यासाठीच क्षात्रतेज व ब्राह्मतेज जागविले. रामाचा आदर्श समोर ठेवून वागण्याचा प्रयत्न करावा असे सांगितले.

**राम उपासना माझी । त्रैलोक्य सुख पावले ।।**
**सोडिले देव इंद्रादि । तोडिली बंधने बळे ।।**

राम उपासनेमुळे त्रैलोक्याचे सुख मिळते असे समर्थ म्हणतात. रामदासांनी समाजातील समस्या जाणून घेण्यासाठी भिक्षेचा मार्ग स्वीकारला. एकदा असेच ते भिक्षा मागायला गेले असता. एका घरात त्यांना आक्रोश ऐकायला मिळाला. त्यांच्या दुःखाची वेदना रामदासांच्या हृदयाला भिडली. ते अस्वस्थ झाले. दुःखाचे कारण विचारले असता, त्यांना समजले की, त्या घरातील सुंदर स्त्री घरातील पुरूषांदेखत पळवून नेली आहे. हे ऐकूण त्यांच्या जी गोष्ट लक्षात आली ती म्हणजे, स्वरक्षण करण्यासाठी समाज असमर्थ झाला आहे. त्यांचा पुरूषार्थ जागवला पाहिजे. निराश, मेलेल्या मनाला चैतन्य देण्याचे काम समर्थांनी मनाच्या श्लोकांमधून केले. लोकांची वैचारिकता बदलत अखंड भ्रमण केले.

समाजातील दुःख, दारिद्र्य, लाचारी पाहून उदास झालेले रामदास स्वामी श्रीरामाशी मुक्त संवाद करतात. अंतर्मुख होऊन मनातील खंत व्यक्त करतात. “हे रघुनायका तू भक्त वत्सल आहेस. नुसत्या बुद्धीच्या सामर्थ्यावर माझे दोन हात फार तोकडे पडतात. मी आता काय करू? मला काहीच सुचत नाही. रघुनाथा तूच काय तो मार्ग दाखव.” खालील रचनेतून त्यांच्या मनातील भावना व्यक्त होतात .

**अन्न नाही वस्त्र नाही । सौख्य नाही जनामध्ये।।**
**आश्रयो पाहता नाही । बुद्धी दे रघुनायका ।।**
**उदास वाटते जीवी । आता जावे कुणीकडे ।।**
**तू भक्त वत्सला रामा । बुद्धि दे रघुनायका ।।**

त्यांच्या तेजेस्वी, ओजस्वी कार्यातून बुद्धीचे तेज अंधारात चाचपडणाऱ्या समाजाला सदैव प्रेरणा देत राहिले. असे हे युगपुरूष या महाराष्ट्रात जन्मले आणि अमर झाले.म्हणून आपला महाराष्ट्र जसा शिवरायांचा आहे म्हणतात तसाच तो श्री समर्थ रामदास स्वामींचा पण आहे.

समर्थांचा निर्वाण दिन म्हणजे ही दासनवमी..!नारायण नावाचे शैशव,रामदास नावाचे तारुण्य,समर्थ नावाचे आयुष्य आज काया सोडणार..! प्रतिपदेपासून चालू झालेलं प्रायोपवेशन नैसर्गिक बदल दाखवू लागलं होतं.अन्न त्याग करून नामाचा आहार आणि जल त्याग करून विरक्ततेची आपोषणी घेऊन हा महात्मा मनुष्यदेहाच्या निवृत्तमार्गी जाऊ लागलाय. गात्र सोडायची अन अनुभव पांघरायचा,मन सोडायच आणि निरामयता अनुभवायची.हे सगळं स्वतःहुन निग्रहाने करायचं.

समर्थांनी माघ कृष्ण पंचमीला तंजावरवरून आलेल्या रामपंचायतनाच प्रतिष्ठापनापूर्वक पूजन केले.गुरु शिष्याची नजर भेट झाली ये हुदयीचे ते हृदयी विराजमान झाले... दगदग होऊन समर्थ पलंगावर बसले... म्हणाले "रामराया एवढ्या लांबून येण्याचे श्रम केले मला नेण्यासाठी स्वतः आलात." त्या दिवसापासून पाच दिवस समर्थ रामरायांना आणि रामराय समर्थांना एकमेकांच्या नजरेत साठवत होते.सज्जनगडावर रामरायांच आगमन हा पावित्र्याचा कळस होता.समर्थांच वास्तव्य,रामरायांच अस्तित्व हा सज्जनगडचा श्वास बनला.

समर्थांनी प्रायोपवेशन हे जसे ऐहिकरित्या जीवनावश्यक रसांच केलं तसच ते मनाच्या विषयांच ही केलं.पंचमीला रामरायांच्या नेत्रावर बांधलेली पट्टी त्यांनी काढली त्याक्षणी ते रामवृत्तीत ते पोहचले. आता त्यांच्या मुखातून,स्पर्शातून रामराय बोलू लागले. रामरंगी लिन होण्याची सुरुवात ही पंचमीची. या रामरायांची सिद्धाआसनात पूजा ही त्यांच्या आयुष्यभराच्या तपाची परमावधी होती.जांभच्या हनुमान मंदिरात सुरू झालेल अनुष्ठान या दिवशी संपत होत,त्याच उद्यापन होत.समर्थ अनंत,अवध्य होते.आयुष्यभराच्या खडतर तपाच हे फलित. सज्जनगडावर समर्थांनी हिंदवी विश्वाचा आराखडा बांधला.विचार केला. कृती केली. किती लिहावे..?किती सांगावे..?हे सगळं इथंच सोडायच..!पुढच्या पिढीला सुपूर्द करायच..!

प्रायोपवेशनाचा मंगल हेतू हाच..!आपली पंचेंद्रिये क्रियाहीन करायची.ती रामरंगात विलीन करायची.ज्ञानइंद्रिये उघडायची.त्या विश्वरामाची चाहूल घ्यायची..! माघ वद्य नवमी उजाडली समर्थ उठले राम मूर्तींना नमस्कार केला, स्नान केले, लंगोटीवर खाली पद्मासनात बसले  ध्यान लावले आक्काना हुंदका आला, त्यांनी डोळे उघडले. भीमस्वामी त्यांना पलंगावर बसवू पहातात १० जणांना ते भारी ठरले महारुद्र हनुमान कि जय मनुका आणि पाणी घेतले बाहेर पटांगणात श्रीराम जयराम जयजय राम चा गजर अखंड चालू होता.. शनिवारचा दिवस होता २ प्रहाराची वेळ होती. माझी काया आणि वाणी यांची आठवण करून दिली. सर्वांना बाहेर बसायला सांगितले फक्त आक्का आत होत्या. कपाळाला गोपी चंदन लावले गळ्यात तुळशी माळ तेजपुंज  मूर्ती आक्का न्याहाळत होत्या समर्थ उत्तराभिमुख बसले होते.. हर हर हर जप चालू होता हि त्यांची समाधी अवस्था होती खण खाणीत आवाजात समर्थ ३ वेळा श्रीराम श्रीराम श्रीराम म्हणताच त्यांच्या त्या घण गंभीर आवाजाने जणू आकाश हेलावले.

तो कोदंड धारी सितापती लगबगीने तिथे आला त्याने आपल्या परम प्रिय लाडक्या भक्ताला आपल्या बाहुत कवटाळले  त्याच्या मांडीवर त्याच्या मायेचा पदरा आड हा लाडका बाळ जन्मभराचा शीण घालवू लागला...

---

## ६ मार्च २०२४

**बहुत चिंता करूं नये । निसुगपणें राहों नये ।**
**परस्त्रीतें पाहों नये । पापबुद्धी ।।२-२-१६॥**

संपूर्ण दासबोधात २८ वेळा चिंता हा शब्दप्रयोग आला आहे.चिंता,काळजी,भय सगळ्यांना असते प्रत्येकाच्या चिंता वेगवेगळ्या प्रकारच्या असतात.समर्थांनी चिंता करू नका चिंतन करा,श्रवण,मनन मनापासून विवेकाने करा असे सांगितले आहे.

**तैसा मी संतांचा अंकित| तुम्हां संतांपासीं बोलत |**
**तरी माझी चिंता तुमचे चित्त| वाहेलच कीं ||१-६-२०॥**

या ओवीत सगळे संतांवर,सद्गुरूंवर सोपवा आणि निश्चित राहा.असे सांगितले आहे.पण हे समजायला साधकाची मानसिक,आध्यात्मिक तयारी व्हायला वेळ लागतो! बरोबर ना ?

**पोटीं चिंता धरूं नये| कष्टें खेद मानूं नये |समइं धीर सांडूं नये| कांहीं केल्यां ||१४-१-१३॥**
**उत्तम संगती धरावी |आपली आपण चिंता करावी |अंतरी बरी विवरावी |बुद्धि जाणत्याची ॥ १७-७-१२॥**

बघा या ओवीत समर्थांनी सरळ सरळ सोपे सांगितले आहे.फक्त जाणता कोण? हे ओळखून तसे वागणे जमले पाहिजे.हीच तर कसोटी आहे.असो. मनाच्या श्लोकात सुध्दा चिंता हा शब्दप्रयोग ५ वेळा आला आहे.मला जास्त भावलेला श्लोक,

**जगीं पाहतां देव हा अन्नदाता |तया लागली तत्वतां सार चिंता |**
**तयाचें मुखीं नाम घेता फुकाचें |मना सांग पां रे तुझें काय वेंचे ||९३||**

समर्थ सांगतात बारकाईने पाहिलेस तर तुझ्या लक्षात येईल की या जगाची चिंता वाहणारा तोच आहे,अन्नदातही तोच आहे.असे असताना फुकटचे नाम घेण्यात तुझे काय जाते हेच कळत नाही. माझ्या सद्गुरू (कलावती आई बेळगाव) नित्य उपासनेत म्हणतात गुरुराया तव चिंतन प्रतापे,समूळ चिंता पळाली ।

आता दुसरा चरण निगुसपणे म्हणजे आळसी,निरोद्योगी.समर्थांना आळसाचा फार मोठा तिटकारा आहे.आपण उत्तम लक्षणे पाहत आहोत.प्रपंच आणि परमार्थ करताना आळस झटकून टाकला पाहिजे.जो खरा साधक आहे त्याने आळशी नसावे. समर्थाच्या शब्दात

**आळस उदास नागवणा| आळस प्रेत्नबुडवणा|**
**आळसें करंटपणाच्या खुणा| प्रगट होती॥ ११-३-१२॥**

पापबुध्दी आणि पाप बुध्दि फक्त ह्रस्व आणि दीर्घ फरक सोप्या भाषेत **पहिली वेलांटी आणि दुसरी वेलांटी मूर्ख होय नादलुब्धी ।निंदक पाहे उणी संधी |पापी पाहे पापबुद्धि ।लाऊन आंगीं ||७-९-५२||** याचा साधा अर्थ की अद्वेत ग्रंथ ( ज्ञानेश्वरी ,दासबोध,गाथा ) यांचा अनादर करू नये. मला जसे अवगत झाले तशी व्यक्त झाली आहे.तृटी माझ्या.जे चांगले ते सद्गुरू आणि समर्थाचे.आपल्याला काही समजत नाही असा भाव मनात ठेवला की सद्गुरूच आपल्या कडून करवून घेतात.

---

**७ मार्च २०२४**

**धूम्रपान घेऊं नये ।उन्मत्त द्रव्य सेऊं नये ।**
**बहुचकासीं करूं नये ।मैत्री कदा ।। दा २ - २ - २५।।**

साधकाच्या, महंताच्या नीतिमत्तेचा स्तर किती उंच असावा हे या ओवीत समर्थांनी सांगितले आहे. साधकाने कोणतेही व्यसन कधीच करू नये याकडे समर्थांचा कटाक्ष असे. निर्व्यसनी मनुष्य समाजाचा आदर्श असतो. एखाद्या व्यसनाच्या आहारी गेलेला मनुष्य आपली नीतिमत्ता गमावू शकतो. काही व्यसने तर अशी आहेत की वेळेवर नशा मिळाली नाही तर तो बेचैन होऊन जातो. धूम्नपान, मादक पदार्थ हे देखील वाईट आहेत. मादक पदार्थ तर माणसाचे माणूसपण हिरावून टाकतात.

अगदी साधे व्यसन देखील तुमचा खोळंबा करील. सहज आठविली म्हणून एक कथा सांगतो. एक स्त्री आपल्या ५-६ वर्षाच्या मुलाला घेऊन महाराजांकडे आली, म्हणाली महाराज, याला गूळ फार खायची सवय आहे. त्याने याचे पोट बिघडण्याची शक्यता आहे. महाराज म्हणाले, "याला आठ दिवसांनी घेऊन ये." आठव्या दिवशी तिने मुलाला पुनः आणले तेव्हा महाराज म्हणाले अजून आठ दिवसांनी आण. आठ दिवसांनी ती पुनः आली तेव्हा महाराजांनी त्या मुलाला मांडीवर घेतले व म्हणाले, "बाळ, गूळ खाऊ नये त्याने तुझे पोट खराब

होईल." मुलाने होकार भरला आणि यापुढे गूळ खाणार नाही हे कबूल केले. हे बघून त्या मुलाची आई म्हणाली, "महाराज, हे जर तुम्ही पहिल्याच दिवशी सांगितले असते तर मला दोन चक्रा नसत्या कराव्या लागल्या." यावर महाराज म्हणाले की मी स्वतःच गूळ आवडीने खात असे. आठ दिवसात ते व्यसन सुटले नाही म्हणून पुनः आठ दिवसांनी बोलविले, आता माझे व्यसन सुटले म्हणून मी बाळाला सांगू शकलो आणि म्हणून त्याने ही ते ऐकले.

चोंबड्या माणसाशी मैत्री करू नका हे देखील या ओवीत समर्थांनी सांगितले आहे. असा माणूस तुमची केव्हा आणि कशी फजिती करेल सांगता येत नाही. म्हणून मित्र निवडतांना देखील सावध असायला हवे.

आपल्या हृदयस्थ परमेश्वराला प्रणाम करतो व माझे विवेचन संपवितो.

---

## ८ मार्च २०२४

**कामेंविण राहों नये । नीच उत्तर साहों नये ।**
**आसुदें अन्न सेऊं नये । वडिलांचें हि ।। २-२-२६॥**

आपण उत्तम गुण समास पाहत आहोत. ही ओवी आत्ता पण ततोतंत लागू होते आहे.यावरूनच समर्थाची दूरदृष्टी लक्षात येते.रिकामटेकडे लोक आजही नाक्या-नाक्यावर पहायला मिळतात.मोठ्या मोठ्या फुशारक्या मारणे, आणि मी मी भोपळ्याची बी म्हणणारे खूप आहेत.कितीही सांगितले तरीही आपला स्वभाव सोडायला तयार नसतात उलट जो सांगायला जातो तोच वाईट ठरतो असा अनुभव प्रत्येकाला आला असेल.पण साधकाने नेहमी कार्यरत रहावे.

दासबोधात सत्वगुण सांगताना जरी कोणी वाईट बोलले तरीही सहन करावे.जो सहन करतो तो सत्वगुणी होय.

**नीच उत्तर साहाणें ।प्रत्योत्तर न देणें ।**
**आला क्रोध सावरणें ।तो सत्वगुण ।।२-७-६७।।**

आसुदें म्हणजे आयते. शिक्षण होईपर्यंत वडिलांवर अवलंबून राहणे ठीक आहे; पण स्वतः ची भाकरी स्वतः मिळवली पाहिजे. आत्ताच्या त्या काळात सुध्दा गरजेचे आहे.पण जिथे संस्कार असतील तिथे मुलगा,मुलगी दोघांनाही समान वागणूक दिली जाते नाहीतर नाही.जर संस्कार चांगले असतील तर आयते खाण्याची इच्छा होत नाही.पण आता जे काही राजकारणात चालले आहे ते काही ठीक नाही. समर्थांच्या काळात परकीय राज्यकर्ते होते.शासन दुष्ट असल्याने सामान्य माणसाची आर्थिक परिस्थिती खूप वाईट होती.म्हणून प्रयत्नवाद,कष्ट यांवर समर्थांनी विलक्षण भर दिला आहे. नीच उत्तर साहो नये दासबोधात १९

व्या दशकात अजून एक ओवी आहे.उध्दटाशी उद्धट.म्हणजे जशास तसे वागावे.सहन करण्याची एक सीमारेषा असते. अजून काही सूचत नाही.आपल्या सर्वांना सादर वंदन.

---

## ९ मार्च २०२४

**तोंडीं सीवी असों नये ।दुसऱ्यास देखोन हांसों नये ।**
**उणें अंगीं संचारों नये ।कुळवंताचे ।। दा २ - २ - २७।।**

चांगल्या चांगल्या लोकांच्या तोंडात छोटी-मोठी शिवी नकळत बसली असते. माणूस ज्या लोकांमध्ये दिवस भर वावरतो त्यांच्या सवयी त्याला नकळत लागतात. पोलीस खात्याचा अधिकारी किंवा माझ्या सारखा कामगारांकडून काम घेणारा माणूस या सवयीला सहज बळी पडतो. माणूस सवयीचा गुलाम झाल्यामुळे कशी गंमत घडते हे एका कथेच्या माध्यमातून आपण समजून घेऊ.

कथा अर्थातच पोलिस ठाणेदाराची आहे. हे महाशय पूजा करतांना फार मन लावून पूजा करतात. पूजा फार वेळ चालते आणि पूजा सुरु असतांना हे मौन धारण करतात. एके दिवशी चोरीच्या प्रकरणातील एक आरोपी त्यांच्या सहकाऱ्यांनी धरला. तो काही केल्या गुन्हा कबूल करी ना. ही बातमी सांगायला त्यांचा हवालदार आला. व सांगू लागला. ठाणेदार साहेब त्यावेळी मौनात होते आणि पळीने पाणी टाकुन ते कृष्णाला आंघोळ घालीत होते. आरोपी सांगत नाही हे ऐकून त्यांचे पित्त खवळले पण ते मौनात होते म्हणून बोलू शकत नव्हते. त्यांनी बाळकृष्ण उचलला त्याला उलटा धरला आणि आचमन पळीने त्याला बडवून दाखविला. हवालदार समजला आणि त्या आरोपीला उल्टा टांगून बडवायला निघून गेला. पण बिचाऱ्या बाळकृष्णावर मौनामुळे मार खायची पाळी आली. ही पद्धत चुकीची आहे पण सवयीचा परिणाम!

आता समर्थ सांगत आहेत म्हणून आपणही तोंडात असलेली लहान सहान शिवी टाकून दिली पाहिजे. तोंडात सतत रामनाम ठेवले की असे वाईट साईट शब्द येणारच नाहीत. खरं पाहिले असता दासबोधात समर्थांनी एका ठिकाणी शिव्यांची यादीच दिली आहे, पण आपण अशा शिव्या टाळाव्या यासाठी ती यादी आहे.

कोणी घसरून पडला, कोणाची फजिती झाली किंवा अन्य प्रकारे एखाद्याचे नुकसान झाले अशा प्रसंगी आपण कुत्सिकपणे त्याला हासू नये. आज आपण हसलो उद्या तो आपल्याला हासेल. आपण असे करू नये. चांगल्या माणसाचे दोष दाखवायचे म्हणून त्याला अकारण दोष चिकटवू नये. प्रत्येक मनुष्यात चांगुलपणा असतो तो शोधायचा आपण प्रयत्न करावा.

समर्थ बारीक सारीक दोष दाखवून आपल्याला त्या दोषांपासून दूर रहायचा सल्ला देतात. हा सल्ला आपल्या हिताचाच असतो म्हणून आपण समर्थांना धन्यवाद देऊया. हे दोष आपण नक्कीच टाकणार आहात म्हणून मी आपल्याला धन्यवाद देतो आणि इथेच थांबतो.

---

## १० मार्च २०२४

**अल्पधनें माजों नये । हरिभक्तीस लाजों नये ।**
**मर्यादेविण चालों नये । पवित्र जनीं ।।२-२-३२**

उत्तम लक्षण या समाजातील ही ओवी आहे.ओवी ४-३०मधे नीती धर्म याला धरून आचरण कसे असावे, वैयक्तिक आणि सामाजिक दोन्ही पातळीवर कसे वागावे कसे वागू नये हे सांगून समर्थ ओवी ३१ पासून पुढे केवळ नीतिमान व्यवहाराने परमार्थ साधता येत नाही. त्यामधे भगवंताला स्थान पाहिजे हे समजावून सांगत आहेत. सर्व साधारण पणे जरा अधिक पैसा मिळाला की त्याच्यामुळे उन्मत्त होणे हा सर्व सामान्य माणसाचा स्वभाव असतो.

पैशाने सारे काही विकत घेऊ शकतो अशी घमेंड उत्पन्न होते. मग कोणाची पर्वा वाटत नाही. पैसा आज आहे उद्या नसेलही हा विवेक सुटतो.उन्मत्त होणे म्हणजे कुणाचीही तमा न बाळगणे.मग इतरांना कमी लेखणे, अपमान करणे घडू लागते.मर्यादा ,भान सुटू लागते.

आपल्यापेक्षा ज्ञान वय अनुभव अशाने जे ज्येष्ठ आहेत , त्यांच्या समोर नम्र असणे आवश्यक आहे.याचे भान सुटते. याला उपाय काय ? तर भगवंताची भक्ती न लाजता करणे.भक्तीत विनम्र भाव आहे.परिस्थिती विपन्न असो की संपन्न जर भक्तीत लीन असू तर वर्तणूक चांगली राहील.

मर्यादेचे उल्लंघन होणार नाही. हे भक्तांचे लक्षण आहे आणि भक्तिचे फलित सुद्धा आहे.भक्तीने आपले विचार वर्तन आचरण संतुलित रहाते आणि वृत्ती चांगली रहाते असे समर्थांना या ओवीतून सांगायचे असावे.

---

## ११ मार्च २०२४

**सत्य मार्ग सांडूं नये ।असत्य पंथें जाऊं नये ।**
**कदा अभिमान घेऊं नये ।असत्याचा ।। दा २ - २ - ४०।।**

सत्य म्हणजे परमात्मा. किंवा सत्य म्हणजे खरे असा अर्थ धरला तरी सत्याचाच मार्ग अनुसरावा. तेच अंततः भल्याचे आहे. लोकमान्य टिळकांनी शिक्षकाला सांगितले की "मी शेंगा खालल्या नाहीत, मी टरफले उचलणार नाही." हा सत्याचा मार्ग त्यांनी बालपणीच अवलंबिला होता म्हणून त्यांनी पुढे "स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध अधिकार आहे व तो मी मिळविणारच" असे इंग्रजांना ठणकावून सांगितले. महात्मा गांधींनी देखील आयुष्यात सत्याचे प्रयोग केलेत.

सत्याचा मार्ग कितीही खडतर असला तरी अंतिमतः तोच मार्ग श्रेयस्कर ठरतो. "सत्यमेव जयते"असे मुंडकोपनिषदातील वचन आहे.

**सत्यमेव जयते नानृतं सत्येन पन्था विततो देवयानः ।**
**येनाक्रमन्तृषयो ह्याप्तकामा यत्र तत् सत्यस्य परमं निधानम्।।मुंडक।।**

भावार्थ - सत्याचा केवळ विजय होतो, खोट्याचा नाही. ज्याच्या सहाय्याने कृतार्थ झालेले ऋषी जातात, ज्या ठिकाणी तेच परमेश्वराचे (सत्य स्वरूपाचे) सर्वश्रेष्ठ आश्रय स्थान आहे. तो देवयान मार्ग सत्यानेच तयार झालेला असतो. सत्यमार्ग सोडायचा नाही म्हणजेच असत्य मार्गाने जाऊ नये. अणि अर्थातच खोट्याचा अभिमान देखील धरू नये. पुढच्या ओवीत देखील "विवेके दृढ धरावी । वाट सत्याची।" असे समर्थ म्हणत आहेत.

जीवनात सत्य हे सर्वोच्च महत्त्वाचे आहे असा समर्थांचा विचार आहे म्हणूनच इथे समर्थांनी तीच गोष्ट पुनः पुनः सांगितली आहे. समर्थांनी सत्याची इतकी थोरवी गायिली आहे म्हणून आपण देखील सत्य मार्ग पक्का धरून ठेवला पाहिजे. समर्थ कृपेने जे विचार स्फुरतात तेच आपणापुढे मांडले आहेत, त्या विचारांचा कृपया स्वीकार करावा.

---

**अपकीर्ति ते सांडावी । सकीर्ति वाढवावी । विवेकें दृढ धरावी । वाट सत्याची ।। २-२-४१**

"आपणासारिखे करिती तात्काळ" या संतस्वभावामूळेच समर्थ मूर्खलक्षणे सांगितल्यानंतर लगेचच उत्तम लक्षणे सांगतात. अपकीर्ति ते सांडावी। सदकीर्ति वाढवावी। याचा क्रमही महत्वाचा आहे. अपकीर्ति होईल ते त्वरित सोडावे. वाईटाचा त्वरित त्याग करावा. सद्कीर्ति वाढेल असे प्रयत्नपूर्वक वागावे. कीर्ति सहसा जन्मोत्तर लाभते.

सत्पुरूषाने मानवीदेह सत्कार्यासाठी झिजवला, तेव्हा कीर्तिरूपाने त्याचे महात्म्य मृत्यूनंतरही राहातेच. समर्थ दूरदृष्टिने, ज्याने अपकीर्ति होईल, ज्याने तुझे, तुझ्या कुलाचे नाव वाईट होईल असे वर्तन त्वरित थांबव, असे आपणास सांगताहेत. आपल्या आजच्या जगण्याचा उद्याच्या पिढीवर काय परिणाम होणार आहे असा व्यापक विचार या दोन ओळिंतून समर्थ देत आहेत.

एका पिढीने जर इंग्रजांचे स्वामीत्व हुसकावून लावले नसते तर आज आपण भारतात राहूनही भारताचे गुणगान गाऊ शकलो असतो का? त्या स्वातंत्र्यसैनिकांच्या कीर्तिच्या तेजाने आज आपण प्रगतीपथावर आहोत. म्हणून भविष्याचा विचार करून सदवर्तन करावे.

'सद्कीर्ति वाढवावी' या अवघ्या दोन शब्दांत समर्थ आपणांस किती व्यापक उपदेश देत आहेत. नुसते सद्वर्तन केले म्हणजे कीर्ति होईल का? सद्कीर्ति साठी आपण केवळ स्वतःपुरते न जगता समाजिक व्हायला हवे, कारण कीर्ति ही समाजातून मिळते. एखाद्या कल्याणकारी कार्यात स्वतःस झोकून द्यायला हवे.

उत्तम विचार
↓
दृष्टी
↓
आराखडा
↓
संघकौशल्य
↓
नि:स्वार्थ सेवाभाव
↓
सुकीर्ति

वरील सर्व साधनांत उत्तम व्हावे, घडावे आणि मग सुकीर्ति कमवावी असे समर्थांना प्रत्येक साधकाकडून अपेक्षित आहे. आणि हे सर्व साधण्यासाठी विवेके दृढ धरावी वाट सत्याची। विवेकपूर्वक ठामपणे सत्यमार्गच ओळखावा आणि अवलंबावा. फलाचा विचार न करता निष्काम कर्मयोग करावा, तो सत्याच्या दिशेनेच करावा असे सांगत समर्थ श्रोत्यांना, वाचकांना, साधकांना घडवत अवघा समाज सुजाण, सुशील, सज्जन बनवत आहेत.

---

## १३ मार्च २०२४

**नाना वेश नाना आश्रम । सर्वांचें मूळ गृहस्थाश्रम ।**
**जेथें पावती विश्राम । त्रैलोक्यवासी ।। दा १४ - ७ - १।।**

युगधर्म निरूपणाचा हा समास फार महत्वाचा आहे. गृहस्थाश्रमातच सर्व नर रत्ने उत्पन्न होतात म्हणून समर्थ गृहस्थाश्रमाला उत्तमोत्त म्हणत आहेत. प्रसिद्ध जैन साध्वी प्रितीसुधा महाराज म्हणत "ग्रहस्थ तो साधुओं के माता पिता होते हैं। हम साधुओं को भोजन तो आपसे ही मिलता है।" सारे साधु निःस्वार्थ असतात. समाजात निःस्वार्थ लोकांची आवश्यकता असते, अन्यथा समाजाचा समतोल रहाणार नाही. समर्थांची साधु संगठना तर आदर्शच होती. तो केवळ ईश्वरप्राप्तिसाठी प्रयत्न रत साधुंचा समूह नव्हता तर समाज संगठन व्हावे व स्वराज्य संचलनासाठी आवश्यक गुप्तहेर व्यवस्था असावी व असेच इतर उद्देश्य त्या संप्रदायाचे होते. साधु कसा असावा हे सांगतांना समर्थ म्हणतात –

**अंतरापासून वैराग्य । तेंचि जाणावें महद्भाग्य ।**
**लोलंगतेयेवढें अभाग्य । आणीक नाही।।**

साधूचे मुख्य लक्षण निःस्पृहता, वैराग्य आहे. आसक्ति अथवा लोभ साधूला शोभत नाही. वैराग्यापोटी राजा देखील राज्य त्याग करून परमात्म्याची प्राप्ति व्हावी म्हणून वनात निघून जातो. वैताग येऊन देखील कोणी गृहत्याग करतो पण हे वैराग्य जास्त काळ टिकत नाही, फजिती होते. ब्राह्मणांना समर्थांनी या ठिकाणी दूषण दिले आहे. भरपुर समाचार घेतला आहे.

**ब्राह्मण बुद्धीपासून चेवले । आचारापासून भ्रष्टले ।**
**गुरुत्व सांडून जाले । शिष्य शिष्यांचे ।।**

शेवटच्या ११ ओव्यात ब्राह्मणांची भरपूर निंदा समर्थांनी केली आहे. ब्राह्मणांनी बुद्धिमान पुरुषाचा आदर्श समाजापुढे ठेवायला हवा पण इथे ब्राह्मण अशोभनीय कार्य करतांना दिसतात, हे समर्थांनी दाखवून दिले आहे. समर्थांना ब्राह्मणांकडून काय अपेक्षा आहे हे ब्राह्मणांनी समजून घेतले पाहिजे व त्या अनुकूल आपल्या आचरणात ब्राह्मणांनी बदल आणला पाहिजे हे इथे आवर्जून सांगावेसे वाटते.

---

**१४ मार्च २०२४**

**याकारणे गृहस्थाश्रम । सकळांमध्यें उत्तमोत्तम ।**
**परंतु पाहिजे स्वधर्म । आणी भूतदया ।।१४-७-४**

देव, ऋषि, योगी तापसी, वीतरागी (वैराग्यशील) या सर्वांचा विभाग गृहसृथाश्रमा़त असतो म्हणजे या सर्वांचा निर्वाह गृहस्थाश्रमाच्या आश्रयाने होतो.

पूज्य बेलसरे त्यांच्या विवरणामध्ये हेच सांगतात, संस्कृती, समाज आणि व्यक्ती ही मानवी जीवनाची तीन अंगे आहेत. माणूस कुटुंबात राहतो.अनेक कुटुंब मिळून समाज बनतो आणि समाजाची एक संस्कृती असते,त्यापप्रमाणे वागून मनुष्य आपला विकास करतो.समाज सुधारण्यासाठी समर्थांनी व्यक्तीच्या परिवर्तनावर भर दिला आहे.परिवर्तन हा युगधर्म आहे.समाज स्वार्थी,ध्येय हीन,विस्कळीत झाला म्हणजे आळशी,निरुत्साही होतो आणि मारक शक्ती प्रबळ होतात.(आता पण थोड्या फार फरकाने तीच परिस्थिती आहे ).

समर्थांच्या वेळी असा निद्रिस्त समाज होता.आतून पोखरला गेला होता. समर्थांनी उत्तम महंत नेमून नवसंजीवनी दिली.समाजाला जागृत केले.विचार,वासना आणि कर्म मनुष्याची तीन अंगे आहेत.आत्मबुध्दीने विचार प्रगल्भ होतात,शुध्द होतात.विचार चांगले असतील तर कर्म निष्काम होते.ईश्वरप्रेमाने वासना पवित्र होते आणि समाजाची उन्नती होते.म्हणून कर्म,भक्ती,ज्ञान यांचा मेळ प्रंपचात असावा लागतो.गृहस्थामश्रमाधूनच ऋषी,मुनी,संत निर्माण होतात,म्हणून गृहस्थाश्रम महत्वाचा आहे.

गृहस्थाच्या घरी असणाऱ्या अन्नामध्ये या सर्वांचा विभाग असल्यामुळे यांना गृहस्थाने अन्नदान करणे आवश्यक आहे.शडकर्मे= षडकर्मे अध्ययन,अध्यापन,यजन,याजन,दान व प्रतिग्रह ही ब्राह्मणाची सहा कर्तव्ये आहेत.याच गृहस्थाश्रमातून भक्तिमार्ग विकसित होत जातो व पुढे वैराग्य प्राप्त होऊन आत्मज्ञानाचे महत् भाग्य त्याला मिळते.

---

**१५ मार्च २०२४**

**आधी प्रपचं करावा नेटका | मग घ्यावे परमार्थ विवेका |**
**येथे आळस करू नका |विवेकी हो || १२-१-१||**

**प्रस्तावना** : विवेक म्हणजे निवड, वैराग्य म्हणजे नावड. विवेक म्हणजे भगवंताची अथवा परब्रम्हाची निवड. वैराग्य म्हणजे विषयांची अथवा दृश्य जगाची नावड. हा दशक प्रपंच-परमार्थ समन्वयाचा आहे. परमार्थामध्ये ज्या गुणांची आवश्यकता असते ते सगळे गुण प्रपंचासाठी देखील आवश्यक असतात. आज समाज भोगवादी झाल्यामुळे अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. 'जगा आणि जगू द्या' या तत्वासाठी विवेक वैराग्य आवश्यक आहे. भगवान रामकृष्ण म्हणत, 'प्रपंच दाईसारखा करावा आणि परमार्थ आईसारखा करावा.

**अर्थ** : आधी प्रपंच व्यवस्थित करावा, त्यानतंर मात्र विवेकी विचार करून परमार्थाकडे वळावे. विवेकी मनुष्यांनो, येथे अजिबात आळस करू नका.

**भावार्थ** : देहाच्या आधारे कर्मे करून दृश्य जगात मला प्रत्येक गोष्ट प्राप्त होईल आणि मी संपूर्ण सुखी समाधानी होईन अशी जीवाची जी धडपड असते, त्याला प्रपंच असे म्हणता येईल. केवळ प्रपंच चांगला करायचा, प्रपंचात सुख उपभोगायचे, नोकरी धंद्यात उत्कर्ष प्राप्त करायचा, यासाठी लागणारा विवेक केवळ व्यवहार चातुर्याच्या आधाराने आपण आयुष्यात वापरतो. पण या विवेकाला वैराग्याची जोड नसेल तर तो विवेक लंगडा आहे. प्रारब्ध कर्मानुसार आलेली कर्तव्येकर्मे पूर्ण करावीच लागतात. नाहीतर त्याचे गाठोडे पुढे वाहवत राहावे लागते. परंतु त्यानतंर केवळ दृश्य जगातील सुखासाठी धडपडत राहणे योग्य नाही. कारण दृश्य जगातील कोणतीच वस्तू अथवा नातेसंबंध मृत्यू नंतर आपल्या सोबत येत नाहीत. सतत वाढत जाणाऱ्या व अपूर्ण राहणाऱ्या गरजा अनेक शारीरिक आणि मानसिक आजारांना आमत्रंण देतात हे आपण पहातोच आहोत.

भगवंताने आपल्याला देह ,मन , बुद्धी दिली आणि त्याच्या आधारे आपण काम करतो, म्हणजे भगवंतच आपल्याकडून सर्व कर्मे घडवीत असतो. त्याच्या प्रेरणेनेच सर्व घडते आहे, अशी भावना प्रत्येक कर्मात ठेवली म्हणजे त्याला परमार्थ म्हणता येईल. प्रपंचाची कर्तव्यकर्मे झाल्यानंतर परमार्थ जरूर करावा.

परमार्थाकडे ध्येय ठेवून आपण  प्रपंचात राहावं. आपल्याकडे असलेला वेळ केवळ प्रपंचात खर्च करणे चुकीचे आहे. येथील मुख्य आहे तो परमार्थ. मुख्य आहे तो परमात्मा. या परमार्थाला साध्य करण्यासाठी प्रपंचाची सर्व कर्तव्यता जो शांतपणे पूर्ण करतो, त्याला परमार्थासाठी मोकळा वेळ मिळू शकतो. यासाठी 'आळस' हा आपल्या जीवनाचा जो सर्वात मोठा शत्रू आहे, तो आळस आपण जीवनातून दूर करावा. सतत प्रयत्नांमध्ये स्वतःला झोकून द्यावे. दिवसामध्ये जे काही क्षण आपल्याला भगवंताने दिलेले आहेत, त्यात सतत प्रयत्नशील राहून प्रपंच नेटका करण्याच्या दृष्टीने वापर करत असताना एकदृष्टी, एकमन परमार्थाच्या दिशेने लावावे, की कधी या सर्व प्रपंचातल्या कर्तव्यांची मी व्यवस्थित पूर्तता करेन, कधी मला थोडीशी स्वस्थता मिळेल आणि या स्वस्थतेच्या आधारे मी माझ्या जीवनात, मी माझ्या परमार्थाचे अधिष्ठान कधी प्राप्त करू शकेन.

अशा दृष्टीने हा विवेक आणि वैराग्य हातात हात घालून ज्या मनुष्याने जीवनाचा आरंभ केला त्यालाच या बाराव्या दशकाची पूर्णाहूती ज्याला म्हणता येईल, असा 'उत्तमपुरुष' ही स्थिती प्राप्त होते.

थोडक्यात मनुष्याने आपल्या प्रयत्नांनी आपल्या जीवनामध्ये दोन्ही प्रांतांना (प्रपंच व परमार्थ) प्रकाशमान करून टाकावे हेच समर्थांना अपेक्षित आहे.

---

## १६ मार्च २०२४

**प्रपंच सांडून परमार्थ केला । तरी अन्न मिळेना खायाला ।**
**मग तया करंट्याला । परमार्थ कैंचा ।। दा १२ - १ - ३।।**

विमळ लक्षणाच्या या समासाची सुरुवात "आधी प्रपंच करावा नेटका।" अशी आहे. तुम्ही प्रपंचात पडला आहात तर आधी प्रपंचाची सोय लावा. कारण पुढच्या ओवीत म्हटले आहे की

**प्रपंच सांडून परमार्थ कराल । तेणें तुम्ही कष्टी व्हाल ।**
**प्रपंच परमार्थ चालवाल । तरी तुम्ही विवेकी ।।**

फक्त २० ओव्यांच्या या समासात प्रपंच व परमार्थाची सांगड कशी घालावी हे सांगितले आहे. प्रपंच व परमार्थ मानवाच्या आयुष्यात परस्पर पूरक असले पाहिजेत. प्रपंच तर आवश्यक आहेच पण काही परमार्थ असलाच पाहिजे. प्रपंच नीट सांभाळून परमार्थ झालाच पाहिजे. माणुस विवेकी असतो, या विवेकाच्या बळावर माणूस प्रपंच नीट करतो, हाच विवेक त्याने परमार्थाकरिता वापरला पाहिजे. विवेकाच्या कारणाने दूरदृष्टी येते, या दूरदृष्टीचा उपयोग माणसाने केला पाहिजे. तसे नाही केले तर "अन्न मिळेना खायाला" अशी परिस्थिति येईल. माणसाने प्रपंच सावधपणे करावा त्याच प्रमाणे परमार्थ ही यशस्वी करावा.

प्रपंच सोडून परमार्थ कराल तर दोन वेळची भ्रांत होईल, आणि अशा करंट्याला कोणीही जवळ करणार नाही. पुढच्याच ओवीत समर्थांनी म्हटले आहे –

**परमार्थ सांडून प्रपंच करिसी । तरी तूं येमयातना भोगिसी ।**
**अंतीं परम कष्टी होसी । येमयातना भोगिता ।।**

परमार्थ फक्त मनुष्य योनीतच शक्य आहे. याच योनीत माणूस आपला उद्धार करून घेऊ शकतो. या योनीत चुकलास तर चौऱ्यांशीचा फेरा चुकणार नाही. संधी मिळाली आहे, तर आताच सोने करून घ्या. कोण जाणे पुनः ही संधी कधी मिळेल.

---

**१७ मार्च २०२४**

**परमार्थ सांडून प्रपंच करिसी । तरी तूं येमयातना भोगिसी ।**
**अंतीं परम कष्टी होसी । येमयातना भोगितां ।। दा १२ - १ - ४।।**


समर्थांनी मागच्याच ओवीचा विषय या ही ओवीत घेतला आहे. परमार्थ करायचा सोडून दिला आणि आता फक्त प्रपंच करतो आहे. अरत्र ना परत्र अशी अवस्था होईल. कारण समर्थांनी पुढच्याच ओवीत सांगितले आहे.

**साहेबकामास नाहीं गेला । गृहींच सुरवाडोन बैसला ।**
**तरी साहेब कुटील तयाला । पाहाती लोक ।।**

मालकाचे कामावर न जाता घरीच राहिला तर त्याला मालक माफ करील काय? भगवंत आपला मालक आहे, त्याची उपासना, भजन, पूजन करणे आपले कर्तव्य आहे. या कर्तव्यात कसूर केला तर भगवंत तुम्हाला काय देईल? हे जे पंचभौतिक जगत् आहे त्याला संसार म्हटले आहे. आपल्या वैयक्तिक व सार्वजनिक गरजा म्हणजे प्रपंच आहे. हे इंद्रियगोचर जगत आहे. दुसरे जगत अतिंद्रिय आहे. हे जगत संकल्पनांचे बनले आहे. याच जगात परमेश्वराची उपासना येते. हाच परमार्थ होय. ऐहिक जगत दुःखाने भरलेले आहे. परमार्थ तुम्हाला दुःख निवृत्तीचा मार्ग दाखवितो. मनुष्य आहात तर विवेक करायला हवा. विवेक नसेल तर मात्र दुःख, यातना मिळणार आहेत. म्हणून समर्थांनी येमयातना म्हटले आहे.

---

<u>**१८ मार्च २०२४**</u>




**प्रपंचीं जो सावधान ।तो परमार्थ करील जाण ।**
**प्रपंचीं जो अप्रमाण ।तो परमार्थीं खोटा ।। दा १२ - १ - ९।।**

प्रपंचात कसे रहावे म्हणजे परमार्थ सहज होईल हे या ओवीत समर्थ सांगत आहेत. "आधी प्रपंच करावा नेटका । मग घ्यावे परमार्थ विवेका ।" या ओवीचे आणि आज आपण चिंतनासाठी घेतलेल्या ओवीमध्ये साधर्म्य आहे. तुम्ही प्रपंचात नीतिमान असाल तरच परमार्थ नीट करू शकणार आहात.

एक गृहस्थ एका साधूकडे गेला आणि म्हणाला की मला धारणा, ध्यान, समाधी शिकवा. साधूने यम, नियम शिकवायला सुरुवात केली. तेव्हा तो गृहस्थ म्हणाला यम-नियम हे तर आम्ही जाणतो. खरे बोला, अहिंसा वगैरे आम्हाला शाळेत देखील शिकविले जाते. तुम्ही ते काही सांगू नका. आम्हाला तुम्ही ध्यान वगैरे शिकवा.

यावर साधु म्हणतो अष्टांगयोग शिकायचा आहे कि विकलांगयोग शिकायचा आहे. योगाचे आठही अंग पायरी पायरीने शिकावे लागतील. यम-नियम आचरल्याशिवाय पुढे जाता येणार नाही. ब्लॅकमनीवर आसन टाकून कधी ध्यान सफल होईल काय?

समर्थ देखील म्हणतात की प्रामाणिकपणे प्रपंच कराल तरच तुमचा परमार्थ यशस्वी होईल. प्रपंचात लांडीलबाडी कराल तर परमार्थ यशस्वी होणारच नाही. प्रपंच नेटका कधी होईल ते या अळीपासून शिका हे परमार्थ सांगत आहेत

**पर्णाळि पाहोन उचले ।जीवसृष्टी विवेकें चाले ।**
**आणि पुरुष होऊन भ्रमले । यासी काय म्हणावे ।।**

जो प्रपंच नीट करीत नाही तो कीटकापेक्षाही हीन आहे हे सप्रमाण समर्थ दाखवून देत आहेत. विमळलक्षणाचा हा समास साधकाचे शुद्धीकरण करण्यासाठीच लिहिला आहे. यावरून आपण धडा घेऊन आपली वाटचाल करावी.

---

**१९ मार्च २०२४**




**रागें रागें निघोन गेला । तरी तो भांडभांडों चि मेला ।**
**बहुत लोक कष्टी केला । आपण हि कष्टी ।।१४-७-२१**

**ओवीचा सरळ अर्थ:-** कोणी एखादा रागारागाने घर सोडून जातो आणि मग ज्याच्या त्याच्याशी भांडण तंटा करीत मरून जातो असा माणूस पुष्कळ लोकांना कष्ट देतो व आपणही कष्ट भोगतच मरतो. संसाराला कंटाळून घर सोडणे, डोक्यात राख घालून रागावून घर सोडणे आणि संसाराचे असार असणे समजले म्हणून वैराग्य येणे यात फरक आहे.

प्रस्तुत ओवीला संदर्भ त्या आधीच्या ओव्यांचा आहे. समर्थ प्रथम गृहस्थाश्रमाचे महत्व सांगतात. तो यथासांग करता करता भक्तीमार्ग गवसला तर उत्तम असे समर्थ म्हणतात.वैराग्य आतून उदय पावणे महत्वाचे आहे.भगवंताचा भक्त अशी विरक्ती आली की अंतरंगातून अनासक्त होतो.मग देह त्याची कर्तव्ये करीत असला तरी अंतर्स्थिती विरक्त होते.देही असून विदेही होणे व्यक्ती व समाज दोघांसाठी महत्वाचे असते.

पण उगीच संसार सोडला, तात्कालिक विरक्ती म्हणून सोडला किंवा अपयश आले,क्रोधाचा अतिरेक झाला म्हणून सोडला तर ते वैराग्य टिकाऊ नसते.असा माणूस भले संन्यासी वेश धारण करेल पण मनाने आसक्ती,विकार काहीच कमी नाही अशा द्वंद्वात सापडतो.स्वत:वर चिडलेला वैफल्यग्रस्त असा हा सर्व समाजावर राग काढत रहातो.वैराग्याने अंत:करण निवायला हवे, समाधान स्थिरावायला हवे तसे न घडता तो आपले आयुष्य वाया घालवतो.प्रपंच आणि परमार्थ दोन्ही हातचे जातात असे समर्थ सांगत आहेत.

**२० मार्च २०२४**

**संसारत्याग न करितां । प्रपंच उपाधी न सांडितां ।**
**जनामध्यें सार्थकता । विचारें चि होये ।।६-९-२४**

प्रपंच परमार्थ समन्वय साधावा हे शिर्षक आहे.सामान्यत: संसार व प्रपंच एकाच अर्थाचे आहेत.पण इथे एकाच ओवीत ते दोन्ही शब्द आले असल्यामुळें त्यांचे अर्थ या ठिकाणी तरी वेगळे आहेत असे मानावे लागते.श्री.स.भ.नानासाहेब देव यांनी 'संसार म्हणजे बायकापोराना सांभाळण्याचा व्याप, आणि प्रपंच म्हणजे जनी जनार्दनाच्या सेवेचा किंवा सार्वजनिक कार्याचा व्याप' असा अर्थ सुचविला आहे.

या ओवीत समर्थांनी विचाराचे महत्त्व पटवून देताना परमार्थ करण्यासाठी संन्यास घेण्याची आवश्यकता नाही असे ठासून सांगितले आहे.प्रपंच हा कर्तव्यबुध्दीने केला असता व त्यावरील महत्वाचा त्याग केला असता आयुष्याचे सार्थक होते. समर्थ म्हणतात जे खरोखर श्रेष्ठ आहेत त्यांनी साराचाच शोध घ्यावा व जे कनिष्ठ, आळशी आहेत त्यांनी असाराचाच शोध घ्यावा कारण सारासार विवेक फक्त ज्ञानी, श्रेष्ठ, शहाणेच जाणतात.लोखंडाचे सोने करणारा परीस, चिंता हरण करणारा चिंतामणी, मौल्यवान रत्ने ही तर कोणाला माहित नसतात, गुप्त असतात.पण दगड, गोटे, कांचमणी रस्त्यावर इतस्ततः पडलेले असतात. सामान्यांना सांगून काहीच उपयोग नाही कारण सार असार,खरे खोटे हे निवडण्याची कला त्यांना माहित नसते म्हणून साधू संतांच्या खुणा साधू संतच जाणतात. मनाच्या श्लोकात सुध्दा समर्थ हेच सांगतात

**नव्हे सारं संसार हा घोर आहे । मना सज्जना सत्य शोधूनि पाहें।**
**जनीं वीष खातां पुढें सूख कैचें । करी रे मना ध्यान या राघवाचें ॥ ६६ ॥**

समर्थ म्हणतात प्रपंच न सोडता, खटपटींचा त्याग न करता,सारासार विचारांच्या साहृयाने प्रपंचात राहून आत्मज्ञान मिळवता येते व जन्म सार्थकी लावता येतो. प्रपंचात राहून प्रपंचात लिप्त समर्थ सांगतात माझा स्वतःचा अनुभव असा आहे विवेकाच्या मार्गाने जाऊन सर्वांनीच तो अनुभव घ्यावा असा अनुभव घेण्यास खरे ज्ञान समजावे. अज्ञानी असा अनुभव घेत नाही. उधार माल विकणे व रोकडा माल विकणे यात जसा फरक आहे तसेच मानसपूजेतील दर्शन व साक्षात परमेश्वराचे दर्शन यात फरक आहे. एवढे सगळे सांगून सुद्धा कोणी अज्ञानी आपल्या अर्धवट बुध्दीचे तारे तोडून लोकांची दिशाभूल करतो म्हणून ३०व्या ओवीत समर्थ रामदास म्हणतात की जो कोणी हे खोटे मानेल त्याला माझ्या उपासनेची शपथ आहे.

**ये गोष्टीस करी अनुमान ।तो सिद्धचि पावेल पतन ।**
**मिथ्या वदेल त्यास आण ।उपासनेची ।।६-९-३०॥**

टीप :- मला जेव्हढे वाचून समजले.ते लिहिण्याचा प्रयत्न केला आहे.जे चांगले ते समर्थांचे/सद्गुरुंचे तृटी माझ्या.जाणकारांनी समजून घ्यावे हि विनंती. चांगले जर सद्गुरुचे आहे तर चांगले नसणारे सद्गुरुचे नाही असे म्हणणे मला पटत नाही. हा एक प्रकारे सूक्ष्म अहंकार असतो. जे जे आहे ते ते त्याचेच आहे. मी कोण मध्ये येणारा?

**येक मुख्य परमेश्वरू । दुसरी प्रकृति जगदाकारु ।तिसरा आपण कैंचा चोरु । आणिला मधें ।।**
**ऐसें हैं सिद्धचि असतां । नाथिली लागे देहअहंता। परंतु विचारें पाहों जातां । कांहींच नसे ।।**
**दा ४-९-११/१२**

**२१ मार्च २०२४**

**प्रपंच सुखे करावा । परी काही परमार्थ वाढवावा ।**
**परमार्थ अवघाची बुडवावा । हे विहित नव्हे ।।५-३-१०३॥**

अधिक ओव्या असलेला समास. १०४ ओवी संख्या . प्रपंच परमार्थ समन्वय साधावा हे शिर्षक आहे .या समासात शिष्याच्या अवलक्षणांसह सच्छिष्य लक्षणे सविस्तर सांगितली आहेत.मागच्या सद्गुरू लक्षण समासात ११ गोष्टी समर्थांनी निक्षून सांगितल्या आहेत.त्या जर असतील तरच सद्गुरु आणि सत्शिष्य हे नाते सिध्द होते. ज्ञान, वैराग्य, भजन, स्वधर्मकर्म, साधन, कथा निरुपण, श्रवण, मनन, नीती, न्याय व मर्यादा ह्या अकरा गुणांचे आचरण नसेल व साधकाचे आचरण इतर प्रापंचिकांप्रमाणेच विकारांनी भरलेले असेल तर प्रत्यक्ष साधना न करणारे लोक सहाजिकच विचारू लागतात की यांच्यात व आमच्यात फरक काय आहे ?

या समासात शिष्याला सुध्दा ११ बंधने समर्थांनी घातली आहेत. सत्कर्म, स्वधर्म, सतशास्त्र, सद्वासना, सत्शिष्य, सद्गुरू, साधन, अभ्यास, सत्संग, सदुपासना, नित्यनेम. ही सगळी सत्वगुणाची लक्षणे आहेत. हल्ली सकाम भक्तांचा फार मोठा वर्ग आध्यात्मिक क्षेत्रात आढळतो. या लोकांनी अध्यात्माचा बाजार मांडला आहे. प्रामाणिकपणे संसाराची आसक्ती ठेवून आणि ती मान्य करून विषय सेवन करणारे नास्तिक या दांभिक शिष्यांपेक्षा परवडले. रजोगुण आणि विषयतृप्तीसाठी भगवंताला राबवणारे बेगडी परमार्थी शिष्य जागोजागी दिसतात.

भगवान रामकृष्ण एक गोष्ट सांगत २ कोळणी आठवडे बाजारासाठी मासे विकायला नेत असत. एकदा बाजारात मासे खूप आले.या दोघींचे मासे संपेनात.सगळे मासे विकले जावेत म्हणून त्या मोठ्या आशेने बराच वेळ बाजारात थांबल्या.त्यांचे खेडेगाव दूर होते रात्र पण झाली होती म्हणून त्यांनी वाटेतल्या माळ्याच्या घरी मुक्काम केला. माळ्याने जी खोली ह्या दोघींना झोपायला दिली होती ती फुल ठेवायची खोली होती. फुलांचा सुगंध येण्याऐवजी त्यांना उंदीर मेल्याचाच वास येऊ लागला. शेवटी पाटीतील माशांवर पाणी शिंपडून त्या पाट्या डोक्याखाली ठेवून त्या झोपल्या. ज्यांना संसाराची दुर्गंधीचे सुगंधी वाटते असे लोक परमार्थाच्या उद्यानात संसारातील मासळी घेऊन येतात आणि आपले खरे रूप लपवून आपल्याला फुलांचा सुगंध आवडत असल्याचे नाटक करतात.

बोधामृतात कलावती आई म्हणतात हरिप्रेम म्हणजे निर्मळ प्रेम. हे सुखकारक असते. स्वार्थी प्रेम म्हणजे मळीण प्रेम. हे दु:खदायक असते. मोलाची वस्तू हवी असल्यास जसे त्याला जास्त पैसे द्यावे लागतात त्याप्रमाणे बहुमोलाचे ईश्वरी प्रेम आपल्याला हवे असल्यास शिष्याने गुरुंच्या ठिकाणी एकनिष्ठा ठेवावी लागते.सेवा वेळेवर व यथासांग घडली नाही तर तर गुरू नाराज होतात. गुरुंनी नाराज होऊ नये म्हणून शिष्याने सेवा करीत असता दक्षता बाळगावी लागते. कारण मोती किंवा दूध फुटले असता ते जसे पूर्ववत होत नाही त्याप्रमाणे गुरु एकदा नाराज झाले म्हणजे त्यांची कृपा संपादन करणे फारच जड जाते. आपल्या सेवेच्या योगे करून गुरू खूष झाले की शिष्यावर गुरुंची कृपा झालीच म्हणून समजावी.

अनासक्तीने, विवेकाने वैभवाचा प्रपंच अवश्य उभारावा.परंतु त्याच्या जोडीला पारमार्थिक हिताचाही विचार केलाच पाहिजे.परमार्थाकडे पूर्ण दुर्लक्ष करणे माणसाच्या जीवनाला शोभणारे नाही.

## <u>२२ मार्च २०२४</u>

**आपण येथेष्ट जेवणें ।उरलें तें अन्न वाटणें ।**
**परंतु वाया दवडणें ।हा धर्म नव्हे।। दा १२ - १० - १।।**

या जगात ८४ लिए योनीतील असंख्य प्राणी आहेत. "आहार, निद्रा, भय, मैथुन" या सर्व प्राण्यांच्या मूलभूत गरजा आहेत. पण मनुष्य प्राणी वेगळा आहे. फक्त याच योनीत मी कोण आहे व कुठे जायचे आहे हे प्रश्न उद्भवतात आणि मनुष्य त्यांची उत्तरे शोधायचा प्रयत्न करतो. मनुष्यच आत्मज्ञान प्राप्त करून घेऊ शकतो. इतर प्राणी केवळ पशू पक्षी आहेत व त्यांच्या जीवनाला उद्देश्य नसतो.

मनुष्य आत्मज्ञानी झाला की त्याने आपला देह परोपकारासाठी झिजवायचा असतो. आत्मज्ञान होण्यापुर्वी देखील काही लोक परोपकारासाठी आयुष्य वेचतात. या ओवीचे दोन अर्थ निघतात. पहिला अर्थ तर स्पष्टच आहे. अन्नाची नासाडी होऊ नये आणि गरजवंताला अन्न मिळावे हा समर्थांचा हेतु इथे स्पष्ट दिसतो. अन्न हे ब्रह्म आहे. त्याची नासाडी म्हणजे त्याचा अनादरच होय. असे करू नका.

आवश्यक तेवढेच पानात घ्या, ते खाल्ल्यावर हवे असल्यास आणखी घ्या. पण पानात टाकून देऊ नका. अन्न वाया दवडणे ही राष्ट्रीय हानी (national loss) आहे. ते अन्न पिकवायला किती कष्ट पडतात? ते आपल्या पर्यंत पोहोचवायला किती सायास करावे लागतात? मग ते वाया घालवावे काय? बफे मध्ये पंक्ति मध्ये किती अन्न वाया जाते? तेच अन्न जल गोरगरीबांना वाटून दिले तर त्यांचे पोट भरणार नाही काय? वाया घालविण्याला समर्थ अधर्म म्हणतात. अन्नाची किंमत ओळखा आणि वाया जाण्यापासून वाचवा.

दूसरा अर्थ विद्ये संबंधी आहे. उदंड शिक्षण घ्या त्याचा समाजासाठी उपयोग करा. तुम्ही शिकला आहात तर चार लोकांना शिकवा. त्याने ते लोक व्यवसायाला लागतील. तुमचे शिक्षण वाया जाणार नाही हे बघा. अर्थात् याचा संबंध उद्याच्या ओवीशी आहे ते उद्याच बघू.

---

## <u>२३ मार्च २०२४</u>

**तैसे ज्ञानें तृप्त व्हावें । तें चि ज्ञान जनास सांगावें ।**
**तरतेन बुडों नेदावें । बुडतयासी ।।१२-१०-२**

उत्तम पुरुष लक्षणांमधली ही दुसरी ओवी.पहिल्या ओवीत आपण यथेच्छ जेवावे व जे अधिक असेल ते ज्यांना गरज आहे त्यांना द्यावे असे सांगितले आहे आणि या ओवीत अन्ना इतकीच माणसाची दुसरी भूक म्हणजे ज्ञान याबाबत समर्थ सांगतात.

उत्तम पुरुष लक्षणे प्रपंच व परमार्थ दोन्ही कडे लागू पडतात.तत्कालीन समाजाची स्थिती होती त्यात परकीय चाकरी करणारे श्रीमंत आणि इतर अत्यंत गरीब प्रजा असा भेद होता.विषमता होती.या समाजाला सुधारायचे तर त्यांना उपदेश मार्ग दर्शन हवे होते.तसेच ज्ञानी व अज्ञानी असाही भेद होता आणि असतो.

विवेकी माणसाने प्रथम भरपूर ज्ञान मिळवावे. समर्थ ज्ञान म्हणतात तेव्हा आत्मज्ञान म्हणतात.ज्ञानाने तृप्ती होते .असे ज्ञान हे आत्मज्ञानच असते.ते झाले की इतर काही मिळवायची वासना उरत नाही.

आत्मज्ञानाने तृप्त झालेल्याची ही जबाबदारी आहे की जे भवसागरात बुडत असतील त्यांना हात द्यावा.जे कमी कुशल आहेत अशांना बुडू देणे जाणत्याला शोभत नाही.जो मति प्रकाश आपल्याला सद्गुरू कृपेने,साधनेने लाभला आहे तो इतरांना मिळावा अशी उदारता हवी.जे मार्गावर आहेत पण मागे आहेत त्यांना मार्गदर्शन करायला हवे.

---

## २४ मार्च २०२४

**कोण कोण राजी राखिले । कोण कोण मनी भंगिले ।**
**क्षणक्षणा परीक्षिले । पाहिजे लोक ।। १९ - ७ - ६।।**

या समासात समर्थांनी लोकसंग्रह, समाजसेवा आणि परमार्थ करणाऱ्या नेत्याला उपदेश केलेला आहे. समाज संगठन करणाऱ्या पुरुषाला समाजातील विविध प्रकारच्या लोकांना सोबत घेऊन त्यांचेकडून इच्छित कार्य करवून घ्यायचे असते. ह्या महंता भोवती जमा झालेले लोक अज्ञानी मुमुक्ष किंवा साधक असतात. प्रत्येकाचा स्वभाव वेगवेगळा असतो. महंत हा ज्ञानी, वासना रहित, निरहंकारी, दयावंत असतो. हा स्वतः तर उपासना करतो आणि सोबत आलेल्या लोकांना देखील भक्ती, उपासनेला लावतो. त्यांना त्यांचे दुःख कमी व्हावे म्हणून मार्ग दाखवीत असतो.

असा ज्ञानी सोबतच्या लोकांचे कल्याण व्हावे म्हणून प्रयत्न करीत असतो. प्रपंचावरील त्यांची श्रद्धा, आसक्ती भंगणार नाही व ते अधिकाधिक निःस्वार्थी होतील असा प्रयास करतो. समूहाबद्दल प्रेम व आत्मीयता दाखवीत असतो. प्रत्येकाची मर्जी राखून त्याला आपल्या कार्यासाठी वापरीत असतो. महंत कसा वागतो _

**थोडें बोलोनि समाधान करणें । रागेजोन तरी मन धरणें ।**
**मनुष्य वेधींच लावणें । कोणीयेक ।।४।।**

महंताने आपल्या अनुयायांचे थोडक्यात बोलून समाधान करायचे असते. राग आला तरी तो प्रदर्शित करू नये. प्रत्येकाला आपल्याकडे आकर्षित करावे. त्याने चिडचिड करू नये अन्यथा तामसी वृत्ती दिसून लोकांचे प्रेम कमी होते.

महंताने चाणाक्ष असले पाहिजे. आपल्यावर कोण कोण प्रसन्न आहेत? कोणाचा मनोभंग आपल्यामुळे झाला आहे? आपल्यामुळे कोणी दुखावले गेले आहेत काय? हे त्याने वारंवार तपासले पाहिजे. हे सारे लोक आपल्या कार्यासाठी हवे आहेत ही जाणीव ठेवून महंताने त्यांची मने सांभाळली पाहिजे. परंतु अशा शिष्याची चुकीची मागणी मात्र महंताने पूर्ण करू नये असे समर्थ इथे सांगत आहेत.

महंताला तारतम्य बाळगता आले पाहिजे हा समर्थांच्या सांगण्याचा हेतु आहे. आपण ही सारे समर्थांचे महंतच आहोत हे लक्षात घेऊन या समासातील उपदेशाचे मनन केले पाहिजे.

---

## २५ मार्च २०२४

**जिकडे जग तिकडे जगन्नायक । कळला पाहिजे विवेक ।**
**रात्रींदिवस विवेकी लोक । सांभाळीत जाती ।। दा १९-७-१२।।**

येत्न निरुपणाच्या या समासात महंताने कसे वागावे हे समर्थांनी विस्तारपूर्वक सांगितले आहे. अगदी पहिल्याच ओवी पासून महंताची आचार संहिता सांगायला समर्थ सुरुवात करतात. महंताने कसे वागावे कसे वागू नये याचीच चर्चा समर्थांनी इथे केली आहे. महंत आशाळभूत नसावा, चतुर असावा, सदाचाराची असावा अन्यथा त्या महंताची महंती कटकटी निर्माण करते. असा महंत नालायक ठरून ठाई ठाई तो दुःखी होतो.

महंताने असे वागावे की त्याची कीर्ति सर्वत्र पसरावी. लोकांना तो आवडावा, लोकांना राजी राखून त्याने आपले कार्य करावे. आपण अनुसंधानाच्या उच्च पातळीवर रहावे, त्या भुमिकेतून लोकांचे निरिक्षण करीत जावे. कोणाच्याही मागे काही मागण्याचा तगादा लावू नये. समर्थ म्हणतात

**आमची प्रतिज्ञा ऐसी । कांहीं न मागावें शिष्यासी ।**
**आपणामागें जगदिशासी। भजत जावें ।। दा १२ - १० - ३४।।**

आजची ओवी आता बघुया. एक म्हण आहे **"पाचा मुखी परमेश्वर"** म्हणजे परमेश्वर हा लोक समूहात असतो. इथे समर्थ म्हणतात की ज्या बाजूला बहुजन समुदाय असतो, समाज असतो त्याच बाजूला जगाचा स्वामी परमेश्वर असतो. विवेकी महंत हे ओळखून असतात. समर्थ म्हणतात की -

**चालती बोलतीं देऊळें । त्यामधें राहिजें राऊळें ।**
**जितुकीं देऊळें तितुकीं सकळें । कळली पाहिजे ।।१७ - १ - १४।।**

समाज हा परमेश्वराचे व्यक्त रूप आहे, तेव्हा लोकांची अंतःकरणे दुखवू नये. महंताने लोकांमध्ये राहून लोकांना राजी राखून कार्य करायचे असते. समाजसेवा करणाऱ्या व्यक्तीने साधना म्हणून समाजसेवा करायची असते. त्या साधकाने सर्व माणसांमध्ये ईश्वर पहायला शिकावे. रामकृष्ण परमहंस शिवभावे जीवसेवा करायला सांगत. आजही रामकृष्ण मिशनचे साधू सेवा करतांना समोरच्या व्यक्तीमध्ये परमेश्वर पहात असतात. "आत्मनो मोक्षार्थ जगद्धिताय च" हे त्यांचे ब्रीद आहे.

---

## २६ मार्च २०२४

**जो जो लोक दृष्टीस पडिला । तो तो नष्ट ऐसा कळला ।**
**अवघेच नष्ट येकला भला । काशावरुनी ।। दा १९ - ७ - १३।।**

काल आपण बघितले होते की प्रत्येक माणसात परमेश्वर आहे. तो परमेश्वर विविध प्रसंगी विविध रूपांमध्ये आपल्या समोर येत असतो. त्या रूपातील परमेश्वराला आपण ओळखायला हवे.

कुत्र्याच्या रूपात आलेल्या परमेश्वराला नामदेव ओळखू शकले, गाढवातील परमेश्वर एकनाथ महाराज पाहू शकले. आपल्याला मात्र परमेश्वर न दिसता वाईटपणाच दिसतो. समर्थ आपल्याला आपली दृष्टी बदलायला सांगत आहेत.

**नारायेण असे विश्वीं । त्याची पूजा करीत जावी ।**
**या कारणे तोषवावी । कोणीतरी काया ।। १५ - ९ - २४।।**

काल आपण पाहिले होते की समाज हा परमेश्वराचे व्यक्त रूप आहे. त्यामुळे कोणाचे अंतःकरण दुखवू नये. कोणी वाईट असल्याचे आपल्याला जाणवत असेल तर तो आपलाच दोष असला पाहिजे. समाजातील सारीच माणसे ज्याच्या दृष्टीने वाईट आहेत तो तरी स्वतः चांगला कसा असेल? जनतेला सोडून महंत राहूच शकत नाही महंताने तऱ्हेवाईकपणे वागणे ठीक नव्हे.

समाजसेवा करणाऱ्या माणसाची समाजसेवा ही मुक्तीचे साधन असली पाहिजे. परिस्थिति अनुकूल आहे अशा वेळी आपली परमार्थ साधना करणे कठीण काम नाही परंतु जनतेमध्ये राहून नाना प्रकारच्या कटकटी मागे लागल्या असता त्या गुंत्यात राहून साधना करणे, स्वरूपाचे अनुसंधान टिकविणे सोपे नाही. हे ज्याला जमेल त्यानेच महंती करावी, लोक गोळा करावे. साधकाने साधनेद्वारे प्राप्त झालेली अंतर्स्थिती विचलित न होऊं देता ईश्वराची पूजा म्हणून समाजाची सेवा करावी. ईश्वर प्राप्तीचे साधन म्हणून समाजकारणाकडे पाहिले पाहिजे.

ज्याला सर्व लोकांमध्ये फक्त दोषच दिसतात त्याने आपली भुमिका तपासली पाहिजे. आपल्या मध्येच काही तरी दोष आहे तो दूर केला पाहिजे अन्यथा लोक संग्रहाचे काम करू नये. एक सुभाषित आहे -

**अमन्त्रमक्षरं नास्ति नास्ति मूलमनौषधम् ।**
**अयोग्यः पुरुषो नास्ति, योजकस्तत्र दुर्लभः ।।**

अर्थात कोणीही व्यक्ति अयोग्य नसते, त्याचा योग्य उपयोग करून घेणारा हवा.

---

## २७ मार्च २०२४

**संगीत चालिला तरी तो व्याप । नाहीं तरी अवघाचि संताप ।**
**क्षणक्षणा विक्षेप । किती म्हणौन सांगवा ।। दा १९ - ७ - २५।।**

साधकाने समाजसेवा करावी किंवा नाही आणि करायची झाल्यास कशा पद्धतीने करावी, अध्यात्म क्षेत्रात हा प्रश्न गहन आहे. कर्मयोग हा ईश्वर प्राप्तीचा एक मार्ग आहे. अर्थात् हे करणारा साधक कुशल असायला हवा. "योगः कर्मसु कौशलम्" हे गीता सांगते. असे कर्म करतांना जर सत्पुरुषाचे मार्गदर्शन नसेल, केवळ अहंकाराची तृप्ती किंवा गप्प बसवत नाही म्हणून काही खटपट-लटपट करावीशी वाटत असेल तर अशी कर्मे ईश्वर प्राप्तीचे साधन न होता निव्वळ देखावा वा गोंधळ होईल. हे ईश्वर प्राप्तीचे साधन नव्हे. लॉयन्स क्लब किंवा तत्सम इतर संघटनांच्या माध्यमातून काही श्रीमंत लोक फोटो काढण्यापूर्ता किंवा प्रसिद्धि करिता समाजसेवा करतात. काही गुरु मंडळी देखील अशाच प्रकारचा देखावा करतात. हा कर्मयोग नव्हे.

समाजसेवा आणि साधना याचा मेळ साधकाला बसविता आला पाहिजे. या करिता या समासात समर्थांनी योग्य मार्गदर्शन केले आहे. एखादा रजोगुणी माणूस एखादी संस्था काढून त्या द्वारे सेवा कार्य सुरु करतो पण कार्य आटोक्यात न आल्याने कार्याचा विचका होतो. असे होऊन देखील तो पदाला घट्ट धरून ठेवतो, भांडणे होतात व कार्यनाश होतो. समर्थांनी या ओवीत हेच सांगायचा प्रयत्न केला आहे. संगीत म्हणजे व्यवस्थित किंवा उत्तम रित्या. लोकसंग्रहाचे रहस्य सांगतांना समर्थ म्हणतात कि समूह संघर्षरहित व सुरळीत चालला तर जो व्याप होतो त्याचा मनाला ताप होत नाही. पण हाच व्याप बिघडून संघर्ष निर्माण झाला की तो संताप होतो. मनाला त्याचे क्लेष होतात. समूह जीवनात पदोपदी अडचणी व गैरसमज निर्माण होतात, त्यांचे किती वर्णन करणार आहे.

या समूहात अनागोंदी सुरु होते. समूहातील मूर्ख माणसे मूर्खपणाने विचित्र वागतात. शहाणी माणसे अहंकारापोटी आपसात भांडत बसतात. समूह प्रमुख असणारा महंत अशा प्रकारे कात्रीत सापडतो, त्याची फजिती होते, अखेर कार्यनाश होतो. कारभार झेपत नाही, करवत नाही आणि आवरत ही नाही, असे दिसून ही महंताला स्वस्थ बसवत नाही. त्याने कार्य सोडून साधनेला एकांतात जावे हेच उत्तम.

साधकाने अशा कार्यापासून स्वतःला वेगळे करून घ्यावे. विचका होणारे कार्य सुरु ठेवून आपली साधना भंग होऊ देऊ नये. कार्य ही गेले आणि साधना ही गेली असे दुहेरी नुकसान साधकाचे होण्याचा संभव आहे. त्यापेक्षा कार्य त्याग करून एकांतात साधनेसाठी निघुन जावे. निदान साधना तरी सुरळीत होईल.

---

## २८ मार्च गुरुवार

**येखादें मनुष्य तें सिळें। त्याचें करणें चि बावळे|**
**नाना विकल्पाचें जाळें । करून टाकी ।। १९-८-१६**

शिकवण या दशकातील उपाधी लक्षण निरूपण या समाजातील ही १६ वी ओवी आहे. उपाधी बरोबर जबाबदारी येते .ती पेलण्याची क्षमता असलेल्या माणसाने ती जरूर करावी.या समासात महंती कोणी करावी व कोणी करू नये या बाबतीत समर्थ मार्गदर्शन करत आहेत.आपले अनुसंधान सांभाळून त्याने जनात वावरावे संग्रह करून मोठे कार्य त्यांच्या करवी करवून घ्यावे असे अपेक्षित आहे. महंत गुणग्राहक असावा.समर्थ महंताला करतात तसाच राजकारणी पुरुषाला सुद्धा मार्ग दाखवतात कारण दोघांना लोकसंग्रह महत्वाचा असतो. राजकारण करण्यासाठी चातुर्य लागते विवेकाने नियोजनबद्ध काम केले तर ते यशस्वी होते.अन्यथा राजकारण बिघडते लोक नाराज होऊन विस्कळीत पणा येतो.

प्रस्तुत ओवीत समर्थ मनुष्य स्वभावाचे एक उदाहरण देत आहेत.तो कळाहीन व कर्तृत्व हीन असतो.त्याचे सगळे वागणे बावळटपणाचे असते.तो घोटाळे करून ठेवतो.एखादा नाही तर अनेक घोटाळ्यांचे जणू जाळे निर्माण करतो.ते उलगडणे इतरांना साधत नाही .अनेक संशय शंका मात्र उत्पन्न होतात.त्याने वेळ जातो. कार्य बिघडते व संघटन बिघडते.


महंताने राजकारणी लोक संग्राहक मनुष्याने असे लोक लक्षात घेऊन मुख्य कार्यापासून दूर ठेवायला हवेत. सध्या निवडणुकीचे वारे वाहात आहेत .आधी केलेले काम, घोटाळे, कर्तृत्व,कार्यक्षमता यावर आधारित कोणावर कोणती जबाबदारी द्यायची, कोणाला तिकीट न देता इतर जबाबदारी द्यायची, कोणाला निवृत्त करायचे

याचे नियोजन सर्व पक्षांना करावे लागतात.सामान्य माणसांना हे निर्णय अप्रिय अनपेक्षित असू शकतात.पण तिथे असलेले विवेकी नेते ही सारी अनुमाने गणिते जुळवीत असतात व दूरदृष्टी ने मोठे उद्दिष्ट,लक्ष समोर ठेवून ही निवड करीत असावेत व असे करणे आवश्यक आहे असा समर्थांचा ही अभिप्राय असावा असे हा श्लोक वाचून वाटते.

---

**उद्वेग अवघे तुटोनि जाती । मनासी वाटे विश्रांती ।**
**ऐसी दुल्लभ परब्रह्मस्थिती । विवेकें सांभाळावी ।।१९-८-२६॥**

समासाचे नाव आहे उपाधिलक्षण निरूपण .शिर्षक चालू आहे समाजाची सेवा करावी.उपाधि(धी) म्हणजे सामान्य अर्थ माया,प्रपंच,विकार,अडथळा,आपत्ति,चळवळ वगैरे. दशक १९/८/१९ ते १९/८/२२ तसेच दशक १९/८/२७ ते १९/८/३० यात ह्यांचे सविस्तर विवेचन केले आहे.महंताने महंती करण्यासाठी जो व्याप मांडला आहे त्याला उपाधी असे म्हणतात.




**ज्यासी उपाधी आवरेना । तेणें उपाधी वाढवावी ना ।**
**सावचित्त करुनियां मना । समाधानें असावें ॥ १९-८-१९॥**

व्याप सांभाळता येत नसेल तर तो वाढवू नये, असा स्पष्ट संकेत समर्थांनी इथे दिला आहे.उपाधी वाढविण्याची कला काही लोकांमध्ये स्वभावत: असते, तर काहींना ते प्रयत्नपूर्वक करावे लागते. लोकांचे गुण--अवगुण ओळखून, कोणामध्ये नेतेपणाची, महंताची लक्षणे आहेत हे लक्षात घेऊन त्यांची कार्यासाठी निवड करावी.गुणग्राहक,नेमकेच बोलणारे,सर्वासामावून घेणारे अशा लोकांना बरोबर घेऊन आपण उपाधी वाढवावी. महंतांने नेहमी असा विचार केला पाहिजे की आत्मारामाला एकही उपाधी नाही अशा निश्चयात राहिले असता व्यापामुळे उद्वेग नाहीसे होतात व आपली ब्राह्मस्थितीं सांभाळता येते.म्हणून महंताने समुदायामध्ये व आत्मचिंतनासाठी एकान्तामध्ये आयुष्य घालवावे.आत्मस्थिती सांभाळली जात नाही. जर आपल्या मनाला कार्याचे समाधान मिळत नसेल तर एका क्षणात कार्यापासून बाजूला व्हावे. आपल्या सेवेवाचून आणि कार्यावाचुन भगवंताचे अथवा समाजाचे काहीही अडलेले नाही हे लक्षात ठेवावे.

---

**कांहीं गल्बला कांहीं निवळ । ऐसा कंठीत जावा काळ ।**
**जेणेंकरितां विश्रांतीवेळ । आपणासी फावे ॥ १९-८-२९॥**

या जगात आपल्या समाधानापेक्षा मोठी गोष्ट दुसरी कोणतीही नाही.ज्याला कार्याचा विनाश दिसू लागला त्याने निदान स्वतःला आवरावे आणि उर्वरित काळ भगवंताच्या चिंतनात घालवावा.कर्माचे व्यसन लागू देऊ नये.साधक दशेमध्ये ज्याला कर्मयोगाची उपासना करावयाची आहे त्याच्यासाठी समर्थ वरील ओवीतून मौलिक सूचना देतात. नवोदित कार्यकर्त्याने २४ तास कर्मामध्ये राहू नये .त्याने आपल्या दिनचर्येत कर्माचे तास आणि उपासनेचे तास ठरवून घ्यावेत.काही तास त्याने कर्मयोगाचे अनुष्ठान करावे आणि काही तास एकांतात उपासना करावी.कर्मामुळे चित्ताची शुध्दी होईल आणि उपासनेमुळे बुध्दीला स्थिरता प्राप्त होईल.जसजशी कार्याची क्षमता वाढेल तसतसा त्याने व्याप वाढवावा आणि आध्यात्मिक साधनेच्या बळावर आपली परब्रह्मस्थिती कायम सांभाळावी.नवोदित कार्यकर्त्याला एकांतात राहून आत्मपरीक्षण करणे गरजेचे आहे.कार्यकर्त्याने एकांतात राहून आपल्या चुका जर तपासल्या नाहीत, तर त्याच्यात कधीही सुधारणा होणार नाही.त्याची भूमिका सतत शिकण्याची असली पाहिजे. भगवद्गीतेत ४ त्या अध्यायात स्वाध्याय यज्ञ सांगितला आहे.कर्मयोगी साधकाने स्वाध्याययज्ञ करावा. प्रथम चुका होतील,त्याने घाबरून जाऊ नये तसेच चुकांकडे दुर्लक्ष करू नये.त्यातून बोध घ्यावा.हितचिंतकांचे मार्गदर्शन घ्यावे.

**दास डोंगरी रहातो । यात्रा देवाची पहातो ।**

उत्सवाची सर्व तयारी करून उत्सवाच्या समयी समर्थ घळीत निघून जात. समर्थ पुष्कळदा एकांतात निघून जात. चिंतनाची ओवी समर्थांचे आत्मचरित्रच आहे. कार्यकर्त्याला हे आवश्यक असते की त्याने मधून मधून कार्याचे सिंहावलोकन करण्यासाठी एकांतवास सेवन करावा. या शिवाय एकांतामध्ये महत्त्वाच्या व्यक्तींसोबत मंत्रणआ करता येते. साधनेसाठी तर एकांत हवाच पण एकांत ही देखील महंताची साधनाच आहे. एकसारखे कार्यात व्यस्त राहिल्यामुळे रजोगुण वाढतो, परत सत्वगुण आणण्यासाठी एकांत आवश्यक आहे.

---

## रविवार ३१.०३.२०२४

**जगामधे जगमित्र | जिव्हेपासी आहे सूत्र |**
**कुठे तऱ्ही सत्पात्र | शोधून काढावे ||१९-०२-१९||**

प्रस्तावना : श्रीमत् दासबोधातील एकोणिसाव्या दशकाला श्री समर्थांनी शिकवण असे शीर्षक दिलेले आहे. या दशकामध्ये श्री समर्थांनी व्यावहारिक शिकवण सांगितली आहे. तसेच हा समास म्हणजे जणू श्री समर्थांचे आत्मचरित्र आहे. जसे एखादी आई आपल्या मुलाला अनंत प्रकारे संस्कार करून त्याला एका उत्तम व्यक्तिमत्त्वाच्या आधारे घडवत असते, त्याचप्रमाणे समर्थ माऊली देखील जीवाचे शिल्प घडावे, त्यातून एक उत्तम व्यक्तिमत्व आकारास यावे, या दृष्टीने त्याचे प्रयत्न आणि त्यावरही केली जाणारी संस्कारांची दिशा आपल्याला या दशकामध्ये समजावून सांगत आहेत.

अर्थ : जगामध्ये जगमित्र होण्याचे मुख्य सूत्र, साधन आपल्या जिव्हेपाशी आहे. गोड बोलून किंवा मनोगत जाणून सर्वांचा स्नेह संपादन करावा. पण त्या बरोबरच सज्जन मात्र शोधून काढावेत.

भावार्थ : दासबोधातील १९ व्या दशकातील वरील समासाच्या अंतिम टप्प्यामध्ये समर्थ संवादाचे सूत्र वरील ओवीमध्ये आपल्याला सांगतात.

या जगामध्ये जगत्मित्र व्हायचे असेल तर या सगळ्यांचे वर्म आपल्या जिभेपाशी आहे. आपल्या वाणीच्या आधारे चांगल्यातली चांगली माणसं संवाद शास्त्राच्या आधारे जोडावीत. हे संघटन करण्याची कला आपल्या वाणी जवळ आहे. असा हा जगत्मित्र केवळ आपल्या वाणीच्या सामर्थ्याने या सर्व लोकांना एकत्रित करत असतो. मग या वाणीचे सामर्थ्य जगत्मित्र होण्यासाठी आपण कशा पद्धतीने वापरले पाहिजे तर श्री समर्थांनी त्याचे सूत्र दिले की, शब्दांचा उच्चार करत असताना या वाणीच्या आधारे त्या शब्दांच्या आवेगात आपण असे काही वाहवत जातो की कित्येकदा चुकीच्या शब्दांची योजना आपल्याकडून नकळतपणे होऊन जाते. ज्या ठिकाणी जाऊ त्या ठिकाणी गोड बोलून माणसे आपलीसी करावीत. तेथील गुणवंत माणसे जवळ करावीत. त्यांच्याशी मित्रता ठेवावी. परंतु कटू बोलून सहसा कोणाचे मन दुखवू नये. संत कबीर आपल्या एका दोहयामध्ये म्हणतात,

**"शब्द शब्द संभालकर बोलिए, शब्द के नहीं हाथ नहीं पाॅंव**
**एक शब्द में है औषधि और एक शब्द में है घाव !"**

अर्थात नकळत एखादे शब्द जरी आपण म्हणत असलो, तरी बऱ्याचदा आपल्या अंतरंगामध्ये असलेले पूर्व संस्कार, वासना जे कदाचित आपण सुसंस्कारित आहोत हे दाखवत असताना आपण लपवून ठेवलेले आहेत, त्या देखील या 'नकळत' शब्दांच्या वाटे बाहेर पडू शकतात. त्यामुळे शब्द हे निवडून बोलले पाहिजेत असा श्री समर्थांनी येथे उपदेश केला आहे.

---

**१ एप्रिल २०२४**

**तो परोपकार करितांचि गेला । पाहिजे तो ज्याला त्याला ।**
**मग कायें उणें तयाला । भूमंडळीं ।। दा. १९ - ४ - १०।।**

या प्रकरणाचे उपशिर्षक समाजाची सेवा करावी असे आहे. या उपशिर्षकाला साजेशा व्यक्तीचे वर्णन या ओवीत आढळते. सदेव लक्षणाच्या या समासात समाजाच्या सेवेसाठी सदैव तत्पर असणाऱ्या व्यक्तीचे वर्णन समर्थ करीत आहेत.

**उपजतगुण शरीरीं । परोपकारी नानापरी।**
**आवडे सर्वांचे अंतरीं । सर्वकाळ ।।२।।**

या ओवी पासूनच अशा परोपकारी माणसाचे वर्णन समर्थ करीत आहेत. माझ्या सारख्याला प्रश्न पडतो की इतका सज्जन, परोपकारी मनुष्य खरेच असतो काय? आपला स्वार्थ असल्याशिवाय कोण परोपकार करेल? आज कित्येक सामाजिक संस्था (NGO) दिसतात पण कोणतीही संस्था स्वार्थाशिवाय कार्य करीत नाही. समर्थ तर एका व्यक्तीचे वर्णन करीत आहेत.

अर्थात् समर्थ म्हणतात तर नक्कीच असा मनुष्य असेल आणि तो समर्थांचा महंतच असेल. तो कोणाचे मन मोडीत नाही. भाग्यवंताच्या लक्षणांची त्याला बरोबर कल्पना असते. सर्वांना तो हवा हवासा

वाटतो. जिथे जाईल तिथल्या लोकांना तो आवडतो. उत्तम गुण असणारा हा सत्पात्र माणूस जगमित्र असतो. त्याच्या गुणांच्या जोरावर त्याची कीर्ति जगभर पसरते. सर्वांचे अंतःकरण तो सांभाळतो. अत्यंत नम्र वागणे त्याचे असते. बोलतो तसाच तो वागतो. नेहमीच उत्तम क्रिया तो करतो. पुष्कळ लोक त्याला मानतात. तो अविरत परोपकार करीत जातो. म्हणून तो ज्याला त्याला हवा हवासा वाटतो.

अशा परोपकारी पुरुषाला जगात काहीच कमी पडत नाही. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही संस्था समर्थांच्या संघटनेच्या धर्तीवर स्थापन झाली आहे. या संस्थेचा प्रचारक कसा असावा, त्याची आचार संहिता कशी असावी हे ठरवितांना हा समास डोळ्यापुढे ठेवला असावा. आजच्या प्रचारकांना हा समास मार्गदर्शक ठरेल.

---

## २ एप्रिल २०२४

**दुस-याच्या दुःखें दुखवे | दुस-याच्या सुखें सुखावे |**
**आवघे चि सुखी असावे | ऐसी वासना || १९-४-२३**

दासबोधाच्या १९ व्या दशकातील सदेवलक्षण नाम चौथ्या समासातील ओवी क्रमांक २३ वर आज आपण चिंतन करणार आहोत. सदेव म्हणजे दैवी गुणांनी युक्त असे हे शब्द सूचक आहे. भगवंताच्या जितके जवळ जावे, तितकी त्याची म्हणजे आत्म्याची लक्षणे आपल्यात उतरत जातात. आणि आपली म्हणजे देहाची लक्षणे संपत जातात. देहातील दोष विकार संपत जातात. आणि भगवंताचे गुण अंगी उतरत जातात . सत्व गुण वाढत जातात .संत प्रवृत्ती वाढत जाते. ज्याची साधना योग्य मार्गाने सुरु आहे, त्याला हे स्वानुभवाने प्रत्ययी येते. विवेक बुद्द्धीने असा सत्पुरुष नरदेह सार्थ तर करतोच त्यासोबतच आपल्या भोवतीच्या लोकांचेही तो कल्याण साधतो.

**दुस-याच्या दुःखें दुखवे| बहुतेक जणांना आपले दुःख पर्वता एवढे** वाटते.दुस-याचे दुःख समजणे तर दूरच राहिले. दुस-याच्या दुःखाणे दुःखी झाल्याचे नाटक बरेचदा केले जाते. किंवा कधी कधी खरेच दुःख होते.पण आपण स्वतःस किती त्या व्यक्तीच्या जागी पाहातो आणि त्या व्यक्तीचे दुःख वाटून घेतो हे खरोखरच चिंतनीय आहे.पर दुःख शीतल असते असे प्रत्येकाला वाटत असते.परंतु त्या दुःखाचा दाह त्या दुःखितालाच जाणवत असतो. संतांना मात्र हे दुस-याचे दुःख कष्टविते.

**दुरितांचे तिमिर जावो | विश्वस्वधर्म सूर्ये पाहो |**
**जो जे वांछील तो ते लाहो | प्राणिजात ||**

असे म्हणायला आपल्यालाही ज्ञानेश्वर माउली प्रमाणे माउली व्हावे लागेल. संत एकनाथ महाराजांना तहानेने व्याकूळ झालेल्या गाढवाचे कष्ट व्यथित करतात आणि ते विठ्ठला आधीही गाढवाला पाणी पाजतात. आत्मा सर्वांभूती याची अनुभूती आलेले संत जनच असे स्वतःस विसरून समाजाचे होतात,

शामची आई म्हणजेच  साने गुरुजींच्या कितीतरी सहज कृतीतून तिचा तरल स्वभाव संस्कार रूपाने गुरुजीना घडवत गेला. तिचे उदाहरण आजच्या संपूर्ण ओवी साठी अगदी यथार्थ आहे असे वाटते. संस्काराने ही संत लक्षणे बिंबवता येतात .घराची आर्थिक बौद्धिक सामाजिक सुबत्ता असतानाही आपले समर्थ बाल वयातच **" चिंता करितो विश्वाची "** असे तळमळीने सांगतात . ही दैवी लक्षणे काही भाग्यवंतांना स्वाभाविकच

लाभतात. दुस-याच्या सुखें सुखावे |दुस-याचे दु:ख दिसले की आपले दु:ख अधिकच तीक्ष्ण, तीव्र वाटते .दुस-याच्या सुखाने सुखावणारे हे केवळ संत प्रवृत्तीचे असतात .

देह बुद्धीला सुखावणारी वासना अशा साज्जनात अणु मात्रही नसते. असलीच तर "आवघे चि सुखी असावे|" ही वासना असते. स्वार्थ ते परमार्थ अशा प्रवासाचे हेच अंतिम ध्येय आहे. नुसता परमात्म अनुभव घेउन आपल्याला थांबायचे नाही ,तर सर्वे भवन्तु सुखिन: |येथ पर्यंत पोहोचायचे आहे.

---

## ३ एप्रिल २०२४

**नारायेण असे विश्वीं । त्याची पूजा करीत जावी ।**
**याकारणें तोषवावी । कोणीतरी काया ।। १५ - ९ - २५।।**

पिंडोत्पत्तिनिरूपणाच्या समासातील ही ओवी आहे. या समासात चारी खाणीतील जीवप्राणी कसे निर्माण होतात याची चर्चा आली आहे. पंचमहाभूतांपेक्षा अंतरात्मा वडील आहे.

सर्वच पिंडांपेक्षा अंतरात्मा वडील आहे. अंतरात्म्याशी अनन्य होऊन त्यास ओळखावे. तो वडील अंतरात्मा ज्याच्या अंतकरणात जागा होतो तो भाग्यपुरुष होतो. त्या अंतरात्मा रूपी नारायणाला अखंड ध्यानी मनी आठवावे. मग लक्ष्मी त्याचे जवळ येते. अंतरात्मा सर्व विश्वामध्ये व्यापून आहे. त्याची पूजा करीत जावी. कशी करावी त्याची पूजा? त्यासाठी कोणीतरी एखादा जीव संतुष्ट करावा. देहाला केलेले उपचार अंतरात्मा ग्रहण करतो. आणि म्हणूनच कोणीतरी जीवाची सेवा करावी.

खरी उपासना म्हणजे संबंध विश्वावर आपुलकीने प्रेम करणे. प्रत्येक जीवामध्ये अंतरात्मा विद्यमान असतो म्हणून कोणाचेही अंतःकरण न दुखविता भेटेल त्याला आपला समजून सेवा करावी. रामकृष्ण परमहंसांनी शिवभावे जीवसेवा सांगितली आहे त्याचे ही कारण हेच आहे की प्रत्येक जीव हा अव्यक्त परब्रह्म असून त्याची केलेली पूजा परमेश्वरापर्यंत पोहोचते.

---

## ४ एप्रिल २०२४

**देऊळें म्हणिजे नाना शरीरें । तेथें राहिजे जीवेश्वरे ।**
**नाना शरीरें नाना प्रकारें । अनंत भेदें ।। दा १७ - १ - १३।।**

स्वामी विवेकानंद म्हणतात, "प्रत्येक जीव अव्यक्त ब्रह्म आहे." म्हणजे प्रत्येक शरीरात ब्रह्म तत्व विराजमान आहे. समर्थांना हे पक्के ठाऊक आहे. दासबोधात जागोजाग याचा उल्लेख नाना प्रकारे समर्थांनी केलेला आहे. २० -४ मधली ही ओवी बघा -

**पृथ्वीमधें जितुकीं शरीरें । तितुकीं भगवंताचीं घरें ।**
**नाना सुखें येणें द्वारें । प्राप्त होती ।।२० - ४ - ४।।**

गीतेमध्ये भगवंत म्हणतात "सर्वस्यचाहं हृदि सन्निविष्टो मत्तः स्मृतिर्ज्ञानमपोहनं च ।" मीच सर्व प्राण्यांच्या हृदयात अंतर्यामी होऊन राहिलो आहे. सातव्या श्लोकात भगवंत म्हणतात की प्रत्येक जीव माझाच अंश आहे. कठोपनिषद देखील आत्म्याला शरीररूपी रथाचा मालक म्हणते. प्रत्येक शरीरात परमात्मा आहे हे जाणून त्याची सेवा करा असा संदेश रामकृष्ण परमहंस आपल्या शिष्यांना देतात. समर्थांशिवाय इतर संत देखील हेच सांगतात. नामदेव व एकनाथाने तर तसे वागून दाखविले आहे. पण आमच्या आचरणात कसे आणि कधी येईल हा प्रश्नच आहे. आद्यात्मिक शास्त्र, ग्रंथ, कथा वाचून सोडून द्यायच्या नसतात. त्यातून धडा घेऊन आपले आचरण सुधरले पाहिजे.

या ओवीत तर शरीरांना देऊळांची उपमा दिली आहे. आणि या शरीररूपी देऊळांच्या अंतर्यामी तो जीवेश्वर राहतो आहे. पुढच्याच ओवीत समर्थ म्हणतात की शरीरे म्हणजे चालती बोलती देवळे आहेत व त्यात देव रहातो. जितकी देऊळरूपी शरीरे आहेत तितकी कळली पाहिजेत. आत्माराम हा या सर्व देवळातील मुख्य देव असतो.

अंतरात्मा खरोखर सुखदुःखांचा स्पर्श न होणारा आहे. तो केवळ साक्षीपणाने रहाणारा, निर्दोषपणाने सम असणारा आहे. परंतु देहात रहायला आल्यावर देहाच्या सहवासाने मूळचा संगरहित आत्मा संगसहित बनतो. त्यामुळे त्याला सुख-दुःखे जबरदस्तीने भोगावी लागतात. हाच ह्या देवावर झालेला बलात्कार होय. हा संपूर्ण समास वाचला की या देहाचे व त्यातील आत्म्याचे महत्व कळून येते.

---

**५ एप्रिल २०२४**

**मुख्य हरिकथा निरूपण । दुसरें तें राजकारण ।**
**तिसरें तें सावधपण । सर्वविषईं ।। दा ११ - ५ - ४।।**

समर्थ संप्रदायाची चतुःसूत्री सांगतांना समर्थांनी ही चौथी आणि पुढील पाचवी अशा दोन ओव्यांच्या उल्लेख केला आहे. पाचवी ओवी उद्या मी घेणार आहे म्हणून आजचे चिंतन चौथ्या ओवीपुरते मर्यादित ठेवू या. राजकारण निरुपणाच्या ११ - ५ या समासात ही ओवी येते.

राजकारण या शब्दाचा आज प्रचलित अर्थ या ठिकाणी घेता येणार नाही. समर्थांनी हा शब्द कोणत्या अर्थाने वापरलेला आहे ते बघावे लागेल. तो असा - समाजाचे पुढारीपण गाजविण्यास लागणारे व्यवहार चातुर्य म्हणजे राजकारण असा. राजकीय हालचाल या पुढारीपणाचा एक महत्त्वाचा भाग आहे. समाजातील निःस्वार्थी आणि चतुर पुरुषांना समर्थांनी प्रेरणा दिली आणि लोकसंग्रह कसा करावा हे इथे समजवून सांगितले आहे.

लोकसंग्रह करणाऱ्या पुरुषाचा समाजातील सर्व अंगाशी संबंध येतो. लोकसंग्रह करणाऱ्या पुरुषाचा साधुसंत, धर्मसंस्था, राज्यसंस्था व अर्थ संस्था यांच्याशी निकटचा संबंध येतो. असा पुढारी आणि त्याच्याशी संबंध ठेवणारा साधु हे दोघेही परकीय राज्यकर्त्यांचा रडारवर येतात. समर्थांच्या काळात शासक असहिष्णु, क्रूर होते, त्यांच्या विरोधात कार्य करणाऱ्या लोकनेत्यास समर्थ पूर्ण पाठिंबा देत.

अशा नेत्याला मार्गदर्शन म्हणून समर्थांनी संप्रदायाची चतुःसूत्री सांगितली आहे. यातले प्रथम सूत्र आहे "हरिकथा निरूपण" हरिकथा निरुपणाच्या सूत्राला मुख्य सूत्र म्हटले आहे. लोकांना हरिकथेच्या मिषाने

एकत्र आणायचे. नित्य भगवंताच्या कथा करून लोकांना एकत्र खिळवून ठेवायचे, लोकांना भक्तीमार्गाला लावायचे हे महंताचे मुख्य काम असे. जमा होणाऱ्या मंडळीतील तरुणांना निवडून त्यांना शक्तीच्या उपासनेला लावायचे. अशा तरूणांमधूनच शिवरायांचे मावळे तयार होत असत. तरूणांच्या संघटनेला राजकारणास लावायचे. हे काम गुप्तपणे होत असे. हे संप्रदायाचे दूसरे सूत्र आहे.

तिसरें सूत्र सावधपणाचे आहे. सावधपणावर समर्थांचा फारच भर होता. चौपदी मध्ये समर्थ "सावधपण मज देरे राम" हे मागणे मागतात. "सावध साक्षपी आणि दक्ष। तयास तात्काळीच मोक्ष ।" ही सावधान माणसाला समर्थांनी दिलेली गॅरंटी आहे हे आपण लक्षात घ्यावे. पुढाऱ्याने ही सर्व सूत्रे लक्षात ठेवून त्याप्रमाणे समुदाय घडविला पाहिजे. संप्रदायाचे चौथे सूत्र आपण उद्या बघणार आहोत.

---

## ६ एप्रिल २०२४

**चौथा अत्यंत साक्षप । फेडावे नाना आक्षेप ।**
**अन्याये थोर अथवा अल्प । क्ष्मा करीत जावे ।। दा ११ - ५ - ५।।**

काल आपण समर्थ संप्रदायाची चतुःसूत्री बघायला सुरुवात केली होती आणि त्यातील तीन सूत्रें बघितली होती. प्रथम सूत्र होते "हरिकथा निरूपण" दुसरे "राजकारण" आणि तिसरे सर्व विषयी "सावधपण" असे सूत्र होते. आजच्या ओवीत चौथे सूत्र समर्थ सांगत आहेत. "अत्यंत साक्षप" हे ते चौथे सूत्र आहे. साक्षप किंवा साक्षेप चा अर्थ उद्योगीपणा असा आहे. सांप्रदायिकाने सतत उद्यमशील असले पाहिजे असे समर्थांनी या ओवीत सांगितले आहे. अविरत उद्योगावाचून टिकणारे यश मिळत नसते असे समर्थ सांगतात.

आपल्या ध्येयाबद्दल वा कार्याबद्दल नाना प्रकारचे संशय, आक्षेप लोक घेतात. संप्रदायिकाने त्या आक्षेपांचे खंडन करावे असे समर्थ सांगतात. आपले अनुयायी लहान सहान चुका करतात त्यांना त्याबद्दल क्षमा करावी असे समर्थ या ओवीत सांगतात. फेडावे नाना आक्षेप या चरणावरून प्रेरणा घेऊन समर्थांच्या चरित्रावर घेतले गेलेल्या आक्षेपांचे खंडन करणारे एक पुस्तक पुजनीय सुनिलदादा चिंचोलकरांनी लिहिले आहे. "समर्थ चरित्र -आक्षेप आणि खंडन" असे या पुस्तकाचे नाव आहे. आपण प्रत्येकाने ते मिळवून वाचले पाहिजे.

संप्रदायाच्या या चतुःसूत्रीचा विस्तार या ११ - ५ समासात समर्थांनी केलेला आहे. हरिकथा निरूपण हे तर संप्रदायाचे मुख्य ध्येय आहे. आपणामागे जगदीशासी भजत जावे हा संदेश आहे. दुसरें सूत्र राजकारण आहे. लोकांना हरिकथेच्या निमित्ताने जमवून समाजकार्यास लावणे हे ढोबळ मानाने राजकारण आहे. सावधपण हा तर मानव जीवनाचा प्राण आहे. आणि अत्यन्त साक्षप म्हणजे सतत उद्योगशीलता हे चौथे सूत्र आहे. महंताने आपले कार्य या चतुःसूत्रीचा भोवताल विणले पाहिजे. संप्रदायिकाने देखील या चतुःसूत्रीच्याच परिघात राहिलें पाहिजे.

---

## ७ एप्रिल, २०२४

**दोष देखोन झाकावे । अवगुण अखंड न बोलावे ।**
**दुर्जन सापडोन सोडावे । परोपकार करुनि ।।**

राजकारणाचे भान असावे या विषयांतर्गत येणाऱ्या ओव्या आपण पाहत आहोत. वरील ओवी राजकारणनिरूपण समासातील दहाव्या क्रमांकाची आहे. हा समास फक्त महंतांसाठी किंवा नेत्यांसाठी लिहिला असावा असे वरकरणी वाटू शकेल परंतु हा प्रत्येक सांसारिक सामान्य मनुष्यासाठी दैनंदिन आयुष्य जगताना, कुटुंबात, समाजात जगताना विवेक कसा वापरावा हे सांगणारे एक step by step guide आहे. समर्थांचा दासबोध ज्याच्या आयुष्यात खऱ्या अर्थाने येतो, त्याने या सूत्रांचा practically वापर करणे महत्वाचे आहे. मनुष्य जन्माचे सार्थक हे दासबोध आचरणात आणण्यातच आहे याबद्दल जेव्हा अभ्यासकाचा ठाम विश्वास निर्माण होईल तेव्हाच ते सार्थक घडायला सुरुवात होते.

या ओवीत समर्थ म्हणतात की, "दोष देखोन झाकावे । अवगुण अखंड न बोलावे ।" मनुष्याचा मूळ स्वभाव हा दुसऱ्याचे दोष सर्वात पहिले पाहण्याचा असतो. काही माणसे तर अशी असतात की त्यांना समोरचा मनुष्य कसाही वागला तरी त्याचे दोषच आधी दिसतात. परंतु आपण हे नेहमी विसरतो की दुसऱ्याकडे एक बोट दाखविताना चार बोटे आपल्याकडेच असतात म्हणजेच आपण स्वतः जेव्हा दोषांचे गिरीवर घेऊन जगत असतो तेव्हा आपल्याला दुसऱ्याकडे बोट दाखविण्याचा अधिकार नसतो.

अश्या मनुष्याला समर्थांनी पढतमूर्ख म्हंटले आहे, "दोष ठेवी पुढिलांसी । तेचि स्वये आपणापासी । ऐसे कळेना जयासी । तो येक पढतमूर्ख ।।०२-१०-१३।।" समोरचा मनुष्य चुकीचा वागत असला की दोष दिसणे हे स्वाभाविक आहे परंतु त्याचे दोष/अवगुण सतत त्याच्यापुढे बोलून दाखविल्यामुळे त्यात एक कोडगेपणा निर्माण होऊ शकतो, त्याचे मन दुखावले जाऊ शकते आणि ते जर एखादे वाढत्या वयातील मूल असेल तर त्याच्यात एक प्रकारचा न्यूनगंड आयुष्यभरासाठी निर्माण होऊ शकतो.

आपल्याला स्वतःला कोणी सतत आपल्या दोषांबद्दल बोलत राहिले तर आवडेल का याचा विचार विवेकी मनुष्याने करायला पाहिजे. जर आपले दोष दाखविलेले आपल्याला आवडत नसतील तर मग आपणही तसे समोरच्या माणसाशी वागू नये असे सद्गुरु समर्थ आपल्याला शिकवीत आहेत.

लहान मुलांना त्यांचे अवगुण दाखवून द्यावेत पण तेही एकांतात! त्यांच्या मनाला दुखावेल अश्या पद्धतीने न सांगता समजावून सांगणे यातच खऱ्या विवेकी मनुष्याच्या आचरणाची परीक्षा असते. कोणाचेही दोष दाखविताना माझ्या आवाजाची पट्टी मृदू असावी, स्वर हा समजविण्याचा असावा व शब्द कोमल पण योग्य संदेश देतील असे असावेत तरच त्या बोलण्याचा उपयोग होतो अन्यथा ते वाया जाते.

जसे संत तुकाराम महाराज त्या लहान मुलाला अति गुळाचे सेवन करू नये हे सांगण्यासाठी आधी स्वतः पंधरा दिवस गूळ खाणे सोडतात, त्याचप्रमाणे दुसऱ्याचा दोष दाखविताना तो आधी आपल्यात तर नाही ना हे देखील तपासून बघणे विवेकी मनुष्याला अत्यंत आवश्यक आहे. नाहीतर केवळ वयाने मोठे असण्याचा अधिकार वापरुन आपण जर उठसुठ इतरांचे दोष दाखवत राहिलो तर समोरच्याच्या मनात आपल्याबद्दल आदरभाव कधीच टिकणार नाही.

पुढील चरणात समर्थ माऊली म्हणतात, "**दुर्जन सापडोन सोडावे । परोपकार करुनि ।।"** - दुर्जन संज्ञेचा सरलार्थ म्हणजे दुष्ट जन किंवा खल. समर्थ म्हणतात, 'दुर्जनासी तंडो नये'. समाजात कायम दोन्ही तऱ्हेची माणसे आढळतात सज्जन आणि दुर्जन. दुर्जन मनुष्य अनेक अवगुणांनी युक्त असतो. परंतु याचा अर्थ असा नाही की त्याच्याजवळ एकही चांगला गुण नसतो. संत मंडळी तोच एक चांगला गुण नेहमी बघतात कारण त्यांना त्या दुर्जनातील परब्रह्म दिसत असते. आपण सामान्य मनुष्य तसे बघू शकत नाही कारण आपण चर्मदृष्टीने (देहबुद्धीतून) त्या दुर्जनाकडे बघत असतो परंतु संत मात्र त्याच्याकडे आत्मदृष्टीने किंवा ज्ञानदृष्टीने बघत असतात.

याचे सर्वश्रुत उदाहरण म्हणजे रामेश्वर भट्ट व संत तुकाराम! आपल्याला त्यांच्या गोष्टी चरित्रातून माहित आहेत परंतु तुकोबांची गाथा इंद्रायणीत बुडविण्याचा आदेश देणाऱ्या रामेश्वर भट्टांनी आपल्या अधिकाराचा गैरवापर केला. खल किती खालच्या पातळीवर जाऊ शकतात याचे हे उत्तम उदाहरण आहे परंतु त्याच रामेश्वर भट्टांना जेव्हा अंगाची लाही लाही होऊ लागते तेव्हा संत तुकारामांच्या पायांवर लोळण घ्यावे लागते आणि इतक्या कपटी वृत्तीने वागलेल्या रामेश्वर भट्टाला तुकोबा माफ तर करतातच पण त्याचा शिष्य म्हणून स्वीकार करुन उद्धारही करतात. संत तुकाराम आपल्या एका अभंगात म्हणतात, **"पुण्य ते पर उपकार । पाप ते परपीडा ।।"** हा अभंग त्यांनी प्रत्येक दुर्जनांच्या प्रसंगी आचरणात आणून दाखविला आहे आणि परोपकाराचा एक वस्तुपाठच आपल्यासमोर ठेवला आहे.

या स्तरावरील क्षमाशीलता फक्त संतांकडेच दिसते परंतु याचा एक अंश तरी आपण आपल्या व्यावहारिक जीवनात आचरणात आणायला पाहिजे. आपल्याही आजूबाजूला, कधी कधी तर कुटुंबातच आपला द्वेष करणारी माणसे असतात परंतु त्यांना मनापासून क्षमा करुन निदान माझ्याकडून त्यांना त्रास होणार नाही, माझ्या मनात मी त्यांच्याविषयी अढी बसू देणार नाही, त्यांचा द्वेष मत्सर करणार नाही, एवढे तरी आपल्याला दासबोध अभ्यासक म्हणून करता आलेच पाहिजे.

म्हणूनच श्रीमत दासबोध हा आचरणात आणण्याचा ग्रंथ आहे हे वारंवार स्पष्ट होते. समर्थांनी या ओवीत दिलेल्या दोन्ही सूत्रांमध्ये विलक्षण सामर्थ्य भरलेले आहे तेव्हा आपल्या आचरणात या सूत्रांचा वापर करण्याचा विवेक आपण सद्गुरु समर्थ माऊलींकडे मागुया.

---

## ८ एप्रिल २०२४

**दुखः दुसऱ्याचें जाणावें| ऐकोन तरी वांटून घ्यावें |**
**बरें वाईट सोसावें| समुदायाचें ||१४|| ११.५.१४**

दशक ११ भीम दशक सहज समाधी सांभाळून कर्माचा प्रचंड खटाटोप कसा सांभाळावा हे ज्यांच्या जीवनावरून शिकता येते त्या मारुतीराया चे नाव असलेला हा दशक व त्यातील राजकारण निरूपण या नावाचा हा समास व त्यातील १४ क्रमांकाची ही ओवी आहे. हरिकथा निरूपण, राजकारण,सर्वविषयी सावधपण, अत्यंत साक्षेप अशी संप्रदायाची चतु:सूत्री समर्थांनी समासाच्या सुरवातीला सांगीतली आहे.

**जाणावे परांचे अंतर| उदासीनता निरंतर|**
**नीति न्यायासि अंतर पडो नेदावे||**

असे समर्थ सांगतात

महंताने राजकारण करताना लोक संग्रह करायचा आहे.त्यासाठी लोकांच्या अंत:करणाची परीक्षा करायची आहे.उदासीन असावे म्हणजे अलिप्त असावे , स्वार्थ नसावा व वर्तन नीतीला धरून असावे.महंताला सर्जनशील मन हवे म्हणजे कोणत्या काळी काय करावे ते अनेक उपाय पर्याय सुचतील व त्यायोगे अनेकांचे हित साधता येईल.हे करताना अनेकांचे भले बुरे सहन करायची सहनशीलता हवी.

प्रस्तुत ओवीत समर्थ महंताला त्याची जाणीव अधिक विकसित विशाल करायला सांगतात.ज्या समुदायाकडून कार्य करवून घ्यायचे किंवा ज्यांचे प्रबोधन करायचे त्यांच्या सुख दु:खांशी समरस होऊनच हे कार्य करावे लागते.

काही त्रास असला आणि कोणी शांतपणे ऐकून घेतले तरी मन हलकं होतं हा अनुभव तर आपण घेतो.त्रासलेलं मन थोडं हलकं झालं की त्याचे त्यालाही पर्याय दिसू शकतात.कोणी काही उपाय सुचवले तर त्यातून आपल्याला झेपणारा अधिक हितकारक उपाय कोणता हे समजू शकते.मनातल्या मनात थोडी जागा तयार होते.सुख वाटल्याने वाढते आणि दु:ख वाटल्याने उणावते असे म्हटले जाते.

सीतेच्या शोधार्थ निघालेल्या वानर सैन्याने द-या खो-या पालथ्या घातल्या व ते सागर तीरी हतबल निराश अवस्थेत पोहोचले.मारुतीरायांनी ही मन: स्थिती जाणली व पुढील जबाबदारी आपल्या शिरावर घेतली.सीतेचा शोध लागला,लंका दहन झाले आणि नंतर मात्र हनुमंतांना आपल्या सेनेला रामांना भेटायची व सुवार्ता द्यायची उत्सुकता लागून ते वायु वेगाने परतले.आधी दु:ख वाटून घेतले, जबाबदारी शिरावर घेऊन पार पाडली व नंतर आनंद वर्तमान द्यायची तातडी.बरे वाईट सोसावे समुदायाचे||

दुसरे उदाहरण इंद्रजिताच्या शक्तीमुळे मूर्च्छित मरणासन्न वानर सैन्याला मारुती रायांनी पुन्हा संजीवन दिलेव आवेशाने त्यांचे नेतृत्व करून विजयश्री खेचून आणली. हे भीमरूपी स्तोत्रात आले आहे. हा नेतृत्व गुण समर्थांना अपेक्षित आहे.

---

## ९ एप्रिल २०२४

**अपार असावे पाठांतर । सन्निधचि असावा विचार ।**
**सदा सर्वदा तत्पर । परोपकारासी ।। दा ११ - ५ - १५।।**

लोकसंग्रह करणाऱ्या पुरुषाच्या गुणांचे वर्णन समर्थांनी ११ - ५ या राजकारण निरुपणाच्या समासात केले आहे. हा उपदेश प्रामुख्याने समर्थांच्या महंतासाठी आहे. महंत हा all-rounder असावा असे समर्थांचे म्हणणे आहे. त्याचा शास्त्रांचा भरपूर अभ्यास असावा. तो मानसशास्त्रज्ञ देखील असावा. मनमिळावू असावा. लोकांकडून कार्य करून घेण्याची कला त्याला अवगत असावी. त्याला सर्वांचा आवडता होता आले पाहिजे.

ह्या ओवीचा अर्थ असा आहे - त्याचे पाठांतर खूप असावे. त्याने पुष्कळ ग्रंथाचे अवलोकन, अभ्यास केलेला असावा. त्याने नेहमी विचाराने वागावे, विवेकाने कर्म करावे. परोपकार करण्यास त्याने सदोदित मनाने तयार असावे. अर्थात् नेतृत्वाचे सारे गुण त्याचेमध्ये असावे. काही गुण तर पुढच्या ओवीत देखील आहेत –

**शांती करून करवावी । तऱ्हे सांडून सांडवावी ।**
**क्रिया करून करवावी । बहुतांकरवी ।। १६।।**

त्याने कठीण प्रसंगामध्ये स्वतः शांत रहाण्यास शिकावे आणि इतरांना देखील शांत रहाण्याय शिकवावे. आपण तऱ्हेवाईकपणे वागणे टाळावे आणि इतरांना देखील ते सोडण्यास शिकवावे. आपण कर्म करावे व इतरांकडून ते करवून घ्यावे. "क्रिया करून करवावी" हे आपल्या अभ्यासक्रमाचे घोषवाक्य आहे हे आपण जाणताच. लोकसंग्रही पुरुष लोकसमुदायाला वश करून घेतो व त्यांना मार्गदर्शन करून प्रगति पथावर त्यांना नेतो. कार्यामध्ये विक्षेप न यावा व लोकांची प्रगति सतत चालु रहावी हे पुढाऱ्याचे ध्येय हवे.

---

## १० एप्रिल २०२४

**करणें असेल अपाये । तरी बोलोन दाखऊं नये ।**
**परस्परें चि प्रत्यये । प्रचितीस आणावा ।। ११-५-१७॥**

शिर्षक आहे राजकारणाचे भान असावे. दासबोधात राजकारण निरुपणाचे २ समास आहेत. दशक ११-५ व १९-९.वरील ओवी क्रमांक दशक ११ समास ५ मधील आहे.

आताच्या घडीला उपयुक्त ठरेल अशी ओवी आहे असे मला वाटते. कारण आत्ताच्या काळात फारच वेगळ्या अर्थाने त्या कडे पाहिले जाते जे फार दु:ख देणारे आहे. समर्थांना जे अभिप्रेत आहे ते दासबोध खरा अभ्यासल्याने होते. कोणत्याही सामाजिक गटाची संघटन, संरक्षण, संवर्धन आणि भौतिक व आध्यात्मिक वैभव या गरजा असतात.हे लक्षात घेऊन आक्रमक धार्मिक झोटिंगशाहीला तोंड देण्यासाठी समर्थांनी संघटन व अनुकूल शासन यांच्या दिशेने अथक प्रयत्न केले.लोकशाही ही बहुमतावरती अवलंबून असल्यामुळे ते बहुमत आपल्या होईल असा प्रयत्न करणे आवश्यक ठरते.अशी विशिष्ठ चौकट स्वीकारल्यानंतर ती चौकट अनिवार्य आहे तोपर्यंत संघटना हा शासन स्वाधीन ठेवण्याचा एकमेव मार्ग ठरतो.

कोणत्याही प्रसंगात स्वतःची शांती न ढळू देता व स्वतःचा हटवाद न चालवता व त्याचबरोबर दुसऱ्यांनाही शांत करून त्यांचेही हटवाद थांबवावे.वरील पध्दतीने आपण स्वतः काम करून आपल्या योग्यतेचे अधिकाधिक कार्यकर्ते निर्माण करावे.समर्थांच्या जीवन कार्याचे हे प्रधान सूत्र आहे.

ह्या ओवीत समर्थांनी गनिमी कावा सांगितला आहे. पुढची १९ वी ओवी देखील गनिमी कावा सुचवते. समाजकार्य करीत असता किंवा शत्रूशी झुंजत असता हा उपदेश कामी येतो. कार्याच्या आड येणाऱ्याचा परस्पर काटा काढता आला पाहिजे.

**नष्टासी नष्ट योजावे ।।१९-९-११।।**
**काटीने काटी झाडावी । ।१९-९-१२।।**
**धटासी आणावा धट ।।१९-९-३०।।**

अशा किती तरी ओव्यांमधून शत्रूला किंवा दुर्जनाला कसे tackle करावॅ हे सांगतात. बहुतेक ठिकाणी गुप्तता हे मुख्य सूत्र आहे. हाच गनिमी कावा आहे. सुनिल दादांच्या दैनंदिन जीवनात दासबोध ह्या

पुस्तकाच्या ४७ व्या प्रकरणात हा विषय आला आहे. राजकारण करतांना कित्येक वेळा गुप्तता आणि कावेबाजीचा अवलंब करावा लागतो.

**राजकारण बहुत करावें । परंतु कळों च नेदावें ।**
**परपीडेवरीं नसावें । अंतःकरण ।। ११-५-१९॥**

हे सर्व राजकारण अखंड करावे.पण त्यांचे सूत्र आपल्याकडे आहे हे कुणाच्याही लक्षात येऊ देऊ नये. राजकारणामध्ये हेवेदावे साधण्यासाठी अगर दुष्टवृत्तीमुळे दुसऱ्याचा नाश करण्याचे मनातही आणू नये.अत्यंत महत्त्वाचे म्हणजे गुप्तता बाळगणे.सावध-साक्षेपी-दक्ष या सर्व गोष्टी यात येतात लोकांची पारख हवी,कोणाला दूर,कोणाला जवळ करायचे कळले पाहिजे.स्वत: मात्र अलिप्त असले पाहिजे.हे अलिप्तपण परमार्थात आवश्यक आहेच,पण प्रपंचात तो नेटका होण्यासाठी गरजेचे आहे,आणि राजकारणात महत्त्वाचे आहे.

---

## १२ एप्रिल २०२४

**येकांची पाठी राखणें । येकांस देखो न सकणें ।**
**ऐसीं नव्हेत कीं लक्षणें । चातुर्याची ।। दा ११ - ५ - २५।।**

महंताने राजकारण करीत असावे. राजकारण या शब्दाचा ढोबळ मानाने अर्थ समाजकारण असा होतो. महंताने समुदाय एकत्र करावा, समुदायाकडून कार्य करून घ्यावे. असे कार्य करून घेत असतांना कार्यकर्त्याला सांभाळून घ्यावे लागते. एक सख्खा आणि दुसरा सावत्र असा भेद करून चालणार नाही. व्यक्ती महत्त्वाची नसून कार्य महत्त्वाचे आहे याचे भान महंताने ठेवायचे असते. अगदीच नाईलाज असेल तर कामाचा नसलेला माणूस सोडून द्यावा. पण जो पर्यंत तो आपल्या समुदायात आहे तोपर्यंत भेदभाव करू नये.

या समासात महंताला समर्थांनी पुष्कळ tips दिलेल्या आहेत. २१व्या ओवीत समर्थ सांगतात की तापट व विवेकहीन माणसाला दूर ठेवावे. भित्र्या, अंगचोर माणसाला आपले गुप्त बेत सांगू नये. अशा प्रकारच्या माणसाशी संबंध आला तर आपण तेथून निघून जावे. खरा निःस्वार्थी लोकसंग्रही पुरुष कार्य संपले की निघून जातो. त्याचा मान -सन्मान, गौरव करू म्हटले तरी तो सापडत नाही. महंताने आपला व्याप वाढवावा, आपल्या कार्याचे क्षेत्र वाढवावे, पण त्यात गुंतून जाऊ नये, मनाने त्यात अडकू नये. महंताने सुरुवातीपासूनच आपल्याकडे कमीपणा व अज्ञान घ्यावे.

**उपाधीसी विस्तारावें । उपाधींत न संपडावें ।**
**नीचत्व पहिलेंच घ्यावें । आणि मूर्खपण ।।९।।**

एकंदर हा संपूर्ण समासच नेत्यासाठी आणि सांसारिका साठी उपयुक्त आहे. दासबोधाच्या अभ्यासकांनी तर या समासाकडे विशेष लक्ष दिले पाहिजे. समाजातील निःस्वार्थी आणि चतुर पुरुषांना समर्थांनी प्रेरणा दिली, लोकसंग्रह कसा करावा हे समजवून दिले.  दासबोधातील हा उपदेश विशेष करून अशा लोकांना नजरेपुढे ठेवून करण्यात आला आहे.

---

**१३ एप्रिल २०२४**

**चोर भांडारी करावा । घसरतांच सांभाळावा ।**
**गोवा मूर्खपणाचा काढावा । हळु हळु ।। दा १९ - ९ - ९।।**

एक संस्कृत सुभाषित आहे.

**अमन्त्रमक्षरं नास्ति । नास्ति मूलमनौषधम्।**
**अयोग्यः पुरुषो नास्ति। योजकस्तत्र दुर्लभः।।**

अर्थात् प्रत्येक अक्षर मंत्र होण्याच्या लायकीचे आहे, कोणतेही मूळ औषधीय गुणाचे असते, कोणताही मनुष्य अयोग्य नसतो. या सर्वांचा योग्य उपयोग करून घेणारा दुर्लभ असतो.

एखादा माणूस चोर आहे, त्याला काय काम देणार असा प्रश्न लोकनेत्यास पडतो. परंतु चाणाक्ष नेता अशा माणसाचा देखील चांगला उपयोग करून घेऊ शकतो.

लोकमान्य टिळकांची एक कथा सांगतो. टिळकांना राष्ट्र कार्यासाठी दौरे करावे लागत असत. सोबत जो मिळेल त्याला घ्यावे लागे. एक दिवस त्यांच्या सोबत असणारा माणूस इतरांच्या खिशातले पैसे चोरणारा होता ते टिळकांना ठाऊक होते. हा माणूस टिळकांच्या चांगलाच परिचयचा होता म्हणून त्याला सोबत घेण्यास टिळक नकार देऊ शकत नव्हते. रात्री दोघेही एकाच खोलीत झोपले. सकाळी तो मनुष्य मित्रत्वाच्या नात्याने टिळकांना म्हणाला, " तुमच्या खिश्यात तर पैसेच नाही मग आपण इतका प्रवास कसा कराल?" अर्थात् रात्री त्याने टिळकांचे खिसे, बॅग तपासली हे टिळकांच्या लक्षात आले. ते म्हणाले, "अरे! तू माझे खिसे, सामान रात्री तपासशील याची मला खात्री होती पण तू स्वतःच्या उशीखाली बघणार नाहीस म्हणून मी पैसे तुझ्या उशीखाली ठेवले होते." एवढे बोलत असतांना टिळकांनी त्याच्या उशीखालून पैसे काढून आपल्या खिशात ठेवले. कोणाचा काय वीक पॉइन्ट आहे हे हेरुन नेत्याने त्या अनुयायाचा कसा उपयोग करावा हे टिळक जाणून होते.

या ओवीत समर्थ चोरालाच स्टोअरकीपर करायला सांगतात ह्यात नवल काहीच नाही. भांडाऱ्याला सर्वच वस्तूंचा चोख हिशेब ठेवावा लागतो. कुणी एखादा चोर असेल तर तो भांडाऱ्याची नजर चुकवून चोरी करू शकेल. पण तोच चोर जर भांडारी असेल तर काय चोरी करे? इतके करून त्याच्या मूळ स्वभावाप्रमाणे त्याने किरकोळ चोरी केली तर त्यास समज देऊन सांभाळून घ्यावे. स्वामी आपल्याला सांभाळून घेत आहेत हे बघून तो इसम पुढे असा मूर्खपणा करणार नाही. हळु हळु त्याची चोरी करण्याची ही वाईट सवय जाईल.

समर्थ म्हणतात की महंताने चतुर असावे. प्रत्येक कार्यकर्त्याला नीट पारखून असावे. प्रसंगीं कोणी चुकत असेल तर त्याला सांभाळून घ्यावे. त्याचा तिरस्कार करू नये, त्याला योग्य ठिकाणी वापरावे.

## १४ एप्रिल रविवार

**नष्टासी नष्ट योजावे । वाचाळासी वाचाळ आणावे ।**
**आपणावरी विकल्पाचे गोवे । पडों च नेदी||१९-९-११**

राजकारण निरूपण या समाजातील ही ओवी आहे.समाजातील भिन्न प्रकृतीची भिन्न पातळीवर असलेली भिन्न आवाक्याची माणसे गोळा करून प्रत्येकाकडून काहीतरी कार्य करून घेण्याच्या कलेला श्रीसमर्थ राजकारण असे नाव देतात.

समर्थ जे राजकारण अपेक्षित धरतात ते हे असे आहे.प्रत्येकात गुण आहेत तसे अवगुण आहेत .महंताला दोन्हींचा आपल्या म्हणजे समाजाच्या,देशाच्या, धर्माच्या कार्यासाठी उपयोग करून घेता आला पाहिजे. जशास तसेच उत्तर द्यावे,ठकास महाठकच भेटला पाहिजे.तोंडाळाला दुसरा तोंडाळच गप्प करू शकतो.हे ठरवून योग्य गुणी व अवगुणी योजणे हे चातुर्य आहे व ही कला राजकारण करणाऱ्या व्यक्तीला आलीच पाहिजे.सर्व करून अलिप्त रहाणे हे ही जमलेच पाहिजे.

पूर्वायुष्यात जी अंबा होती ती शिखंडी बनून आली.तिच्या मनात भीष्मांच्या प्रती द्वेष व प्रतीशोध घ्यायची भावना तीव्र होती.श्रीकृष्ण हे जाणून होते.जोवर भीष्म रणांगणात आहेत तोवर पांडव विजयी होणे शक्य नाही हे वास्तव श्रीकृष्ण जाणून होते.भीष्म शिखंडीवर शरसंधान करणार नाहीत हे हि ते जाणून होते.या सर्व गोष्टींचा अंतिम परिणाम साधण्यासाठी श्रीकृष्णांनी उपयोग करून घेतला.ती निर्णय घेण्यातली लवचिकता हेच कृष्ण नीतीचे चातुर्य होते ज्यामुळे पांडव जेते ठरले.वास्तविक पहाता अजिंक्य ठरलेले योद्धे,सैन्य, शस्त्र सगळे कौरवांकडे कितीतरी अधिक होते.

हीच कूटनीती पुढे आर्य चाणक्य वापरतात.नंद राजांची राजवट उलथून पाडून न्याय्य राजवट आणताना ते ज्या हेरांची नेमणूक करतात,ज्या लोकांची पेरणी मगध साम्राज्यात करतात ते पाहिले की समर्थ सांगतात तशी योजना करताना तोडीस तोड योजना आखलेली दिसते.सर्वात शेवटी अमात्य राक्षस या नंदाच्या महामंत्री असलेल्या महा धूर्त निष्ठावंतांना आपल्या कडे यायला भाग पाडताना शक्य ते सर्व मार्ग वापरतात.

एका दुर्जना कडून दुसऱ्या दुर्जनांचा काटा काढताना योजना आखणारा गुप्त रहाणे महत्वाचे असते.संशयातीत रहाणे गरजेचे असते. चंद्रराव मोरे रहायचे त्यांच्या जवळ घळीत समर्थ रहात होते.शिवाजी महाराजांनी मोरे यांचे पारिपत्य केले त्याच्या काही दिवसच आधी समर्थ घळीतून निघून गेले हा निव्वळ योगायोग नक्कीच नव्हता. गुप्त राहून कार्य हे असे असते.विजापूर दरबारात अफझलखान पाठवण्याचे ठरवले हे समर्थांना कसे समजले? महंतांनी गुप्त रहाणे कसे व किती महत्वाचे आहे ते अशा प्रसंगी जाणवते.

**१५ एप्रिल २०२४**

**कांटीनें कांटी झाडावी ।झाडावी परी तें कळों नेदावी ।**
**कळकटेपणाची पदवी ।असों द्यावी ।। दा १९ - ९ - १२।।**

रानात फिरतांना एखाद्याला काटा रुततो. रुतलेला हा काटा काढायसाठी तो मनुष्य मग दुसरा काटा शोधतो, त्या काट्याने पायात रुतलेला काटा काढून टाकतो. समर्थांनी काट्याचा हा उपयोग आपल्याला शिकविला . कशासाठी? नष्टास नष्ट योजावे, वाचाळास वाचाळ आणावे, हुंब्यास हुंबा लावून द्यावा, टोणप्यास टोणपा आणावा वगैरे कित्येक उपाय सांगितले आहेत. दुष्टाला, गुंडाला कसे सामोरे जायचे? त्याच्यासारखे दुष्ट आपण होऊ शकणार नाही म्हणून काय करायचे, तर तसाच माणूस शोधायचा आणि दोघांची लावून द्यायची. हे दुर्जन आणायचे कोठून? समर्थ तो उपाय २३ व्या ओवीत समर्थ सांगत आहेत.

**दुर्जन प्राणी समजावे । परी ते प्रगट न करावे ।**
**सज्जनापरीस आळवावे । महत्त्व देऊनी ।। २३।।**

म्हणजे महंताने, नेत्याने गुंड देखील आपल्या पदरी बाळगावे. कठीण प्रसंगी कामाला येतील. समर्थांनी स्वतः माहुली च्या ठाणेदाराला चोप दिल्याची कथा आहे. मोठा समुदाय जमा करावा, त्यात निरनिराळ्या गुणांचे लोक जमा करून ठेवावेत. असा महंत योग्य माणसाला योग्य ते काम सोपवितो आणि आपण मात्र नामानिराळा रहातो. महंताला हे जमले पाहिजे. दुर्जनाचा काटा परस्पर काढता आला पाहिजे. आणि महत्वाचे म्हणजे आपला संबंध यात कुठे दिसू देऊ नये.

शिवथरचे चंद्रराव मोरे स्वराज्याशी बंड करू इच्छित होते. समर्थांनी शिवथर घळीत असतांना चंद्रराव मोऱ्यांची समजूत घालायचा भरपुर प्रयत्न केला. तो ऐकत नाही असे पाहून राजांना खबर दिली. राजाने त्याचा काटा काढला. समर्थ यात कुठे दिसून पडले नाहीत.

या ओवीत समर्थांनी महंताचा एक गुण सांगितला आहे. महंताने बावळटपणाचे सोंग धारण करावे, आपण मुळीच चतुर नाही असा आव आणावा हे समर्थ या ओवीत सांगत आहेत. एका ओवीत समर्थ म्हणतात की आपण सभेमध्ये एखाद्या कोपऱ्यात "दुरी दिनासारिखे बसावे". चतुर महंताला बावळटपणाचे सोंग चांगले वठविता आले पाहिजे. त्यातून आपली कार्यसिद्धि करून घेता आली पाहिजे.

सध्या पाकिस्तानात अतिरेकी लोकांच्या हत्या होत आहेत. आज पर्यंत २५-२६ अतिरेकी पाकिस्तानात मारले गेले आहेत. योगायोगाने या अतिरेक्यांचा संबंध भारतात झालेल्या अतिरेकी घटनांशी आहे. नेमके असेच लोक का मारले जात आहेत हे ओपन सिक्रेट आहे. पण यात भारताचा संबंध कुठेही दिसून पडत नाही कारण मरणारे व त्यांना मारणारे दोघेही पाकिस्तानीच आहेत. असो !

शिवाजी महाराजांची नीति गनिमी काव्याची आहे. हा गनिमी कावा या समासात बघायला मिळतो आहे. शिवाजी महाराजांच्या रणनीति मध्ये असे कित्येक प्रसंग दिसून पडतात.

**१६ एप्रिल २०२४**

**जो दुसऱ्यावरी विश्वासला । त्याचा कार्यभाग बुडाला ।**
**जो आपण चि कष्टत गेला । तो चि भला ।।१९-९–१६॥**

शिर्षक चालू आहे राजकारणाचे भान असावे.दासबोधात दोन समास राजकारण ह्या विषयी आहेत.समर्थानी मौलिक सूचना केल्या आहेत.हे बोधवाक्य ट्रकच्या पाठीमागे,रिक्षेच्या पाठीमागे,कुठे फळ्यावर वगैरे ठिकाणी दिसते. गुजराथी मध्ये पण म्हणतात ना जेणो काम तेणो थाय । बीजा करे सो गोता खाय । ( मला गुजराती येत नाही पण आठवले म्हणून लिहिले).पण समर्थांनी ते आधीच सांगितले होते.नेत्याने महत्वाची कामे स्वतःच करावीत.जी कामे दुसऱ्यावर सोपवली आहेत ती त्यांनी पूर्ण केली की नाही याकडे डोळ्यात तेल घालून लक्ष ठेवावे.या बाबतीत थोडा जरी ढिलेपणा झाला तरी कार्याचा नाश होऊ शकतो.

काही कार्यकर्ते कोणत्यातरी छोट्या गटाचे पुढारी असतात.त्या कार्यकर्त्याला वश करून घेतले की त्याच्या गटातील बाकीची माणसे काही एक प्रयत्न न करता आपल्याशी एकनिष्ठ राहतात.वेगवेगळ्या गटांचे असे जे म्होरके आहेत त्यांना आपल्या पक्षात समाविष्ट करून घ्यावे.अशा प्रकारे अनेक चांगली माणसे राजकारणात सांभाळून घ्यावीत.या सर्व सूचनांवरून समर्थ रामदासांचे राजकीय जीवनाचे निरिक्षण किती सखोल होते याच कल्पना करता येते.

१९७५ ते १९७७ या आणीबाणीच्या काळात तुरुंगात असताना अटलबिहारी वाजपेयी यांनी दासबोध वाचला.त्यावेळी ते म्हणाले “ हा ग्रंथ मी तरुणपणी वाचायला हवा होता.कदाचित माझ्या अनेक राजकीय चुका मी टाळू शकलो असतो.”

---

**१७  एप्रिल २०२४**

**मुख्य सूत्र हातीं घ्यावें । करणें तें लोकांकरवीं करवावें ।**
**कितेक खलक उगवावे । राजकारणामधें ।।१९-९-१८॥**

कार्याचे स्वरूप राजकीय असेल तर गुप्तता अत्यावश्यक असते.राजकारणातील सर्व डावपेच सगळ्यांनाच कळले तर त्याला डावपेचाचे स्वरूपच उरत नाही, व राजकारण बिघडून जाते. खरं तर समर्थांना आज जे राजकारण चालू आहे, ते अजिबात अपेक्षित नाही.समाजातील भिन्न प्रकृतीची,भिन्न स्वभावाची भिन्न माणसे एकत्र करून, त्यांचा लोकसंग्रह करून,त्यांना एकाच उत्तम प्रेरणेने प्रेरित करुन,समाजहितांची कार्ये करणे,म्हणजे राजकारण असा त्याचा अर्थ आहे.

समर्थांना ढिलेपणा अजिबात मान्य नाही.दुसऱ्यांवर सर्वस्वी अवलंबून राहू नये हे खरे असले, तरी सर्व कामे स्वतः करणे प्रत्येक वेळी शक्य नसते.अशा वेळी दुसऱ्यांकडून करून घ्यावे.माझ्यात करण्याची धमक आहे,मी करू शकतो,हे दुसऱ्याला माहिती पाहिजे,म्हणजे तो ते व्यवस्थित करतो.म्हणून मुख्य सूत्र आपल्या हातात ठेवायचे.अशा अनेक गोष्टी समर्थांच्या राजकारणात महत्वाच्या ठरतात.कारण योग्य समाजहित लक्षांत घेऊन कार्य करणे,समाजहिताबरोबर जनसामान्यांची मानसिकता बदलणे,स्वराज्य संस्थापना हे समर्थांचे राजकारण होते

---

## १८ एप्रिल २०२४

**समुदाव पाहिजे मोठा । तरी तनावा असाव्या बळकटा ।**
**मठ करुनी ताठा । धरूं नये।। दा १९ - ९ - २२।।**

समर्थांनी या समासात मठपती अर्थात् महंताला सुचना केलेल्या आहेत. महंत हा अत्यंत चतुर असावा. लोकांची मनें त्याला वाचता यायला हवी. महंताने सदा मनमिळावू असले पाहिजे. या सूचना सार्वजनिक जीवनात कार्य करणाऱ्या आजच्या लोकनेत्याला ही लागू होतात म्हणून आजच्या लोकनेत्याने दासबोधाचे अध्ययन करणे आवश्यक आहे. संघटनेचे शास्त्र समर्थांनी अगदी उत्तम पद्धतिने समजवून सांगितले आहे. या समासातील एक एक ओवी त्या दृष्टीने महत्त्वाची आहे.

समर्थाच्या महंताला समाजकारण करायचे असते. त्यासाठी लोकसंग्रह आवश्यक आहे. लोक निरनिराळ्या स्वभावाचे असतात. जो तो संघटनेला आपल्या पद्धतिने वापरू इच्छितो. त्याने प्रस्तावित कार्यापासून संघटना दूर जाऊ शकते. कोणीही मनमानेल तसा उपयोग करून घेऊ नये म्हणून महंताने आधीच नियम घालून द्यायला हवे. आपल्या उद्दीष्टांपासून लोक भरकटायला नको हे आवर्जून पहावे लागते.

म्हणून समर्थ "तनावा असाव्या बळकटा" असे म्हणतात. तनावा म्हणजे stay. सर्कसचा तंबू एका खांबावर असला तरी त्याला चार-सहा बाजूंनी तनावा, stay बांधलेले असतात. त्यामुळे तंबूचे कापड आणि खांब पक्के रहातात. तसे ह्या संघटनेच्या तंबूचा महंत हा मुख्य खांब असतो आणि तंबू पक्का उभा रहावा म्हणून नियमांचे तणाव बांधले असतात. तंबू कितीही मोठा असला, लोकसमुदाय कितीही मोठा असला तरी मग धोका नसतो.

हा तंबू एकखांबी असला तरी महंताला देखील समर्थांनी काही पथ्ये सांगितली आहेत. "मठ करून ताठा धरू नये" हेच प्रमुख पथ्य आहे. ताठा समजून घ्यायचा असेल तर सोप्या मराठीत adamant हा शब्द वापरावा लागेल. महंताने अडॅमंट असू नये, फ्लेक्सीबल असावे असा समर्थांचा आशय आहे. अगदी युक्तीने अनुयायांना अनुकुल करून घ्यावे. समुदायातील दुर्जन लोक ओळखून ठेवावे. प्रसंगीं त्यांना कसे वापरावे ते ठरवावे.

समर्थ स्वतः उत्तम समाजशास्त्री होते, दूरदृष्टीचे होते. म्हणूनच ते येवढी मोठी संघटना उभी करू शकले व ती सुरळीत चालावी म्हणून महंताला मार्गदर्शन करू शकले. आपण ही आपल्या जीवनाच्या वाटचाली साठी या मार्गदर्शनाचा लाभ घेऊ शकतो.

---

## १९ एप्रिल २०२४

**दुर्जनप्राणी समजावे | परि ते न प्रकट करावे |**
**सज्जनापरीस आळवावे | महत्त्व देऊनी ||१९/९/२३**

राजकारणात दुर्जन लोकांना सुद्धा केव्हा व कसे सज्जना प्रमाणे स्थान द्यावे हे या ओवीत समर्थांनी समजावले. शिवछत्रपतींच्या काळात राजकीय परिस्थिती मोठी विचित्र होती. घरभेदीपणा ,फितुरी ,हेवेदावे, सुडाचे राजकारण या प्रकारच्या घटना सतत घडत होत्या .चांगले चांगले मराठा सरदार पराक्रमी

असूनही आदिलशहा,निजामशहा ,दिल्लीचा बादशहा यांची चाकरी करण्यात धन्यता मानत होते .या सरदारांमध्ये आपापसात भांडणे लावून देऊन इस्लाम राज्यकर्ते त्यांची गंमत पाहत होते .

श्रीमंत बाबासाहेब पुरंदरे म्हणतात ,"मराठ्यांच्या तलवारीत पाणी होते पण ते स्वकीयांना पाण्यात पाहण्यासाठी आणि शत्रूच्या दारात पाणी भरण्यासाठी. मराठे मरतमरत जगत होते आणि जगत जगत मरत होते ."शिवछत्रपतींना कामाला सुरुवात करताना प्रसंगी अशा दुर्जनांचे साह्य घेणे आवश्यक होते. एकदम चांगली माणसे आणायची कुठून? जीवनात प्रत्येक क्षेत्रात चांगली माणसे बोटावर मोजणे एवढीच असतात. प्रत्येक वेळी तत्वाला धरून वागावायचे झाल्यास राजकारणी माणूस एकाकी पडू शकतो .अशा प्रसंगी आहे त्या माणसाकडूनच स्वराज्याची स्थापना करणे आवश्यक होते .

शिवछत्रपती शिस्तीला तसे कडक होते तेवढी शिस्त आवश्यक देखील होती पण प्रसंगी आपल्या स्वभावाला मुरड घालून दुसऱ्याच्या दोषावर पांघरून घालणेआवश्यक होते. त्यांच्या शिस्तीमुळे नेताजी पालकर ,कान्होजी जेधे ,प्रतापराव गुजर, खंडोजी खोपडे ही माणसे दुखावली गेली. नेताजी पालकर तर रुसून मोगलांना जाऊन मिळालेला होता पण तो पुन्हा महाराजांकडे आला त्यावेळेस त्याचे धर्मांतर झाले होते त्याचे शुद्धीकरण करून परत आपल्या धर्मात घेणे भाग पडले .

खुद्द संभाजी राजेच मोगलांना जाऊन मिळाले पण स्वराज्यात परतल्यावर त्यांचा पुन्हा स्वीकार करण्याशिवाय पर्याय नव्हता .उलट ते स्वराज्यात परतल्यावर महाराजांनी लगेच त्यांना उत्तराधिकारी नेमले असते नेमले तर शिवछत्रपतींच्या मृत्यूनंतर रायगडावर जर संघर्ष झाला तो टळू शकला असता .म्हणजे या गोष्टी सांगण्याचा मतलब एवढाच की राजकारण चालवताना काही वाईट माणसांना सांभाळून घ्यावे लागते. ते उपद्रवी असले तरी त्यांना दुखावल्यास होणारे दुष्परिणाम लक्षात घेऊन त्यांना थोडे महत्त्व द्यावे लागते .म्हणजे दुर्जन प्राणी समजावे तरी ते प्रकट न करावे आजही सध्याच्या राजकारणात आपण बघतो तसेच चालू आहे.या मंडळींना काय म्हणले जाते सुसरी बाई तुझी पाठ मऊ असे म्हणत त्यांना औंजारव गोंजाराव लागतं .प्रत्येक वेळी नवीन माणसे कुठून आणायची आणि नवीन माणसे एकनिष्ठ प्रामाणिक असतील कशावरून अखेर आहे त्या माणसाकडूनच राज्यकारभार चालवावा लागतो.

हा नाजूक मुद्दा समर्थांनी आपल्या राजकारण निरूपणात फार व्यवस्थित समजावला आहे. म्हणूनच ह्या दुर्जन लोकांना सुद्धा सज्जना परीस अळवावे आणि त्यांचं त्यांना महत्त्व द्यावे लागते. काही माणसे एक दोन वेळा चुकतात पण त्यांना क्षमा केली की ते पुन्हा एक निष्ठेने काम करतात. अन्यथा अशी दुखावलेली माणसे एकत्रित आली की ते अजून वेगळं काही राजकारण करू शकतात मग ते आपल्याला महागात पडते. समाजात,कुटुबांत किंवा आपण जे काही समाज कार्य करीत असू त्या प्रत्येक ठिकाणी या समर्थांच्या शिकवणीचा उपयोग होतो.नाहीतर सगळ्यांन पासून आपण एकटे पडतो. म्हणून समर्थ म्हणतात दुर्जन प्राणी समजावे........

**२० एप्रिल २०२४**

**जनामधें दुर्जन प्रगट ।तरी मग अखंड खटखट ।**
**या कारणें ते वाट ।बुझून टाकावी ।। दा १९ ९ २४।।**

ही ओवी महंतासाठी, गृहस्थासाठी आणि राज्यकर्त्यासाठी सारख्याच महत्त्वाची आहे. या समासातील शेवटच्या १०-१२ ओव्या राजकारणाशी देखील संबंधित आहेत. समर्थांचा महंत दिसायला जरी आध्यात्मिक पुरुष असला तरी त्याचा राजकारणाशी जवळचा संबंध असलेला आढळतो.

जावळीच्या खोऱ्यातील चंद्रराव मोरे स्वराज्याशी इमान राखण्यास तयार नसल्याचा संशय होता. त्यावेळी समर्थ खालीच शिवथरघळीत मुक्कामाला होते. त्यांनी चंद्रराव मोऱ्याचे मन वळविण्याचा बराच प्रयत्न केला. परंतु तो मानत नाही असे लक्षात आल्याने समर्थांनी शिवरायाला निरोप देऊन त्याचा काटा काढविला. "ते वाट बुझून टाकावी ।" चा अर्थ हाच आहे. चंद्रराव मोरे जीवंत राहिला असता तर नाना खटपटी, कुरापाती करीत राहिला असता. त्यामुळे त्याचा वेळीच निःपात आवश्यक होता.

आजही राजकारणाची परिस्थिति तशीच आहे. पाकिस्तान अतिरेक्यांचा अड्डा बनला आहे. अतिरेक्यांना मदत, निर्देश तेथूनच प्राप्त होते. त्यावर उपाय म्हणून सर्जिकल स्ट्राईक आवश्यक होता. एकाच सर्जिकल स्ट्राईकने पाकड्यांना दहशत बसली. "घर में घुस कर मारेंगे" हे पालुपद मधॅमधे मोदी गात रहातात तेव्हाच उपद्रव बंद रहातो. सर्जिकल स्ट्राईक हा "प्रचितिचा तडाखा" त्या वेळा आवश्यकच होता.

एखादा दुर्जन जर डोईजड होऊ लागला तर त्याला केवळ तू दुर्जन आहेस म्हणून चालणार नाही, त्याने तो अधिकच चेकाळेल व त्रास देणे सुरु करेल. हा त्रास बंद करायला त्याच्या मर्म स्थळावर आघात करावा लागेल, त्यात हयगय करू नये असे समर्थांचे मत आहे.

**हे धूर्तपणाचीं कामें । राजकारण करावें नेमें ।**
**ढिलेपणाच्या संभ्रमें । जाऊं नये ।।२७।।**

ही कामें फार चतुराईची आहेत. महंताने अगदी व्यवस्थित राजकारण करावे. उगीच गबाळेपणाने वागू नये.

---

**"आत्मनिरूपण"**

**सामर्थ्य आहे चळवळीचे| जो जो करील तयांचे|**
**परंतू येथे भगवंताचे| अधिष्ठान पाहिजे ||२०/४/२६**

कर्मामध्ये सामर्थ्य आहे जो जे कर्म करील त्यास सामर्थ्य प्राप्त होईल परंतु त्या कर्मास भगवंताच्या अनुसंधानाचा आधार पाहिजे. आपण निमित्त मात्र आहोत .खरा कर्ता भगवंत आहे त्याच्या सत्तेने कर्म घडणार व त्याचे फळ मिळणार. अशी निष्ठा असणे हे भगवंताचे अधिष्ठान होय .अशा निष्ठेचा माणूस कर्म उत्तम करून देखील त्यापासून अलिप्त राहील. त्यास कर्तेपणाचा अभिमान होणार नाही. भगवंताचे अधिष्ठान असले

म्हणजे मी केल्याचा अहंकार येत नाही. हे माझे कार्य नाही भगवंताचे कार्य आहे ही भावना आली की माणूस नि:स्वार्थ भावनेने काम करतो.काम ही उत्तम होते.

श्री समर्थांनी बांधलेले "श्रीरामाचे चाफळ" येथील मंदिर याचे उत्तम उदाहरण आहे. समाज शरणवृत्तीने, स्वार्थाचा किंवा संकुचित पणाचा लवलेश नसलेल्या असंख्य संघटना ,चळवळी या देशातच नव्हे तर देशाबाहेरही विस्तार पावल्या ही वस्तुस्थिती आपण अनुभवतो आहोत."रामकृष्णमठांचे" पसरलेले जाळे हे अशा चळवळीचे उत्तम उदाहरण होय . तसेच प.पू.पांडूरंगशास्त्री आठवले यांचे स्वाध्याय परिवाराचे योगेश्वर कृषी,निर्मल जीवन, मत्स्यगंधा.श्रीदर्शनम् हे प्रयोग याच धरतीवर आधारित आहेत.

सध्याच ताज उदाहरण आपण शेगावच्या गजानन महाराजांच्या मठात जे सेवेकरी आहेत ते पण काम अशाच प्रकारे आहे.माझ्या तरी पाहण्यात असे आले की ते निष्काम भावनेने काम करतात आणि प्रत्येकाला माऊली माऊली म्हणतच त्यांच्याकडून काम करून घेतात किंवा आपण पडलेलं काम करतात. पण आलेल्या गेलेल्या भक्तांवर ते रागावत नाहीत मोठ्याने ओरडून बोलत नाहीत. हे सुद्धा मोठे कामच म्हणावे लागते. यालाच समर्थ म्हणतात," सामर्थ्य आहे चळवळीचे.

---

## २१ एप्रिल २०२४

**धटासी आणावा धट । उत्धटासी पाहिजे उत्धट ।**
**खटनटासी खटनट । अगस्त्य करी ।। दा १९ - ९ - ३०।।**

राजकारणी माणसाने किंवा महंताने धूर्तपणे कसे वागावे याचे धडे समर्थांनी या ८ - १० ओव्यांमधून दिलेले आहेत. महंत किंवा समाजसेवक संघटक असतो. त्यामुळे त्याला मनमिळावू, सरल स्वभावी असावे लागते. एखादा समाजकंटक किंवा दुर्जन अकारण महंताशी पंगा घेतो. अशा दुर्जनाला सभ्य भाषा समजत नसते. महंत आपली सभ्यपणाची मर्यादा ओलांडू शकत नाही. मग त्या दुर्जनाचा बंदोबस्त कसा होईल?

**खळदुर्जनासी भ्यालें । राजकारण नाहीं राखिलें ।**
**तेणें अवघें प्रगट जालें । बरें वाईट ।।२१।।**

दुष्ट-दुर्जनाच्या भयाने कार्य सोडता येणार नाही. अशावेळी काही करणे असेल तर ते इतरांकडून करवून घ्यावे. "करणें तें लोकांकरवीं करवावें ।" या करिता सर्व प्रकारचे लोक महंताने आपल्या जवळ बाळगावे. जेव्हा कोणी दांडगाई करणारा आला तर आपल्या दांडगट माणसाला इशारा करून त्याचा बंदोबस्त करावा. उद्धट तोंडाळ माणसाशी पंगा घ्यायला दुसरा तोंडाळ पुढे करावा आणि भांडखोरास भांडखोर लावून द्यावा. म्हणजे आपले कार्य विना अडथळा करता येईल. पुढची ओवी महत्त्वाची आहे.

**जैशास तैसा जेव्हां भेटे । तेव्हां मज्यालसी थाटे ।**
**इतुकें होतें परी धनी कोठें । दृष्टीस न पडे ।।३१।।**

या सगळ्या युक्त्या करणारा महंत मात्र यात पुढाकार घेतो आहे, दुर्जनाचा बंदोबस्त महंत करीत आहे याचा पत्ता कोणालाच लागत नाही. महंत इतका धोरणी असायला हवा.

---

## २२ एप्रिल २०२४

**जैशास तैसा जेव्हां भेटे । तेव्हां मज्यालसी थाटे।**
**इतुकें होतें परी धनी कोठें। दृष्टीस न पडे ।। दा १९ - ९ - ३१।।**

मज्यालसी थाटे याचा अर्थ सभेला रंग भरतो. कुस्तीत जेव्हा दोन तुल्यबळ मल्ल भिडतात तेव्हा कुस्ती बघणाऱ्या प्रेक्षकांना मजा येतो. याला मज्यालसी थाटे म्हणता येईल. महंताला समर्थांनी या काही ओव्यांमधून विशेष सूचना केल्या आहेत. हुंब्यास हुंबा, टोणप्यास टोणपा, लौंदास लौंद, धटास उद्धट, खटनटास खटनट महंताजवळ तयार असावे. महंताने इशारा करण्याचीच वाट की जशास तसा असलेला तो आपले कसब दाखवायला सुरु करेल. पण एक खबरदारी महंताने घ्यायची आहे. महंताने हे राजकारण व्यवस्थित करावे, हयगय करू नये. सर्व कामे अशा मंडळींकडून करवून घ्यावी पण मी करवीत आहे हे दिसू न देण्याची खबरदारी घ्यावी. आपण पिक्चरमध्ये येऊ नये, हे लक्षात ठेवावे.

**करणें असेल अपाये । तरी बोलोन दाखऊं नये ।**
**परस्परेंचि प्रत्यये । प्रचितीस आणावा ।।१७।।**

एकदा का हा जशास तसा माणूस एक्शनमध्ये आला की मग त्यांचा सामना रंग भरतो. तो दुर्जन पुन्हा म्हणून कुरापत काढणार नाही. समर्थांच्याच शब्दात सांगायचे म्हणजे "ती वाट कायमची बुजवून टाकावी." दुर्जनाच्यामुळे आपले कार्य अडले आहे असे होऊ नये म्हणून हा इलाज करावा. काम होत असतांनाच आपण नामानिराळे रहावे. महंताने हे लक्षात असू द्यावे की समाजात दुर्जन असणारच आहेत. सत्कार्यात ते मोडता घालतीलच. अशा प्रसंगी त्याचा तोडगा महंताजवळ आधीच असायला हवा. महंताने पदरी चक्क गुंड बाळगावे व अशांना धडा शिकवावा. हे करतांना महंताचा संबंध असल्याचा संशय देखील येऊ नये.

---

## २३ एप्रिल २०२४

**लोकीं लोक वाढविले । तेणें अमर्याद जाले ।**
**भूमंडळीं सत्ता चाले । गुप्तरूपें ।। दा १५ - २ - २६।।**

निस्पृहव्यापलक्षण नामक १५ - २ ह्या समासातील ही ओवी आहे. तसे बघितले तर समर्थांनी आपले चरित्रच या समासातून वर्णिले आहे. दासबोध वाचत असतांना काही काही ठिकाणी समर्थ आपले चरित्र सांगतात असे आढळते. कित्येक ओव्यांमध्ये तर समर्थ स्पष्टच लिहितात. "आमची प्रतिज्ञा ऐसी ।", "खनाळामधें जाऊन राहे ।", "काही गल्बला काही निवळ ।", "शरीर परोपकारीं लावावें।" अशा किती तरी ओव्या सापडतात. समर्थ खनाळामधे चिंतन करण्यासाठी मधून मधून जात असत. "काही गल्बला काही निवळ" हे त्यांचे धोरण होते. अशा निर्जन स्थळी देखील लोक त्यांना भेटून समस्या निवारण करण्यासाठी सल्लामसलती करिता येत असत.

समूह निर्माण करून समर्थ राजकारण शिकवीत आणि असे त्यांचे शिष्य राजकारण करीत. प्रत्येक महंताने समूह निर्माण करावे आणि अशा समूहांद्वारे आपली सत्ता राबवीत जावी असा संदेश समर्थ इथे देत

आहेत. प्रत्येक समूह नायक आपापल्या क्षेत्रात आपली सत्ता राबवितात आणि या महंताच्या द्वारे सर्व समूहांवर समर्थ आपली सत्ता राबवीत असत.

अफझल खान जेव्हा शिवरायावर चालून येऊ लागला तेव्हा त्याच्या प्रत्येक मुक्कामाची खबर रोज शिवरायाला समर्थांच्या मठांच्या माध्यमातून मिळत असे. "विजापुरचा सरदार निघाला आहे" हे पत्र त्याचा भक्कम पुरावा आहे. आपण एक होमवर्क करा. हे पत्र कोणी, कोठून व केव्हा लिहिले ते शोधून काढा.

समर्थांचे महंत ठिकठिकाणी आपल्या अनुयायांची संख्या वाढवीत असत. ही सारी मंडळी शिवरायांच्या स्वराज्याच्या उपयोगी पडत असे.

शिवरायांचे आयुष्यात जेथे जेथे महत्त्वाच्या घटना घडल्या तिथे तिथे समर्थांचा मठ असे, हा काही निव्वळ योगायोग नव्हता. सूरत लूटण्यापूर्वी त्या शहराची इत्थंभूत माहिती शिवाजीच्या सैन्याकडे होती. ही माहिती समर्थांच्या साधूंनी गोळा करून दिली होती. शिवरायांची आग्र्यावरून सुटका आणि त्यांचा व संभाजी राजांचा परतीचा प्रवास हा समर्थांच्या मठांच्या सहभागामुळे होता.

---

## २४ एप्रिल २०२४

**ऐसी कीर्ति करून जावें । तरीच संसारास यावें ।**
**दास म्हणे हें स्वभावें । संकेतें बोलिलें ।।**

मी कालच्या चिंतनातच म्हणालो होतो कि हा समास बहुतांशी समर्थांचे चरित्र आहे. समर्थांनी आयुष्य भर लोकसंग्रह केला. लोक त्यांचेकडे सहज आकर्षित व्हायचे. इतकी प्रचंड लोकप्रियता समर्थांची आहे की आज देखील आपल्या सारखे अगणित लोक समर्थांकडे आकर्षित होत आहेत. ही निव्वळ जादू नाही, समर्थांनी आयुष्य भर लोकांना उपासनेला लावले, उपासनेचा गजर केला, आणि ठाई ठाई लोकांना मुक्तिच्या मार्गाला लावले. लोकांना समर्थांनी केवळ हिंदवी स्वराज्याच्या कामी लावले असे नाही तर त्यांना भगवद्भक्ति, ज्ञान, देशप्रेम या सर्वच मार्गांची दीक्षा दिली.

**ऐसे कैवाड उदंड जाणे । तेणें लोक होती शहाणें ।**
**जेथें तेथें प्रत्येय बाणे । प्राणीमात्रासी ।।**

लोकसंग्रहाच्या अनेक युक्त्या त्यांच्यापाशी होत्या. अनेक लोकांना त्यांनी ज्ञानी केले, शहाणे केले. हे सारे केल्याने त्यांची कीर्ति आज देखील भूमंडळी पसरत आहे. जगातल्या निरनिराळ्या भाषांमध्ये दासबोध आणि समर्थ चरित्राचे भाषांतर होत आहे. "रामकथा ब्रह्मांड भेदून आजही जातच आहे. महाराष्ट्रातच नव्हे तर देशात असलेली दैन्यावस्था दूर करायचा प्रयत्न समर्थांनी केला. कवी भूषण म्हणतो, "एक सिवा न होता तो सुन्नत होती सबकी ।" शिवबा सोबतच समर्थांचेही योगदान यात आहे. कैपक्षी परमार्थी राजा घडविण्याचे कसब समर्थांजवळ होते म्हणून लोकांची सुन्नत झाली नाही उलट हिंदुस्तान बळावला आणि अटके वर हिन्दूत्वाचे निषाण रोवले गेले.

**उदंड करी गुप्तरूपें । भिकाऱ्यासारिखा स्वरूपें ।**
**तेथें येशकीर्तिप्रतापें । सीमा सांडिली ।।**

समर्थांनी बहुतेक कार्य गुप्तपणे केलेले आहे. हे जे सारे समर्थांनी केले ते जर दुसरा कोणी करेल तर तो देखील कीर्ति पावेल. समर्थ म्हणतात की आपण देखील अशा प्रकारे कार्य करून आपली कीर्ति करावी. मानव जन्माचे हेच सार्थक आहे. माणसाने मरावे परी कीर्तिरूपे उरावे.

---

## २५ एप्रिल २०२४

**माणुस हेंकाड आणी कच्चें ।मान्य करावें तयाचें ।**
**येणें प्रकारें बहुतांचें ।अंतर राखावें ।। दा १५ - ६ - १३।।**

चातुर्य विवरणाचा हा समास आहे. सहाजिकच समर्थांनी इथे महंताला चातुर्य शिकविले आहे. या ओवीत तर समर्थ प्रत्येकाचे ऐकून घ्यायला सांगत आहेत पण याचा संदर्भ १० व ११ व्या ओव्यांमधे शोधावा लागेल. समर्थांचा महंत हा पुष्कळ लोकांना गोळा करतो व त्या प्रत्येकाकडून विविध कामे करवून घेतो. सगळ्यांचेच त्याला ऐकावे लागते, अशा वेळी त्याने काय करावे हे सांगतांना समर्थ म्हणतात –

**बहुतांचे बोलीं लागलें । तें प्राणी अनुमानी बुडाले ।**
**मुख्य निश्चये चुकलें । प्रत्ययाचा ।।१०।।**
**उदंडाचे उदंड ऐकावें । परी तें प्रत्ययें पहावें ।**
**खरेंखोटें निवडावें । अंतर्यामी।।११।।**

महंताने एक गोष्ट लक्षात ठेवावी की जो पुष्कळ लोकांचे ऐकतो तो योग्य निर्णय घेऊ शकत नाही. अशा वेळी आपला अनुभव काय म्हणतो ते बघावे. खूप लोकांचे खूप ऐकावे पण निर्णय घेतांना आपल्या अनुभवाला प्राधान्य द्यावे. आपली बुद्धी योग्य प्रकारे वापरावी. नेत्याने तर नाही कुणालाही म्हणू नये पण निर्णय घेतांना योग्य काय, अयोग्य काय हे लक्षात ठेवावे. जास्त काही न बोलता आपल्या प्रचितीचा निर्णय घ्यावा.

चिंतनाच्या या ओवीत समर्थ म्हणतात एखादा माणूस (कार्यकर्ता) हेकट किंवा अकलेने कमी असला तरी प्रसंगी त्याचे म्हणणे ऐकावे, केवळ तो बिनडोक आहे म्हणून त्याचे म्हणणे अव्हेरू नये. त्याचा सल्ला देखील उपयोगी असू शकेल म्हणून त्या प्रमाणे करावे. पण असे करतांना आधीचा उपदेश लक्षात असू द्यावा. चतुर माणसाला समर्थांचा हा उपदेश लगेच लक्षात येईल व तो तसे वागू शकेल.

---

**२६ एप्रिल 2024**

**वेडें करावें शहाणें| तरीच जिणें श्लाघ्यवाणें |**
**उगेंच वादांग वाढविणें| हें मूर्खपण ||१५ .६.१५||**

जो वेड्यांना शहाणे करतो,त्याचेच जीवन प्रशंसनीय असते.लोकात उगीच वाद वाढवीत बसणे हा मूर्खपणा आहे. चातुर्य विवरण समासात ही ओवि येते.या ओवीला आधीच्या दोन ओव्यांचा संदर्भ आहे.समर्थ सांगतात की कोणी हेकट असला कम-अक्कल असला तरी प्रसंगी आवश्यक असेल तर त्याचेही ऐकावे.मनात पीळ पेच वाकडेपणा ठेवला तर तोच वाढत जातो.असे करतो त्याला शहाणे म्हणता येत नाही.

म्हणून प्रस्तुत ओवीत समर्थ शहाणा कोणाला म्हणावे ते एक लक्षण सांगतात .जो वादात न पडता वेड्यांना शहाणे करायचा उपाय योजतो,तो शहाणा.हे कसे करावे ते पुढील ओवीत आले आहे...

**१) दुस-याशी समरस होऊन**
**२) प्रसंगी पडते घ्यावे व दुस-यास उलथून पाडावे.**
**३) सगळे विवेकाने करताना आपले अंतरंग कळू देऊ नये**

शिवाजी महाराजांनी बारा मावळातील सवंगडी जमवले.काही सरदार आपलेसे केले.त्यांच्या सुख दु:खाचे भागिदार झाले. काही वेळा नमते घेत जुळवून माणसे जोडली.नेताजी पालकर रागावून मोगलांना मिळाले, धर्म बदलला पण जेव्हा अनुताप होताच परत आले, तेव्हा महाराजांनी मोठ्या मनाने त्यांना स्वराज्यात व हिंदू धर्मात घेतले. मन मोठे केल्या शिवाय लोकसंग्रह साधत नाही.या समासात लोकसंग्रह करणारा जो लोक नेता आहे त्याचे चातुर्य शहाणपण कसे असते ,असायला हवे ते समर्थ सांगतात.

असाच प्रसंग संभाजीराजे मोगलांना मिळाले व वर्ष भर शिवाजी महाराजांच्या विरोधात होते तेव्हा होता.शिवाजी राजे स्वतः जातीने गेले व समजूत घालून युवराजांना स्वराज्यात घेऊन आले.' रायगडाला जेव्हा जाग येते ' या वसंत कानेटकर यांच्या नाटकात हा संघर्ष,राजांची उलघाल अतिशय परिणामकारक आली आहे. पण संभाजी राजांना शिवाजी राजांनी पन्हाळा किल्ल्यावर जवळपास नजरकैदेत केले. नेताजी पालकर व संभाजी महाराज यांना निकष वेगळे लावले.व हा मनसुबा शिवाजी महाराजांच्या मनात संभाजीराजे यांना भेटताना नक्की तयार असणार.पण चातुर्य यातच होते की महाराजांनी आपले अंतरंग संभाजी राजांना कळू दिले नाही.

समर्थांची शिकवण शिवाजी महाराजांनी किती तंतोतंत अंगी बाणवली हे लक्षात घेतले की या समासातील बहुतेक ओव्या शिवाजी राजांना लागू पडतात असे जाणवते.

माधवराव पेशवे यांनी सुद्धा सखाराम बापू बोकील,राघोबा दादा यांचे कितीतरी अपराध पोटात घालून त्यांना स्वराज्याच्या हितासाठी जपले हे दुसरे चातुर्याचे उदाहरण लक्षात येते.माणसे चुकतात.त्यांना दंड देऊन किंवा माफ करून नंतर त्यांना मेळवून घेणे हे लोक संग्रह करणा-याने सदैव लक्षात ठेवावे लागते.तर वैर कमी होते.आपली ऊर्जा व्यर्थ वाया जात नाही.असे समर्थांना या ओवीतून सांगायचे असावे असे वाटते.

**२७ एप्रिल २०२४**

**अति सर्वत्र वर्जावें । प्रसंग पाहोन चालावें ।**
**हटनिग्रहीं न पडावें । विवेकी पुरुषें ।।दा १८ - ६ - ७।।**

समर्थांच्या समयी छत्रपति शिवाजी महाराजांचा अवतार स्वराज्य स्थापनेसाठी झाला होता. समर्थ आणि शिवराय या जोडीने, हे कार्य कुशलतेने केले. संन्यास्त योद्धा आणि योद्धा संन्यासी या जोडीने चमत्कार घडविला. शिवराय हे धर्मस्थापनेचे नर आहेत, असा त्यांचा गौरव समर्थ करतात. शिवरायाचे अटीतटीच्या प्रसंगी समर्थ व त्यांच्या मठांचे मोलाचे योगदान राहिलें आहे.

अफझलखान नावाचे असेच एक संकट स्वराज्यावर आले होते. या संकटाचा सामना कसा व कोठे करावा हे ठरले होते. अफझलखानाच्या हालचालीवर समर्थांचे महंत लक्ष ठेवून होते. "विजापूरचा सरदार निघाला आहे" हे प्रत्र समर्थांच्या कण्हेरी मठातून महाराजांकडे रवाना झाले होते. अफझलखान कसा आहे, त्याच्याशी कसे वागावे, याचा उपदेश शिवरायांना ज्या पत्राद्वारे दिला ते पत्रच दासबोधात समाविष्ट करण्यात आले आहे. तेच पत्र म्हणजे १८ - ६ हा समास होय.

**"विवेकें विचारें राजकारणें । अंतर शृघारिजे ।"**

शरीर वस्त्रांने आणि अंतःकरण विवेकाने सजविले पाहिजे. असा सल्ला देतांना 'अंतरी नस्तां च्यातुर्यबीज । कदापि शोभा न पवे' असा caution देखील दिला आहे. हे थोडे समजून घ्यावे लागेल. च्यातुर्यबीजचा सामान्य अर्थ चतुरपणा असा होतो पण गहन अर्थ 'चिलखत' असा आहे. म्हणजे अफझलखानाच्या भेटीस जातांना आत चिलखत घालणे अत्यंत आवश्यक आहे हे समर्थांनी शिवरायाला सांगितले आहे.

खान शीघ्रकोपी, बेईमान, असत्य वचनी, बेभरवशाचा आहे. म्हणून "कोणीयेकाचा (खानाचा) सेवट । जाला पाहिजे।" अशी सूचना देखील समर्थ देऊन ठेवतात. असा समय पुनः येणार नाही, राजकारण एका निश्चित नियमाने चालत नसते. आलेल्या संधीचा फायदा करून घ्यायचा असतो. कोणत्याही गोष्टीत अति नसावे, विचारवंत पुरुषाने हट्टीपणा, आग्रही भूमिका ठेवू नये. तुमच्या या कार्यात ईश्वर, विशेषतः तुळजाभवानीची साथ आहे, काही सावधानता असायला हवी.

**अखंड चि सावधाना । बहुत काये करावी सूचना ।**
**परंतु कांहीं येक अनुमाना । आणिलें पाहिजे ।। १०।।**

हीच वेळ आहे, खानाचा फडशा पाडायची. असा संदेश देऊन समर्थांनी हे प्रभु शिवरायाकडे पाठविले.

## २९ एप्रिल २०२४

**धकाधकीचा मामला। कैसा घडे अशक्ताला ।**
**नाना बुद्धि शक्ताला ।म्हणोनी सिकवाव्या ।। दा १९ - १० - २२।।**

विवेकलक्षणनिरूपणाच्या या समासात समर्थांनी महंताला सर्वसाधारण मार्गदर्शन केले आहे. या आधीच्या राजकारण निरूपणाच्या समासात देखील महंताला उपदेश केलेला आढळतो. समर्थांचा महंत एकदम परफेक्ट असला पाहिजे. त्याला समाजकारण, राजकारण तर करायचे आहेच पण सोबतच समाज जागृती व काही गुप्त कामे ही करायची असतात.

स्वराज्यासाठी माहिती गोळा करणे आणि योग्य व्यक्तिकडे पोहोचविणे हे ते गुप्त कार्य आहे. अशी कामे करतांना कार्यकर्ता सशक्त हवा अशक्त, अपंग कार्यकर्ता हे काम सहज करू शकणार नाही. म्हणून जिथे धकाधकीचे वा धावपळीचे काम असेल तिथे योग्य कार्यकर्ता असायला हवा. सैन्यामध्ये, पोलिसमध्ये भरती करतांना उमेदवाराची शारीरिक परीक्षा घेतली जाते याचे कारण हेच आहे कि अशा जवानाला धावपळीचे व अडथळ्याचे काम करावे लागणार आहे, त्यामुळे उमेदवार योग्य शारीरिक क्षमतेचाच असला पाहिजे.

समर्थ या ओवीत हेच सांगत असून अशाच योग्य कार्यकर्त्याला निरनिराळ्या युक्त्या शिकवाव्या म्हणजे तो आपले कार्य उत्तम तऱ्हेने करू शकेल.

---

**जो दुसऱ्यांचे अंतर जाणे| देश काळ प्रसंग जाणे|**
**तया पुरुषा काय उणें| भूमंडळी ||१४/७/२८||**

या समासात समर्थ म्हणतात जो दुसऱ्यांचे अंतकरण ओळखतो देश काळ प्रसंग जाणतो अशा चतुर पुरुषाला जगात कोठेही काहीही कमी पडत नाही. दुसऱ्याचे अंतर जाणणे म्हणजे मन ओळखणे त्याला जाणून घेणे.जगामध्ये अनेक प्रकारचे लोक असतात त्यामधील जे आपल्या संपर्कात येतात त्यांना जाणून घेणे सोपी गोष्ट नाही. दुसऱ्याचे अंतकरण न दुखवता त्याच्याशी संबंध ठेवता आले पाहिजे. कुणाच्या हृदयाला लागेल असे न बोलता त्याचा आपला संबंध वाढवता आला पाहिजे ही सुद्धा एक प्रकारची भक्तीच आहे. खूप ओळखी असणे खूप मित्र असणे याला समर्थ महत्त्व देतात.

लोकसंग्रह करताना समाजातील लोकांच्या चुका पोटात घालाव्या लागतात. लोकांना त्यांच्या अपराधाबद्दल क्षमा करावी लागते. संबंध तुटायला वेळ लागत नाही मात्र दोन मने जोडण्यासाठी खूप सहनशक्ती लागते. दोन माणसाची मने कशानेही जोडता येत नाहीत ती प्रेमानेच जोडता आली पाहिजेत.जो माणूस दुसऱ्याच्या सुखासाठी सतत धडपडतो, इतरांना त्यांच्या कामात मदत करतो. त्यांचा लोकसंग्रह आपोआप वाढत जातो.

सध्याच्या धावपळीच्या युगात मनुष्य दुसऱ्याच्या अंतकरणाचा थोडा देखील विचार करायला तयार नाही. सगळीकडे स्पर्धा आहे. दुसऱ्यावर स्वामित्व गाजवण्याची अनावर ओढ आहे. मोठे झाल्यावर विद्यार्थी यात कमी पडू नयेत म्हणून हल्ली शिक्षण क्षेत्रापासूनच या जीव घेण्या स्पर्धेच्या वरवंट्याखाली बालकांचा निरागस भाव भरडल्या जातो. जिथे प्रेम आहे तिथे स्पर्धा नाही जिथे प्रेम आहे तिथे स्वार्थ नाही प्रेमामध्ये फक्त दुसऱ्याचाच विचार असतो. समर्थ तर एका ठिकाणी म्हणतात," माझे सर्व जाऊ दे |नाम तुझे राहो हाच

माझा भाव अंतरीचा |प्रेमाचे हे उच्चतम स्वरूप पाहिले म्हणजे सकाम भक्ती किती  खालच्या दर्जाची आहे याची कल्पना येते.

मनुष्य जीवन जगत असताना स्वतःसाठी न जगता जो दुसऱ्यासाठी जगतो तोच खरा मनुष्य होतो त्यामुळे त्याला देशाचे काळाचे भान असते आणि तो कुठेही जरी गेला जगाच्या पाठीवर त्याच्याकडे लोकसंग्रह करण्याची कला असल्यामुळे त्याला कधीही काहीही कमी पडत नाही. लोकसंग्रह करताना माणसाला  दुसरा काय म्हणतो हे ऐकण्याची सवय असली म्हणजे त्याला त्याचे कार्य नीट करता आले असे समजावे.

दुसऱ्याला सांभाळणे म्हणजे त्यांचे अंत:करणं सांभाळून घेणे ही कला जमली की तो सगळ्यांचा आवडता होतो मग समाजात त्याला कशाचीच उणीव भासत नाही. म्हणून आपल्याकडे एक म्हण आहे जीभ ही तलवारीच्या धारे सारखी असते .ती चौघात बसवते आणि चौघातून उठवते.  मारलेले घाव माणूस विसरतो पण बोललेले घाव विसरत नाही.

---

## १ मे २०२४

**शरीर परोपकारीं लावावें ।बहुतांच्या कार्यास यावें ।**
**उणें पडों नेदावें ।कोणीयेकाचें ।। १२ - १० - ५।।**

जगात असंख्य प्राणी आहेत. त्यात मनुष्य प्राणीच केवळ असा आहे की तोच ईश्वर प्राप्ति करून घेऊ शकतो. असे असले तरी फारच कमी लोक ईश्वर प्राप्तीचे प्रयत्न करतात. त्यातही विरळाच ब्रह्मज्ञान प्राप्त करतो. अज्ञानी माणसे तुलनेने अधिकच आहेत. अशा परिस्थितीत ज्ञानी पुरुषावर ही जवाबदारी येऊन पड़ते की या अज्ञानी लोकांना आत्मज्ञानाच्या वाटेवर लावणे. ज्ञानी माणसाला समर्थ काय उपदेश करतात?

**आपण येथेष्ट जेवणें । उरलें तें अन्न वाटणें ।**
**परंतु वाया दवडणें । हा धर्म नव्हे।।१।।**
**तैसें ज्ञानें तृप्त व्हावे । तें चि ज्ञान जनास सांगावें ।**
**तरतेन बुडों नेदावें । बुडतयासी ।।२।।**

वास्तविक पहाता ब्रह्मज्ञानी माणसाने काहीही नाही केले तरी चालणार आहे, पण आसपासच्या अज्ञानी लोगांच्या कल्याणासाठी त्यांना सायोज्याची वाट दाखविण्याचे काम ज्ञानी माणसाने करावे अशी अपेक्षा समर्थ बाळगतात. ज्ञानी पुरुषाला समर्थ उत्तम पुरुष म्हणतात. अशा उत्तम पुरुषाने स्वतःमध्ये कोणते गुण बाळगावे हे समर्थांनी १२ - १० या समासात सांगितले आहे. याच समासातील ही ओवी असून पुढील चार ओव्या उद्यापासून रोज एक या प्रमाणे येणार आहेत.

तुर्तास आजची ओवी बघुया. आपले शरीर परोपकारासाठी झिजवावे. 'मना चंदनाचे परी त्वां झिजावे । परी अंतरी सज्जना निववावे ।' पुष्कळ लोकांची कामे करून द्यावी, कोणासही उणे पडूं देऊ नये.  उत्तम पुरुष हा ज्ञानी आहे, त्याने आपल्या आसपासच्या लोकांची सर्वतोपरी मदत करावी. कुणाला काही मदत हवी असेल तर लगेच त्याच्या मदतीला धावून जावे. हळू हळू त्या लोकांना परमार्थ मार्गावर न्यावे.

---

## २ मे २०२४

**आडलें जाकसलें जाणावें ।यथानशक्ति कामास यावें ।**
**मृदवचनें बोलत जावें ।कोणीयेकासी ।। दा १२ - १० - ६।।**

उत्तम पुरुषाचे आयुष्य समाजाच्या सेवेतच त्याने घालवावे कारण आता त्याला स्वतःसाठी मिळवायचे असे काहीही राहिले नाही. आत्मदर्शन करून घेऊन तो कृतार्थ झालेला आहे. म्हणून "आता उरलो उपकारापुरता" येवढीच त्याची भूमिका असते. उत्तम पुरुष हा आत्मज्ञानी असतो तसाच महंत देखील ज्ञानी असतो. समर्थांचा हा उपदेश महंतांना देखील उपयोगी पडतो.

ज्ञानी माणूस हा सर्वत्र आत्मतत्व बघत असतो. "आत्मवत सर्वभूतेषु" ही त्याची भूमिका असते. अशा अवस्थेत कुणाची अडचण ही त्याला आपलीच अडचण वाटते, दुःखी माणसाचे दुःख त्याला स्वतःचेच दुःख वाटते. ब्रह्मवृन्दांनी रेड्याच्या पाठीवर चाबकाचे फटकारे लगावले तेव्हा ज्ञानेश्वर महाराजांना वेदना झाल्या. जेव्हा माऊलींना त्या लोकांनी विचारले की 'आम्ही तर रेड्याला मारले, आणि तू तर तुलाच मारल्यासारखे करतोस.' तेव्हा माऊलींनी आपल्या पाठीवर चाबकाचे वळ उठल्याचे दाखविले.

आपल्याला तर पर दुःख शीतळच वाटते. (नेणे दुसऱ्याची तळमळ । तें मनुष्य परदुःखसीतळ ।), ज्ञानी माणूस मात्र दुसऱ्याच्या दुःखाने दुःखी होतो. कारण तो प्रत्येक जीवास आपलाच अंश मानतो. म्हणूनच तो प्रत्येकाचे काम आत्मीयतेने करतो.

या ओवीचा तीसरा चरण 'मृदवचनें बोलत जावें' आहे. समर्थांनी दशक १२ समास १० मध्ये याबद्दल सांगितले आहे.

**बरे बोलता सुख वाटते । हे तो प्रत्यक्ष कळते ।आत्मवत परावे ते । मानित जावे ।।**
**कठिण शब्दे वाईट वाटते । हे तो प्रत्ययास येतें। तरी मग वाईट बोलावे ते । काय निमित्ये ।।**

मृदुवचनांची आवश्यकता तर प्रत्येकच संत मान्य करतात. प्रितीसुधा नामक जैन साध्वी म्हणतात

**शब्द सम्हालकर बोलिए। शब्द के हाथ न पाव।**
**एक शब्द करें औषधी। एक करें घाव।।**

आंधळ्याचा मुलगा आंधळाच असे बोलून द्रौपदीने महाभारत युद्ध ओढवून घेतले. गोड बोलायला आपले काहीही जात नाही तरीही आपण गोड का बोलू शकत नाही. समर्थांनी उपदेश तर भरपूर दिला आहे पण आपण किती आत्मसात करतो हाच प्रश्न आहे. असो!

## ३ मे २०२४

**दुसऱ्याच्या दुःखें दुःखवावें| परसंतोषें सुखी व्हावें |**
**प्राणीमात्रास मेळऊन घ्यावें| बऱ्या शब्दें ||१२ .१०.७||**

उत्तम पुरुष निरूपण या समाजातील ही ओवी आहे.आत्मज्ञानी माणूस हा श्री समर्थांचा उत्तम पुरूष आहे. त्याची जाणीव जगदाकार झालेली असते.परब्रहम सर्व ब्रह्माडाला व्यापून आहे व हरेक जीवात परब्रहम अंश रूपाने आहे ही अनुभूती त्याला आलेली असते.त्यामुळे जेजे भेटीजे भूत त्या मानिजे भगवंत हे त्याला नि:संशय पटलेले असते.

रेड्याच्या पाठीवर ब्रहम वृंद कोरडे मारतात आणि कळवळतात मात्र ज्ञानेश्वर माउली.पाठीवर कोरडा ओढल्याचे वळ दिसतात. हे दोन आत्मे एकरूप असल्याचे मोठे उदाहरण आहे. रस्त्यावर गाढव तडफडत आहे हे दिसल्यावर संत एकनाथ आपली यात्रा, पुण्य विसरतात व काशी विश्वेश्वरासाठी आणलेली कावड त्या गाढवाच्या मुखात ओततात. त्या गाढवाची तडफड अंतरंगी जाणवते म्हणून असे घडते.परसंतोषे सुखी होणे हेही वाटते तेवढे सोपे नाही. साक्षीभावाने किंवा समरसतेने मनापासून कौतुक करणे महत्वाचे असते. मन ख-या खु-या आनंदाने ओसंडून वाहायला हवे. एकवेळ इतरांच्या सुखात सामील होणे किंवा आपल्या सुखात इतरांना सामील करून घेणे जमेल ही पण इतरांच्या दु:खात सहभागी होणे व ते दूर करायला मनापासून झटणे हा दुर्मिळ गुण आत्मसात करायला हवा.

प्रस्तुत ओवीला संदर्भ आधीच्या ओवीचा आहे.शरीर परोपकार करण्यात लावावे.अनेकांच्या उपयोगी पडावे.'स्व 'च्या आत्मकेंद्री प्रेमातून बाहेर पडावे आणि ज्यांची जी नड असेल ती यथा शक्ती भागवणे महत्वाचे आहे.यात इतरांची अडचण आपण समजून उमजून दूर करणे अधिक महत्त्वाचे आहे.प्रत्येकाशी अगदी मृदू बोलण्याची सवय हवी.म्हणजे माणसे जोडली जातात.दुखावली जात नाहीत.गोड बोलून माणसे आपलीशी करणे हे प्रापंचिक पारमार्थिक दोघांना महत्वाचे आहे.

कुठलेही कार्य करायला अशी जोडलेली माणसेच लागतात.शिवाजी महाराजांनी माणसे जोडली स्वराज्य साकार झाले.आनंदवन भुवन प्रत्यक्षात आले.रामाने वानर सेना जोडली, सुग्रीव, बिभीषण,जटायू ,संपाती जोडले.रावणाचा पराभव व सीतेची सुटका शक्य झाली.युद्ध संपल्यावर रोज आपल्या सेनेतील वीरांची विचारपूस करणे त्यांच्या अंगावर मायेने हात फिरवणे हे खूप महत्त्वाचे होते.श्रीकृष्ण तर अश्वांना लागलेल्या जखमांची निगा राखत.हे दुस-याच्या दु:खे दुखावले जाणे खूप मौल्यवान आहे. हे सांगण्याचा समर्थांचा उद्देश आपली वृत्ती सुधारावी, जाणीव विशाल व उदार असावी असा असावा असे वाटते.

---

## ४ मे २०२४

**बहुतांचे अन्याय क्षमावे ।बहुतांचे कार्यभाग करावे ।**
**आपल्यापरीस व्हावे ।पारखे जन ।। दा १२ - १० - ८।।**

समर्थ स्वतःचेच शब्द बोलतात. शिवरायाचे पश्चात जेव्हा संभाजी महाराजांनी काही मंत्र्यांना हत्तीच्या पायी दिले, काहींना कैद केले, ही वार्ता ऐकून समर्थांनी राजा संभाजीस पत्र लिहून जो उपदेश दिला तोच इथे या ओवीच्या प्रथम चरणात आला आहे.

आपल्या अधीनस्थ असणाऱ्या मंत्र्याचे, शिलेदाराचे, अधिकारी/कर्मचाऱ्याचे अपराध होता होईतो पोटात घालावे. ही सगळी मंडळी सहसा आपल्याशी एकनिष्ठ असतात, त्यांचे अपराध क्षमा करावे, त्यांना सांभाळून घ्यावे. समाजाच्या, लोकांच्या कामी यावे. कुणाचे काम अडले असेल, कुणाला किरकोळ मदत हवी असेल तर तेवढी आपण करून द्यावी. समाजामध्ये लोकांना मदत करणारा अजातशत्रु होतो. त्याच्या निमंत्रणावर लोक धावून येतात. अगदी तुमच्याशी मतभेद असणारे देखील प्रसंगी तुमच्या बाजूने होतात. लोकनेत्याला, महंताला ही कला जरूर अवगत असावी.

समर्थांचा हा उत्तम पुरुष महानुभाव असतो. म्हणूनच स्वतःचे उर्वरित आयुष्य तो लोकांकरिता खर्च करतो. ज्ञानी पुरुष व्यवहारात वागतांना प्रयत्नशील असतो. सारा समाजच त्याचे कुटुंब असतो. त्याची वृत्ती सदा शान्त व क्षमाशील असते, म्हणून तर तो दूसऱ्याचे अपराध क्षमा करू शकतो. त्याचे आचरण त्याचे बोलण्याप्रमाणे असते.

ही ओवी, हा समास म्हणूनच समर्थांचे आत्मचरित्र आहे. आपल्या प्रबोध शक्तीच्या बळावर तो बहुतांचे मनोगत हाती घेतो. सोबत्यांना आणि इतरांना देखील तो आपल्या कार्यासाठी तयार करतो, परमार्थ मार्गावर नेतो आणि अखेर आत्मज्ञानी करतो.

---

## ५ मे २०२४

**उत्तम पदार्थ दुसऱ्यास द्यावा| शब्द निवडून बोलावा |**
**सावधपणें करीत जावा| संसार आपला ||१२-१०-१२॥**

समासाचे नाव आहे उत्तम पुरुष लक्षण. ओवीची सुरुवात उत्तमाने आहे. व्यवहारात म्हणजे वैयक्तिक आयुष्यात आपल्याला काय पहायला मिळते.अर्थात ते त्रिगुण आणि संस्कार ह्यांवर अवलंबून असते. सत्वगुणी माणसेच उत्तम म्हणून जे काय असेल ते दुसऱ्यांना देतात. इथे समर्थ रामदास स्वामी सुध्दा तेच सांगत आहे.

आता दुसरा चरण काही वायफळ बडबड करणाऱ्या बायकांमुळे ज्या मोजके बोलतात तरी सुद्धा सगळ्याच बायकांना त्यात ओढले जाते.निदान दासबोधाचा अभ्यास करणाऱ्यांनी हे लक्षात घेऊन त्याप्रमाणे वागण्याचा प्रयत्न करावा.( मी माझ्या बद्दल बोलणे आहे.खरचच कमी बोलावे.खूप उर्जा साठते. कारण बोलून सुध्दा समोरची व्यक्ती समजणार नसेल तर बोलून काय फायदा ?बोलण्याचे किती फायदे आहेत बघा.

आपल्या गोड बोलण्याने डॉक्टर रोग्याचे निम्मे दुखणे बरे करतो. चांगले नेतृत्व करणारा आपल्या बोलण्याच्या कौशल्याने सगळी संघटना एकत्र बांधून ठेवतो, आपली प्रेमळ आई तिच्या मृदु बोलण्याने सगळ्या घराला एका सूत्रात धरून ठेवते,तर न रागवता चांगले शिकविणाऱ्या तुमच्या शिक्षिका अथवा शिक्षक तुमचे खूप लाडके असतात.

मनाचा श्लोक क्रमांक ५१ मधपण सांगितले आहे **सदा बोलणें नम्र वाचा सुवाचा.** नुसते मृदु बोलणे चांगले बोलणे पुरेसे नाही तर तुम्ही जे जे क्रुत्य कराल त्यात वाईट हेतू नसावा. म्हणजेच तुम्ही केलेली प्रत्येक गोष्ट चांगल्या हेतूने केलेली असावी.

ती तेनालीरामाची गोष्ट माहिती असेलच.परीक्षा घ्यायची असते------पेलाभर दूध---- बंद टाकी------ सर्वांचा विचार बाकीचे दूध आणतील मी कशाला नेऊ?सगळेच पाणी आणतात.सगळ्यांची लबाडी उघडकीस आली.शेवटचा चरण फार महत्वाचा आहे.संसार म्हणजे प्रापंचिक पण आणि आध्यात्मिक पण म्हणजे आपण समाधानात राहावे.

---

## ६ मे २०२४

**मरणाचें स्मरण असावें । हरिभक्तीस सादर व्हावें ।**
**मरोन कीर्तीस उरवावें । येणें प्रकारें ।। दा १२ १० १३।।**

संतांना मृत्युवर भाष्य करणे आवडते. समर्थांनी देखील मृत्यु बद्दल लिहिले आहे.

**आपणास आहे मरण । म्हणौन राखावें बरेंपण ।**
**कठिण आहे लक्षण । विवेकाचे ।। १२ - २ - २६।।**

मृत्यु हेच अंतिम सत्य आहे. जन्म होईल की नाही, केव्हा होईल ते सांगणे शक्य नाही मात्र मृत्यु मात्र सत्य आहे. जो जो जन्मास येईल त्याला एक दिवस मृत्यु नक्की येणार आहे. "जातस्य हि ध्रुवो मृत्युर्ध्रवं जन्म मृतस्य च ।" (गीता २-२७) मृत्यु नंतर कोणत्या योनीत जन्म मिळणार आहे, हा गहन प्रश्न आहे. आपल्या कर्मांप्रमाणे आपला पुढचा जन्म असणार आहे. म्हणून आता अशी कर्मे करा की पुढचा जन्म मनुष्य योनीतच मिळेल. म्हणून 'बरेपण राखा' हे समर्थ सांगतात.

**कबीरा जब हम पैदा हुए जग हँसा हम रोए ।**
**ऐसी करनी कर चलो हम हँसे जग रोए ।।**

कबीरांचे हे वचन किती सार्थ आहे? अगदी थोडक्यात सन्त कबीर आपल्याला जीवनाचे तत्वज्ञान सांगत आहेत, जीवनाचे सत्य उजागर करीत आहेत. समर्थांनी देखील या ओवीत हेच सत्य सांगितले आहे. पुढचा जन्म उत्तम मिळावा या करिता याच जन्मात प्रयत्न करता येतील. भगवान श्रीकृष्ण गीतेत सांगतात की, **"शुचीनां श्रीमतां गेहे योगभ्रष्टोऽभिजायते।"** म्हणजे तुम्ही या जन्मात केलेली साधना वाया जात नाही. पुढील जन्मात अशी परिस्थिति प्राप्त होते की तुम्हाला तिथून पुढे साधना सहज करता येणें शक्य होते. मग या जन्मात साधना कशी करायची ? "हरिभक्तीस सादर व्हावे" अशी ती साधना आहे.

कबीराने म्हटल्याप्रमाणे "ऐसी करनी कर चलो" म्हणजे तुमची या जन्मातील ईश्वर भक्ति, परोपकार यांनी तुमची कीर्ति होईल, आणि ही कीर्ति तुमच्या मृत्यु नंतर देखील लोक गातील. समर्थांना हेच आपल्याकडून अपेक्षित आहे.

या क्षणभंगुर जीवनात 'जन्माला आला आणि ओझे वाहात मेला' अशी आपली अवस्था होऊ नये म्हणून "ऐसी करनी" करायला हवी आहे. आज पर्यंत पुष्कळ आयुष्य कुटाळक्या करण्यात वाया गेलं आहे, मृत्युचा काय भरवसा कधीही येईल, म्हणून लगबगीने कार्य सिद्धी करायची आहे. अन्यथा महा भयंकर योनीतील एकीमध्ये जन्म घ्यावा लागेल. घाई का करायची हे कबीर साहेबांच्या एका दोहयात आले आहे.

**पानी केरा बुदबुदा, अस मानुस की जात ।**
**एक दिन छिप जाएगा, ज्यों तारा परभात ।।**

माणसाचे जीवन पाण्यावरील बुडबुड्याप्रमाणे क्षणभंगुर आहे. जसा पहाटेच्या समयी आकाशातून तारे अचानक नाहीसे होतात तसे हे जीवन संपून जाईल. समर्थ याच साठी सांगत आहेत की भगवंताचीं भक्ति करा, "**भज मन राम चरन सुखदायी।"**

---

## ७ मे २०२४

**उदंड धिःकारून बोलती। तरी चळों नेदावी शांति ।**
**दुर्जनास मिळोन जाती । धन्य ते साधु ।।१२-१०-१६।। उत्तम पुरुष निरूपण**

समर्थ या समासात आत्मज्ञानी पुरुषाची लक्षणे सांगत आहेत.ज्ञानी माणसाला जबाबदारीने संयमाने वागावे लागते.अज्ञानी जनांना शहाणे करणे सोपे नाही.प्रपंच सन्मुख देहसुख हे खरे सुख मानणारा वर्ग मोठा आहे.त्याला परमार्थ सन्मुख करणे त्यांची देहबुद्धी पालटून आत्मबुद्धी स्थिर करणे हे मोठे वृत्यंतर आहे.

प्रस्तुत श्लोकात समर्थ म्हणतात की कोणी कितीही अवहेलना केली तरी टाकून बोलले तरीही उत्तम पुरुषाने आपली शांती भंगू देऊ नये.दुर्जनाशी सुद्धा जे समरस होऊ शकतात ते साधुपुरुष खरोखरच धन्य समजावे. यात सहनशीलता, वृत्ती अतिशय शांत संतुलित असणे, निरनिराळ्या प्रकारच्या लोकांना हाताळताना लागणारे कौशल्य व लवचिकता महत्त्वाचे आहे.ध्येयाप्रती अढळ निष्ठा आहे.

माणूस वरवर तिखट बोलत असला तरी त्याचे अंतरंग जाणून घेणे आहे.काही दुर्गुण असले तरी त्याच्या अंगभूत काही चांगल्या गुणांचा अंगिकृत कार्यासाठी उपयोग कसा करता येईल हा दूरदृष्टी विचार आहे. मग तात्कालिक बोलणे सहन करणे ,दुर्लक्ष करणे शक्य होते. दीर्घ नियोजन आहे.

कोणताही बदल म्हटला की त्याला विरोध हा होतोच हे आपण आताही अनुभवतो आहोत.बदल घडल्यावर त्याचे फायदे दिसू लागतात.अगदी मेट्रो पुण्यात आणायची असा संकल्प केला तेव्हा जड स्थितीशील प्रवृत्ती असणारे व आहे तेच बरे आहे म्हणणारे कमी नव्हते.खूप टीका केली गेली.पण प्रकल्प पूर्ण झाल्यावर त्याची उपयुक्तता पटली.कोणी मान्य केली कुणी मान्य न करताच सुविधा वापरायला सुरुवात केली.

हे स्थूल बदला बाबत .सूक्ष्म बदल हा मनात घडवायचा असतो.त्यायोगे जनमत घडवायचे असते, उदात्त ध्येयाने प्रेरित जन समूह बनवायचा असतो व त्यांच्या करवी कार्य घडवायचे असते.बरे हे करताना काही प्रस्थापित विरोध करणारच.व्यवस्था बदलणे काहींच्या स्वार्थाला थेट धक्का देते तर काहींच्या मनात बदलास अनुकूल अशी वृत्ती नसते. लोक संग्रह करणारे महंत,सुधारक,व्यासंगी ध्येयासक्त शिक्षक यांचा मार्ग अवघड असतो.काही वेळा समाज तपासून घेत असतो.परीक्षा घेत असतो.प्रतिक्रीया काय येते तेही जोखत असतो.

विवेकानंद रामकृष्ण परमहंस यांना भेटल्यावर किती तरी प्रकारे त्यांना तपासले.सुरवातीला तर अविश्वास होता .पण त्यांच्या प्रत्येक शंकेला उत्तर, अनुभूती सद्गुरू देत गेले.एक सत्शिष्य घडला व महान कार्य घडले.

एकनाथ महाराज नदीवर स्नानासाठी जात तिथे त्यांचा विरोधी भले बुरे बोले पण नाथ शांत आहेत हे पाहून त्यांच्यावर अनेकदा थुंकला.यापेक्षा वाईट अनुभव काय असणार? पण नाथ शांत राहिले.याचा परिणाम घडून त्या माणसाला अनुताप झाला.

ज्ञानेश्वर महाराज, तुकाराम महाराज यांना समाजाने कमी छळले का? पण त्यांची शांत वृत्ती , सहनशीलता,तितीक्षा यामुळे त्यांचे विरोधक नंतर निस्सीम भक्त झाले... मंबाजी बुवा विसोबा खेचर यांची उदाहरणे या निमित्ताने आठवतात .

संतांना ख-या अर्थी कोणी शत्रू नसतो.ते जगदाकार जगन्मित्र असतात.त्यांच्या अंत:करणात वात्सल्य,करुणा, मैत्री हे झरे झुळझुळत असतात.त्यांच्या संगतीने अट्टल दरवडेखोर वृत्ती पालट घडून महर्षी बनतात.असे हे परीस असतात.

त्यांची अंतरस्थिती कशी असते,कसे विचार करतात याचा अनुमान लावण्याचा, ओवी समजून घेत आपण प्रयत्न करू शकतो.संपूर्ण समजणे मात्र अवघड आहे ..

---

## ८ मे २०२४

**कीर्ती पाहों जातां सुख नाहीं ।सुख पाहातां कीर्ती नाहीं ।**
**विचारेंविण कोठें चि नाहीं ।समाधान।। दा १२ - १० - १९।।**

समर्थांचा उत्तम पुरुष आत्मस्वरूपाच्या विशाल अनुभवामुळे स्वतः अतिविशाल होतो. देह बुद्धि जाळून टाकल्यामुळे तो स्वार्थ रहित असतो. तो स्वतःचे उर्वरित आयुष्य समाजासाठी वेचतो. असा पुरुष शान्त, क्षमाशील असतो, मृदु-मधुर बोलतो. त्याचे वागणे सदा नम्र असते. अशा उत्तम पुरुषाला या ओवीचा मजकूर ठाऊकच असतो. त्याला हे माहित असते की तो जे कार्य करीत आहे, त्यातून त्याला ऐशो आराम मिळणार नाही.

त्या कार्यात तो इतका व्यस्त असतो की "राम काज बिना चैन कहां?" अशी त्याची भूमिका असते. आत्मज्ञान प्राप्त असलेला हा ज्ञानी आपला देह समाजासाठी झिजवीत असतांना आपले कार्य उत्तम प्रकारे पूर्ण व्हावे, त्याची चांगली फळे समाजाला मिळावी अशी त्याची अपेक्षा असते. याकरिता तो "चंदनाचे परी झिजत असतो" चंदनाचा एक गुण आहे की ते ज्याच्या संपर्कात येते त्याला आपला सुगंध देते. अशा प्रकारे त्याची कीर्ति त्या सुगंधा प्रमाणे पसरत जाते. जो झिजणार नाही त्याचा सुगंध इतरांना मिळणार नाही. साधुची किर्ति हा त्याच्या झिजण्याचा by product असतो. कीर्ति व्हावी म्हणून साधू झिजत नसतो. म्हणूनच समर्थ म्हणतात -

**स्वयें आपण कष्टावें । बहुतांचे सोसित जावें ।**
**झिजोन कीर्तीस उरवावें । नाना प्रकारें ।।१८।।**

ज्याला देहाला सुख हवे असे वाटते त्याला कीर्ति मिळणार नाही. त्याने खुशाल ऐशो आराम भोगावा. लोक संग्रह करून समाजासाठी झिजणारा महंत किर्तिवंत होतो. अशा महंताचा बाणा असतो की "आपल्या पुरुषार्थ वैभवें । बहुतांस सुखी करावें ।" अशा माणसाला लोक शोधत येतात.

**जो उत्तम गुणें शोभला । तो चि पुरुष माहा भला ।**
**कित्येक लोक तयाला । शोधीत फिरती ।।२९।।**

ज्ञानी मनुष्य आपले आचरण सर्वसामान्य माणसा सारखे ठेवतो कारण त्याला माहित असते की सामान्य माणूस आपले अनुसरण करणार आहे. म्हणूनच तो व्यावहारिक जगाचे सारे नियम पाळतो. कोणताही विकार नसल्याने तो बंधनात सापडत नाही.

सामान्य माणसाची कर्मे कोणत्या न कोणत्या विकाराने ग्रस्त असतात त्यामुळे त्याचे चित्त अशान्त असते. अशांतीचे कारण वासना हे आहे. ज्ञानी पुरुषाला वासनाच नसते म्हणून त्याचे चित्त सदा शांत असते. सामान्य मनुष्य वासनेच्या भितीपोटी कर्मापासून दूर पळतो. परंतु ज्ञानी मनुष्य आपले अंतःकरण निर्लेप तव्याप्रमाणे, वाटरप्रूफ घड्याळाप्रमाणे ठेवून सारे व्यवहार करतो. कोणत्याही कर्माने त्याचे अंतःकरण विचलित होते नसते.

---

## ९ मे २०२४

**आपलें अथवा परावें ।कार्य अवघें च करावें ।**
**प्रसंगीं कामास चुकवावें ।हें विहित नव्हे।। दा १२ - १० - २१।।**

लोकांच्यापुढे आदर्श असावा अशा उत्तम पुरुषाची लक्षणें समर्थांनी या १२ -१० व्या समासात सांगितली आहेत. यातील चार लक्षणें महत्वाची आहेत. आत्मज्ञान, प्रखर वैराग्य, गोड बोलणे आणि पुष्कळांना सुखी करणे ही ती चार लक्षणें आहेत. प्रस्तुतची ओवी या पैकी चवथ्या लक्षणात मोडते. या ओवीच्या आधीची आणि नंतरची ओवी देखील लोकांना सुखी करण्यासंबंधीचीच आहे. पुढच्या काही ओव्या देखील इतरांना आपल्या सारखेच किंबहुना आत्मवत माना असा संदेश देतात.

थोडा विचार केल्यावर असे लक्षात येते की समर्थांनी सांगितले आहे कि, "ऐक शिष्या येथीचे वर्म । स्वयें तूं चि आहेसि ब्रहम। (५ - ६ - ४५) आदि शंकराचार्य म्हणतात "जीवो ब्रह्मैव ना परः ।" म्हणजे जे परब्रहम माझ्या मध्ये आहे तेच प्रत्येक जीवात विद्‌यमान आहे. त्या ब्रहमाचे कार्य हे त्यामुळे माझेच कार्य आहे. आपल्याला पचायला हे जड जात असले तरी आत्मज्ञानी माणसाची ही अनुभूति असते. आणि म्हणूनच आत्मज्ञानी पुरुष प्रत्येक कार्य आपले समजून, मन लावून करीत असतो. आपल्या सारख्याला हे कळत नाही म्हणून समर्थांनी ही ओवी आपल्या अभ्यासाला दिली आहे.

समर्थ म्हणतात कि, "आपल्या पुरुषार्थ वैभवें । बहुतांस सुखी करावें।" हा सारा उपदेश केवळ याच साठी आहे की समर्थ जाणून आहेत की कोणीही माझ्या पेक्षा भिन्न नाही, त्याची सेवा ही आपलीच सेवा आहे. काम आपले असो की दुसऱ्याचे असो, आपण वेळेवारी केले पाहिजे. कामचुकारपणा करणे योग्य नव्हे.

**तो विष्णु आहे जगदांतरीं । तो चि आपुले अंतरीं।**
**कर्ता भोक्ता चतुरीं । अंतरात्मा वोळखावा ।। ११ - ९ - १४।।**

प्रत्येक जीव अव्यक्त ब्रहम आहे. असे असतांना देहाशी एकरूप झाल्याने जीवाला सुख वा दुःख भोगावे लागतात. आपण इंद्रियांशी तादात्म्य पावल्यामुळे विकारलो आहोत. आपण शरीराचे संगतीत असलो की ती कुसंगती होते, त्यामुळेच आपल्याला इतरांमधील परमात्मा दिसत नाही व त्यामुळेच त्यांचे कार्य ते आपल्याला आपले वाटत नाही.

मनुष्य जेव्हा मनाने ईश्वराचे, ब्रहमाचे चिंतन करतो तेव्हा ती सत्संगती होते. अशावेळी अन्य माणूस परका वाटतच नाही. त्याचे कार्य ते आपलेच कार्य वाटायला लागते.

---

## १० मे २०२४

**बरें बोलतां सुख वाटतें| हें तों प्रत्यक्ष कळतें ।**
**आत्मवत परावें तें| मानीत जावें ||२२||**

आपल्याशी कुणी चांगले बोलले तर आपल्याला बरे वाटते.त्यामुळे आपणसुद्धा दुसऱ्यांशी बोलताना चांगलेच बोलावे. हा साधा सरळ अर्थ आहे. शब्द हे शस्त्रासारखे असतात, जर ते शल्यचिकित्सकाच्या हाती आले तर औषधीचे काम करतात, आणि गुन्हेगाराच्या हाती सापडले तर इतरांना इजा करतात.

कुणाशीही प्रेमाने बोलताना त्यांची आस्थेवाईकपणे चौकशी केली तर त्यांना बरे वाटते. तसे केल्याने आपले काहीही खर्च होत नाही. त्यांचेसाठी खरेच काही करावयाचे असल्यास त्या व्यक्तीत न गुंतता तुमचे दोन गोड शब्दच त्यांना सुखावून जातात तर कटू शब्दांनी समोरची व्यक्ती दुखावली जाते. श्रीमद्भगवद्गीतेत भगवान श्रीकृष्ण वाणीच्या तपाची व्याख्या करताना म्हणतात-

**अनुद्वैगकरं वाक्यं सत्यं प्रियहितं च यत् ।**
**स्वाध्यायभ्यसनं चैव वाड्.मयं तप उच्चते ॥ १७-१५ ॥**

अशी वाणी जी उद्वेग उत्पन्न करणार नाही,जी सत्य असूनही प्रिय व हितकारक असेल आणि वेदशास्त्रांचे पठण तथा भगवंताचे नामस्मरण यालाच वाणीचे तप असे म्हंटले आहे.एका ठिकाणी संत कबीर म्हणतात

**ऐसी बाणी बोलिए,मन का आपा खोय।**
**औरन को सीतल करें आपही सीतल होय ॥**

अशी वाणी बोलावी की जेणे करून बोलणारा व ऐकणारा हे दोघेही शांत होतील.कबीरांचे विचार सकारात्मक आहेत.तुमच्या बोलण्याने समोरच्याला सुख वाटले पाहिजे,त्याचा चेहरा खुलला पाहिजे.असा आनंद बघून तुम्हाला देखील आनंद होईल

---

## ११ मे २०२४

**कठिण शब्दें वाईट वाटतें । हें तों प्रत्ययास येतें।**
**तरी मग वाईट बोलावें तें । काये निमित्य ।। दा १२ - १० - २३।।**

उत्तम पुरुष निरूपण समासाच्या २२ ते २६ या ओव्यांमधून समर्थांनी वाणीचा संयम सांगितला आहे. समाजाला एकसंध करायची जवाबदारी महंतावर येऊन पडते. माणसाच्या जिभेवर सरस्वतीचा वास असतो. तेव्हा शब्द बोलतांना याचे भान असावयास हवे. चुकीचा किंवा वाईट शब्द बोलणे हा सरस्वतीचा अपमान आहे. महंताला हे चांगले ठाऊक असावयास हवे. महंताला कित्येक लोकांशी संवाद करावा लागतो. त्यामुळे त्याने गोडच बोलायला हवे. जिभेवर साखर आणि डोक्यावर बर्फ असला की लोकसंग्रह चांगला करता येतो. महंत जर तापट असेल तर त्याने संप्रदायाची हानीच होणार आहे.

महंताने, सार्वजनिक क्षेत्रातील कार्यकर्त्याने ही ओवी कायम स्मरणात ठेवावी. कोणी आपल्याला घालून पाडून बोलले, आपला अकारण अपमान केला तर आपल्याला वाईट वाटणे सहाजिक आहे. याचा अनुभव आपण घेतलाच असेल. माझ्यात जो परमात्मा वसत आहे तोच जर समोरच्या व्यक्तीमध्ये असेल तर त्याच्या करिता मी वापरलेला कठोर शब्द हा माझ्याच करीता मी वापरत आहे असे नाही का होणार? "आत्मवत परावे ते" मी मानणार नाही काय? मी मलाच कठोर वचने अशा प्रकारे बोलण्यापेक्षा मृदु शब्दांचा प्रयोग नाही का करू शकणार? अहितकारक बोलणाऱ्याला समर्थांनी caution देऊन ठेवली आहे, ती अशी -

**जे दुसऱ्यास दुःख करी । ते अपवित्र वैखरी ।**
**आपणास घात करी । कोणी येके प्रसंगीं ।।**

कारण असे आहे कि "बोलिल्या सारखे उत्तर येते", "पेरिले ते उगवते" आणि महंत तर समाजातील आदरणीय व्यक्ति असतो. त्याचे वागणे आदर्श हवे जेणे करून लोकांनी त्याचे अनुकरण करावे.

**बोलण्यासारखें चालणें । स्वयें करून बोलणें ।**
**तयाचीं वचनें प्रमाणें । मानिती जनीं ।।**

म्हणूनच महंताने गोड बोलून लोकांना आपला आदर्श घालून दिला पाहिजे. काल आपण कबीरांचे वचन बघितले होते "ऐसी वाणी बोलिए । मन का आपा खोए । औरन को सीतल करें। आपही सीतल होय." "जगामध्ये जगमित्र, जिव्हेपासी आहे सूत्र". म्हणूनच वाचा सदैव मधूर असली पाहिजे.

---

## १२ मे २०२४ .

**आपणास चिमोट घेतला। तेणें कासाविस जाला ।**
**आपणावरून दुसऱ्याला। राखत जावें ||१२-१०-२४||**

आपल्यास कुणी चिमटा काढला तर आपल्याला वेदना होतात त्यामुळे दुसऱ्यास चिमटा घेण्याआधी याचा विचार करावा.दुसऱ्यास दुःख होईल असे बोलणे म्हणजे वाणी अपवित्र करणे होय.प्रसंगी आपले बोलणे आपलाच घात करू शकते.आपण जसे बोलतो तसेच आपल्याला उत्तरही मिळते.( Action -reaction)

**दंभ दर्प अभिमान| क्रोध आणी कठिण वचन |**
**हें अज्ञानाचें लक्षण| भगवद्गीतेंत बोलिलें ||१२-१०-२८||**

याची त्याला जाणीव असते,त्यातून बाहेर पडून,लोक सद्गुणी कसे होतील याचा तोच विचार करू शकतो आणि मार्ग दाखवतो भागवत ग्रंथात स्कंध २ मध्ये परिक्षित राजाने शुकमुनींना भागवत धर्माची व्याख्या सांगितली ते समर्थांनी सोप्या भाषेत सांगितले आहे.थोडक्यात बोली भाषेत जगा आणि जगू द्या.

---

**१३ मे २०२४**

**जे दुसऱ्यास दुःख करी । ते अपवित्र वैखरी ।**
**आपणास घात करी । कोणियेके प्रसंगी।। दा १२ - १० - २५।।**

उत्तम पुरुष लक्षणाच्या समासात दुसऱ्याला दुःख देऊ नका असे समर्थांना कित्येक ओव्यांमध्ये सांगितले आहे. पुनरुक्तीचा दोष पत्करूनही समर्थ दासबोधात कित्येक ठिकाणी तीच ती गोष्ट सांगतांना आढळतात. फार महत्वाची गोष्ट आहे, एकदा सांगून होणार नाही म्हणून समर्थांनी पुनः पुनः तीच ती गोष्ट सांगितली आहे.

या ओवीत देखील देखील वैखरीने इतरांना दुःख देऊ नका असे सांगितले आहे. या आधीच्या किती तरी ओव्यांमधून ही बाब सांगितली आहे. माणसाची वाणी गोड असली की तो समोरच्या माणसाला सहज वश करू शकतो हा समर्थांचा अनुभव आहे. समर्थ आपल्या संप्रदायिकाला देखील तसेच वागायला शिकवितात. प्रश्न हा आहे की आम्ही किती प्रमाणात हे आत्मसात करतो.

महाभारतात शिशुपाल नाव सर्वांना माहित आहे. हा शिशुपाल भगवान श्रीकृष्णाला सतत दुषणे देत असे. याची ही सवय शिसुपालाच्या मातेला ठाऊक होती. कृष्ण एकदिवस याच कारणाने शिशुपालाचा वध करील असे त्या मातेला वाटे. म्हणून तिने भगवान कृष्णाकडे मागणे मागितले की तू याला माफ कर. त्यावर भगवान श्रीकृष्णाने कबूल केले की शिशुपालाचे १०० अपराध मी क्षमा करीन पण त्याच्या १०१व्या अपराधाला मात्र क्षमा नाही. आणि १०१ व्या अपराधाला कृष्णाने शिशुपालाचा वध केला.

शिशुपालाचा वध का झाला? तर त्याच्या अपवित्र वैखरीमुळे. आज आपण दुसऱ्याला दुःख देणारे बोललो तर ते कुठे तरी आपल्या प्रारब्धात नोंदविले जाते आणि याच जन्मात किंवा पुढील जन्मात त्याचा परिणाम आपल्या वाट्याला येतो. तुम्ही पुण्य करा अथवा पाप त्याची चांगली-वाईट फळे तुम्हाला मिळणारच आहेत. कधी कुणा अत्यंत सज्जन मनुष्याला दुःख भोगावे लागते. त्याने पुर्वीच्या जन्मात केलेल्या पाप कर्माचे ते फळ असते.  एखादा दुष्ट माणूस वैभव भोगतो ते देखील त्याने केलेल्या पूर्वपुण्याइनेच.

म्हणूनच समर्थ म्हणतात की कधी कुणाला घालून पाडून बोलू नका.

---

## १४ मे २०२४

**आपल्या पुरुषार्थवैभवें |बहुतांस सुखी करावें |**
**परंतु कष्टी करावें | हे राक्षेसी क्रिया ||१२/१०/२७**

समर्थ या समासातील १५ ओवीमध्ये उत्तम पुरुषांची महत्त्वाची चार लक्षणे सांगतात.

**१)आत्मज्ञान**
**२) प्रखर वैराग्य**
**३) गोड भाषण**
**४) पुष्कळांना सुखी करणे**.

या चार गोष्टी उत्तम पुरुषाच्या आचरणात दिसतात. तो जसे बोलतो तसे वर्तन करतो.

या ओवी मध्ये समर्थांना सांगायचं आहे की आपण श्रेष्ठ पदास चढून वैभव मिळवावे त्या वैभवाने पुष्कळांना सुखी करावे, पण त्या वैभवाच्या बळावर लोकांना दुखी करणे ही राक्षसी क्रिया होय. या ठिकाणी श्रेष्ठ पद म्हणजे कोणते? वैभव कोणते ? परमार्थात श्रेष्ठ पद म्हणजे आत्मज्ञान होय.आत्मज्ञानापेक्षा काहीही श्रेष्ठ नाही.असे ज्ञान मिळून इतरांना ते ज्ञान कसे प्राप्त करावं हे सांगवे आणि सगळेजण शहाणे करून सोडावे .

उत्तम पुरुषाने सगळ्यांना आपल्याबरोबर घेऊन जावे हा महत्त्वाचा विचार समर्थांनी सांगितला ज्याला समाजाचे नेतृत्व करायचे आहे त्याचे सगळे असे प्रेमाचे संबंध हवे. समाजाचे नेतृत्व करणारे पुढारी त्याग आणि सेवा यासंबंधी जागोजागी व्याख्याने देतात. पण समाजातला भोगवाद किती चालला आहे, याकडे लक्ष नाही कारण पुढाऱ्यांच्या जीवनात तो त्याग सेवाभाव दिसून येत नाही. लोकमान्य टिळक, महात्मा गांधी आणि स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी त्या काळात सामाजिक क्रांती घडविली ती स्वतःच्या त्यागातून.

स्वामी विवेकानंद एका ठिकाणी म्हणतात भगवंताच्या चरणी जे पूर्णपणे आत्मसमर्पण करतात ते तथाकथित कार्यकर्त्यांपेक्षा जगाचे अधिक हित साधीत असतात. पूर्णतः शुद्ध बनलेला एकच महापुरुष तथाकथित शेकडो उपदेशकांहून अधिक कार्य करीत असतो. हृदयाची पवित्रता आणि वाक्‌संयम यांच्याच योगाने शब्दात चैतन्य निर्माण होते होत असते ओज निर्माण होत असते

हे परमार्थाच्या दृष्टीने झालं आणि व्यवहारात सुद्धा तसेच आहे किंवा घरामध्ये सुध्दा जो कोणी कर्ता श्रेष्ठ पुरुष असतो तो जेव्हा मोठ्या पदावर असतो त्यावेळेस तुम्हाला जे वैभव प्राप्त झालेले असते.ते वैभव म्हणजे लक्ष्मी पैसा पद प्रतिष्ठा हे तुम्ही एकट्याने मिळवले असले तरी त्यावर तुमच्या एकट्याचा अधिकार नसतो. तो पैसा भगवंत तुम्हाला देतो तर तो एकट्यासाठी देत नाही तर ते वैभव आपल्या घरातील व्यक्तीचा समाजातील लोकांचा धर्माचा देवचा, देशाचा या सगळ्यांचा त्यावर अधिकार असतो आणि तो हिस्सा प्रत्येकाला देऊन उरलेला आपण उपभोगायचा असतो. तसे न करता एकटेच उपभोगत असला तर स्वार्थी होता. इतर लोक तुमच्यावर नाराज होतात. तुमच्याकडे बघून दुःखी होऊ शकतात व दुःखी होणे ही राक्षसी क्रिया आहे. आपण तसे वागलो नाही तर स्वतः पुरते मर्यादित होतो.मग आपल्याला कोणीच ओळखत नाही. जसे आलो तसे चाललो अशी अवस्था होते.

म्हणून समर्थ म्हणतात उत्तम पुरुषाचा पुरुषार्थ अनेकांना सुखी करण्यामध्ये आहे दुसऱ्याला दुःखी करणे हे राक्षसाचा काम आहे.

---

## १५ मे २०२४

**आपण आवचितें मरोन जावें । मग भजन कोणें करावें ।**
**याकारणें भजनास लावावें । बहुत लोक ।। दा १२ - १० - ३३।।**

समर्थ दशक १ समास १ मध्ये प्रश्न विचारतात की "काय बोलिले जी येथ।" आणि उत्तरात सांगतात की भक्तीमार्ग, "मुख्य भक्तीचा निश्चयो ।". समर्थांनी जो संप्रदाय स्थापन केला त्यात इतर उद्देश्य गौण आहेत पण भक्तीमार्ग प्रमुख आहे. लोकांना रामभक्तीला लावायचे आणि त्यांना स्वस्वरूपापर्यंत न्यायचे. त्यामुळे भक्तीचा प्रसार प्रचार शिष्यांनी सतत करीत रहावा अशी त्यांची शिकवण होती. दशक १२ समा समास १० मध्ये समर्थांनी आपल्या अनुयायांना भक्तीप्रसार करायला सांगितला आहे. प्रत्येक महंताने आपल्या मागे भजन, कीर्तन करणारे अनुयायी तयार करून ठेवावे. समर्थांचे सांगणेच आहे की, "रामकथा ब्रह्माण्ड भेदून पैल्याड न्यावी" सांप्रदायिकाने "देव मस्तकी धरावा, अवघा हलकल्लोळ करावा ।" सर्वत्र हिंदू बळावला पाहिजे. भक्तीमार्गाचा प्रचार प्रसार सुलभ व्हावा म्हणून समर्थ म्हणतात -

**आमची प्रतिज्ञा ऐसी । कांहीं न मागावें शिष्यासी ।**
**आपणामागे जगदीशासी । भजत जावे।।**

समर्थांचा हा संदेश आपल्याकरिता देखील आहे हे आपण लक्षात ठेवावे.

---

## १६ मे २०२४

**आमची प्रतिज्ञा ऐसी । कांहीं न मागावें शिष्यासी ।**
**आपणामागें जगदिशासी । भजत जावें ।। दा १२ - १० - ३४।।**

समर्थांचा महंत निस्पृह असतो. तो संप्रदायिकाकडून किंवा शिष्याकडून वैयक्तिक काहीही मागत नसतो. भिक्षेतून जो निधि गोळा होतो त्यावर महंत मठाचा खर्च भागवतो. महंताचा मुख्य उद्देश्य समाज एकत्र करून भक्तीमार्गाला लावणे. धर्माच्या देव-देवतांचे महत्त्व आणि वैभव वाढविण्यावर त्याचा भर असतो.

आजच्या ओवीचा विषय कालच्या चिंतनात येऊन गेला आहे. मठाला जोडून व्यायामशाळा, मंदिर आदि उपक्रम सुरु असत. या उपक्रमासाठी भिक्षेच्या माध्यमातून निधि जमा होत असे. या साऱ्यांची व्यवस्था तो महंत या भिक्षेच्या निधीतून करीत असे.

सामान्य शिष्यावर अकारण बोजा लादला जात नसे. अनुयायांनी, शिष्यांनी भगवत् भजन, उपासना आदि आध्यात्मिक कार्य सतत करीत असावे अशी अपेक्षा समर्थांची होती. या ओवीच्या माध्यमातून समर्थ सगळ्या सांप्रदायिकांना आश्वत करीत आहेत की त्यांचेवर कोणताही आर्थिक बोजा लादला जाणार नाही. प्रत्येकाने उपासनेला हजर रहात जावे व भगवद्भक्ति करीत जावी. म्हणूनच -

**आमची प्रतिज्ञा ऐसी । कांहीं न मागावें ।**
**आपणामागें जगदिशासी भजत जावें ।।**

असे स्पष्ट आश्वासन समर्थ इथे देत आहेत. अट एकच की प्रत्येकाने भक्ती जरूर करावी. "देव मस्तकी धरावा, अवघा हलकल्लोळ करावा ।" हाच संप्रदायाचा मंत्र असे. समर्थांचे हे कार्य आजही अविरत सुरु आहे. आपण लोक समर्थ साहित्याचा अभ्यास तर करतोच पण भक्तीचा मार्ग देखील पुढे नेत आहोत. "भक्तीचेनि योगे देव निश्चये पावती मानव ।" हे आम्हाला ठाऊक आहे.

म्हणूनच आम्ही राघवाच्या या पंथावर वाटचाल करीत आहोत. समर्थांच्या या प्रतिज्ञेनुसार आम्ही देखील जगदीशाच्या भजनाचे हे कार्य निःस्वार्थ बुद्धीने पुढे नेत आहोत. येणारी पिढी देखील हाच वसा घेऊन पुढे जाणार आहे हे आश्वासन आम्ही समर्थांना देत आहोत. रामाचे महत्त्व वाढविणे हे आमचे ध्येय आहे.

---

**१७ मे २०२४**

**बोलण्यासारिखें चालणें| स्वयें करून बोलणें |**
**तयाचीं वचनें प्रमाणें| मानिती जनीं ||१२ .१०.३९ ||**

आदरणीय गोंदावलेकर महाराजांची एक कथा सांगितली जाते. एक स्त्री त्यांच्याकडे आपल्या मुलाला घेऊन आली.तो खूप गोड खायचा.ही सवय मोडावी म्हणून महाराजांनी काही उपदेश करावा अशी तिची इच्छा होती. गोड खाणे चांगले नाही.कमी खा एवढे तरी गुरु मुखातून त्याच्या कानी पडावे असे वाटत होते .महाराज म्हणाले सांगतो. तुम्ही दोघे आठ दिवसांनी परत या.

आठ दिवसांनी आल्यावर महाराज त्या मुलाला म्हणाले की बाळ फार गोड खाणे चांगले नाही.कमी खा.त्या माउलीला प्रश्न पडला की हे तर महाराज आठ दिवस पूर्वी सांगू शकले असते. तिने विचारल्यावर महाराज म्हणाले मी प्रथम गूळ खाणे थांबवले. काय होते ते अनुभवले. आता मी त्याला उपदेश करू शकतो म्हणून आठ दिवस मागून घेतले. तात्पर्य काय तर अनुभूती घेऊनच बोलावे.जे प्रत्ययास आले तेच बोलावे.आधी आचरण केल्यावरच काही बोलायचा अधिकार आपल्याला प्राप्त होतो.

बोले तैसा चाले त्याची वंदावी पाउले असे म्हणतात.बोलणे व चालणे म्हणजे वागणे यात मेळ असला पाहिजे.अन्यथा शब्द फुकट जातात.ऐकणारा जेव्हा बोलणे एक व चालणे एक पाहतो तेव्हा या माणसात काही सत्व नाही हे समजून जातो.बोलणार नाही कदाचित पण समजून जातो.त्याच्या मनातून वक्ता उतरतो.

प्रवचन निस्पृह पणाचे द्यायचे आणि व्यासपीठ सोडताना बिदागि साठी हुज्जत घालणे हे अशा विपरीत वागण्याचे उदाहरण आहे.आपले बोलणे प्रमाण कधी ठरते, अनुकरणीय कधी ठरते तर जेव्हा आपण उक्ती प्रमाणे कृती सातत्याने करतो तेव्हा.

---

**१८ मे २०२४**

**वेड्यास वेडें म्हणों नये| वर्म कदापि बोलों नये |**
**तरीच घडे दिग्विजये| निस्पृहासी ||१३-१०-२६||**

दशक तेरावा समास दहावा.' शिकवण निरूपण ' स्वधर्म -स्वराष्ट्र- कार्यकर्त्या स्वयंसेवकांस राष्ट्रगुरू समर्थांनी दिलेली ही शिकवण अत्यंत महत्त्वाची आहे.ती केव्हाही कालबाह्य ( out of date / time ) कोणत्याही काळी निरुपयोगी अशी होणार नाही.कोणत्याही काळातील लोकसेवकांस ती मार्गदर्शक व उपयुक्त अशीच आहे.शंकराचार्यांचे तत्वज्ञान श्री समर्थ इथे थोडक्यात व सोप्या पद्धतीने मांडतात.

न्यायाधीश आणि चोर, पंतप्रधान आणि चपराशी,विद्वान आणि निर्बुद्ध ही सर्व माणूस म्हणून सारखीच आहेत.कायद्याच्या पातळीवर समान आहेत.परंतु कोणताही शहाणा माणूस त्यांना सारख्याच योग्यतेचे म्हणणार नाही.याचा अर्थ खालच्या पातळीवरील माणसाने आहे त्या पातळीवरच राहावे असे मुळीच नाही.

समर्थांच्या मते अशा माणसांना त्यांच्या पातळीवर जाऊन,त्यांच्या मनोगताचा ठाव घेऊन त्यांना कळेल अशा भाषेत शिकवावे.हे लोकशिक्षणाचे कार्य करण्यात जो यशस्वी होतो त्यालाच समर्थ मोठा महंत म्हणतात.असा मोठा महंत या सामान्य माणसाची उपेक्षा न करता,त्यांना नावे न ठेवता,त्यांना शहाणे करण्यासाठी जीवन वेचतो.मनाच्या श्लोकात सुध्दा जनी निंद्य ते सोडून द्यावे असे सांगितले आहे.साधक बाधक दोन्ही गोष्टी बघून विवेकाने आचरण करायचे

---

**१९ मे २०२४**

**जीव जीवात घालावा । आत्मा आत्म्यांत मिसळावा ।**
**राहराहों शोध घ्यावा । परांतराचा ।। दा १५ - १ - ४।।**

आत्म दशकातील चातुर्य लक्षण समासातील ही ओवी आहे. समर्थांच्या मते चतुर माणसाची व्याख्या अशी आहे, "जीवाच्या अंतर्यामी रहाणाऱ्या ईश्वररूपी अंतरात्म्यास जो जाणतो तो खरा चतुर होय, भाग्यवान होय." खरा शहाणा मनुष्य प्रमुख व्यक्तीशी स्नेह जोडतो. त्यामुळे त्या संघटनेतील इतर लोक त्याला आपोआपच वश होतात. समर्थांनी सांगितलेले हे सूत्र आपण देखील लक्षात ठेवायला हवे.

लोकसंग्रह करू इच्छिणाऱ्या महंताने अशा प्रकारे लोकांचा अंतरात्मा वश करून घ्यावा. मग लोक सहज वश होतात. हे सारे कार्य विवेकाने करता येते. कोणी हा सोपा मार्ग न चोखाळता वशीकरण वगैरे मार्गाने जायचा प्रयत्न करेल तर ते प्रयोग लटके ठरतील.

ज्या व्यक्तीला वश करून घ्यायचे असेल त्याच्या जीवात महंताने आपला जीव मिसळावा. आपला अंतरात्मा त्याच्या अंतरात्म्यात मिसळावा. एक गोष्ट लक्षात ठेवावी की देह पंचभूतांचा असला तरी त्यामध्ये ईश्वर वास करीत असतो. जीव त्या अंतरात्म्या सोबत रहात असतो. हा जीवरूपी ईश्वर प्राप्त परिस्थिति प्रमाणे बदलत असतो. समोरच्या व्यक्तीच्या मनात काय आहे हे महंताला ओळखता आले पाहिजे.

महंत मानस तज्ञ असावा, म्हणजे तो समोरच्या व्यक्तीचे मन ओळखून त्याप्रमाणे त्याच्याशी संवाद करून त्याला आपलासा करून घेईल. प्रत्येकाला पुनः पुनः भेटून त्याला आपल्या कार्याकरिता आपल्या बाजूने वळविण्याची कला महंताला आली पाहिजे.

---

## २० मे २०२४

**मूर्खास वाटे मी शाहाणा । परी तो वेडा दैन्यवाणा ।**
**नाना चातुर्याच्या खुणा । चतुर जाणे ।। दा १५ - १ - १३।।**

जगात प्रत्येक जण आपापली वाट चोखाळतो. राजा राजमार्गाने जातो. आजही एखादा मंत्री जात असेल तर सारी रहदारी रोकली जाते, म्हणजे तितका वेळ तो मार्ग राजमार्ग होतो. चोरांच्या वाटा चोरांनाच ठाऊक असतात. वेडे लोक अल्पस्वार्थापायी मूर्खपणाच्या वाटेने जाऊन फसतात. आजच्या ओवीत समर्थांनी एक सत्य प्रगट केले आहे. समर्थ म्हणतात की प्रत्येक वेड्याला वाटते की तो शहाणाच आहे.

एक वेडा एकदा अचानक एका वेड्यांच्या इस्पितळात पोहोचला. इस्पितळ बंद झाले होते. दारावरच्या चौकीदाराला तो म्हणाला, "मी आरोग्य मंत्री आहे, मला आत येऊ दे." त्यावर तो चौकीदार म्हणतो, "या या आमच्या इथे सकाळ पासून तीन जण स्वतःला आरोग्य मंत्री म्हणवीत दाखल झाले आहेत. तुम्ही चौथे आहात, आमचे डॉक्टर तुमचा देखील इलाज जरूर करतील.

वेड्याला म्हणा अथवा मूर्खाला म्हणा आपण वेडा/मुर्ख आहोत हे मंजूरी नसते उलट तो इतरांना वेडा समजतो. शहाणा माणूस प्रत्येक वेळी आपल्या कृतीचे उक्तीचे निरिक्षण करतो पण वेडा मात्र कायम स्वतःला शहाणा समजत असतो. साधकाच्या मनातील गोंधळ दूर व्हावा म्हणून समर्थांनी मूर्ख लक्षणे सांगितली आहेत. त्या लक्षणांवर विचार करून आपण ती लक्षणे त्यागायचा सतत प्रयत्न करीत असतो.

चतुर मनुष्यासंबंधी देखील समर्थ या समासात सांगतात की चतुर मनुष्यच चातुर्याच्या खुणा ओळखू शकतो. चतुर मनुष्य कसा वागतो हे बघुन आपण जर त्यांच्या पाऊलखुणा ओळखू शकलो किंवा त्यांच्यात असलेली उत्तम लक्षणे आपल्यात शोधू शकलो तर आपणही चतुर म्हणविले जाऊ.

---

## २१ मे २०२४

**अवघे च म्हणती आम्ही थोर । अवघे चि म्हणती आम्ही सुंदर ।**
**अवघे चि म्हणती आम्ही चतुर । भूमंडळी ।। दा १५ १ १७।।**

भगवंताने सर्व जीव प्राण्यांमध्ये फक्त माणसालाच बुद्धि दिली आहे. या बुद्धीचा उपयोग त्याने समाज सेवा करण्यासाठी, भगवंताच्या प्राप्ति साठी करावा हे अपेक्षित आहे. बुद्धीचा दुरुपयोग होऊ नये हे प्रत्येकाने बघायला हवे. पण माणूस भलत्याच गोष्टीचा अभिमान धरतो व विचित्रपणे वागायला लागतो. अभिमान नव्हे तर दुराभिमान बाळगतो. बुद्धि ही ईश्वराने माणसाला दिलेली देणगी आहे, ही योग्य प्रमाणात असावी व तिचा योग्य वापर आम्ही करीत जावा म्हणून आपण रामाला नियमित प्रार्थना करीत असतो. -

**युक्ति नाहीं बुद्धि नाहीं । विद्या नाहीं विवंचिता ।**
**नेणता भक्त मी तूझा । बुद्धि दे रघुनायका ।।**

**किंवा**

**युक्ति असेना बुद्धि असेना शांति वसेना अंगी ।।**

भगवंतच बुद्धि देतो आणि त्याचा वापर देखील तोच करायला शिकवितो. ही जाणीव नसेल तर 'घरी कामधेनु पुढे ताक मागे' अशी अवस्था होते. या समासात १५ व्या ओवीत म्हटले आहे कि राज्य सोडून राजा भीक मागत फिरतो आहे. नुसती बुद्धि असून चालत नाही, तिचा फाजील अभिमान नको असे समर्थ आपल्याला सांगत आहेत.

अन्यथा प्रस्तुतच्या ओवीत सांगितल्याप्रमाणे अवस्था होते. कुणाला आपल्या (नसलेल्या) सौंदर्याचा अभिमान असतो तर कुणाला आपल्या चातुर्याचा फुकाचा अभिमान असतो. परमेश्वराने माणसाला हा वृथा अभिमान देऊन संसारात गुंतवून ठेवले आहे. अभिमान अंगी असल्यामुळे कोणीही स्वतःला लहान समजून घेण्यास तयार नसतो. शहाणे लोक ही गोष्ट बरोबर ओळखून असतात.

**लटिक्याचा साभिमान घेणें । सत्य अवघें च सोडणें ।**
**मूर्खपणाचीं लक्षणें । ते हे ऐसी।। २०।।**

वृथा अभिमान हा मूर्खपणा आहे असे समर्थ म्हणतात. स्वतःला प्रधान सेवक म्हणविणे हा मोदींचा नम्रपणा आहे. संस्कृत विश्वविद्यालयाचे कुलपति स्वतःची ओळख शिक्षक अशी सांगतात असा नम्रपणा थोरांच्या अंगीच असतो पण अर्ध्या हळकुंडाने पिवळा झालेला माणूस वृथा अभिमान बाळगतो.

---

## २२ मे २०२४

**दुसऱ्याचे चालणी चालावें| दुसऱ्याचे बोलणीं बोलावें |**
**दुसऱ्याचे मनोगतें जावें| मिळोनियां ||१७|| १५ .६.१७**

चातुर्य विवरण समासात ही ओवी आली आहे लोकसंग्रह करणा-या माणसाने कोणास नाराज करू नये.आपले मन दुस-याच्या मनाशी मिळवून वागावे.

प्रारब्ध रेखा पुसता येते हा विश्वास समर्थ या समासात देतात.त्यासाठी चातुर्य हवे.माणसाने स्वतः विचार केला पाहिजे.खूप लोकांचे ऐकून प्रत्यक्ष अनुभव हाच प्रमाण मानला पाहिजे.खरे खोटे ठरवायचा तोच योग्य मार्ग आहे.ही प्रचीती घेणे हे मनाचे बुद्धी चे काम आहे.कोणाला दुखवू नये.

पुष्कळांचे मन सांभाळणे अगदी हेकट माणसाचे सुद्धा प्रसंगी ऐकावे. वाकड्यात शिरणे दीर्घकाळाचा विचार करता तापदायक ठरते. समरस होऊन आपलेसे करावे. अगदी आवश्यक पडले तर नंतर उलथून पाडावे. आपले अंतरंग उघड होता कामा नये.

शिवाजी महाराजांनी हे चातुर्य वापरून अनेक माणसे जोडली.जी तरीही वाकड्यात शिरली,त्यांचे पारिपत्य योजना आखून गुप्त पणे केले.जावळीचे चंद्रराव मोरे यांचे पारिपत्य असे केले.आधी मन वळवण्याचा खूप प्रयत्न केला. प्रस्तुत श्लोकात समर्थ ही वागण्याची खुबी समजावून सांगत आहेत. दुस-याच्या अंतरंगात शिरण्यासाठी त्यांचे विचार वर्तन जाणून घेतले पाहिजे.त्यांच्याशी सहमती दर्शवली नाही तर कोणी आपल्याला त्यांच्या निकट येऊ देणार नाहीत.सामाजिक कार्यकर्ता एखाद्या क्षेत्रात कार्य सुरू करतो तेव्हा काय करतो? प्रथम त्या लोकांमधे जाऊन मिसळतो,रहातो,उठतो बसतो, त्यांच्या सुख दु:खात सहभागी होतो,अडि अडचणी निवारणाचा प्रयत्न करतो.मग कुठे लोकांना त्याचा विश्वास वाटतो. ते आपले हृदय त्याच्या पाशी मोकळे करतात.त्याला आपला म्हणून सामावून घेतात.

लोक संग्राहक कोणीही असो त्याला दुसऱ्याच्या मनोगताशी सहमत होणे गरजेचे असते.हा आपल्या हिताचा आहे, विश्वासार्ह आहे हे पटवून देणे ही कार्यकर्त्यांचीच जबाबदारी असते.जोपर्यंत मन जुळत नाहीत तोवर अंतर दुरावा रहातो.एक विचार झाला की संशय संघर्ष विकल्प संपून जातात.मनाची उकल करण्यासाठी जोडून घेण्यासाठी हे गरजेचे आहे हे समर्थ आपल्याला समजावून सांगत आहेत. आपल्या ध्येयासाठी माणसे जोडताना ती विचारांनी ,भावनांनी ,सुख दु:खांनी जोडावी लागतात.प्रसंगी पड खाऊनही हे करावे लागले तरी ते करावे यातच शहाणपण चातुर्य व दीर्घ दृष्टी आहे.

---

## २३ मे २०२४

**आधीं अंतर हातीं घ्यावें| मग हळुहळु उकलावें |**
**नाना उपायें न्यावें| परलोकासी ||१५-६-१९||**

संपूर्ण दासबोधात चातुर्यलक्षणाचे ३ समास आहेत.

**१) १४-६**
**२) १५-१**
**३) १५-६**

तीनही समासात कार्य करत्याने/ साधकाने कसे वागावे हे सांगितले आहे. अवगुणांचा त्याग कसा करावा? पारमार्थिक माणसाने अवगुणी असणे,ही गोष्ट परमार्थाला कमी पणा आणणारी आहे.माणूस प्रयत्नांच्या साहृयाने सद्गुण आत्मसात करू शकतो.पण ळशी माणूस गुण संपादनासाठी काहीही करत नाही.उलट आपले अवगुण झाकण्यासाठी तो आध्यात्मिकतेचा आव आणतो.असा मनुष्य व्यवहारात तर अपयशी होतोच.पण त्याचबरोबर आध्यात्मिक जीवनातही तो काहीच प्राप्त करू शकत नाही.

पारमार्थिक माणसाचा व्यवहार उत्तम असला पाहिजे.त्याचा प्रपंच नेटका आणि संपन्न असला पाहिजे.त्याच्याजवळ व्यवहार चातुर्य असले पाहिजे.कुणाचे अंत:करणं दुखवू नये.यावर समर्थांचा खूप भर आहे.कार्य करताना काही विक्षिप्त माणसे भेटतात.त्यांचे म्हणणे ऐकून घ्यावे.त्यांना तात्पुरते ‘ बरोबर ‘ असे म्हणावे, पण निर्णय घेताना जे योग्य असेल तेच करावे.लोकांचे नादी लागायचे नाही याचा अर्थ त्यांना दुखवावे असा मुळीच नाही.दुसऱ्याचे मन जिंकणे खरोखर कठीण आहे. परंतु सार्वजनिक जीवनात ज्याला नेतेपद सांभाळायचे आहे,त्याला खूप सोसावे लागते.अपमानाचे अनेक प्रसंग वाट्याला येतील,ते सारे गिळून टाकावे लागतात.

समुदायातील प्रत्येक व्यक्तीशी सामंजस्याचे संबंध निर्माण करावे.जे योग्य आहे ते प्रसंगमान साधून समजावून सांगावे व अनेक उपाय करून चुकीच्या निर्णयाकडून योग्य निर्णयाकडे न्यावे.

---

**२४ मे २०२४**

**प्रसंग जाणोनि बोलावें । जाणपण कांहींच न घ्यावें ।**
**लीनता धरून जावें । जेथतेथें ।। १५ - ६ - २३।।**

चातुर्य विवरणाच्या या समासात प्रथम शाई तयार करणे, बोरू तयार करणे, लिहीणे वगैरेची चर्चा समर्थांनी केली आहे. रेखा तितुकी पुसोन जाते हे सांगतांना समर्थांनी कर्मरेखा देखील आपल्या कर्तृत्वाने पुसता येते हे सांगितले आहे. समर्थ प्रयत्न वादाचे पक्के पुरस्कर्ते आहेत हे आपल्या लक्षात येते. प्रयत्नाला समर्थ देव म्हणतात. "यत्न तो देव जाणावा" हे त्यांचे म्हणणे आपल्याला माहितच आहे. पुढे आपल्या महंताला उपदेश देतांना समर्थ म्हणतात -

**धक्के चपेटे सोसावे । नीच शब्द साहात जावे ।**
**प्रस्तावोंन परावे । आपले होती ।।**

महंताला लोकसंग्रह करायचा आहे म्हणून त्याने प्रत्येकाचे म्हणणे ऐकून घ्यावे. जो चुकीचे बोलतो तो आज ना उद्या पश्चाताप करून आपला अनुयायी होईल. आपण आपल्याकडे कमीपणा घ्यावा. प्रसंग जसा असेल त्या अनुरूप बोलावे. उगाचच आपले शहाणपण मिरवू नये. महंताने लोकांसमोर आपले ज्ञान पाजळण्यापेक्षा लोकांच्या ज्ञानाची खोली तपासावी.

**कुग्रामें अथवा नगरें । पाहावी घरांची घरें ।**
**भिक्षामिसें लहानथोरें । परीक्षून सोडावीं ।।**

समर्थांनी भिक्षेच्या निमित्ताने कित्येक मुलांना आपल्या संप्रदायात घेऊन पुढे त्यांना महंत बनविले होते. आपल्या महंतांना देखील समर्थ हीच युक्ति सांगत आहेत. गावोगाव भिक्षा मागतांना आपल्या संप्रदायास कामास येतील अशी मुले हेरून त्यांना आपल्या संप्रदायात सामिल करून घ्यावे. महंत मन मिळावू स्वभावाचा असेल, लोकांचे म्हणणे ऐकून घेणारा असेल तर हे कार्य सहज शक्य होते.

आजच्या या ओवीने या उपक्रमाची सांगता होत आहे. आपण सर्वांनी आमचा उत्साह सतत वाढविला व त्यामुळे पुष्कळ जण या उपक्रमात लेखनास प्रवृत्त झाले. एकंदर वाचकांचा व लेखकांचा उत्साह बघून असाच उपक्रम पुढेही राबवावा असे वाटते. समर्थ प्रेरणा देतील तसेच घडेल. या उपक्रमाला भरभरून आशिर्वाद दिल्याबद्दल मी आपल्या हृदयस्थ परमेश्वरास प्रणाम करतो, माझ्या प्रणामाचा कृपया स्वीकार व्हावा.